डिसेंबर २०२० – जानेवारी २०२१/पाने ९२/किंमत ₹१०

लोकराज्य

एक वर्ष महाराष्ट्र सेवेचे महाविकास आघाडीचे

महाराष्ट्र थांबला नाही. थांबणार नाही.

महामानवाला अभिवादन

चैत्यभूमी येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करताना राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, विधानसभा अध्यक्ष नाना पटोले, मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य मंत्री धनंजय मुंडे आदी.

दरवर्षी महापरिनिर्वाण दिनानिमित्त सागराशी स्पर्धा करणारा भीमसागर येथे येतो. परंतु या वर्षी कोरोनाच्या संकटकाळात भीमसैनिकांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६४ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आपल्या शिस्तीचे व संयमाचे दर्शन घडवले. बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी मोजकीच गर्दी होती, त्यातही कमालीची शिस्त पाळण्यात आली. या वेळी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, विधानसभा अध्यक्ष नाना पटोले, मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य मंत्री धनंजय मुंडे, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले तसेच ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार आदी नेत्यांनी चैत्यभूमी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले.

अंतरंग

खंबीर आणि पारदर्शक ६

महाविकास आघाडीच्या सरकारला एक वर्ष पूर्ण झाले. बहुमत सिद्ध केल्यावर विधिमंडळाच्या सभागृहात मी एक भाषण केले होते, त्यात स्पष्टपणे म्हणालो होतो की, मी मैदानातला माणूस आहे आणि आता सभागृहात आलोय. सर्वांना अभिमान वाटेल असा महाराष्ट्र घडवून दाखवू. महाराष्ट्राचे भले व्हावे आणि नागरिकांच्या आयुष्यात सुख यावे, यासाठी आम्ही घेतलेल्या ठोस निर्णयांचे लोकांकडून स्वागतच होत आहे हे पाहून समाधान वाटते.

महाविकासाला गती ९

राज्यातील महाविकास आघाडी सरकारची वर्षपूर्ती ही राज्याच्या सर्वांगीण प्रगतीच्या, जनतेच्या आशा, आकांक्षा, अपेक्षांच्या पूर्ततेच्या दिशेने सुरू असलेल्या प्रयत्नांची वर्षपूर्ती आहे. राज्यातील जनता महाविकास आघाडी सरकारकडे आपले सरकार म्हणून बघतेय, हेच सरकारचे सगळ्यात मोठे यश आहे. सर्व समाजघटकांना सोबत घेऊन कोरोनासंकटाशी लढा, अशा अनेक बाबींनी सरकारवरील जनतेचा विश्वास अधिक वाढला आहे.

महसूल : तंत्रज्ञानावर भर १६

गत वर्षात अस्मानी संकट आणि कोविड-१९ या जागतिक आपत्तीला सामोरे जावे लागले. या संकटाच्या काळात जेव्हा संपूर्ण राज्य बंद करण्याची वेळ आली तेव्हा सरकारी रुग्णालय, जिल्हाधिकारी, तहसीलदार, तलाठी यांच्यासह विविध विभागातील अधिकारी/कर्मचारी यांनी संकटाच्या समयी अहोरात्र काम केले, करत आहेत. राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी लोकाभिमुख निर्णय घेतले जात आहेत.

खंबीर आणि पारदर्शक	६
महाविकासाला गती	९
नागरी जीवनमान सुखकर	१२
सिंचनातून बहरणार शेती	१४
महसूल : तंत्रज्ञानावर भर	१६
उद्योगात नवविश्वास	१८
रस्त्यांचे रूप पालटणार	२०
अन्नधान्य वितरणात विक्रम	२२
कामगारांना मदतीचा हात	२४
कौशल्य विकास व रोजगार	२६
पोलिसांमध्ये विश्वास	२८
किमती नियंत्रणात, पुरवठा सुरळीत	३०
कोरोनाशी यशस्वी लढा	३२
समर्थ गावांच्या दिशेने	३४
ऊर्जाविकासाचे प्रकाशपर्व...	३६
दर्जेदार शिक्षणाची पायाभरणी	३८
स्वस्त व परवडणारी घरे	४०
पशुधनात वृद्धी, खेळाडूंना संधी	४२
आपत्तीत शासन पाठीशी	४४
वैद्यकीय शिक्षणाला बळकटी	४८
विद्यार्थिहित अग्रस्थानी	५०
कृषी विस्तारातून प्रगती	५२
वनसंवर्धन : नवी पावले	५४
गावांना शुद्ध पाणी	५६
आदिवासींचा समग्र विकास	५८
प्रत्येक हाताला काम	६०
कर्जमुक्त शेतकरी	६२
सुरक्षित प्रवास...	६४
मत्स्यव्यवसायाला उभारी	६६
सक्षम महिला, सुदृढ बालक	६८
जलसंधारणातून जलसमृद्धी	७०
सामाजिक न्याय केंद्रस्थानी	७२
पर्यावरणपूरक विकास	७४
जनकल्याणासाठी बांधील	७६
माहिती तंत्रज्ञान यशस्वी	७७
विकासासाठी अर्थचक्राला गती	७८
वंचितांना भक्कम आधार	७९
सर्वसामान्यांना दिलासा	८०
शाश्वत विकासाला अग्रक्रम	८१
आश्वासक वाटचाल	८२
प्लास्टिकमुक्तीचा निर्धार	८३
सामान्यांच्या हिताची जपणूक	८४
उद्योग, पर्यटनाला चालना	८५
प्रेस स्वातंत्र्य : डॉ. आंबेडकरांचा दृष्टिकोन	८६
मंत्रिमंडळात ठरले !	८८
शिक्षक रणजितसिंह डिसले यांचा सन्मान	९०

वर्ष ७२ वे | अंक ५ | डिसेंबर २०२० – जानेवारी २०२१

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

- मुख्य संपादक — डॉ. दिलीप पांढरपट्टे
- प्रबंध संपादक — अजय अंबेकर, गोविंद अहंकारी
- संपादक — अनिल आलूरकर
- उपसंपादक — प्रवीण कुलकर्णी, गजानन पाटील, राजाराम देवकर
- वितरण अधिकारी — मंगेश वरकड
- वितरण साहाय्य — अश्विनी पुजारी
- साहाय्य — भारती वाघ
- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, सुशिम कांबळे
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — उमा नाबर
- मुद्रण — मे. मुद्रण प्रिंट एन पॅक प्रा.लि., कोपरखैरणे, नवी मुंबई.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई–४०० ०३२.
E-mail : lokrajya2011@gmail.com

ई – लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमत असेलच असे नाही.

महाराष्ट्र घाबरला नाही.. घाबरणार नाही..

जनतेच्या विश्वासाच्या बळावर स्थापन झालेल्या राज्यातील महाविकास आघाडी सरकारने वर्षपूर्ती केली असून, कितीही संकटे आली तरी महाराष्ट्र घाबरला नाही, घाबरणार नाही असे सांगतानाच जनतेच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी दिली.

सह्याद्री अतिथिगृह येथे महाविकास आघाडी शासनाच्या वर्षपूर्तीनिमित्त माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित पुस्तिकेचा प्रकाशन सोहळा झाला, त्या वेळी श्री. ठाकरे बोलत होते. मुख्यमंत्री श्री. ठाकरे पुढे म्हणाले, जनतेच्या आशीर्वादामुळे तीन पक्षांचे सरकार वर्षभरापूर्वी अस्तित्वात आले. संत गाडगेबाबांच्या दशसूत्रीनुसार हे शासन काम करत असून, वर्षभरात नैसर्गिक संकटांना तोंड देत राज्यातील जनतेच्या पाठीशी हे सरकार ठामपणे उभे आहे. नैसर्गिक आपत्तीत बळीराजाला सावरतानाच कोरोनाच्या संकटात सर्वसामान्यांच्या रक्षणासाठी भक्कमपणे काम केले जात आहे.

मुख्यमंत्री श्री. ठाकरे, खासदार शरद पवार, उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, उद्योगमंत्री सुभाष देसाई, माहिती व जनसंपर्क राज्यमंत्री कु.आदिती तटकरे, सचिव तथा महासंचालक डॉ. दिलीप पांढरपट्टे यांच्या हस्ते 'महाराष्ट्र थांबला नाही, थांबणार नाही' या पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. वर्षभरात घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांचे प्रतिबिंब या पुस्तिकेत उमटले असून, पुस्तिकेच्या उत्तम निर्मितीबद्दल मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांनी कौतुक केले.

वर्षभरात संकटग्रस्तांना धीर देण्याचे काम या शासनाने केले आहे. त्यामुळे संकटकाळात बळीराजा कधी रस्त्यावर आला नाही. - **खा. शरद पवार**

जनतेच्या विकासासाठी हे सरकार बांधील आहे. या शासनाची वर्षपूर्ती ही समर्थ महाराष्ट्राला घडवणाऱ्या निर्धाराची वर्षपूर्ती आहे. कोरोनायोद्ध्यांचे मी आभार मानतो. कोरोना काळात विकासकामांना खीळ बसणार नाही. **- अजित पवार, उपमुख्यमंत्री**

महाविकास आघाडीचे सरकार किमान समान कार्यक्रमावर काम करत असून, अतिवृष्टी, चक्रीवादळ, कोरोना या संकट काळात राज्याने नागरिकांना विविध उपाययोजनांतून दिलासा दिला आहे. **- बाळासाहेब थोरात, महसूल मंत्री**

संकटांवर मात, विकासाला गती

राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा...

कवी गोविंदाग्रजांच्या कवितेतील ही ओळ अगदी चपखलपणे महाराष्ट्राचे वर्णन करणारी आहे. आपले राज्य किती राकट नि कणखर आहे याची प्रचिती पावलोपावली येते आणि जगावर अथवा देशावर एखादे संकट ओढवले असेल तर नक्कीच येते. तीच परंपरा कायम ठेवत गेल्या वर्षभरात राज्य शासन असंख्य अडचणींचा सामना करत सर्वसामान्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले.

गतवर्षी २८ नोव्हेंबर रोजी राज्यात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडी सरकारच्या मंत्रिमंडळाने शपथ घेतली. ऐतिहासिक क्षणांचा साक्षीदार असलेल्या शिवाजी पार्क मैदानावर हा शपथविधी सोहळा पार पडला. त्याला एक वर्ष पूर्ण झाले. नवीन सरकार आल्यानंतर सर्व यंत्रणा नव्या उत्साहाने, जोमाने कामाला लागते, यात शंका नाही. मात्र, यंदा उत्साह कमी करणाऱ्या अनेक संकटांची मालिका राज्यावर कोसळली, तरी महाराष्ट्राने आपला कणखरपणा वेळोवेळी दाखवून दिला.

क्यार, महा व निसर्ग चक्रीवादळ, अवकाळी पाऊस, अतिवृष्टी, पूरपरिस्थिती, गारपीट यामुळे अतोनात नुकसान झाले. नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीबरोबरच पायाभूत सुविधांचेही मोठे नुकसान झाले. घरांची मोठ्या प्रमाणावर पडझड झाली. विद्युत यंत्रणा कोलमडली. भरीस भर म्हणून मार्च महिन्यापासून कोरोना विषाणूचे संकट आपल्यासमोर उभे ठाकले. संकटांची ही मालिका संपणारी नव्हतीच; पण महाराष्ट्र घाबरला नाही आणि घाबरणारही नाही, हे विधान यानिमित्ताने सार्थ ठरले.

राज्यावर आलेल्या संकटांशी सामना करत त्यावर नियोजनपूर्वक मात करण्यात राज्य शासनाला यश आले. सर्वसामान्य जनतेचा सरकारवरील विश्वास आणि मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व त्यांचे सहकारी मंत्री यांचा निर्धार तसेच तत्पर प्रशासन हेच या यशाचे गुपित.

अनेक संकटांचा सामना करत असताना महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत राज्यात लॉकडाऊन असतानादेखील जुलै २०२० पर्यंत ९७ टक्के लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला. ३० लाखांहून अधिक शेतकऱ्यांना लाभ देण्यात आला. सुमारे ८६ लाख शेतकऱ्यांना पीकविमा रकमेचे वाटप करण्यात आले. शिवभोजन थाळीच्या माध्यमातून अवघ्या ५ रुपयांत गोरगरिबांसाठी जेवणाची सोय करण्यात आली.

कोरोना प्रतिबंधासाठी 'माझे कुटुंब, माझी जबाबदारी' हे व्यापक अभियान राबवण्यात आले. महात्मा फुले जनआरोग्य योजनेचा लाभ सर्व नागरिकांना देण्याचा निर्णय घेण्यात आला. नैसर्गिक आपत्तिबाधित नागरिकांना १३ हजार कोटी रुपयांहून अधिक मदतीचे वाटप करण्यात आले. हे सर्व करत असताना या संकटकाळात विकासकामांना खीळ बसणार नाही, याचीही खबरदारी घेण्यात आली.

इंदू मिल येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्मारक उभारणीला वेग देण्यात आला. कृषिपंप वीजजोडण्यांसाठी नवीन धोरण जाहीर करण्यात आले. त्याअंतर्गत १ लाख कृषी ग्राहकांना सौर कृषिपंपाद्वारे वीजजोडणी दिली जाणार आहे. शेतकऱ्यांकडून हमीभावाने गेल्या १० वर्षांतील विक्रमी कापसाची खरेदी केली गेली. सुमारे ९ लाख घरांच्या निर्मितीसाठी महाआवास अभियान (ग्रामीण)चा शुभारंभ करण्यात आला. उद्योगवाढीला चालना देण्यासाठी उद्योगांसाठी ४० हजार एकरची 'लॅण्ड बँक' तयार करण्यात आली. 'ईज ऑफ डुईंग बिझनेस'अंतर्गत ६६ हजार कोटींचे गुंतवणुकीचे प्रस्ताव आले. 'महाजॉब्स पोर्टल'अंतर्गत स्थानिकांना रोजगार मिळवून दिला गेला.

'शौकसे आए बुरा वक्त अगर आता है,
हमको हर हालमें जीनेका हुनर आता है'

हेच आपण सर्वांनी या संकटात सिद्ध केले.

शासनाच्या विविध विभागांमार्फत वर्षभरात सर्वसामान्यांसाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी करण्यात आली; याची उद्‌बोधक व नेमकी माहिती मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व त्यांच्या सहकारी मंत्र्यांनी आपल्या लेखात दिली आहे.

वर्षभरातील शासनाच्या कामगिरीचा आढावा घेणारा डिसेंबर २०२० - जानेवारी २०२१ चा हा वर्षपूर्ती विशेषांक आपणास आवडेल, असा विश्वास आहे.

डॉ. दिलीप पांढरपट्टे
(मुख्य संपादक)

महाविकास आघाडीच्या सरकारला एक वर्ष पूर्ण झाले. बहुमत सिद्ध केल्यावर विधिमंडळाच्या सभागृहात मी एक भाषण केले होते, त्यात स्पष्टपणे म्हणालो होतो की, मी मैदानातला माणूस आहे आणि आता सभागृहात आलोय. सर्वांना अभिमान वाटेल असा महाराष्ट्र घडवून दाखवू. एक वर्ष म्हणजे काही मोठा काळ नव्हे. पण महाराष्ट्राचे भले व्हावे आणि नागरिकांच्या आयुष्यात सुख यावे, यासाठी आम्ही घेतलेल्या ठोस निर्णयांचे लोकांकडून स्वागतच होत आहे हे पाहून समाधान वाटते.

खंबीर आणि पारदर्शक

उद्धव बाळासाहेब ठाकरे
मुख्यमंत्री

सत्तेत असो किंवा नसो, आम्ही जनतेच्या प्रश्नांना नेहमीच उचलून धरले. आम्ही नेहमीच शिवसेनाप्रमुख बाळासाहेबांनी दाखवलेल्या मार्गावर चालत राहिलो आहोत. त्यामुळे मी ज्या जबाबदारीच्या खुर्चीवर बसलो आहे त्याची मला जाणीव आहे. या ठिकाणी आल्यावर मला लोकांच्या समस्यांकडे आजपर्यंत किती वरवर पाहिले जात होते ते दिसले. राज्यातील आरोग्य व्यवस्था आजवर किती दुर्लक्षित होती आणि तिला किती प्राधान्य होते तेही दिसले.

मी या पदावर आलो आहे ते जनतेच्या समस्यांवर शाश्वत तोडगा काढण्यासाठी. त्यामुळे मूलभूत समस्यांना कायमस्वरूपी सोडवण्यासाठीच प्रयत्न केले जातील.

विषाणूशी लढताना नवे उपाय

कोरोनाकाळात राज्य सरकारने जम्बो सुविधा उभारल्या. १५ दिवसांत देशातले पहिले फील्ड हॉस्पिटल बांद्रा-कुर्ला संकुलात उभारले. शहरांमध्ये कोविड सेंटर्स उभारली, वैद्यकीय सुविधा वाढवल्या, अनेक चाचण्या, उपचार सर्व नागरिकांसाठी मोफत उपलब्ध करून देण्यात आले.

मुंबईत धारावी, वरळीसारख्या ठिकाणी उद्रेकाविषयी आम्हाला चिंता होती, मात्र तेथील नियोजनाचे अगदी आंतरराष्ट्रीय पातळीवर कौतुक झाले. राज्याचा रुग्ण बरे होण्याचा दर आज ९५ टक्के आहे.

काही ठळक गोष्टी सांगतो. 'माझे कुटुंब, माझी जबाबदारी'सारखी देशातील नावीन्यपूर्ण अशी आरोग्य सर्वेक्षण मोहीम आम्ही राबवली आणि कोविडचा संसर्ग रोखण्याची सुरुवात झाली. महात्मा फुले जनआरोग्य योजनेत जनतेला मोफत आरोग्य उपचार देण्यात येत असून सर्व खासगी व धर्मादाय रुग्णालयांमधील एकूण खाटांच्या ८० टक्के खाटा कोरोना व अन्य रुग्णांच्या उपचारासाठी राखीव ठेवण्यात आल्या. कोरोना चाचण्यांसाठी सर्वात कमी दर आज महाराष्ट्रात आहे. ऑक्सिजन उत्पादन करणाऱ्यांना वैद्यकीय क्षेत्रासाठी ८० टक्के आणि उद्योगांसाठी २० टक्के प्राणवायू देण्याचे बंधनकारक करणे असो किंवा मास्कची किंमत कमी करण्यासाठी पुढाकार घेणे असो, महाराष्ट्राने सर्वसामान्य नागरिकांना कोरोनाची कमीतकमी झळ बसावी म्हणून ठोस निर्णय घेतले. आज सुमारे ५०० प्रयोगशाळा राज्यात आहेत. काही महिन्यांपूर्वी कोरोना रुग्णांच्या वाढत्या संख्येत महाराष्ट्र प्रथम क्रमांकावर होता. आज झपाट्याने कोविड रुग्ण वाढत असलेल्या १५ राज्यांत महाराष्ट्र नाही हे आपल्या प्रयत्नांचे फलित आहे.

कोरोनाच्या दुसऱ्या लाटेची किंवा ब्रिटन, युरोपमधल्या बदललेल्या कोरोना विषाणूची चिंता आम्हालाही आहे. आम्ही पूर्ण सावधगिरी बाळगून पावले उचलत आहोत.

२ लाख कोटींची गुंतवणूक

या सगळ्या संकटातून देशाची अर्थव्यवस्थाही सुटली नाही. पण, राज्य सरकारने महाराष्ट्राला या अनेकविध संकटांतून

आकुर्ली (कांदिवली) स्टेशनची पाहणी करताना मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे.

लढाई समर्थपणे लढतोय

नवे सरकार स्थापन झाल्यानंतर काही महिन्यांतच कोरोनासारखे महाभयानक जागतिक संकट ओढवले. मुंबईत कोरोनाची तीव्रताही अधिक होती. त्या पाठोपाठ कोकण किनारपट्टीला निसर्ग चक्रीवादळाचा जोरदार तडाखा बसला. नंतर क्यार चक्रीवादळ, अतिवृष्टी अशा एकामागोमाग एक येत असलेल्या संकटांनी आपल्या सरकारची परीक्षाच घेतली. मात्र, या सर्व खडतर परीक्षांमध्ये आम्ही न डगमगता पुढे जातोय.

वर्षभरात सुमारे २०० निर्णय आम्ही मंत्रिमंडळाच्या बैठकांमध्ये घेतले आहेत. आज १० महिने झाले आपण कोरोनाशी लढतो आहोत. मात्र, उपमुख्यमंत्री अजित पवार, आरोग्य मंत्री राजेश टोपे, महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, गृहमंत्री अनिल देशमुख आणि इतर सर्वच मंत्री, विधिमंडळ सदस्य, लोकप्रतिनिधी यांच्या साथीने राज्य सरकारने अतिशय विचारपूर्वक आणि योजनाबद्ध पद्धतीने ही परिस्थिती हाताळली. पोलीस, हॉस्पिटल्स आणि इतर सर्व प्रकारच्या अत्यावश्यक सेवेतील व्यक्तींनीही सरकारला उत्तम साथ दिली. सर्वात महत्त्वाचे म्हणजे आम्ही या कोरोना लढ्यात कुठेही लपवाछपवी केली नाही, पारदर्शकता ठेवली.

बाहेर काढत पुन्हा प्रगतिपथावर नेण्याचा चंग बांधला. सगळीकडे कंपन्या बंद पडत असताना महाराष्ट्रात मात्र मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होत आहे.

गेल्या वर्षभरात महाराष्ट्राने २ लाख कोटींची गुंतवणूक आकर्षित केली आहे. हे सगळं कागदावर नाही, तर सामंजस्य करार झालेल्या ६० ते ७० टक्के उद्योगांना सुविधा देण्याचे काम सुरू आहे. माझे सहकारी मंत्री सुभाष देसाई हे यामध्ये प्रकर्षाने लक्ष घालत आहेत. आमची बांधिलकी जनतेच्याप्रति आहे, हे आम्ही कधीही विसरलो नाहीत. राज्याची आर्थिक परिस्थिती ठीक नसतानासुद्धा जे योग्य आणि जनतेच्या भल्याचे आहेत असे निर्णय आम्ही घेतले आहेत. कोरोनाकाळात केंद्राच्या अन्नसुरक्षा योजनेत समाविष्ट होऊ न शकलेल्या ३ कोटी ८ लाख एपीएल म्हणजे केशरी कार्डधारकांना अगदी ऑगस्टपर्यंत राज्य शासनाने अल्प दराने धान्य पुरवले. केंद्र शासनाकडून २१ रुपये किलोने घेतलेले गहू ८ रुपये प्रतिकिलोने, तर २२ रुपये प्रतिकिलोने घेतलेले तांदूळ १२ रुपये प्रतिकिलोने कार्डधारकांना देण्यात आले.

शिष्यवृत्तीही जमा

जवळपास २ लाख अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांची मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, फ्रीशीपची शिष्यवृत्ती देण्यात आली. ज्येष्ठ दिव्यांग नागरिकांना रेशन, जीवनावश्यक वस्तूंचे वाटप, त्यांच्यासाठी मदत कक्ष, कम्युनिटी किचनच्या माध्यमातून एकट्या राहणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना मोफत जेवण देण्यात आले.

बेरोजगारांच्या हातांना काम

कोरोनाच्या संकटामुळे निर्माण झालेल्या बेरोजगारीवर उपाययोजना करताना कौशल्य विकास विभागाने राज्यभर ऑनलाइन रोजगार मेळावे आयोजित केले. महास्वयंम वेबपोर्टलच्या माध्यामातून विविध उपक्रमाच्या आधारे जानेवारी ते नोव्हेंबर अखेरपर्यंत राज्यात एकूण १ लाख ६४ हजार ७२३ बेरोजगारांना रोजगार मिळाला. कोविडमध्ये गरिबांच्या हाताला काम मिळावे म्हणून पूर्ण काळात रोजगार हमी योजनेची कामे मोठ्या प्रमाणात हाती घेण्यात आली. ७ लाखांहून अधिक मजुरांच्या हाताला काम मिळाले.

माथाडी कामगारांसाठीही शासनाने अनेक निर्णय घेतले. यामध्ये माथाडी कामगारांचा अत्यावश्यक सेवेतील घटक म्हणून समावेश करण्यात आला आणि त्यांनाही ५० लाख रुपयांचे विमा कवच

एक वर्ष महाराष्ट्र सेवेचे
महाविकास आघाडीचे

देण्यात आले. १ लाख २८ हजारांहून अधिक माथाडी कामगारांना या विमा योजनेचे सुरक्षा कवच मिळाले.

पूरग्रस्त, अतिवृष्टिग्रस्तांना मदत

पूरग्रस्त आणि अतिवृष्टिग्रस्तांसाठी १० हजार कोटी रुपये घोषित केले. अडीच हजार कोटी रुपये आपण लगेच उपलब्ध करून दिले आणि त्यातली ९५ टक्के रक्कम शेतकऱ्यांना मिळाली.

गेल्या वर्षभरात विविध नैसर्गिक आपत्ती, कोरोना काळात श्रमिकांची प्रवास व्यवस्था व इतर कारणांसाठी आम्ही साडे तेरा हजार कोटी उपलब्ध करून दिले आहेत. आज कोरोनामुळे एकूणच शिक्षणाचा प्रश्न उभा राहिला आहे. त्यासाठी ऑनलाइन शिक्षणाचे अनेक पर्याय उपलब्ध करून दिले गेले.

सर्वसामान्यांसाठी निर्णय

अवघ्या ५ रुपयातल्या शिवभोजन थाळीने २.७५ कोटींपेक्षा जास्त भुकेलेल्यांची भूक भागवली आहे, तीसुद्धा कोरोना काळात. डीपीडीसी/अनुसूचित जाती जमाती घटक कार्यक्रमासाठी १०० टक्के निधी दिला आहे. मुद्रांक शुल्कदरात कपात केल्याने मालमत्ता खरेदी विक्री व्यवहार ३९ टक्क्यांनी वाढले. 'महाआवास' अभियानमध्ये आम्ही ८ लाख ८२ हजार घरकुले बांधून देत आहोत. स्व. बाळासाहेब ठाकरे रस्ते अपघात विमा योजना, मुंबई नागरी परिवहन प्रकल्प टप्पा ३ साठी १० हजार ९४७ कोटी मंजुरी, डीसीआरबाबतचे नवे एकात्मिक धोरण या निर्णयांमुळे सर्वसामान्यांच्या आयुष्यात निश्चितच फरक पडणार आहे.

कोरोनाकाळात अतिरिक्त राहिलेल्या दुधाचे भुकटीत रूपांतर करून आदिवासी बालकांना वाटप, आदिवासी बांधवांच्या मदतीसाठी खावटी अनुदान योजना,

कर्जमुक्तीमुळे घरे सावरली

सर्वसामान्य माणसांच्या हिताच्या निर्णयाची सुरुवात ही महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेपासून करता येईल. यामध्ये ३१.६८ लाख कर्जखात्याची यादी निर्गमित करण्यात आली होती. त्यापैकी ३०.८५ लाख कर्जखात्यांवर १९ हजार ६८४ कोटी रुपयांची रक्कम जमा करण्यात आली. उरलेल्या शेतकऱ्यांच्या खात्यातही कर्जमुक्तीची रक्कम जमा करण्याचे काम सुरू आहे. मुख्यमंत्री शाश्वत सिंचन कृषी योजनेत ठिबक व तुषार सिंचनासाठी ८० टक्के अनुदान, छत्रपती राजाराम महाराज उद्योजकता व कौशल्य प्रशिक्षण योजनेतून २ लाख ८२ हजार शेतकऱ्यांना गट शेतीचे प्रशिक्षण, शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन खते आणि बियाणे पुरवण्याचा निर्णयही याचाच एक भाग.

लॉकडाऊन काळात शेतीविषयक कामांचा खोळंबा होऊ नये, म्हणून कृषी साहित्याची दुकानेही सुरू ठेवण्यात आली. शहरांमध्ये गृहनिर्माण संस्थांच्या दारापर्यंत शेतमाल, भाजीपाला आणि फळे पोहोचवण्यात आली. आखाती व युरोपियन देशात जवळपास ९९१२ मे.टन शेतमाल निर्यात झाला.

शेतीतील आमूलाग्र बदलासाठी 'विकेल ते पिकेल' योजना, जिल्हा आणि पीकनिहाय व्हॅल्यू चेन हे उपक्रम शेतकऱ्यास हमखास भाव दिल्याशिवाय राहणार नाही. शेतकऱ्यांकडून हमी भावाने शासनाने गेल्या दहा वर्षांतील विक्रमी कापसाची खरेदी केली. कृषिपंप वीज जोडणीसाठी नवीन धोरण आखले.

अनुसूचित जमातीतील यूपीएससीची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना २६ हजार रुपये आर्थिक साहाय्य, मराठा युवकांसाठीची 'सारथी' अधिक बळकट करणे, ओबीसीसाठी 'महाजोती' प्रशिक्षण संस्था, कोविड काळात माथाडी कामगारांना प्रत्येकी ५ हजार रुपये मदत, बांधकाम कामगारांना प्रत्येकी २ हजार रुपये मदत, महिलांच्या सुरक्षेसाठी 'दिशा'सारखा कडक 'शक्ती' कायदा करण्यासाठी विधिमंडळाच्या माध्यमातून असे बरेच निर्णय आम्ही घेतले. विविध निवृत्तिवेतन योजनांच्या ३५ लाखांहून अधिक लाभार्थींना एप्रिल, मे, जून या महिन्यांचे एकत्रित मानधन एकदम देण्यात आले.

पर्यावरणावरही लक्ष केंद्रित

पर्यावरणाला महत्त्व देऊन आणि त्यांच्या संवर्धनाला प्राधान्य देऊन विकास करणे हे आमचे धोरण आहे त्याचाच एक भाग म्हणून आरे दूध वसाहतीत सुमारे ८१२ एकर जमीन राखीव वने म्हणून घोषित केली.

पर्यटनाला चालना देण्यासाठी आदरातिथ्य क्षेत्राला उद्योगाचा दर्जा दिला आणि परवान्यांची संख्या ७० वरून १० वर आणली. राज्यातील ५० वे अभयारण्य आणि १० संरक्षित वने घोषित केली.

विकासाला खीळ नाही तर वेग दिला

पैशाचे सोंग आणता येत नाही म्हणतात ते खरे आहे. एकीकडे अर्थचक्राला गती देणाऱ्या घटकांना प्रोत्साहन द्यायचे आणि दुसरीकडे सामाजिक जबाबदारीही पार पाडायची. त्यामुळे केंद्राकडून जीएसटी आणि कर परतावा मिळणेही महत्त्वाचे आहे. मागील वर्षीच्या तुलनेत यंदा मिळालेले राज्याचे उत्पन्न २४ टक्क्यांनी कमी झाले आहे. त्यामुळे केंद्राकडून अपेक्षा असणे स्वाभाविक आहे. मात्र तरीदेखील आम्ही कुठेही विकासाला खीळ बसेल असे काही केलेले नाही.

१ मे महाराष्ट्र दिनी नागपूर ते शिर्डी या टप्प्यात आम्ही हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग सुरू करतोय. काही दिवसांपूर्वी मी माझे सहकारी मंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत या महामार्गाची पाहणी केली. या प्रकल्पाचे अप्रतिम काम चालू आहे. हा प्रकल्प पूर्ण होईल, तेव्हा ज्याचा महाराष्ट्राला अभिमान वाटेल असा आपल्या देशातील सर्वोत्तम महामार्ग बनेल असे काम आपण केलेले असेल. सुमारे ६० टक्क्यांपेक्षा जास्त रस्त्याचे बांधकाम पूर्ण झाले आहे.

कोस्टल रोडचे काम वेगात

मी मध्यंतरी कोस्टल रोडच्या कामाची पाहणी केली. हे काम वेगाने सुरू आहे. कोस्टल रोडच्या भूयारीकरणासाठी देशातील पहिले सर्वात मोठा व्यास असणारे अजस्त्र मशिन वापरले जात आहे. हे काम मे २०२३ पर्यंत पूर्ण होणं अपेक्षित आहे. एकूण प्रकल्प १२,८०० कोटींचा आहे. यापैकी आतापर्यंत १४०० कोटी खर्च झाले आहेत.

मुंबई-पुणे मिसिंग लिंक

मुंबई ते पुणे द्रुतगती मार्गावरून आपण आता अधिक जलद प्रवास करू शकता. खोपोली ते कुसगाव दरम्यान आपण नवीन मार्गिका बांधतो आहोत. हा रस्ता ८ पदरी आणि लांबी १९.८० कि.मी.असून भारतातील सर्वात रुंद असा बोगदा या ठिकाणी होणार आहे. जवळजवळ अर्धा तास अंतर यामुळे कमी होईल. मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाचे नियोजन करताना मिसिंग लिंक प्रकल्पाच्या आखणीचा समावेश होता, त्या वेळी ते होऊ शकले नव्हते आणि आता आपण करतो आहोत.

सर्वसामान्य हाच केंद्रबिंदू

नुकतीच मी मुंबईतल्या मेट्रो स्थानकांच्या कामाचीही पाहणी केली आणि कालबद्धरीत्या हे सगळं काम करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

पायाभूत सुविधांची कामे या वर्षभरात थांबली नाहीत. मेट्रो, गृहनिर्माण, परिवहन, ऊर्जा, वन-पर्यावरण, पर्यटन असेल किंवा जलसंपदासारखा विषय असेल. या सर्वच क्षेत्रात थेट व अप्रत्यक्षरीत्या सर्वसामान्यांना लाभ होईल, असेच प्रोत्साहनात्मक निर्णय राज्य शासनाने घेतले आहेत. संत गाडगेबाबांनी सांगितलेली दशसूत्री आमच्यासाठी मार्गदर्शक आहे. पूर्ण वर्षभरात सर्वसामान्य नागरिक हाच आमचा केंद्रबिंदू होता आणि पुढेही राहील.

शब्दांकन : अनिरुद्ध अष्टपुत्रे,
मा. मुख्यमंत्री महोदयांचे जनसंपर्क अधिकारी

राज्यातील महाविकास आघाडी सरकारची वर्षपूर्ती ही राज्याच्या सर्वांगीण प्रगतीच्या, जनतेच्या आशा, आकांक्षा, अपेक्षांच्या पूर्ततेच्या दिशेने सुरू असलेल्या प्रयत्नांची वर्षपूर्ती आहे. राज्यातील जनता महाविकास आघाडी सरकारकडे आपले सरकार म्हणून बघतेय, हेच सरकारचे सगळ्यात मोठे यश आहे. शेतकरी कर्जमाफी योजना, नैसर्गिक आपत्तिग्रस्तांना तत्काळ दिलासा, मागास, आदिवासी, अल्पसंख्याक बांधवांना न्याय, सर्व समाजघटकांना सोबत घेऊन कोरोनासंकटाशी लढा, अशा अनेक बाबींनी सरकारवरील जनतेचा विश्वास अधिक वाढला आहे.

अजित पवार
उपमुख्यमंत्री

कोरोना संकटकाळात सर्व सामान्य नागरिकांच्या आरोग्याला प्राधान्य देत विविध क्षेत्रातील विकासकामांनाही वर्षभरात राज्य शासनाने गती दिली. शेतकरी, कष्टकरी, मागासवर्गीय, आदिवासी, अल्पसंख्याक, महिला, युवक, व्यापारी, उद्योजक अशा सर्वच घटकांच्या कल्याणाचे अनेक निर्णय घेतले. अपूर्ण पायाभूत प्रकल्प पूर्ण करण्यावर भर दिला. आरोग्य सुविधांचे जाळे भक्कम केले. आर्थिक, औद्योगिक प्रगतीबरोबर पर्यावरणाची काळजी घेतली. राज्याचा पुरोगामी विचार, सामाजिक, सांस्कृतिक एकतेची वीण अधिक घट्ट होईल, यासाठी प्रयत्न केले.

राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी काम करत असताना महाविकास आघाडी सरकारने जनतेवर अन्याय करणारा, महाराष्ट्राच्या हिताशी प्रतारणा करणारा एकही निर्णय घेतला नाही, याचा आम्हाला आनंद व अभिमान आहे.

महाविकास आघाडीचे सरकार हे राज्याचे हित जपणारे, जनतेच्या मनातील सरकार आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील संघभावनेने सरकार उत्तम काम करत आहे. या सरकारच्या वर्षपूर्तीच्या निमित्ताने राज्यातील समस्त नागरिक बंधुभगिनींना मी शुभेच्छा देतो. आपण सरकारवर दाखवलेल्या विश्वासाबद्दल आभार मानतो.

महाविकासाला गती

मेट्रो प्रकल्पाची पाहणी करताना उपमुख्यमंत्री अजित पवार.

सर्वसामान्य नागरिकांची विचारपूस करताना उपमुख्यमंत्री अजित पवार.

आव्हानांवर मात

सरकारच्या पहिल्या वर्षात आपल्यासमोर 'कोरोना'चे मोठे आव्हान होते. राज्यातील जनतेला, आपल्या सर्वांना सोबत, विश्वासात घेऊन सरकारने हे आव्हान यशस्वीपणे पेलले. मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांवर, शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांवर सोपवलेली जबाबदारी सर्वांनी उत्तम पार पाडली.

सर्वांना न्याय देण्यात यश

जनतेच्या आशा-आकांक्षा-अपेक्षांवर खरे उतरण्यात, समाजघटकांना न्याय देण्यात सरकार यशस्वी ठरले. हे सारे राज्यातील जनतेचा विश्वास व सहकार्यामुळे शक्य झाले. त्याबद्दल जनतेचे मी आभार मानतो.

सरकारला विधिमंडळात समर्थन दिलेल्या सहकारी पक्षांच्या विधिमंडळ सदस्यांचेही आभार व्यक्त करतो. लोकशाहीत विरोधी पक्ष सत्ताधारी पक्षाइतकाच महत्त्वाचा असतो. राज्यातील विरोधी पक्षनेते, सदस्यांनीही वेळोवेळी मार्गदर्शन केले, त्यांचेही सरकारच्या वर्षपूर्तीनिमित्ताने मी आभार व्यक्त करतो.

जनतेचा विश्वास

राज्यातील सरकार वेगवेगळी विचारधारा असलेल्या राजकीय पक्षांचे सरकार असले तरी हे इथल्या जनतेशी नाळ जोडलेले सरकार आहे. जनतेच्या मनातले सरकार आहे. 'महाराष्ट्राचे हित' व 'समान विकास कार्यक्रम' हा आमच्यातला समान दुवा आहे. गेल्या वर्षभरात राज्यातील जनतेशी प्रतारणा करणारा एकही निर्णय राज्य शासनाने घेतला नाही. राज्याच्या हिताशी तडजोड केली नाही. जनतेच्या सुख-दुःखांशी समरस होत लोकहिताचे अनेक निर्णय घेतले.

शेतकरी कर्जमाफी योजना, नैसर्गिक आपत्तिग्रस्तांना तत्काळ दिलासा, मागास, आदिवासी, अल्पसंख्याक बांधवांना न्याय, सर्व समाजघटकांना सोबत घेऊन कोरोना संकटाशी लढा, अशा अनेक बाबींनी सरकारवरील जनतेचा विश्वास अधिक वाढला आहे.

संघभावनेचे यश

राज्य सरकारचे नेतृत्व मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे आहे. मुख्यमंत्री म्हणून त्यांनी जनमानसावर विश्वासाचा ठसा उमटवला आहे. शासन-प्रशासन-नागरिकांमध्ये संघभावना निर्माण करण्यात ते यशस्वी ठरले आहेत. सहकारी मंत्री, प्रशासकीय अधिकाऱ्यांवर विश्वास टाकून सर्वांना काम करण्याचे स्वातंत्र्य देणारे त्यांचे नेतृत्व आहे. राज्याचे आरोग्यमंत्री

इंदू मिल येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंतरराष्ट्रीय स्मारकाच्या कामाची माहिती घेताना उपमुख्यमंत्री अजित पवार, अल्पसंख्याक मंत्री नवाब मलिक.

कोरोना योद्धयांना सलाम

राज्यात सरकार स्थापनेनंतर अवघ्या तीन महिन्यांतच कोरोनाविरुद्ध लढाई सुरू करावी लागली. ही लढाई सोपी नव्हती, परंतु सरकार व जनतेच्या एकत्रित प्रयत्नातून आपण कोरोना संकटाचा यशस्वी मुकाबला केला. कोरोनाविरुद्धच्या लढाईत सर्वांनी साथ दिली. अनेकांनी जिवाची जोखीम पत्करून काम केले. डॉक्टर, नर्सेस, पॅरामेडिकल स्टाफ, सपोर्ट स्टाफ, फार्मासिस्ट, सफाई कामगार, अंगणवाडी ताई, आशाताई, पोलीस, शासकीय-निमशासकीय, स्थानिक स्वराज संस्थांचे अधिकारी-कर्मचारी, स्वयंसेवी संस्थांचे पदाधिकारी-कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी, सामान्य नागरिक सगळ्यांनी मिळून कोरोनाविरुद्ध एकजुटीने लढाई लढली, यशस्वी केली. या सर्व कोरोनायोद्धयांचे मी जाहीर आभार मानतो. या लढाईत कर्तव्य पार पाडताना काही सहकाऱ्यांना प्राण गमवावे लागले, त्यांना कृतज्ञतापूर्वक श्रद्धांजली वाहतो. या कोरोनायोद्धयांचा त्याग महाराष्ट्र कायम स्मरणात ठेवेल, असा विश्वास देतो.

राजेश टोपे यांनी त्यांच्या सहकाऱ्यांना सोबत घेऊन कोरोनाकाळात पार पाडलेली जबाबदारी हे मुख्यमंत्र्यांचे नेतृत्व व सरकारमधील संघभावनेचे यश आहे, असे मला वाटते.

विकास कामांना गती

राज्य सरकारची वर्षपूर्ती हा साजरा करण्याचा विषय नसून पुढील चार वर्षांच्या महाराष्ट्राच्या प्रगतीची पुनर्आखणी व त्या दिशेने दमदार वाटचालीची सुरुवात करण्याची आहे. सुदैवाने कोरोना संकटकाळातही आपण राज्यातील विकास योजनांना, प्रगतीला खीळ बसणार नाही याची काळजी घेतली. नागपूर-मुंबई समृद्धी महामार्ग, मुंबईतील कोस्टल रोड, मुंबई व पुण्यातील मेट्रो कामाला गती, पुणे-नाशिक रेल्वे मार्ग, मल्टिमोड कॉरिडोर, पुणे विमानतळ, पुणे रिंगरोड, कोकणाला जोडणारे रस्ते, मराठवाड्याचा पाणीप्रश्न अशा अनेक विषयांवर काम गतीने सुरू ठेवले.

मुंबईतील इंदू मिल येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंतरराष्ट्रीय स्मारकाचे कामही वेगाने सुरू आहे. पायाभूत सुविधांच्या विकासाबरोबर राज्याचा सर्वधर्मसमभाव व पुरोगामी विचार जपला जात आहे. सांस्कृतिक विकासावरही लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. पर्यावरण संरक्षण, पर्यटनवाढीवर भर देण्यात येत आहे. राज्यात पायाभूत सुविधांची कामे बंद पडणार नाहीत तर, वेगाने पूर्ण होतील यावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

आरोग्याला प्राधान्य

राज्याचा आर्थिक, औद्योगिक विकास महत्त्वाचा आहे, परंतु नागरिकांचे आरोग्य सर्वाधिक महत्त्वाचे आहे. कोरोना संकटकाळात आर्थिक नुकसान झाले तरी राज्यातील नागरिकांचा जीव वाचला पाहिजे, त्यांना आरोग्यसेवा मिळाली पाहिजे यासाठी आपण अनेक उपाययोजना केल्या, त्याचा उपयोग निश्चितच झाला.

आज राज्यातील कोरोनासंकट नियंत्रणात असल्याचे चित्र असले तरी, गाफील राहून चालणार नाही. नागरिकांनी काळजी घेतली पाहिजे. घराबाहेर पडल्यानंतर सार्वजनिक ठिकाणी तोंडाला मास्क लावणे, गर्दी करणे टाळणे, वारंवार हात धूत राहणे, सुरक्षित अंतर राखणे, स्वत:ला, कुटुंबाला, समाजाला सुरक्षित ठेवण्यासाठी काळजी घेणे, हे पुढील काळातही गरजेचे आहे. कोरोनाची लस येईपर्यंत व कोरोना पूर्णपणे संपेपर्यंत 'माझे कुटुंब, माझी जबाबदारी' हे विसरायचे नाही, असे मी सर्वांना आवाहन करत आहे.

राज्य शासनाची वर्षपूर्ती ही, सर्व धर्म, जाती, पंथांच्या विचारांच्या समाजघटकांना सोबत घेऊन, सर्वांना विकासाची संधी उपलब्ध करून, प्रगतशील महाराष्ट्र घडवण्याच्या निर्धाराची वर्षपूर्ती आहे. सर्वांनी मिळून प्रगत, पुरोगामी, समर्थ, बलशाली महाराष्ट्र घडवण्याचा निर्धार करू या.. राज्यातील सर्व नागरिक बंधुभगिनींना, महाराष्ट्राच्या हितचिंतकांना राज्य सरकारच्या वर्षपूर्तीनिमित्त मी पुनश्च शुभेच्छा देतो. सर्वांचे आभार. धन्यवाद.

शब्दांकन : संजय देशमुख,
मा. उपमुख्यमंत्री महोदयांचे जनसंपर्क अधिकारी

महानगरांच्या विकासासाठी राज्य शासनाने गेल्या वर्षभरात विविध महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या माध्यमातून राज्यात महामार्गाचे जाळे विणण्यावर भर दिला जात आहे. देशातील सर्वात जास्त नागरीकरण झालेल्या राज्यांमध्ये राज्याचा समावेश होतो. त्यामुळे शहरातील नागरिकांना दर्जेदार मूलभूत नागरी सुविधा पुरवताना महानगरांतील जीवनमान उंचावण्यासाठी निर्णय घेतले जात आहेत.

नागरी जीवनमान सुखकर

एकनाथ शिंदे
मंत्री, नगरविकास, सार्वजनिक बांधकाम
(सार्वजनिक उपक्रम)

मुंबई, पुणे, नागपूर यांसारख्या महानगरांच्या परिसराचा मोठ्या प्रमाणावर विस्तार होत आहे. त्यामुळे नागरी सुविधांसोबतच दळणवळणाच्या सुविधांवर मोठा भर दिला जात आहे. शहरवासीयांचा दैनंदिन कामासाठी होणारा प्रवास गतिमान करताना तो सुलभ आणि आरामदायी करण्यावर लक्ष केंद्रित केले जात आहे.

सुसूत्रता आणि पारदर्शकता

राज्यात इमारत बांधकामासाठी सुसूत्रता आणि पारदर्शकता येण्यासाठी मुंबई वगळता राज्यभरात एकात्मिक विकास नियंत्रण नियमावलीला (युनिफाईड डीसीआर) मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मंजुरी देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. यामुळे १५० चौ.मी.पर्यंतच्या भूखंडधारकास स्ववापरासाठीच्या घराच्या बांधकामासाठी बांधकाम परवान्याची आवश्यकता नाही. यामुळे चटईक्षेत्र निर्देशांकाच्या (एफएसआय) गैरवापराला चाप बसणार आहे. तसेच नियमांना बगल देऊन, पळवाटा शोधून 'एफएसआय'चा गैरवापर होण्याचे प्रकार यापुढे बंद होणार आहे.

सध्या जगभरात सुरू असलेल्या कोरोनाच्या संकटाचे प्रतिबिंबही या युनिफाइड डीसीआरमध्ये उमटले असून, आणीबाणीच्या काळात तातडीने विलगीकरणासारखी सुविधा उभारता यावी, यासाठी उंच इमारतींमध्ये एक मजला अनुज्ञेय करण्यात आला आहे. सामान्य परिस्थितीत मनोरंजनात्मक व कलाविषयक सार्वजनिक सुविधांसाठी याची तरतूद असून नागरिकांच्या मनोरंजनविषयक गरजा इमारतींमध्येच पूर्ण होतील आणि कोरोनासारख्या आपत्कालीन परिस्थितीत याचे रूपांतर तातडीने विलगीकरण कक्षात करता येईल.

युनिफाईड डीसीआरमुळे संपूर्ण राज्यात क्लस्टर योजना, एसआरए आदी पुनर्विकास प्रकल्पांची अंमलबजावणी शक्य होणार असल्यामुळे झोपडपट्टी तसेच धोकादायक इमारतीत जीव मुठीत धरून राहणाऱ्या लाखो नागरिकांना हक्काचे घरकूल मिळण्याचा मार्गही प्रशस्त झाला आहे. त्यामुळे त्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत होणार आहे.

उत्तम कामगिरी

राज्याने नागरी स्वच्छता अभियानात देखील आपल्या उत्तम कामगिरीचे सातत्य राखले आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या स्वच्छ सर्वेक्षण २०२०च्या १२ राष्ट्रीय पुरस्कारांपैकी सर्वाधिक ४ पुरस्कार महाराष्ट्राला मिळाले. मोठ्या राज्यांच्या मानांकनात महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर आले आहे. ही बाब नागरिकांच्या सहभागाने आणि यंत्रणेच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे शक्य झाली आहे.

मलप्रक्रिया क्षमता प्रकल्प

नागरी भागात निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर १०० टक्के प्रक्रिया करणे सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना बंधनकारक करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याचबरोबर सर्व महापालिका, नगरपरिषद क्षेत्रामध्ये २०२४ पर्यंत १०० टक्के मलप्रक्रिया क्षमता प्रकल्प निर्माण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. बृहन्मुंबईसाठी ही मर्यादा २०२८ आहे.

लॉकडाऊन काळात विविध विकासकामांचा ऑनलाइन आढावा घेताना नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे

नगराध्यक्षांची निवड नगरसेवकांमधून

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार महानगरपालिकेच्या एका प्रभागातून एका सदस्याची निवड (एक सदस्य प्रभाग पद्धत) करण्याचा निर्णय, पॅनेल पद्धत रद्द करण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियमातील सुधारणेनुसार नगरपरिषद प्रभागातून एका सदस्याची निवड करण्याचा निर्णय घेतला आहे. नगराध्यक्षांची निवड नगरसेवकांमधून करण्याचा निर्णयही आम्ही घेतला.

निधीची उपलब्धता

कोरोनामुळे उद्‌भवलेल्या आर्थिक अरिष्टातून दिलासा देण्यासाठी डिसेंबर २०२० अखेरपर्यंत मुद्रांक शुल्क अधिभार अर्धा टक्क्यावरून शून्य टक्के करण्याचा निर्णय घेतला आहे. इंदू मिल येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या भव्य स्मारकाच्या सुधारित संकल्पनेनुसार पुतळ्याची उंची वाढवून सुधारित खर्चास मान्यता देण्यात आली आहे. सुधारित आराखड्यानुसार पादपीठ १०० फूट व पुतळा ३५० फूट अशी एकूण ४५० फूट उंची ठेवण्यास मान्यता दिली आहे.

गृहविकास प्रकल्प

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या कामाला गती देतानाच सिडकोच्या माध्यमातून नवी मुंबईत ९५ हजार परवडणाऱ्या घरांचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प उभारण्यात येत आहे. ट्रान्झिट ओरिएंटेड डेव्हलपमेंट तत्त्वानुसार गृहबांधणी करण्यात येणार असून खारघर येथे बंद पडलेल्या खदाणींच्या जागेवर खारघर हेवन हिल्स या गृहविकास प्रकल्पाला सुरुवात झाली आहे. तब्बल २५० एकरांवर पसरलेल्या या गृहनिर्माण प्रकल्पाची 'वॉक टु वर्क' या तत्त्वावर रचना करण्यात आली आहे. खारघर येथे इंटरनॅशनल कॉर्पोरेट पार्कच्या उभारणीस सुरुवात झाली असून वित्तीय केंद्र म्हणून परिसराचा विकास करण्यात येत आहे. आर्थिकदृष्ट्या मागास, तसेच अल्प उत्पन्न गटातील नागरिकांसाठी १५ हजार घरांचा गृहप्रकल्प उभारण्यात येत असून घणसोली, खारघर, कळंबोली, तळोजा आणि द्रोणागिरी या पाच नोड्समध्ये प्रकल्प सुरू आहे. कल्याण-डोंबिवली महापालिकेतून १८ गावे वगळून त्यांची स्वतंत्र नगरपरिषद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

वाहतुकीच्या प्रकल्पांना गती

महानगरांमधील पायाभूत सुविधा आणि सार्वजनिक वाहतुकीच्या प्रकल्पांना गती देण्यासाठी विविध निर्णय घेण्यात आले. एमयूटीपी ३ प्रकल्प अंमलबजावणीसाठी मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन, राज्य शासन, एमएमआरडीए व सिडको यांच्यात वित्तीय करारनामा करण्यात आला. एकूण १० हजार ९४७ कोटी रुपयांच्या या प्रकल्पात राज्य सरकारचा वाटा ५० टक्के असून, एमएमआरडीए आणि सिडको हा आर्थिक भार उचलणार.

मेट्रोच्या कामांना गती

पुणे, नागपूर मेट्रोच्या कामांना गती देतानाच नागपूर शहर व परिसरातील भारतीय रेल्वेच्या मार्गावर सध्या अस्तित्वात असलेल्या पॅसेंजर, ट्रेन्स ऐवजी रेल्वे आधारित आधुनिक प्रकारच्या वातानुकूलित ब्रॉड गेज (बी.जी.) मेट्रो सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.

स्वच्छतेविषयी जागरूकता

वाढत्या शहरीकरणामुळे नागरिकांचे जीवनमान उंचावतानाच त्यांना परवडणारी घरे, चांगले रस्ते, पिण्याचे पाणी, सार्वजनिक वाहतूक सुविधा सक्षम करण्यावर आमचा भर आहे. कोरोनासारख्या सांसर्गिक आजारामुळे महानगरातील दाट लोकवस्तीतील विविध समस्या आणि आव्हाने समोर आली आहेत. त्या दूर करताना सार्वजनिक आणि वैयक्तिक स्वच्छतेविषयी जागरूकता निर्माण करण्याचे कामही करण्यात येत आहे.

एक वर्ष महाराष्ट्र सेवेचे
महाविकास आघाडीचे

प्रगतिपथावरील कामे

राज्यासाठी महत्त्वाकांक्षी असलेल्या हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागपूर-मुंबई समृद्धी महामार्ग प्रकल्पाचे काम जवळपास ३० टक्के पूर्ण झाले असून नागपूर ते शिर्डी टप्पा डिसेंबर २०२१ पर्यंत वाहतुकीसाठी खुला होईल. या प्रकल्पात शासनाचा सहभाग फ्लेग्झी इक्विटीच्या माध्यमातून वाढवण्यात आला आहे. यशवंतराव चव्हाण मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाच्या क्षमताविस्ताराचे काम फास्ट ट्रॅकवर असून खालापूर टोलनाका ते सिंहगड इन्स्टिट्युट टनेल तसेच व्हायडक्टमुळे प्रवासाचा वेळ २५ मिनिटांनी घटणार आहे. त्याचबरोर अपघाताचे प्रमाण कमी होतानाच इंधन व वेळेतही बचत होणार आहे.

विरार-अलिबाग मल्टिमोडल कॉरिडॉर एमएमआरडीएकडून एमएसआरडीसीकडे हस्तांतरित करण्यात आला असून प्रकल्पाच्या अंमलबजावणीला वेग आला आहे. शीळ-कल्याण रस्त्याच्या सहा पदरीकरणालाही वेग आला असून, पत्री पुलाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. त्यामुळे याभागातील वाहतूक कोंडीची समस्या सुटण्यास मदत होणार आहे.

वांद्रे-वर्सोवा सी-लिंक, ठाणे खाडीवर वाशी येथे तिसरा खाडी पूल, मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गालगतच्या खालापूर व खोपोली तालुक्यातील ३० गावांचा विकास आराखडा तयार करण्याच्या कामाला सुरुवात, नवीन महाबळेश्वरचा विकास आराखडा, डहाणू ते सिंधुदुर्ग कोस्टल रोडचा सविस्तर प्रकल्प आराखडा तसेच वीज ग्रिडच्या धर्तीवर राज्यभरात दर्जेदार रस्त्यांचे ग्रिड तयार करण्याचा आराखडा तयार करण्याचे काम प्रगतिपथावर आहे.

शब्दांकन : अजय जाधव,
विभागीय संपर्क अधिकारी

गेल्या वर्षभरात जलसंपदा विभागाने अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. वर्षभरात १७२ दशलक्ष घनमीटर पाणीसाठा निर्माण झाला. यामुळे एक लाख हेक्टर सिंचनक्षमता निर्माण झाली. बांधकामाच्या अधीन असलेले सात सिंचन प्रकल्प पूर्ण केले. सिंचनाचा अनुशेष भरून काढण्यासाठी १५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. चांगल्या कामगिरीमुळे जलशक्ती मंत्रालयाच्या राष्ट्रीय जल पुरस्कार २०१९ मध्ये महाराष्ट्राला द्वितीय क्रमांक मिळाला. पुढील कालावधीसाठीही नियोजनबद्ध काम करत आहोत.

सिंचनातून बहरणार शेती

जयंत पाटील
मंत्री, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास

राज्यात सत्तांतर झाल्यापासून जलसंपदा व लाभक्षेत्र विकास या विभागाची महत्त्वपूर्ण जबाबदारी माझ्याकडे आली. आपणास माहितीच आहे की, महाराष्ट्र म्हणजे राकट देशा, कणखर देशा दगडांच्या देशा, अशा या आपल्या महाराष्ट्राच्या समृद्धीचे गुपित इथल्या दऱ्या-खोऱ्यात, नदी-नाल्यात दडलेले आहे. राज्यात खळखळ वाहणाऱ्या पाण्याचे योग्य नियोजन झाल्यानेच महाराष्ट्र एक विकसित प्रदेश बनू शकला, हे नव्याने सांगणे नको. इथल्या जलसंपदेचा उपयोग करत धरण, बंधारे, तलावांच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या बांधावर पाणी नेण्याचे काम जलसंपदा विभागाने केले. तसेच जनतेसाठी पिण्यासाठी मुबलक पाणी मिळावे यासाठी प्रयत्न केले. पाण्याच्या झालेल्या अचूक नियोजनामुळे इथल्या सिंचन क्षमतेत वाढ झाली आणि महाराष्ट्र सुजलाम-सुफलाम झाला, होत आहे.

आता तर कोठे केवळ एक वर्षांचा कालावधी महाविकास आघाडी सरकारला झाला आहे. ही तर सुरुवात आहे. आम्हाला हे राज्य आणखी प्रगतिपथावर घेऊन जायचे आहे. त्यासाठीच राज्य सरकार मोठ्या जोमाने काम करत आहे.

मी सांगू इच्छितो की, या एक वर्षाच्या काळात बांधकामाधीन सिंचन प्रकल्पाद्वारे १७२.२०१ दशलक्ष घनमीटर पाणीसाठा निर्माण झाला असून, १ लाख ४ हजार ५८६ हेक्टर सिंचनक्षमता निर्माण करून ७ बांधकामाच्या अधीन सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यात आले. यात १) पाथरवाला-औरंगाबाद, २) तुरागोंदी-नागपूर, ३) पोथरा-चंद्रपूर, ४) बोरनदी-अमरावती, ५) स्पेनगाव शिवनी-अमरावती, ६) झटामसरी-अमरावती, ७) इंगलवाडी-वाशिम या सात प्रकल्पांचा समावेश आहे. ही एक महत्त्वाची बाब जलसंपदा विभागामार्फत या वर्षात झाली. सिंचनाच्या अनुशेष निर्मूलन कार्यक्रमासाठी १५०० कोटी रुपयांची भरीव तरतूद आम्ही केली असून, त्याद्वारे ३०,०३३ हेक्टर रब्बी समतुल्य सिंचन अनुशेष दूर करण्यास मदत होणार आहे. रखडलेल्या प्रकल्पांच्या बाबतीत प्राधान्यक्रम निश्चित केला असून हे प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी अर्थोपाय करण्यात आले आहेत.

सर्वसमावेशकता

राज्याच्या सर्व भागातील नागरिकांना, लाभ होईल असे काम करण्याचे आमचे नियोजन आहे. इथल्या भौगोलिक परिस्थितीमुळे राज्यातील मराठवाडा व इतर काही प्रांत नेहमीच दुष्काळाच्या झळा सहन करत आहे. विविध योजना, प्रकल्पांच्या माध्यमातून येत्या काळात प्रयत्नांची पराकाष्ठा करत या भागातही पाणी नेण्याचे काम होईल. केंद्र शासन पुरस्कृत बळीराजा जल संजीवनी या योजनेत समाविष्ट असलेले ४ प्रकल्प अनुशेषांतर्गत १ व इतर १ अशा अमरावती

प्रदेशातील ६ त्याचप्रमाणे नक्षलप्रवण गडचिरोली जिल्ह्यातील १ अशा विदर्भातील ७ आणि कोकणातील ३ प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

जलसमृद्धीसाठी वळण योजना

पश्चिमेकडील वाहून जाणारे पाणी दुष्काळग्रस्त मराठवाड्यास देण्याकरिता 'वळण योजना' पूर्ण करण्याच्या कालबद्ध कार्यक्रमाची अंमलबजावणी आम्ही करत आहोत. तसेच राज्यातील इतर भागातील प्रकल्पासाठी 'प्रकल्प तयारी कक्ष' कार्यान्वित करण्यात आला आहे. कालवा सिंचन प्रणालीचे आधुनिकीकरण करण्यासाठी समितीची स्थापनादेखील आम्ही केली आहे. आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे कुकडी प्रकल्पाच्या इतिहासात प्रथमच उन्हाळी हंगामात २ आवर्तने यशस्वीपणे पूर्ण केली.

आधुनिक तंत्रज्ञानावर भर

जलसंपदा विभागाने काळाची पावले ओळखून आधुनिक तंत्रज्ञानावर भर देण्याचा विचार केलेला आहे. तसेच वॉटर रिसोर्स ग्रुपच्या (डब्ल्यूआरजी) माध्यमातून लाभक्षेत्रात पाणी वापराची कार्यक्षमता व उत्पादकता वाढवण्यासाठी 'पब्लिक प्रायव्हेट सिव्हिल सोसायटी पार्टनरशिप' नुसार नावीन्यपूर्ण पद्धतीने ५३ हजार हेक्टर क्षेत्रावर औरंगाबाद आणि नंदुरबार जिल्ह्यांमध्ये युवा मित्र व डेव्हलपमेंट सपोर्ट ग्रुप (डीएससी) यांच्यासोबत सामंजस्य करार करण्यात आला. शिवाय लाभक्षेत्रातील शेतकरी विदा (डाटा) संग्रह तयार करण्याचे काम प्रगतिपथावर आहे. महत्त्वाचे म्हणजे जलशक्ती मंत्रालयाकडून दिल्या जाणाऱ्या, राष्ट्रीय जल पुरस्कार २०१९ मध्ये महाराष्ट्र राज्याला द्वितीय क्रमांक मिळाला.

महत्त्वाचे निर्णय

गेल्या वर्षभरात जलसंपदा विभागाने बरेच महत्त्वाचे निर्णय घेतले. त्यातील एक निर्णय म्हणजे सातारा येथील नियोजित शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी जागा उपलब्ध नव्हती. लोकांच्या आरोग्याच्या प्रश्नाशी निगडित असलेल्या या महाविद्यालयासाठी जलसंपदा विभागाच्या ६३ एकर जागेचे हस्तांतरण करून प्रलंबित जागेच्या प्रश्नाची सोडवणूक करण्यात आली.

आपल्याला माहिती आहे की, मागील वर्षामध्ये पश्चिम महाराष्ट्रात पुराच्या पाण्याने जे थैमान घातले होते ते महाभयंकरच. भविष्यातील त्रास वाचवण्याकरिता आम्ही कृष्णा भीमा नदी खोऱ्यातील पूर नियंत्रणासाठी महाराष्ट्र व कर्नाटक राज्याची संयुक्त समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच क्षारपड जमिनीची गुणवत्ता सुधारण्यासाठी खासगी उपसा सिंचन योजनेच्या माध्यमातून सर्वेक्षण करून उपाययोजना राबवण्याचा निर्णयही घेण्यात आला.

निरादेवघर व गुंजवणी धरणाचे कालवे कार्यन्वित होईपर्यंत विनावापर राहणारे पाणी समन्यायी तत्त्वावर तात्पुरत्या स्वरूपात नीरा डावा कालवा आणि निरा उजवा कालव्यावर क्षेत्रीय वाटपांतर्गत सिंचन प्रवर्गासाठी वापरण्यास मंजुरी देण्यात आली. बंदिस्त वितरण प्रणालीची सुमारे ३५ हजार हेक्टर क्षेत्रावर कामे करण्यात येऊन बंदिस्त वितरण प्रणालीच्या हस्तपुस्तिकेसही मंजुरी देण्यात आली.

जनहितार्थ

तारळी पाटबंधारे प्रकल्पातून खटाव तालुक्यातील धोंडेवाडी, दातेवाडी व मायणी या गावांच्या १५४० हेक्टर क्षेत्रास प्रथमच सिंचनाचा लाभ मिळाला आहे. तसेच आमच्या विभागाने कोविड-१९ च्या कालावधीत उजनी प्रकल्पाच्या उन्हाळी हंगामातील दोन्ही आवर्तने यशस्वीपणे पूर्ण. १ लाख ९ हजार ६७८ हेक्टरचे क्षेत्र

सिंचित केले. आणखी एक महत्त्वाचा निर्णय घेतला त्यामुळे पुराच्या वाया जाणाऱ्या पाण्यातून उजनी प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील तलावांचे पुनर्भरण झाले आणि १.६२ टीएमसी पाणीसाठा वाढ झाली. कृष्णा उप खोऱ्यातील महापूराचे संनियंत्रण करून आटपाडी, खानापूर, जत, मिरज, तासगाव, मंगळवेढा, कवठेमहांकाळ व सांगोला या दुष्काळग्रस्त तालुक्यातील तलाव भरून देण्याचे यशस्वी नियोजन केले. त्यामुळे टेंभू (१.३१ टीएमसी) व म्हैसाळ (१.७५ टीएमसी) उपसा सिंचन योजनेतून पुराच्या पाण्याने भरले. तसेच कारंबा पंपगृह व एकरुख उपसा सिंचन योजनेचे टप्पा १ व २ कार्यान्वित करून प्रथमच उजनी प्रकल्पाचे पाणी दक्षिण सोलापूर व अक्कलकोट तालुक्यातील अवर्षणप्रवण भागास उपलब्ध करून देण्यात आले.

उजनी जलाशयातील इंदापूर तालुक्यातील ४ बुडीत बंधाऱ्यांच्या कामाच्या सर्वेक्षणास मान्यता देण्यात आली. यामुळे पिण्यासाठी व सिंचनासाठी होणारे पाण्याचे दुर्भिक्ष कमी होईल. तसेच लेंडी आंतरराज्य प्रकल्पास २०३३ कोटी रुपयांची सुधारित प्रशासकीय मान्यता देऊन महाराष्ट्र तेलंगणा राज्यांतर्गत असलेल्या आंतरराज्य प्रकल्पास चालना दिली. अशा प्रकारची कामे गेल्या वर्षभरात विभागाने केली असून, पुढील कालावधीसाठी सुद्धा आम्ही नियोजनबद्ध काम करत आहोत. तशा प्रकारची कामाची आखणीदेखील केलेली आहे. म्हणूनच मला विश्वास वाटतो की, राज्यातील प्रत्येक माणूस गर्वाने म्हणेल, 'जय जय महाराष्ट्र माझा, जल जल महाराष्ट्र माझा'.

शब्दांकन : डॉ. राजू पाटोदकर,
विभागीय संपर्क अधिकारी

गत वर्षात अस्मानी संकट आणि कोविड-१९ या जागतिक आपत्तीला सामोरे जावे लागले. या संकटाच्या काळात जेव्हा संपूर्ण राज्य बंद करण्याची वेळ आली तेव्हा सरकारी रुग्णालय, जिल्हाधिकारी, तहसीलदार, तलाठी यांच्यासह विविध विभागातील अधिकारी/कर्मचारी यांनी संकटाच्या समयी अहोरात्र काम केले. राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी लोकाभिमुख आणि गतिमान कामकाज करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

बाळासाहेब थोरात
मंत्री, महसूल

महसूल : तंत्रज्ञानावर भर

गेल्या नऊ महिन्यांहून अधिक काळ प्रशासन न थकता अविरत काम करत आहेत. लोकप्रतिनिधी, सामाजिक संघटना, नोकरदार वर्ग, सामान्य माणूस असे सगळेच एकजुटीने काम करत आहेत. सध्या कोविड-१९ रुग्णांची संख्या कमी होत असताना दिसून येत असली तरी सध्याच्या हिवाळी मोसमात आपल्याला अधिक सतर्क राहणे आवश्यक आहे. गेल्या वर्षभरात आपण प्राधान्याने आरोग्याला केंद्रस्थानी ठेवून अनेक निर्णय घेतले. कोविड-१९च्या संकटकाळात महसूल यंत्रणेने आरोग्य यंत्रणेबरोबर सतर्क राहून रात्रंदिवस काम केले आहे. यामध्ये मग कोविड -१९ तपासणीसाठी राज्यभर प्रयोगशाळांची उभारणी असो किंवा मास्क, सॅनिटायझर, पीपीई किटसाठी आवश्यक ती तरतूद करणे असो. आपल्या सर्वांना माहीतच आहे की, 'माझे कुटुंब, माझी जबाबदारी' ही मोहीम व्यापक स्तरावर राबवण्यात येत आहे. कोविड-१९ परिस्थितीशी सामना करत महाराष्ट्र नव्या जोमाने उभा राहतोय. या संकटाच्या काळात सामान्य माणूस, लघू उद्योजक, व्यापारी आणि सर्वसामान्यांना आधार देण्यासाठी हे शासन प्रयत्नशील आहे. या काळात आलेल्या अस्मानी संकटातून बळीराजाला वाचवण्यासाठी शासनाने दहा हजार कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले आहे.

प्रशासनाचा कणा

सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न सोडवण्याची जबाबदारी महसूल विभाग पार पाडत असतो. शासनाच्या लोकाभिमुख योजना जनतेपर्यंत पोहोचवण्याचे काम महसूल विभाग करत असतो. महसूल विभागाचे काम हे २४ तास व ३६५ दिवस अविरतपणे सुरू असते. कोणतीही परिस्थिती असो, महसूल विभागाची जबाबदारी ही अत्यंत महत्त्वाची असते. त्यामुळेच महसूल विभाग हा शासन व प्रशासनाचा कणा आहे आणि त्यामुळेच हा विभाग अधिकाधिक लोकाभिमुख करण्याचा आमचा प्रयत्न असणार आहे. महाराष्ट्राच्या विकासात आजपर्यंत या विभागाने महत्त्वाचे योगदान दिले आहे. येणाऱ्या काळातही हा विभाग सर्वसामान्यांसाठी विविध योजना राबवण्यात पुढे राहील, असा विश्वास आहे.

विविध योजना राबवण्यात अग्रेसर

वाढती लोकसंख्या, नागरिकीकरण, औद्योगिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर महसूल विभागातील कामकाजामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. नव्या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यास नक्कीच मदत होईल.

सर्वसामान्य नागरिकांचा महसूल विभागाशी दैनंदिन कामकाजासाठी संबंध येत असतो. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकास मध्यवर्ती ठेवून त्यांच्या प्रश्नांची/अडचणींची सोडवणूक तंत्रज्ञानाच्या मदतीने अधिक जलद करण्याचा प्रयत्न महसूल विभाग करीत आहे. महाराष्ट्राच्या विकासात आजपर्यंत या विभागाने महत्त्वाचे योगदान दिले असून यापुढील काळातही हा विभाग सर्वसामान्यांसाठी विविध योजना राबवण्यात पुढे राहील, असा विश्वास आहे. आजपर्यंत साडे सतरा लाखांहून अधिक लोकांनी 'डिजिटल ७/१२' घेतला आहे त्याचप्रमाणे आता 'डिजिटल ८-अ' ला सुद्धा असाच प्रतिसाद मिळेल, अशी मला आशा आहे. महसूल प्रशासन लोकाभिमुख व गतिमान करण्यासाठी आपण सर्वांनी एकत्र प्रयत्न करू या.

महत्त्वाचे निर्णय

- महसूल चोरीला आळा घालण्यासाठी राज्य सरकारशी संबंधित आर्थिक व्यवहारांसाठी यापुढे पॅन क्रमांक अनिवार्य.
- कंपनी एकत्रीकरण किंवा पुनर्रचनेसंबंधीच्या दस्तांसाठी आकारण्यात येणाऱ्या मुद्रांक शुल्कावर विहित केलेली कमाल मर्यादा २५ कोटींवरून ५० कोटींपर्यंत वाढवण्यास मंजुरी.
- महसूल दिनाच्या पार्श्वभूमीवर महसूल विभागामार्फत 'डिजिटल ८-अ' ऑनलाइन सुविधा.
- तलाठ्याच्या डिजिटल स्वाक्षरीने सुमारे २९ लाख खातेदारांनी घेतला सातबारा; तर सुमारे ३ लाख खातेदारांनी डाऊनलोड केले खातेउतारे (८-अ).
- पूर्णत्वाचा दाखला घेतलेल्या प्रकल्पांना दस्त नोंदणीच्या वेळी रेरा नोंदणीची आवश्यकता नाही.
- रिअल इस्टेट (रेग्युलेशन ॲण्ड डेव्हलपमेंट ॲक्ट) रेरा प्राधिकरणाकडून पूर्णत्वाचा दाखला घेतलेल्या प्रकल्पासंदर्भातील दस्त नोंदणीच्या वेळी रेरा नोंदणी आवश्यक नाही.
- आठ दशकानंतर सातबारामध्ये १२ प्रकारचे बदल होणार. या बदलांमुळे मिळणार सर्वसामान्यांना दिलासा.
- मुद्रांक शुल्काचा दर मुंबई आणि मुंबई उपनगर जिल्ह्यात ५ टक्क्यांऐवजी २ टक्के; उर्वरित महाराष्ट्र राज्यात ५ आणि ४ टक्क्यांऐवजी ३ आणि २ टक्के.
- स्थानिक स्वराज्य संस्था करामध्ये देखील १०० टक्के सवलत दिल्याने सर्वसामान्य, शेतकरी वर्ग यांच्यासह घर आणि स्थावर मालमत्ता खरेदी करणाऱ्यांना दिलासा.
- मागच्या वर्षाच्या तुलनेत सप्टेंबर ते नोव्हेंबर या तीन महिन्यांच्या कालावधीत राज्यातील दस्त नोंदणीत लक्षणीय अशी ३९ टक्क्यांनी वाढ.
- शासकीय जमिनीवरील सहकारी गृहनिर्माण संस्थांमधील सदनिका लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्त्वावर वापरासाठी देण्यासाठीचे सुस्पष्ट दिशानिर्देश.
- आजी / माजी सैनिकांना शासकीय जमीन प्रदान करण्यासंदर्भात उत्पन्नाची वार्षिक मर्यादा १ लाखावरून ८ लाख रुपये करण्यात आली.

महसुली लेखांकन पद्धतीत बदल

जवळपास आठ दशकानंतर राज्यात नवी महसूल रचना अमलात येणार असून आता सातबारामध्ये साधारण १२ प्रकारचे बदल करण्यात येणार असल्याने सर्वसामान्यांना दिलासा मिळणार आहे. प्रत्येक गावासाठी युनिक कोड, प्रत्येक सातबारावर वॉटर मार्कसह शासनाचा लोगो आणि क्यूआर कोड हे सातबाराचे वैशिष्ट्य ठरणार आहे. महसूल विभागामार्फत महाराष्ट्रातील ग्राम पातळीवरील महसुली लेखांकन पद्धतीत बदल करण्यात आला आहे. ब्रिटिश काळात एम.जी. हार्टनेल अँडरसन यांनी तयार केलेल्या मॅन्युअलमध्ये १९४१ मध्ये एम.जे.देसाई यांनी सुधारणा केल्या होत्या. त्यानंतर जवळपास ८ दशकानंतर राज्यात नवी महसूल रचना अमलात येत असून सातबारामध्ये साधारण १२ प्रकारचे बदल करण्यात आले आहेत. यापुढे आता प्रत्येक गाव आणि खातेदाराला स्वतंत्र कोड क्रमांक देण्यासोबत गाव नमुना नंबर ७ अधिकार अभिलेख पत्रकात महत्त्वाचे बदल करण्यात आले आहेत.

कार्यक्षम भूमिका

महाराष्ट्राच्या विकासात आजपर्यंत या विभागाने महत्त्वाचे योगदान दिले असून

यापुढील काळातही हा विभाग सर्वसामान्यांसाठी विविध योजना राबवण्यात पुढे राहील, असा विश्वास आहे. कोविड-१९च्या काळात महसूल विभाग आपली भूमिका कार्यक्षमपणे पार पाडत असून राज्याचे आर्थिक व्यवहार सुरळीतपणे सुरू ठेवण्यासाठी देखील प्रयत्न करत आहे. तंत्रज्ञानामुळे कामाच्या गतीसोबतच त्याचे स्वरूपदेखील बदलले आहे. कोविड -१९च्या परिस्थितीत राज्याचे अर्थचक्र सुरळीतपणे सुरू ठेवण्याची जबाबदारी ही देखील महसूल विभागाची असल्याने येणाऱ्या काळातही या विभागामार्फत तत्परतेने काम होईल, असा मला विश्वास आहे.

निर्धाराने लढा दिला

अनेक महिन्यांच्या लॉकडाऊननंतर आपण 'मिशन बिगीन अगेन' म्हणत सर्व काही पूर्वपदावर आणण्याचा प्रयत्न करत आहोत. पण हे करत असताना आपण सर्वांनीच एक लक्षात घेणे आवश्यक आहे की, येणाऱ्या काळातही धैर्य दाखवून आपल्या आरोग्याबाबत सतर्कता बाळगणे गरजेचे आहे. येणाऱ्या काळात आपण सामाजिक अंतराचे नियम पाळणे, मुखपट्टी सतत लावणे, हातांची स्वच्छता ठेवणे याला प्राधान्य देऊ या. आज महाराष्ट्रासमोर वेगळे प्रश्न आहेत. बळीराजा अडचणीत आहे, अजूनही कोविड-१९ चे सावट आहे, राज्याचा विकास दर कमी झाला आहे. पण मला खात्री आहे, आमचे सरकार या सर्व संकटांशी नेटाने आणि निर्धाराने लढेल. संकटांतून संधी निर्माण करत आमचे सरकार महाराष्ट्राच्या विकासाची परंपरा कायम राखेल, याबद्दल मला विश्वास वाटतो.

शब्दांकन : वर्षा फडके- आंधळे,
विभागीय संपर्क अधिकारी

वर्षभरात उद्योग विभागाने गुंतवणुकीच्या मोठ्या संधी उपलब्ध करून देत स्थानिकांना रोजगार मिळवून दिला. या विभागाने कोरोना काळात देदीप्यमान कामगिरी कायम ठेवत उद्योग विश्वाला नवसंजीवनी देण्यात मोलाचा वाटा उचलला आहे. अवघ्या दोन महिन्याच्या अंतराने सुमारे ६६ हजार कोटींची गुंतवणूक आणण्यात या विभागाला यश आले. महापरवाना, महाजॉब यांसारख्या नव्या धोरणांमुळे उद्योग जगाला आशेचा किरण प्राप्त झाला आहे. एक लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे.

उद्योगात नवविश्वास

सुभाष देसाई
मंत्री, उद्योग, खनिकर्म, मराठी भाषा

या वर्षी कोरोनामुळे सगळ्या जगावरच मंदीचे सावट आले. राज्यातही अनेक उद्योगांना टाळेबंदीमुळे फटका बसला. परराज्यातून आलेले कामगार, मजूर परत गेले होते. अशा परिस्थितीत उद्योगांना पुन्हा उभारी देणे हे एक मोठे आव्हान राज्य शासनासमोर होते. मागच्या सरकारमध्ये उद्योगमंत्री म्हणून पाच वर्षे काम केल्यानंतर या शासनातही मला उद्योग विभागाचा मंत्री म्हणून काम करण्याची संधी मिळाली. मी कार्यभार स्वीकारल्यानंतर सर्व योजनांचा आढावा घेतला. योजनेच्या अंमलबजावणीसाठी लागणारे शासन निर्णय, नियमावली तयार करणे आणि प्रत्यक्ष याचा फायदा सुशिक्षित आणि होतकरू तरुणांना देण्यात आला. त्याचबरोबर 'ईज ऑफ डुईंग बिझनेस' अंतर्गत अन्नप्रक्रिया उद्योगांना चालना देण्यासाठी निकषांमध्ये बदल करण्यात आले.

६६ हजार कोटींची गुंतणवूणक

मॅग्नेटिक महाराष्ट्र २.० अंतर्गत गुंतवणूक वाढीस चालना देण्यात आली. नोव्हेंबर २०१९ ते नोव्हेंबर २०२० या कालावधीत २९ सामंजस्य करार करण्यात आले असून, त्याद्वारे ५१ हजार ८९७ कोटी रुपयांची गुंतवणूक तर ३९ हजार ४१२ इतका रोजगार प्रस्तावित आहे. याव्यतिरिक्त सुमारे १४ हजार ६९८ कोटी रुपये औद्योगिक गुंतवणूक प्रस्तावित आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातर्फे उद्योगांसाठी प्लग ॲण्ड प्ले सुविधा देण्यात आली आहे. तयार गाळे उपलब्ध करून देण्यात आले आहेत. नव्या उद्योगांसाठी ४० हजार एकर जमीन राखीव ठेवण्यात आली आहे. एमआयडीसी मार्फत लॅण्ड बँक तयार करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे भाडे तत्त्वावर आणि कमी कालावधीसाठी लीजवर जमीन उपलब्ध करून देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम ही राज्य शासनाची महत्त्वाकांक्षी योजना आहे. उद्योगधंदे व रोजगार निर्मितीसाठी ही एक अभिनव योजना आहे. नोव्हेंबर, २०१९ पासून या योजनेसाठी लाभार्थी निवडीची प्रक्रिया सुरू झाली. आतापर्यंत ३८१७ घटक मंजूर झाले असून, त्यातून २० ते २२ हजार रोजगार निर्मिती अपेक्षित आहे. या योजनेच्या माध्यमातून पुढील पाच वर्षांमध्ये तरुण व नव उद्योजकांसाठी एक लाख घटक तसेच ८ ते १० लाख रोजगार निर्मितीचे लक्ष ठेवण्यात आले आहे. राज्यामध्ये औद्योगिकीकरण वाढावे, यासाठी उद्योग घटकांना सामूहिक प्रोत्साहन योजनेंतर्गत वित्तीय भांडवली व इतर प्रोत्साहने दिली जात आहे. या वर्षात २६०० कोटींचे अनुदान औद्योगिक घटकांना मंजूर करण्यात आले आहे.

निर्यात प्रचालन परिषद

निर्यातीमध्ये राज्य कायम अग्रेसर आहे. देशातील सर्वात जास्त निर्यात करणारे राज्य म्हणून महाराष्ट्राची ओळख आहे. यामध्ये आणखी वृद्धी व्हावी, यासाठी एक्सपोर्ट प्रमोशन स्ट्रॅटेजी तयार करण्यात आली आहे. त्याअंतर्गत उद्योगमंत्री म्हणून माझ्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र एक्सपोर्ट प्रमोशन कौन्सिलची स्थापना करण्यात आली आहे. तसेच जिल्हास्तरावर डिस्ट्रिक एक्सपोर्ट प्रमोशन सेंटरची स्थापना करण्यात आली आहे. त्यासोबतच प्रत्येक जिल्ह्यातून निर्यात वाढावी, यासाठी 'वन डिस्ट्रिक - वन प्रॉडक्ट' ही संकल्पना राबवण्यात येत आहे.

फ्री ट्रेड वेअर हाऊसिंग झोन

मागील वर्षभरात राज्यात जवळपास

८१ हजार कोटींची माहिती तंत्रज्ञान घटकाद्वारे निर्यात करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे राज्यामध्ये ४ नवीन माहिती तंत्रज्ञानाचे विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) विकसित होत असून दोन नवीन फ्री ट्रेड वेअर हाऊसिंग झोन विकसित होत आहेत. त्यामध्ये सर्वसाधारणपणे ३ हजार कोटींची गुंतवणूक होणार आहे.

राज्यातील सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योगांसाठी त्यांचे उत्पादन वाढवण्याच्या दृष्टीने व वित्तीय सहकार्य सहजपणे उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने स्मॉल इंडस्ट्रिज डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडिया (SIDBI) यांच्याबरोबर राज्य शासनाने सामंजस्य करार करून प्रोजेक्ट मॅनेजमेंट युनिट्सची उद्योग विभागामध्ये स्थापना करण्यात आली आहे.

उद्योजकता विकास

राज्यात महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (एमसीईडी) या संस्थेमार्फत उद्योजकता विकास कार्यक्रमांतर्गत सुशिक्षित उमेदवारांना प्रशिक्षण देण्याचा नावीन्यपूर्ण कार्यक्रम हाती घेण्यात आला असून, त्या अंतर्गत महिला, अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती या १० हजारच्या जवळपास लाभार्थ्यांना उद्योजक बनण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. तसेच या लाभार्थ्यांना शासनाच्या वेगवेगळ्या कर्ज योजना जसे 'मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम', 'जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजना' आदी योजनांतर्गत प्रकल्पांना वित्तीय साहाय्य पुरवण्यात येत आहे. या योजनेकरिता जानेवारी, २०२० मध्ये विभागाला प्रतिष्ठेचा 'स्कॉच वार्ड-२०२०' हा पुरस्कार प्राप्त झाला आहे. महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्रामार्फत सद्य:स्थितीत ऑनलाइन प्रशिक्षण कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. याअंतर्गत १४०० महाविद्यालयांसोबत सामंजस्य करार करण्यात आले आहेत.

महाजॉब्स पोर्टल

कोविड-१९च्या महामारीमुळे राज्यातील कामगारांचे मोठ्या प्रमाणात स्थलांतर झाले. त्यामुळे उद्योगांना आवश्यक मनुष्यबळ प्राप्त करणे, स्थानिकांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देणे, यादृष्टीने तसेच एकत्रित माहितीच्या आधारे समन्वय व साहाय्य करण्याच्या उद्देशाने 'औद्योगिक कामगार ब्युरो महाजॉब्स पोर्टल' सुरू करण्यात आले आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून या पोर्टलचे नियंत्रण करण्यात येत असून, आतापर्यंत सुमारे २ लाख लोकांनी पोर्टलवर नोंदणी केली आहे. सामाजिक दायित्वांतर्गत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातर्फे मुख्यमंत्री सहायता निधीसाठी १०७ कोटींची मदत करण्यात आली. औरंगाबाद येथे कोविड केअर सेंटरच्या उभारणीत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातर्फे पुढाकार घेण्यात आला. स्थानिकांना रोजगार आणि गुंतवणूकीला चालना देण्यासाठी येत्या काही वर्षात एक लाख कोटी गुंतवणूकीचे लक्ष्य मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी दिले आहे. यासाठी लागणारा आराखडा तयार आहे. सगळ्यांच्या सहकार्याने हे सहज साध्य, अशी माझी खात्री आहे.

मैत्री

'ईज ऑफ डुईंग बिझनेस इनिशिएटिव्ह' अंतर्गत स्थापन केलेल्या एक खिडकी योजनेमध्ये 'मैत्री'मार्फत या वर्षामध्ये ५१,७०० ना-हरकत प्रमाणपत्रे / परवाने देण्यात आले आहेत. मैत्रीअंतर्गत १६ विभागाचे अधिकारी एकाच ठिकाणी बसून उद्योजकांच्या समस्यांचे निराकरण करत आहेत.

कोरोना काळात उद्योजकता

कोविड-१९ विषाणू प्रादुर्भावाच्या संकटकाळात राज्यातील औद्योगिक गुंतवणूक वाढीसाठी व राज्यात जागतिक दर्जाच्या बहुराष्ट्रीय कंपन्यांना महाराष्ट्रात गुंतवणूक करण्यास सुलभ होण्यासाठी विभागाच्या अभिनव उपाययोजना राबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यात येणाऱ्या सर्व थेट परकीय गुंतवणुकीच्या व ५० कोटी व त्यापेक्षा अधिक गुंतवणुकीच्या प्रस्तावांना अत्यंत तातडीने व स्वयंचलित प्रणालीद्वारे एकाच ठिकाणी महापरवाना देण्याचा निर्णय घेण्यात आला. सामूहिक प्रोत्साहन योजना २०१९ अंतर्गत कृषी व अन्नप्रक्रिया क्षेत्रातील मोठ्या व विशाल प्रकल्पांच्या गुंतवणूक निकषांमध्ये बदल करण्यात आले. लॉकडाऊन काळात परमिशन पोर्टलद्वारे उद्योग सुरू करण्यासाठी परवानग्या देण्यात आल्या. कर्मचारी/कामगार वाहतुकीसाठी ऑनलाइन पद्धतीने पास देण्यात आले. या पोर्टलचा लाभ घेऊन राज्यात ६६ हजार ८१४ उद्योग कार्यान्वित झाले. १५ लाख ८९ हजार कर्मचारी/कामगार पुन्हा कामावर रुजू झाले.

मराठी भाषा

राज्यातील सर्व मंडळांच्या शाळांमध्ये मराठी हा विषय एप्रिल २०२० पासून अनिवार्य करण्यात आला. मराठी भाषेचे अध्यापन व अध्ययन सक्तीचे करण्यात आले असून, शालेय शिक्षण विभागामार्फत त्याची अंमलबजावणी केली जात आहे. मराठी भाषेचा सक्षमपणे सर्वत्र वापर करण्यासाठी राजभाषा अधिनियम १९६४ मध्ये सुधारणा करण्यासाठी समितीची स्थापना करण्यात आली आहे.

शब्दांकन : अर्चना शंभरकर,
विभागीय संपर्क अधिकारी

अनेक नैसर्गिक संकटांना व कोरोनासारख्या महामारीला सामोरे जात असताना राज्य शासनाने सामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवून अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाने गेल्या वर्षभरात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यांत प्रयोगशाळांची निर्मिती केली आहे. शाश्वत आणि दर्जेदार विकास कामे करण्यावर भर देण्यात येत आहे.

रस्त्यांचे रूप पालटणार

अशोक चव्हाण
मंत्री, सार्वजनिक बांधकाम
(सार्वजनिक उपक्रम वगळून)

कोविडविरुद्धच्या लढ्यात सार्वजनिक बांधकाम विभागाने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. कोरोनाग्रस्तांवर उपचार करण्यासाठी रुग्णालयांमध्ये विशेष कोविड वॉर्ड, प्रयोगशाळांची उभारणी अशी अनेक कामे कमीत कमी वेळेत दर्जेदारपणे पूर्ण केली आहेत. पुणे येथे ८५० खाटांचे, तर नागपूर येथे १ हजार २८० खाटांचे कोविड रुग्णालय उभारले. तसेच राज्यात ठिकठिकाणी अशा एकूण ४३ हजार १४० खाटांची सुविधा असलेल्या १२ हजार २८५ खोल्यांची उपलब्धता करून देण्यात आली. यामध्ये ७६२ वॉर्ड, ऑक्सिजन सुविधा असलेल्या १ हजार ६३ खाटांचा व व्हेंटिलेटर्सची सुविधा असलेल्या ३५८ खाटांचा समावेश आहे, तर उर्वरित खाटा क्वारंटाइनसाठी राखीव ठेवण्यात आल्या होत्या.

आव्हानात्मक जबाबदारी

पुणे येथील ससून रुग्णालयाच्या नव्या इमारतीचे अपूर्ण काम तातडीने पूर्ण करण्यात आले. मेडिकल गॅस पाईपलाईन टाकण्याचे प्रत्यक्ष काम अवघ्या ११ दिवसांत पूर्ण करून सार्वजनिक बांधकाम विभागाने नवा विक्रम रचला आहे. साधारणतः या कामाला काही आठवड्यांचा अवधी लागतो. कोरोनाविरुद्धच्या लढ्यातील ही नवीन आव्हानात्मक जबाबदारी विभागाने स्वीकारली व ती यशस्वीपणे पूर्ण केली. त्याचबरोबर कोविड संसर्ग सुरू झाल्यानंतर ससूनमध्ये विशेष कोविड उपचार कक्ष सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. तेथील एक इमारत त्यासाठी तयार करण्याचे ठरवण्यात आले. हे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडे देण्यात आल्यानंतर तातडीने सर्व प्रक्रिया पूर्ण करून कामे हाती घेण्यात आली. काही दिवसांतच ५० खाटांचे आयसीयू कक्ष व १०० खाटांचे आयसोलेशन वॉर्ड्स तयार करण्यात आले. त्याचप्रमाणे एकूण ४७५ खाटा विभागामार्फत रुग्णालयाला पुरवण्यात आल्या. त्याचप्रमाणे आणखी ३०० खाटांचा पुरवठा करण्यात येत आहे.

ससूनमध्ये एकूण ८०० खाटांची सोय करण्यात आली. ही सर्व कामांची प्रक्रिया वेळेआधी पूर्ण करून रुग्णालय उपचारासाठी देण्यात माझ्या विभागाने महत्त्वपूर्ण कामगिरी केली आहे. त्याचबरोबर याच परिसरातील इमारतीत आयसीयू कक्ष, मायक्रोबायोलॉजी प्रयोगशाळेत कोरोना प्रयोगशाळेची उभारणीही करण्यात आली.

राज्यात मुंबई, पुणे, कोल्हापूर, सांगली, सोलापूर, जळगाव, धुळे, चंद्रपूर, गोंदिया, औरंगाबाद, नांदेड, लातूर, बीड या जिल्ह्यांत १६ प्रयोगशाळांच्या निर्मितीचे काम सुरू करण्यात आले. त्यातील अनेक प्रयोगशाळा कमीतकमी वेळेत उभारून त्यांचा वापरही सुरू करण्यात आला.

शेतकऱ्यांना दिलासा

कोविड पाठोपाठ राज्यावर अतिवृष्टीचे संकट आले. त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले. शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी राज्य शासनानेही तातडीने दहा हजार कोटी रुपयांची मदत जाहीर केली. या अतिवृष्टीमुळे राज्यातील पूल व रस्त्यांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यांच्या दुरुस्तीसाठी राज्य शासनाने २ हजार ६३१ कोटी रुपयांचे विशेष पॅकेज जाहीर केले आहे. या रस्त्यांची दुरुस्ती, वाहून गेलेले रस्ते नव्याने बांधणे, आवश्यक तेथे पुलांची निर्मिती यासाठी मी स्वतः

काही जिल्ह्यांमध्ये जाऊन पाहणी केली व प्रशासनाच्या बैठका घेऊन दुरुस्ती करण्याच्या सूचना दिल्या.

दर्जेदार पायाभूत सुविधा

रस्ता हा पायाभूत सुविधेमधील महत्त्वाचा घटक आहे, अशी धारणा आहे. त्यामुळे आज जे राज्य शासनाच्या अखत्यारित जवळपास ९७ हजार किलोमीटरचे रस्ते आहेत, हे सर्व रस्ते सुस्थितीत असले पाहिजेत, ते वाहतुकीच्या दृष्टिने सुव्यवस्थित असावेत, यावर भर देण्यात येत आहे. रस्ते चांगले असले तर राज्याची प्रतिमा वाढते. त्यामुळे हेच रस्ते नाहीत, तर गावापर्यंत, औद्योगिक वसाहतीपर्यंत जाणारे रस्तेही चांगले असावेत, असा आमचा प्रयत्न आहे. दर्जेदार पायाभूत सुविधा ज्यामध्ये रस्ता हा महत्त्वाचा भाग आहे. ते चांगले असावेत, यासाठी आमचे काम सुरू आहे.

प्रस्तावित कामे

राज्यातील रस्त्यांची कामे दर्जेदार व वेळेत पूर्ण व्हावी, यासाठी माझा नेहमीच आग्रह असतो. विभागाकडे राज्याच्या अर्थसंकल्पाव्यतिरिक्त केंद्र शासन व आशियाई विकास बँकेच्या निधीतून कामे केली जातात. महाराष्ट्रातील प्रमुख राज्य व जिल्हा मार्ग राष्ट्रीय महामार्गांना तसेच इतर प्रमुख हमरस्त्यांना जोडण्यासाठी आशियाई विकास बँकेच्या साहाय्याने राज्य सरकार निधी उभारत आहे. या निधीतून राज्यातील अनेक रस्त्यांचे रूपडे पालटणार आहे. आशियाई विकास बँक अर्थसाहाय्यित रस्ते विकास प्रकल्पांच्या अनेक कामांना यापूर्वीच मंजुरी देण्यात आली असून, साधारणतः १,७५० कोटी रुपयांच्या कामांना मंजुरी देण्यात आली आहे. त्याचबरोबर ३,२५० कोटी रुपयांच्या टप्पा १ मधील फेज दोन व तीनचे काम प्रस्तावित आहे. तसेच तिसऱ्या टप्प्यासाठी १ हजार मिलियन डॉलरचे कर्ज घेऊन सुमारे २५०० किमी नवीन रस्त्यांची कामे होणार आहेत. नाबार्डच्या अर्थसाहाय्यातून ग्रामीण भागातील रस्त्यांवरील पुलांच्या कामांना प्राधान्य देण्याचे ठरवले होते. त्यानुसार ही कामेही सुरू झाली आहेत. नाबार्ड अंतर्गत ग्रामीण भागातील रस्त्यांवरील पुलांची कामे करण्यास प्राधान्य देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे ९३० कोटींची कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत.

इतर महत्त्वाचे निर्णय

निवडणुकीच्या वेळेस निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांना मुंबईत एकाच ठिकाणी ना देय प्रमाणपत्र देण्याची सुविधा सुरू करण्यात आली. पुलांची देखभाल, दुरुस्ती व पुनर्निर्माणासाठी नियमावली विकसित करण्यात आली आहे. यामुळे राज्यातील सर्व पुलांची देखभाल व दुरुस्तीची कामे तसेच आवश्यक त्या ठिकाणी त्या पुलांचे पुनर्निर्माणाचे काम वेगाने होण्यास मदत होणार आहे. मार्च महिन्यात झालेल्या अर्थसंकल्पात पहिल्यांदाच मोठ्या प्रमाणात २९ कार्यालयीन व अनिवासी इमारतीच्या बांधकामासाठी निधीची तरतूद करण्यात आली. बांधकाम विभागाबाबत खटल्यांच्या प्रकरणांच्या संनियंत्रणासाठी संगणकीय प्रणाली तयार करण्यात आली आहे. यामुळे खटल्यांचे नियमित मॉनिटिअरिंग होऊन हे खटले लवकरात लवकर संपतील, याकडे लक्ष ठेवण्यात येत आहे. विविध जिल्ह्यातील रस्ते, पूल व शासकीय इमारती यांची कामे लवकरात लवकर मार्गी लागावीत, यासाठी पहिल्यांदाच जिल्हा बैठकांचे आयोजन करण्यात आले.

वाहतूक कोंडी सुटण्यास मदत

नवीन रस्ते प्रकल्पांची विशेषतः राष्ट्रीय महामार्गाची कामे हाती घेत असताना अनेकदा भूसंपादनामध्ये अडचणी निर्माण होतात. विशेषतः नगरपालिका क्षेत्रातील व ग्रामीण भागातील भूधारकांना मिळणारा मोबदला यामध्ये तफावत होती. ही तफावत दूर करावी, यासाठी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्रालयाकडे पाठपुरावा केला. त्यानंतर नगरपालिका/नगरपंचायती व ग्रामीण भागातील भूसंपादनाच्या मोबदल्यातील तफावत दूर करण्याचा निर्णय झाला. तसेच अविकसित नगरपंचायत व 'क' वर्ग नगरपालिकांना सुद्धा ग्रामीण भागाप्रमाणेच वाजवी मोबदला मिळण्यासंबंधी निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातील रस्त्यांच्या कामांना निधी उपलब्ध व्हावा, यासाठी हायब्रिड ॲन्युईटी अंतर्गत रस्ते दुरुस्ती, रुंदीकरणाची कामे सुरू आहेत. त्याअंतर्गत ८ हजार ६०२ किमी रस्त्यांची १४८ पॅकेजेसची कामे हाती घेण्यात आली आहेत. यामध्ये २५४३ किमी रस्त्यांचे डांबरीकरण पूर्ण करण्यात आले आहे. या योजनेंतर्गत रस्त्यांचे दुपदरी व चौपदरीकरण करण्याचे काम सुरू आहे. यामुळे जास्त वाहतूक असलेल्या रस्त्यांवरील वाहतूक कोंडी सुटण्यास मदत होणार आहे.

सुखकर प्रवास

राष्ट्रीय महामार्गावर रेस्टॉरंट, पेट्रोलपंप, शौचालये आदी सोयीसुविधा असतात. त्याचबरोबर राज्यातील इतरही राज्य महामार्गांवर अशाच सोयीसुविधा देता यायला हव्यात. जेणेकरून प्रवासाला निघालेल्या प्रवाशाला ५०-१०० किलोमीटर गेल्यानंतर कुठे तरी थांबता आले पाहिजे, त्या ठिकाणी शौचालय, पेट्रोलपंप असले पाहिजेत. थोडासा आराम करण्याची सुविधा हवी. त्याद्वारे त्याचा पुढचा प्रवास सुखकर होईल. ही संकल्पना राज्यातील इतर रस्त्यांवर राबवण्याची सूचना देण्यात आली.

शब्दांकन : नंदकुमार वाघमारे,
विभागीय संपर्क अधिकारी

महाविकास आघाडी सरकारच्या महत्त्वाकांक्षी शिवभोजन योजनेंतर्गत आतापर्यंत अडीच कोटी गरजू लोकांनी शिवभोजनाचा लाभ घेतला. सामान्य परिस्थितीमध्ये राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेंतर्गत महिनाभरात साधारणतः ३.५० लाख मे.टन धान्य वितरित केले जाते. मात्र कोरोनाच्या पार्श्वभूमीवर अनेक अडचणी असूनही दर महिन्याला जवळपास ८.५० लक्ष मे.टन अर्थातच तीनपट धान्य वितरित करण्याचा विक्रम अन्न, नागरी पुरवठा विभागाने केला आहे.

अन्नधान्य वितरणात विक्रम

छगन भुजबळ
मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण

शिवभोजन समाधानकारक

राज्यातील गरीब आणि गरजूंना स्वस्त दरात भोजन उपलब्ध व्हावे, यासाठी २६ जानेवारी २०२० पासून शिवभोजन योजना सुरू करण्यात आली. शिवभोजन थाळीचा दर शहरी भागात ५० व ग्रामीण भागात ३५ रुपये असा निश्चित करण्यात आला होता. सुरुवातीला ग्राहकाला १० रुपये प्रतिथाळी याप्रमाणे जेवण उपलब्ध करून देण्यात येत होते. हे दहा रुपये वजा जाता शहरी भागासाठीचे ४० व ग्रामीण भागासाठीचे २५ रुपये प्रतिथाळीची उरलेली रक्कम शासनामार्फत अनुदान म्हणून शिवभोजन केंद्रांना दिली जात होती.

कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावकाळात राज्यातील गोरगरिबांना कमी किमतीत जेवण उपलब्ध व्हावे, या उद्देशाने शिवभोजन थाळीचा दर २९ मार्च २०२० रोजीपासून प्रतिथाळी ५ रुपये इतका करण्यात आला. ५ रुपये प्रतिथाळीने शिवभोजन देण्याच्या या निर्णयाला ३१ मार्च २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. लॉकडाऊनच्या काळात लाखो लोकांची भूक भागवणारी ही शिवभोजन थाळी खऱ्या अर्थाने ठरली अन्नपूर्णेची थाळी. या योजनेसाठी शिवभोजन ॲप्लिकेशन तयार करण्यात आले असून, त्याचा वापर करूनच शिवभोजन थाळी वितरित करणे बंधनकारक आहे. योजनेचा विस्तार आता तालुकास्तरापर्यंत करण्यात आला आहे. राज्यात ९०७ शिवभोजन केंद्रे सुरू असून योजना सुरू झाल्यापासून ते आतापर्यंत अडीच कोटी गरीब व गरजू लोकांनी योजनेचा लाभ घेतला आहे.

विक्रमी धान व भरडधान्य खरेदी

किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत राज्यात ऑक्टोबर २०१९ ते जुलै २०२० या काळात विक्रमी धान आणि भरडधान्याची (ज्वारी, बाजरी, मका, रागी) खरेदी करण्यात आली आहे. विदर्भातील धान खरेदीसाठी मुदतवाढ मिळालेल्या शेतकऱ्यांना राज्य शासनाच्या प्रोत्साहन अनुदानाचा लाभ देण्यात आला. दरवर्षी फक्त खरीप हंगामातच भरडधान्याची खरेदी केली जात होती; परंतु राज्यातील शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन राज्य शासनाने रब्बी हंगामातही भरडधान्य खरेदी करण्याचा निर्णय घेतला. या वर्षी खरीप आणि रब्बी मिळून ३ लाख ७६ हजार ४०५ शेतकऱ्यांकडून सुमारे १ कोटी ७४ लाख क्विंटल धानाची विक्रमी खरेदी झाली.

तसेच खरीप आणि रब्बी हंगामात सुमारे ११.५० लाख क्विंटल मक्याची

नाशिक शहरातील शिवभोजन केंद्राची पाहणी करताना व लाभार्थ्यांसोबत संवाद साधताना अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ.

खरेदी करण्यात आली आहे. या योजनेचे उद्दिष्ट २.५० लाख क्विंटलवरून ९ लाख क्विंटल वाढवून योजनेची मुदत १५ जुलै करण्यात आली होती. मात्र, शेतकऱ्यांच्या मागणीनुसार केंद्र शासनाकडे पाठपुरावा करून २.५० लाख क्विंटल अतिरिक्त उद्दिष्ट वाढवून योजनेची मुदत वाढवण्यात येऊन शेतकऱ्यांचा संपूर्ण मका खरेदी केला.

रब्बी हंगामात पहिल्यांदाच मका खरेदी करण्याचा निर्णय घेतला आणि विक्रमी स्वरूपात मक्याची खरेदी करण्यात आली. खरीप आणि रब्बी मिळून २८ हजार २७९ शेतकऱ्यांकडून ७१ हजार ४५१ क्विंटल ज्वारीची खरेदी करण्यात आली. यापोटी किमान आधारभूत किमतीचे ३४५८.५१ कोटी रुपये तसेच प्रोत्साहनपर राशी ८६० कोटी रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आले आहेत.

लॉकडाऊन काळात दिलासा

केंद्र शासनाने प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेची अंमलबजावणी एप्रिल २०२० पासून सुरू केली. योजनेंतर्गत सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांसाठी राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या अन्नधान्याव्यतिरिक्त प्रतिमाह प्रतिसदस्य ५ किलो अन्नधान्य व प्रतिमाह प्रतिकुटुंब १ किलो डाळ याप्रमाणे अन्नधान्य वितरित करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. योजनेंतर्गत माहे एप्रिल २०२० ते नोव्हेंबर २०२० या कालावधीकरिता प्रतिमाह ३ लाख ५० हजार मे. टन अन्नधान्य व १५ हजार ३४० मे. टन डाळ मोफत वितरित करण्यात येत आहे. सवलतीच्या दराने अन्नधान्य राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना व शेतकरी योजनेंतर्गत समाविष्ट न झालेल्या परंतु ज्यांचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न १ लाखापर्यंत आहे अशा ३ कोटी ८ लाख ४४ हजार एवढ्या एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारकांना मे ते ऑगस्ट २०२० या कालावधीकरिता सवलतीच्या दराने अन्नधान्याचा लाभ देण्यात आला. याचा आर्थिक भार राज्य शासनाने स्वत: स्वीकारून अडचणीच्या काळात गरीब जनतेला मदत करण्याची भूमिका स्वीकारली आणि अमलात आणली. या निर्णयानुसार प्रत्येक व्यक्तीला प्रत्येक महिन्याला ३ किलो गहू (रु.८/- प्रतिकिलो) व २ किलो तांदूळ (रु.१२/- प्रतिकिलो) याप्रमाणे अन्नधान्य उपलब्ध करून देण्यात आले आहे.

दृष्टिक्षेपात

● केरोसीन बचतीमुळे राज्य शासनाला केरोसीनमधील थेट लाभ वितरण योजनेनुसार ३६.१९ कोटी प्रोत्साहनभर लाभ. ● नवीन गोदामे- अन्नधान्य साठवण्यासाठी ३१,३२० मे.टन क्षमतेच्या २१ नवीन गोदामांच्या बांधकामांना मान्यता देण्यात आली व यासाठी ५१.०३ कोटी रुपयांचा निधीही वितरित करण्यात आला आहे. ● किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेखाली रब्बी पणन हंगामात गहू या पिकासाठी राज्यात प्रथमच विकेंद्रित खरेदी योजना लागू करण्यात आली. लॉकडाऊन काळात अनेक स्वयंसेवी संस्था गरजू लोकांना अन्नधान्य वितरण व अन्नछत्र चालवत होत्या, त्यांना ओएमएसएस (open market sale scheme) अंतर्गत एफसीआय मधून रु.२१/- प्रतिकिलो गहू व रु. २२/- प्रतिकिलो तांदूळ उपलब्ध करून देण्यात आले. जीवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५ अंतर्गत मास्क व हॅण्ड सॅनिटायझर या वस्तूंचा जीवनावश्यक वस्तू म्हणून समावेश केला. ● धान खरेदीसाठी केंद्राने जाहीर केलेल्या हमीभावापेक्षा ७०० रुपये प्रतिक्विंटल अतिरिक्त देण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे धानासाठी २५६८ व 'अ' ग्रेड धानासाठी २५८८ एवढी रक्कम शेतकऱ्यांना मिळणार आहे. या योजनेसाठी राज्य सरकारने १४०० कोटी रुपये मंजूर केले आहेत. ● कृषी विभागाने जाहीर केलेल्या उत्पादनापेक्षा अधिक धानाची खरेदी होत असल्याची बाब निदर्शनास आली होती त्यामुळे अन्न, नागरी पुरवठा विभाग आणि महसूल विभागाने करार करून ऑनलाइन ७/१२ व ८-अ उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. याचा फायदा राज्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना होणार आहे.

धान्य वितरणाचा विक्रम

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री गरिब कल्याण अन्न योजनेंतर्गत राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेच्या पात्र ७ कोटी लाभार्थ्यांना एप्रिल ते नोव्हेंबर या कालावधीत प्रतिव्यक्ती ५ किलो मोफत तांदूळ तसेच प्रतिकुटुंब एक किलो तूरडाळ किंवा चणाडाळ वितरण केले. तसेच मे आणि जूनपासून केशरी कार्डधारकांनादेखील अतिरिक्त १.५० लक्ष मे. टन धान्य वाटप केले जात असल्याने प्रतिमाह जवळपास ८.५० लक्ष मे. टन म्हणजे तीनपट धान्य वितरित करण्याचा विक्रम अन्न, नागरी पुरवठा विभागाने केला आहे. आत्मनिर्भर योजनेंतर्गत रेशन कार्ड नसलेल्या गरजू नागरिकांना मे व जून महिन्यात प्रतिव्यक्ती प्रतिमाह ५ किलो मोफत तांदूळ व प्रतिकुटुंब प्रतिमाह एक किलो अख्ख्या चण्याचे वितरण केले. प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेतील राज्यातील अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांना जुलै ते नोव्हेंबर २०२० या कालावधीकरिता अख्ख्या चण्याऐवजी दरमहा प्रत्येक शिधापत्रिकाधारकास एक किलो मोफत चणाडाळ वितरित करण्याचा निर्णय घेतला आहे.

शब्दांकन : दत्तात्रय कोकरे,
विभागीय संपर्क अधिकारी

राज्य शासनाने कामगारांच्या सुरक्षेला, आरोग्याला आणि एकंदरच सर्वांगीण विकासाला प्राधान्य दिले आहे. गेल्या वर्षभरात आपण प्राधान्याने कामगारांसाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. उद्योग, कामगार आणि कौशल्य विकास विभाग एकत्रित आल्याने महाराष्ट्रातील वाटचाल आता प्रगतीकडे होणार हे नक्की आहे. महाजॉब्स पोर्टलच्या माध्यमातून नव्या जुन्या कुशल आणि अकुशल कामगारांना रोजगार मिळणार आहे. राज्यातील भूमिपुत्रांना रोजगाराची नवी संधी यामुळे निर्माण होणार आहे.

कामगारांना मदतीचा हात

दिलीप वळसे-पाटील
मंत्री, कामगार, राज्य उत्पादन शुल्क

आज महाराष्ट्रासमोर वेगळे प्रश्न आहेत. बळीराजा अडचणीत आहे, अजूनही कोविड -१९ चे सावट आहे, राज्याचा विकास दर कमी झाला आहे, अनेकांचे रोजगार गेले आहेत. पण मला खात्री आहे. संकटातून संधी निर्माण करत आमचे सरकार महाराष्ट्राच्या विकासाची परंपरा कायम राखेल.

कामगारांच्या हिताचे निर्णय

कोविड-१९ चा सामना करण्यासाठी देशात लॉकडाऊन करण्यात आला. या काळात आपण सर्वांनी स्वयंशिस्त आणि संयम दाखवला असून येणाऱ्या काळातही सर्वांना एकजुटीने परिस्थितीशी सामना करावयाचा आहे. महाराष्ट्राच्या एकूणच जडणघडणीत राज्यातील कामगारांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. महाराष्ट्र हे अनेक कामगार कायद्यांचे जनक आहे. राज्य शासन महाराष्ट्रातील कामगारांच्या सुरक्षेला, आरोग्याला आणि एकंदरच सर्वांगीण विकासाला प्राधान्य देऊन विविध कायदे कामगारांच्या हितासाठी राबवत आहे. यापुढील काळातही महाराष्ट्रात कामगारांचे हक्क आणि त्यांचे हित अबाधित ठेवण्याचा प्रयत्न असणार आहे. गेल्या वर्षभरात आपण प्राधान्याने कामगारांसाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले.

कामगारांचे विविध प्रश्न सोडवण्यासाठी कामगार विभागाने वेळोवेळी सक्रिय भूमिका घेतली आहे. उद्योग, कामगार आणि कौशल्य विकास विभाग एकत्रित आल्याने महाराष्ट्रातील वाटचाल आता प्रगतीकडे होणार हे नक्की आहे. महाजॉब्स पोर्टलच्या माध्यमातून नव्या जुन्या कुशल आणि अकुशल कामगारांना रोजगार मिळणार आहे. राज्यातील भूमिपुत्रांना रोजगाराची नवी संधी यामुळे निर्माण होणार आहे.

आपल्या सर्वांसाठीच गेल्या आठ महिन्यांचा काळ हा कठीण काळ होता. परराज्यातून महाराष्ट्रात रोजगारासाठी आलेला कामगार वर्गही मोठ्या प्रमाणात लॉकडाऊनमुळे अडकून पडला होता. पण याही काळात कामगार वर्गाला धीर देण्याचा प्रयत्न शासनाने केला.

कामगारांना आर्थिक मदत

लॉकडाऊन काळात नोंदणीजीवित असलेल्या बांधकाम कामगारांना दोन टप्प्यात ५ हजार रुपयांचे आर्थिक साहाय्य. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळामार्फत पहिला दोन हजार रुपयांचा हप्ता ९ लाख २५ हजार बांधकाम कामगारांना देण्यात आला, तर दुसरा हप्ता ९ लाख २५ हजार बांधकाम कामगारांना देण्यात आला. यासाठी मंडळामार्फत एकूण ४६२ कोटी ६० लाख रुपयांहून अधिक रकमेचे वाटप करण्यात आले. लॉकडाऊन काळात काम बंद असल्याने नोंदीत माथाडी कामगारांना ५ हजार रुपयांपर्यंत आर्थिक मदत. २६ माथाडी मंडळातील ७५,४७० माथाडी कामगारांना ३१ कोटी ११ लाख ६५ हजार रुपयांची आर्थिक मदत.

प्रवासभत्ता आणि भोजन

लॉकडाऊन काळात नोंदीत सुरक्षा रक्षकांना अतिरिक्त प्रवासभत्ता देण्यास मान्यता. ९ सुरक्षा रक्षक मंडळातील २४,१७० सुरक्षा रक्षकांना ६ कोटी ६६ लाख ९७ हजार ३०० एवढ्या रकमेचा अतिरिक्त प्रवासभत्ता एप्रिल ते जुलै २०२० या कालावधीसाठी अदा करण्यात आला. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळामार्फत लॉकडाऊन काळात मुंबई, पुणे, ठाणे आणि नागपूर येथील ५२९ बांधकामाच्या ठिकाणी ८२ हजार कामगार अडकले होते. या अडकलेल्यांसह ८८ लाख २३ हजार बांधकाम कामगारांना मध्यान्ह भोजन योजनेंतर्गत जेवण, तर ३७ लाख ७५

राज्य उत्पादन शुल्क

अवैध मद्यनिर्मिती वाहतूक, विक्रीविरुद्ध नागरिकांना तक्रार करता यावी, यासाठी नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आले. नियंत्रण कक्षाचा टोल फ्री क्रमांक १८००८३३३३३३ तर व्हॉट्सॲप क्रमांक ८४२२००११३३ असा आहे. मद्यसेवन परवाने आता 'आपले सरकार' च्या https://aaplesarakar.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरून प्राप्त करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

लॉकडाऊन सुरू झाल्यापासून महाराष्ट्रात शेजारील राज्यांमधून होणारी अवैध मद्य तस्करी रोखण्यासाठी सर्व विभागीय उप आयुक्तांच्या देखरेखीखाली १२ सीमा तपासणाऱ्या नाक्यांवर अधिकारी-कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. लॉकडाऊन काळात खाद्यगृह, बार यांना व्यवसायाची संधी न मिळाल्याने त्यांना दिलासा देण्यासाठी अबकारी अनुज्ञप्तींना मुदतवाढ देण्याचा निर्णय, ३० सप्टेंबर २०२० पर्यंत ५० टक्के, तर ३१ डिसेंबर २०२० पर्यंत उर्वरित ५० टक्के रक्कम भरण्याची मुभा देण्यात आली.

कोणत्याही परिस्थितीत राज्यातील गडकिल्ल्यांचे पावित्र्य मद्यपींकडून भंग होणार नाही, यासाठी दारूबंदी कायद्याखाली कडक कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले. साखर/साखरेचा पाक/ऊसाचा रस/बी-हेवी/सी-हेवी मळीपासून जलरहित मद्यार्काचे उत्पादन घेण्यास परवानगी देण्यासाठी सुधारित धोरण निश्चित करण्यात आले. या धोरणामुळे साखर कारखान्यांशी संलग्न आसवनींना इथेनॉल निर्मिती, विक्री यामध्ये अधिक सुलभता आली. मद्यनिर्मिती व मद्याची घाऊक विक्रेते व किरकोळ विक्रेते यांच्याकडे होणारा प्रवास राज्य उत्पादन शुल्क विभागाने विकसित केलेल्या सप्लाय चेन प्रणालीद्वारे नियंत्रित करण्यात आला. नोंदणीशुल्क तरतूदीऐवजी परदेशातून आयात होणाऱ्या मद्यावर वाहतूक शुल्क वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे राज्याचा महसूल वाढण्यास मदत होणार आहे.

एवढ्या बांधकाम कामगारांना रात्रीचे भोजन. यासाठी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळामार्फत ६ कोटी २९ लाख ९८ हजार ५१० रुपये भोजनासाठी खर्च.

तक्रार निवारण केंद्राची स्थापना

कोविड-१९मुळे उद्योजक व कारखानदार यांना वार्षिक विवरण पत्र सादर करण्यासाठी ३१ जुलै २०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. कोविड -१९ मुळे राज्यात लॉकडाऊन यामुळे अनेक व्यवसाय, उद्योग बंद असल्याने कामगारांना थकित वेतन न देणे, कामावरून कमी करणे इत्यादी तक्रारी कामगार विभागास प्राप्त झाल्याने कामगार आयुक्तालयाच्या आधिपत्याखाली प्रत्येक जिल्हा कार्यालयामध्ये तक्रार निवारण केंद्राची स्थापना. आतापर्यंत एकूण १ हजार ०६६ तक्रारी हाताळण्यात आल्या, तर २५,६९९ कामगारांना ४७.५९ कोटी रुपये इतका लाभ कामगार आयुक्त कार्यालयाच्या मध्यस्थीने मिळवून देण्यात आला.

स्वतंत्र पोर्टल

आंतरराज्यीय स्थलांतरित कामगारांना मूळ गावी जाण्याकरिता विशेष श्रमिक रेल्वेने जाण्याकरिता कामगारांची वैयक्तिक माहिती घेणे आवश्यक. कामगारांची माहिती एकत्र करण्याकरिता कामगार विभाग आणि महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळाच्या साहाय्याने स्वतंत्र पोर्टल (http:migrant.mahalabour.in/migrant/form) विकसित.

कारखाने चालवण्यास परवानगी

स्थलांतरित कामगारांना सुविधा देण्यासाठी जिल्हाधिकारी यांना आपत्ती व्यवस्थापन निधीतून खर्च करण्यास मान्यता देण्यात आली. विस्थापित कामगारांच्या व्यवस्थेसाठी ४५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. लॉकडाऊननंतर 'मिशन बिगीन अगेन' अंतर्गत उद्योग व्यवसाय सुरू. यामुळे कारखान्यांना १२ तासांच्या २ पाळ्यांमध्ये काही अटींच्या अधीन राहून कारखाने चालवण्यास परवानगी दिली.

नियंत्रण कक्ष स्थापन

राज्यातील माथाडी व सुरक्षा रक्षक मंडळांचे वैधानिक लेखा परीक्षण करण्यासाठी नव्याने लेखा परीक्षकांची सूची (पॅनेल) तयार करण्यात आली. कारखाने व आस्थापनामध्ये काम करणाऱ्या कामगारांना लॉकडाऊन काळात वेतन अदा न करणे, कामावरून कमी करणे अशा तक्रारींचे निराकरण करण्यासाठी नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला.

बाष्पके संचालनालय

बाष्पक निरीक्षणाला १५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल बाष्पके संचालनालयामार्फत बॉयलर इंडिया २०२० चे आयोजन. या कार्यशाळेत बाष्पक अभियंते, बाष्पक परिचर, बाष्पक निर्माते, दुरुस्तीकार असे १५०० हून अधिक सहभागी. कोविड -१९ परिस्थितीमुळे बाष्पक मालकांना बाष्पकांच्या दहा वर्षानंतरच्या उघड्या स्वरूपातील निरीक्षणामध्ये (बेअर इन्स्पेक्शन) एक वर्ष सूट देण्यात आली.

कोविड-१९ पार्श्वभूमीवर ऑनलाइन पद्धतीने नकाशाला मान्यता देण्यासाठी 'नवीन नकाशा मान्यता ऑनलाइन प्रणाली' www.mahaboiler.com या संकेतस्थळावर उपलब्ध. राज्याच्या विकासात कामगार हा महत्त्वपूर्ण घटक ठरला आहे. येणाऱ्या काळात कामगार वर्गाला अधिक सक्षम करण्यासाठी कामगार विभाग काम करत आहे.

शब्दांकन : वर्षा फडके-आंधळे,
विभागीय संपर्क अधिकारी

मागील वर्षभरात राज्य शासनाच्या कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग तसेच अल्पसंख्याक विकास विभागाने अभूतपूर्व अशी कामगिरी केली आहे. विशेषत: लॉकडाऊन काळात रोजगार निर्मितीसाठी कौशल्य विकास विभागामार्फत विशेष प्रयत्न करण्यात आले. अल्पसंख्याकांच्या शिक्षणविषयक तसेच इतर विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे.

नवाब मलिक
मंत्री, अल्पसंख्याक विकास व औकाफ,
कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता

कौशल्य विकास व रोजगार

कोरोना संकटकाळात लोकांना रोजगार मिळवून देण्यासाठी कौशल्य विकास विभागाने मोठ्या जिद्दीने काम केले. विविध उपक्रमांमधून जानेवारी ते ऑक्टोबर २०२० या काळात १ लाख ४८ हजार ३४३ बेरोजगारांना रोजगार मिळाला आहे. यातील १ लाख १५ हजार ९२८ रोजगार लॉकडाऊनच्या काळात मिळवून देण्यात आले. बेरोजगार उमेदवार आणि उद्योजक यांच्यामध्ये सांगड घालण्यासाठी विभागाचे https://rojgar.mahaswayam.gov.in हे वेबपोर्टल कार्यरत आहे. लॉकडाऊन काळात या वेबपोर्टलचा प्रभावी वापर करण्यात आला.

ऑनलाइन रोजगार मेळावे

राज्यभरात पंडित दीनदयाळ उपाध्याय ऑनलाइन रोजगार मेळाव्यांची मोठी मोहीम राबवण्यात आली. एप्रिल ते सप्टेंबर दरम्यान १११ ऑनलाइन रोजगार मेळावे झाले. सप्टेंबरमध्ये झालेल्या ३५ मेळाव्यांमध्ये २३६ उद्योजकांनी सहभाग घेतला. त्यांच्याकडील १६ हजार ६८३ जागांसाठी ऑनलाइन मुलाखती घेतल्या. या मेळाव्यांमध्ये ९ हजार ८५६ नोकरीइच्छुक तरुणांनी सहभाग घेतला. कोरोना काळात उमेदवारांना ऑनलाइन समुपदेशन आयोजित करण्यात आले.

आयटीआय प्रवेशप्रक्रिया

राज्यातील ४१७ शासकीय व ५६९ खासगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील (आयटीआय) ८४ व्यवसाय अभ्यासक्रमांच्या ६ हजार ८६८ तुकड्यांमधून एकूण १ लाख ४५ हजार ६३२ विद्यार्थ्यांसाठी जागा उपलब्ध आहेत. राज्यातील सर्व शासकीय आयटीआयचा कायापालट करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. आयटीआयचे टाटा टेक्नॉलॉजी व इतर उद्योगसमुहांच्या सहयोगातून आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधायुक्त आयटीआयमध्ये रूपांतरण करण्यात येत आहे. यासाठी सुमारे १२ हजार कोटी रुपयांचा खर्च होणार आहे. नवीन उद्योग, त्यांमध्ये आवश्यक असलेले नवे कौशल्य या अनुषंगाने अभ्यासक्रमांची फेरआखणीही करण्यात येत आहे.

५६९ तरुणांना प्रशिक्षण

कौशल्य विकास आणि उद्योजकता विभागाच्या नावात आता 'कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता विभाग' असा बदल करण्यात आला आहे. राज्यात अर्थसाहाय्यित, स्वयंअर्थसाहाय्यित तत्त्वावर कौशल्य विद्यापीठांची स्थापना करण्याच्या अनुषंगाने समिती गठित करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीमध्ये अनुकंपा तत्त्वावर वायरमन (तारतंत्री) पदाच्या नोकरीसाठी पात्र असलेल्या पण आवश्यक प्रशिक्षणाअभावी नोकरीपासून वंचित राहिलेल्या ५६९ तरुणांना आयटीआयमधून प्रशिक्षण देऊन त्यांना नोकरी मिळवून देण्याचा निर्णय घेतला आहे.

कौशल्य विकास परीक्षा मंडळ

कंपलसरी नोटिफिकेशन ऑफ व्हॅकन्सी ॲक्ट अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी केल्याने आणखी ४० हजार उमेदवारांना नोकरी उपलब्ध करून देण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाचे नाव आता महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास परीक्षा मंडळ करण्याचा निर्णय झाला आहे. कौशल्य विकास परीक्षा मंडळ अधिनियम तयार करण्यासाठी समितीची स्थापना, राज्यातील सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये इन्स्टिट्युट मॅनेजमेंट कमिटी स्थापन, आयटीआयमधील कर्मचाऱ्यांच्या ऑनलाइन पद्धतीने बदल्या, स्किल इंडिया पोर्टलवर सर्व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची प्रशिक्षण संस्था म्हणून नोंदणी असे विविध निर्णय

झाले आहेत. राज्यातील सर्व जिल्ह्यांचा मायक्रो लेवल स्किल गॅप स्टडी अहवाल अंतिम करण्याबाबत कार्यवाही सुरू आहे. महाराष्ट्र ॲप्रेंटिसशिप प्रमोशन स्किम संदर्भातही राज्यामध्ये कामकाज सुरू आहे.

स्टार्टअपना शासकीय कामे

महाराष्ट्र राज्य नावीन्यता सोसायटीतर्फे झालेल्या ऑनलाइन महाराष्ट्र स्टार्टअप सप्ताहामध्ये देशभरातील १ हजार ६०० स्टार्टअप्सनी सहभाग घेतला. तरुणांनी वैशिष्ट्यपूर्ण कल्पकता दाखवत कृषी, शिक्षण, कौशल्य विकास, सार्वजनिक आरोग्य, स्वच्छ ऊर्जा, जलव्यवस्थापन, कचरा व्यवस्थापन, प्रशासन आदी विविध क्षेत्रात अभिनव बदल घडवू शकणारे स्टार्टअपचे सादरीकरण केले. उत्कृष्ट २४ स्टार्टअप्सना त्यांची नावीन्यपूर्ण उत्पादने, सेवा या संबंधित शासकीय विभागांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर राबवण्यासाठी प्रत्येकी १५ लाख रुपयांपर्यंतचे शासकीय कामाचे कार्यादेश देण्यात येत आहेत. या २४ कल्पनांचा वापर शासनाच्या विविध विभागांमधील कामकाजासाठी करण्यात येणार आहे.

केंद्र सरकारने जाहीर केलेल्या राज्यांच्या स्टार्टअप क्रमवारीमध्ये महाराष्ट्राने नेतृत्व श्रेणीमध्ये (लिडर) देशात दुसरा क्रमांक पटकावला आहे. केंद्रीय वाणिज्य व उद्योग मंत्रालयाच्या व्यापार आणि उद्योग संवर्धन विभागाच्यावतीने राज्यांच्या स्टार्टअप संस्थांसाठीच्या साहाय्यक कामगिरीच्या क्रमवारीत महाराष्ट्राने नेतृत्व श्रेणीत (लिडर्स) देशात दुसरा क्रमांक पटकावला आहे. राज्याला स्टार्टअप सुधारणांच्या श्रेणीमध्ये अन्य तीन स्थानेही मिळाली आहेत. स्टार्टअप सुधारणांमध्ये नवीन उद्योजक तयार करणे, नावीन्यपूर्ण विस्तार करणे, जनजागृती व प्रचार या तीन वेगवेगळ्या निकषांवरही या निकालात उत्तम गुण मिळवून महाराष्ट्राने बाजी मारली आहे.

योजनांची प्रभावी अंमलबजावणी

राज्य शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभागामार्फत राज्यातील मुस्लीम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध, पारशी, जैन आणि ज्यू समाजातील विद्यार्थी, महिला यांच्यासह अल्पसंख्याकबहुल भागाच्या विकासासाठी विविध योजना राबवण्यात आल्या. शासकीय आणि खासगी ८४ आयटीआयमध्ये अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी दुसऱ्या आणि तिसऱ्या पाळीमध्ये वर्ग सुरू करण्यात आले आहेत. आता लॉकडाऊननंतर वर्ग सुरू झाल्यानंतर या आयटीआयमध्ये ८ हजार ३४८ अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना प्रशिक्षण मिळणार आहे. राज्यातील १५ शासकीय पॉलिटेक्निकमध्ये अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी यंदाही दुसऱ्या पाळीतील वर्ग योजना राबवण्यात येत आहे. अल्पसंख्याक समाजातील मुलींच्या उच्च शिक्षणाला चालना देण्यासाठी २३ ठिकाणी शैक्षणिक संकुलांमध्ये वसतिगृहे सुरू करण्यात आली आहेत. पोलीस भरतीच्या तयारीसाठी अल्पसंख्याक तरुणांकरिता विविध जिल्ह्यांमध्ये प्रशिक्षण योजना राबवण्यात येणार आहे. डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजनेतून १६८ मदरशांना शिक्षकांच्या मानधनासाठी २.३१ कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत. अल्पसंख्याक समाजाचे शासकीय सेवेतील प्रमाण वाढवण्याकरिता युपीएससी स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण योजना राबवण्यात येत आहे. अल्पसंख्याक समाजातील महिलांचे आर्थिक सक्षमीकरण करण्यासाठी त्यांना बचतगटाच्या माध्यमातून संघटित करून उद्योग, व्यवसाय करण्यासाठी प्रोत्साहित करण्याच्या योजनेला ३१ मार्च २०२५ पर्यंत ५ वर्षांची मुदतवाढ देण्यात आली आहे. महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत ८ हजार ८०० महिलांचे संघटन करून ८०० बचतगट स्थापन करण्यात येणार आहेत. सध्या कार्यरत असलेल्या ३ हजार २०० बचतगट व नव्याने स्थापन होणाऱ्या ८०० बचतगटांतील सदस्यांना कौशल्यवृद्धीचे प्रशिक्षण, त्यांची बँकांशी जोडणी व कर्ज उपलब्धता करून देऊन बचतगटांच्या उपक्रमांना चालना देण्यात येईल.

उच्च शिक्षणविषयक अभ्यासक्रमांसाठी शिष्यवृत्ती, प्री मॅट्रिक, पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती, मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाकडून शैक्षणिक कर्ज, रोजगारासाठी कर्ज, अल्पसंख्याकबहुल शाळांना मूलभूत सुविधांसाठी अनुदान, अल्पसंख्याकबहुल क्षेत्रात पायाभूत सुविधांची उभारणी आदी विविध योजनांची राज्यात प्रभावी अंमलबजावणी करण्याचे राज्य शासनाचे उद्दिष्ट आहे.

शब्दांकन : इर्शाद बागवान,
विभागीय संपर्क अधिकारी

ऑपरेशन धैर्य

कोरोना संकटकाळात नावीन्यता सोसायटीमार्फत रुग्णांच्या कॉन्टॅक्ट ट्रेसिंगसाठी 'महाकवच' मोबाइल ॲप, टेलिमेडिसिन हेल्पलाईन तसेच कोरोनाच्या प्राथमिक चाचणीसाठी सेल्फ असेसमेंट टूल विकसित करण्यात आले. याशिवाय सोसायटीमार्फत सीएसआरच्या माध्यमातून सुमारे ५२ कोटी रुपयांहून अधिक रकमेच्या मदतीची उभारणी आणि वाटप करण्यात आले. स्थलांतरित लोक, दैनंदिन मजुरी करणारे, झोपडपट्टीवासीय, कन्टेन्मेंट झोनमधील नागरिक तसेच कामगारांना अन्न पुरवणे यांसारख्या कामात समन्वय करण्यासाठी 'ऑपरेशन धैर्य' राबवण्यात आले. वैद्यकीय क्षेत्रात कौशल्य प्रशिक्षण घेतलेल्या सुमारे १० हजार ८१५ युवकांच्या याद्या कोरोना संकटकाळात सर्व आयुक्त, मनपा आयुक्त, जिल्हाधिकारी, जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आवश्यक कार्यवाहीसाठी सुपुर्द करण्यात आल्या. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत वर्षभरात लाभार्थ्यांना व गटांना एकूण ४३ कोटी ५४ लाख एवढ्या रकमेचे अर्थसाहाय्य करण्यात आले.

संपूर्ण देशात २४ मार्चपासून कोरोना प्रतिबंधासाठी लॉकडाऊन सुरू करण्यात आला. त्यामुळे नागरिक मोठ्या प्रमाणात अस्वस्थ झाले होते. विविध कारणांनी ते घराबाहेर येत आहेत. महत्त्वाच्या कामाखेरीज त्यांनी घराबाहेर येऊ नये, यासाठी पोलीस २४ तास रस्त्यावर उभे राहून याचे नियंत्रण करत होते. मी स्वत: या कालावधीत जवळपास ३१ जिल्ह्यांत फिरलो. कायदा व सुव्यवस्थेबरोबरच सर्वसामान्य नागरिकांचे हाल होणार नाहीत, याची प्रकर्षाने काळजी घेतली.

पोलिसांमध्ये विश्वास

अनिल देशमुख
मंत्री, गृह

कोरोना संकट काळात लॉकडाऊनदरम्यान प्रत्यक्ष जिल्ह्यांना भेटी देऊन त्या ठिकाणी कार्यरत असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांची व्यक्तिश: विचारपूस केली. त्यांच्या कामाचे कौतुक केले. संबंधित विभागीय आयुक्त, आय.जी. पोलीस, पोलीस आयुक्त, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक इतर अधिकारी, तेथील पदाधिकारी यांच्यासोबत कोरोना संदर्भात आढावा बैठका घेतल्या. त्या त्या ठिकाणच्या कोरोना परिस्थितीचा अभ्यास केला.

पोलिसांचे कुटुंबप्रमुख

राज्यातील सव्वा दोन लाख पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचा गृहमंत्री या नात्याने मी कुटुंबप्रमुख. कोविड काळात माझ्या पोलीस विभागाचे हित जपण्याचा प्रयत्न केला. 'मुंबईसह महाराष्ट्रातील सव्वा दोन लाख पोलीस बांधवांनी, गेली ९ महिने कामाचे तास, सुट्टी, प्रवासाची सोय-गैरसोय, कामावर येण्या-जाण्याकरिता असलेल्या वाहतुकीच्या अडी-अडचणी या कशाचीही पर्वा न करता, अथक परिश्रम करून आपल्या कठोर कर्तव्याचा नवा आदर्श महाराष्ट्रातील तमाम जनतेसमोर निर्माण केला आहे. याचा आम्हा सर्वांना अभिमान आहे. आमचे पोलीस प्रामाणिकपणे आपली जबाबदारी पार पाडत आहेत. त्याची नोंद केवळ महाराष्ट्रानेच नव्हे, तर संपूर्ण जगानेही घेतली आहे'.

पोलिसांसाठी या काळात काही महत्त्वाचे निर्णय घ्यावे लागले. यात मुख्यत्वे कोविड संसर्गामुळे मृत्यू झाल्यास कर्तव्यावरील पोलीस अधिकारी, कर्मचारी यांच्या कुटुंबास ५० लाखांचे सानुग्रह अनुदान, राज्य पोलीस दलातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे कोविड-१९मुळे निधन झाल्यास सरकारी निवासस्थाने त्यांच्याकडेच ठेवण्याची मुभा, पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात कोविड सेंटरची स्थापना, महाराष्ट्र पोलीस कुटुंब योजनेंतर्गत राज्यातील नामांकित रुग्णालयात कोविड-१९ साठी रोकडविरहित उपचार अशा महत्त्वाच्या निर्णयांचा समावेश आहे. त्याचप्रमाणे कोरोना संसर्ग तुरुंगात होऊ नये, म्हणून जवळपास ११ हजार कैद्यांची आकस्मिक पॅरोल व तात्पुरत्या जामिनावर सुटका केली.

आश्वासक पाऊल

आपल्या राज्यातील माता भगिनी या सदैव सुरक्षितच राहिल्या पाहिजे. त्यांची सुरक्षितता हे गृहमंत्र्यांचे कर्तव्य आहे. महिला पोलीस कर्मचाऱ्यांनी मला राखी पौर्णिमेला राखी बांधून राज्यातील सर्व माता भगिनींच्या सुरक्षिततेची हमी घेतली. मी आपणास सांगतो की, त्यांच्या सुरक्षिततेसाठी सरकार कटिबद्ध आहे.

महिला व बालकांवर होणाऱ्या अत्याचाराच्या घटनांना आळा घालण्याच्या उद्देशाने आंध्र प्रदेशमध्ये करण्यात आलेल्या दिशा कायद्याच्या धर्तीवर महाराष्ट्रामध्ये 'शक्ती' हा नवीन कायदा करण्याचा निर्धार आम्ही केला आहे. त्याचा मसुदा अंतिम टप्प्यात असून पुढील अधिवेशनात हा कायदा संमत होईल, असा विश्वास आहे. हा कायदा अधिक प्रभावी व्हावा, त्यादृष्टीने सीआरपीसी (CRPC), आयपीसी (IPC) व पोक्सो (POCSO) या विद्यमान कायद्यातील शिक्षा अधिक कठोर केल्या जाणार आहेत. यासाठी अनन्यसाधारण न्यायालय प्रस्थापित करण्यात येणार आहेत. तसेच चाईल्ड पोर्नोग्राफी विरोधात ब्लॅकफेस नावाने मोहीम सुरू असून, यातील गुन्हेगारांवर कठोर कारवाईचे स्पष्ट निर्देश

सक्षमीकरण

राज्यातील सर्व पोलीस स्टेशनमध्ये सीसीटीव्ही बसवण्याच्या कामाला सुरुवात झाली आहे. तसेच मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय सुरू केले. राज्याच्या सागरी किनाऱ्याची सुरक्षा अधिक भक्कम व्हावी, या हेतूने पोलीस दलासाठी २३ मीटर लांबीच्या वेगवान व अत्याधुनिक अशा ६ नवीन बोटी घेण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे अहमदनगर जिल्ह्यातील कुसडगाव व जळगाव जिल्ह्यातील वरणगाव येथे राज्य राखीव पोलीस बल गट निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली असून, काटोल येथे एसआरपीएफ बटालियन अंतर्गत महाराष्ट्रातील पहिल्या महिला बटालियनची स्थापना करण्यासही तत्त्वत: मान्यता देण्यात आली आहे.

साहाय्यक उपनिरीक्षक ते पोलीस उपनिरीक्षक या पदांवरील पदोन्नतीचा विषय बराच प्रलंबित होता. तो आता मार्गी लावण्यात आला असून, १०६६ जणांना या पदोन्नतीचा लाभ मिळाला आहे. त्यामुळे या कर्मचाऱ्यांच्या व त्यांच्या कुटुंबीयांच्या चेहऱ्यावर निश्चितच हास्य फुलले आहे.

मुंबईसारख्या महत्त्वाच्या ठिकाणी चौपाटी भागात प्रामुख्याने मरिन ड्राईव्ह येथे सुरक्षेच्या दृष्टीने गस्तीकरिता पोलिसांसाठी सेग-वेची सुरुवात करण्यात आली. पोलीस दलासाठी काही सेल्फ बॅलेंसिंग इलेक्ट्रिक स्कूटरचे वाटप केले. याखेरीज एक महत्त्वाचा निर्णय म्हणजे राज्यात तपासासाठी सी.बी.आय. (CBI) ला राज्य शासनाची पूर्व परवानगी घेणे आता आवश्यक असणार आहे.

सामाजिक आंदोलन करताना वैयक्तिक स्वार्थ नसतो. परंतु कधी कधी अशा आंदोलनातील गुन्ह्यांमुळे आयुष्याला गंभीर वळण लागण्याची शक्यता असते. याचा विचार करता काही आंदोलनातील गुन्हे मागे घेण्याचा निर्णय आम्ही घेतला. त्यानुसार कोरेगाव-भीमा प्रकरणातील ६४९ पैकी ३४८ गुन्हे, मराठा आंदोलनातील ५४८ पैकी ४६० गुन्हे आणि नाणार आंदोलनातील ३ गुन्हे मागे घेण्यात आले.

पोलीस विभागाला देण्यात आले आहेत.

लॉकडाऊनच्या काळात वाढलेल्या घरगुती हिंसाचार आणि महिला अत्याचारांच्या तक्रारींची गंभीर दखल घेत संबंधित आरोपींवर योग्य ती ठोस कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. एकूणच राज्यातील माता, भगिनी बालके यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आपल्या गृह विभागाचे आश्वासक पाऊल पुढे पडले आहे.

ऐतिहासिक पोलीस भरती

कोरोनाच्या निमित्ताने मी जेव्हा राज्यात सर्वत्र फिरलो, त्या वेळी असे लक्षात आले की, बऱ्याच ठिकाणी पोलिसांची संख्या कमी आहे. रिक्त जागा भरपूर आहेत. त्या भरणे आवश्यक आहे. एकूणच कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने पोलीस दलाचे सक्षमीकरण करणे महत्त्वाचे आहे. म्हणूनच आम्ही पोलीस दलातील सुमारे १२ हजार ५२८ रिक्त पदे भरण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला.

दिवाळीही पोलिसांसोबत

दुर्गम व अतिसंवेदनशील असलेल्या गडचिरोली जिल्ह्यातील गडचिरोलीपासून ३०० कि.मी. लांब असलेल्या पातागुडमला या भागात मी दिवाळीच्या दिवशी गेलो आणि तेथील पोलिसांसमवेत आपली दिवाळी साजरी करून त्यांच्यासह स्वत:चा आनंद द्विगुणित केला. ही

दिवाळी माझ्या आयुष्यातील खरोखरच खूप आनंददायी व अविस्मणीय ठरली. माझ्या पोलीस बांधवांच्या चेहऱ्यावरील आनंद हा निश्चितच मला पुढील वाटचालीसाठी उत्साहवर्धक आहे. यापूर्वी देखील मी पुणे/मुंबई महामार्गावर मुंबईकडे येत असताना एका पोलीस चेकिंग पोस्टवर थांबलो होतो. त्या वेळी माहीत झाले की, तेथे कार्यरत असलेल्या पोलीस अधिकाऱ्यांचा त्या दिवशी वाढदिवस होता. मी तातडीने केक मागवून त्यांचा वाढदिवस तेथेच साजरा केला.

कोविड काळात उत्तम काम केलेल्या एका पोलीस भगिनीच्या हस्ते बुलडाणा जिल्हा पोलिसांच्या कोविड सेंटरचे उद्घाटन करून तिचा सन्मान केला. स्वत:ला केवळ कुटुंबप्रमुख म्हणून संबोधताना भावनेपेक्षा कर्तव्य श्रेष्ठ मानून मी प्रामाणिकपणे काम करत आहे.

महाराष्ट्राच्या गृहमंत्रिपदाची सूत्रे हाती घेतल्यापासून ही एक महत्त्वाची जबाबदारी आहे. कोणत्याही परिस्थितीत आपल्याला राज्यातील कायदा व सुव्यवस्था राखायची आहे, हे मनाशी ठरवले आणि आपल्या कामकाजाची सुरुवात केली. या घटनेला एक वर्ष पूर्ण झाले. कालगणनेनुसार हा कालावधी जरी एक वर्षाचा असला तरी संपूर्ण जगावर कोसळलेल्या कोरोना संकटामुळे या कालावधीत आपल्या सर्वांना दुप्पट काम करावे लागले. अजूनही कोरोना संपलेला नाही. कोरोनाविरुद्धचे युद्ध सुरू आहे. यात सर्वांनी सहकार्य करणे आवश्यक आहे. आपण सर्वजण निश्चितच शासन, प्रशासनास साथ द्याल, असा विश्वास आहे.

शब्दांकन : डॉ. राजू पाटोदकर,
विभागीय संपर्क अधिकारी

वर्षभरापूर्वी अन्न व औषध प्रशासन विभागाचा कार्यभार स्वीकारला, तेव्हा या विभागामार्फत सामान्य माणसाच्या जीवनाला अधिक सुखकर करण्याचा निर्धार केला. विभाग व सर्वसामान्यांच्या समस्यांचा अभ्यास करून अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. तक्रारींसाठीच्या टोल फ्री क्रमांकाची जनजागृती केली. संगणकीकरण आणि आधुनिक पद्धतीचा वापर करून यंत्रणा अधिक कार्यक्षम केली. मास्क, सॅनिटायझर व औषधांच्या किंमती नियंत्रणात आणून काळाबाजार करणाऱ्यांवर कडक कारवाई केली गेली.

किमती नियंत्रणात, पुरवठा सुरळीत

डॉ. राजेंद्र शिंगणे
मंत्री, अन्न व औषध प्रशासन

प्रत्येक नागरिकाच्या दैनंदिन जीवनाशी निगडित असलेला विभाग म्हणजे अन्न व औषध प्रशासन विभाग. सकाळी घरी येणारे दूध निर्भेळ असावे, इथपासून ते दिवसभर घेतला जाणारा आहार सकस आणि शुद्ध असावा, आजारपणासाठी लागणाऱ्या औषधांचा पुरवठा सुरळीत व्हावा, या सर्व बाबींची काटेकोर पाहणी वर्षभरात केली गेली.

औषधांच्या दरांवर नियंत्रण

अलिकडच्या दिवसांतील आकडेवारी पाहिली असता कोरोना रुग्णांच्या संख्येत घट झाली आहे. मात्र सहा महिन्यांपूर्वी नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण होते. मास्क, सॅनिटायझर, उपचारासाठी लागणारी औषधे उदा. रेमडेसिवीर, टोसिलिझुमॅब, फॅबीपीरावीर ही औषधे आणि ऑक्सिजन इत्यादींची मागणी वाढली होती व त्याचा काळा बाजार होत असल्याबाबत तसेच वाढीव दराने औषधे विकली जात असल्याबाबत तक्रारी येत होत्या.

या सर्व बाबींवर नियंत्रण ठेवण्यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागाच्या मुख्यालयामध्ये चोवीस तास एक कंट्रोल रूम स्थापन करण्यात आले. गरजूंच्या तक्रारीवर तत्काळ कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच आवश्यक वस्तू औषधांच्या वितरण प्रणालीतसुद्धा आमूलाग्र बदल करून कोणताही गैरप्रकार होणार नाही, याची दक्षता घेण्यात आली. रेमडेसिवीरच्या उत्पादक कंपन्यांची वेळोवेळी बैठक घेऊन उत्पादन वाढवण्यासाठी व वितरणासाठी सूचना करण्यात आल्या. हेटेरो, सिपला, मयलॉन, झायडस, डॉ. रेड्डी या ५ कंपन्यांनी उत्पादन सुरू केल्याने पुरेसा साठा उपलब्ध झाला. औषधांच्या काळाबाजारच्या प्रकरणांमध्ये एफआयआर दाखल करण्यात आले. त्यामुळे औषधांच्या वापरावर नियंत्रण आले. योग्य नियोजनामुळे औषधांचा तुटवडा दूर झाला व सध्या ही औषधे मुबलक आहेत.

पुरेसा ऑक्सिजन पुरवठा

राज्यामध्ये ऑक्सिजनची कमतरता निर्माण झाली होती. त्या वेळेस ऑक्सिजन इंडस्ट्रिज आणि मेडिकल ऑक्सिजनच्या प्रमाणात बदल करून ८० टक्के ऑक्सिजन मेडिकल ऑक्सिजन वापरासाठी परवानगी देण्यात आली. बॉक्स ऑक्सिजनची वाहतूक जलद गतीने व्हावी, रुग्णांना कोणत्याही अडचणींचा सामना करावा लागू नये म्हणून ऑक्सिजनच्या टँकरला सायरन बसण्याची परवानगी देण्यात आली. नायट्रोजन टँकर ऑक्सिजनमध्ये कन्व्हर्ट करण्यात आले व ऑक्सिजनचा पुरवठा मुबलक होईल याची खबरदारी घेतली.

काळाबाजार रोखला

कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे मास्क व सॅनिटायझरची मागणी प्रमाणापेक्षा जास्त वाढल्याने सुरुवातीला काहीसा तुटवडा निर्माण झाला. जास्त किमतीने ते विकले जात असल्याचे लक्षात येताच उत्पादन वाढवण्याच्या दृष्टीने साखर

नागपूर येथील औषध विक्री दुकानांवर प्रत्यक्ष जाऊन मास्कच्या किमतीची चौकशी करताना अन्न व औषध प्रशासन मंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे.

कारखान्यांना २४ तासात सॅनिटायझर उत्पादन करण्याचा परवाना देण्यात आला. त्यामुळे टंचाई दूर झाली. मास्क उत्पादनही वाढवले गेले. मास्क व सॅनिटायझरच्या किमतींवर नियंत्रण आणून या वस्तूंचा समावेश जीवनावश्यक वस्तूंच्या यादीत करण्यात आला. तर काळाबाजार करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात आली.

प्रत्यक्ष पाहणी

राज्य शासनाने आता स्वतःहून मास्कच्या किमती नियंत्रित केल्या आहेत. सर्व मेडिकलच्या दुकानात त्यांनी दर्शनी भागात मास्कच्या किमतीचे फलक स्वयं स्पष्ट दिसतील, अशा प्रकारे लावण्याच्या सूचना देण्यात आल्या. असे फलक मराठीत लावण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. शासनाने ठरवून दिलेल्या किंमतीत मास्क विकले जात आहेत का याबाबत मी स्वतः नागपूर येथे १५ ते २० दुकानांची पाहणी करून खात्री केली.

रक्त टंचाईवर मात

थॅलेसेमिया तसेच अत्यवस्थ रुग्णांना रक्त पुरवठा वेळत व्हावा व रक्ताची कोणत्याही प्रकारे कमतरता भासू नये, म्हणून रक्तदान शिबिरे घेण्याबाबतचा निर्णय घेतला. रक्तदात्यांची कोरोनाबाबतची भीती दूर करण्यात यश आले. सर्व रक्तपेढीच्या वारंवार बैठका घेऊन सोशल डिस्टंन्सिंगचे पालन करत रक्तदान शिबिरे आयोजित करण्यात आले. मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे, आरोग्यमंत्री राजेश टोपे व मी स्वतः जनतेला वेळोवेळी आवाहन केले. त्या आवाहनाला प्रतिसाद देऊन रक्तदात्यांनी मोठ्या प्रमाणावर रक्तदान केल्याने रक्ताची टंचाई दूर झाली.

पीपीई किटची उपलब्धता

खासगी वैद्यकीय व्यावसायिकांना माफक दरात पीपीई किट उपलब्ध करून देण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यामध्ये आणि साधारणतः आठ-दहा किरकोळ विक्रेता व दोन घाऊक विक्रेता नेमण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यांच्या माध्यमातून पीपीई किट उपलब्ध करून देण्यात आल्या.

तक्रारी व सूचनांसाठी टोल फ्री क्रमांक

अन्न व औषध प्रशासननाद्वारे राबवण्यात येत असलेल्या औषधी व अन्नविषयक कायद्याच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने जर कोणतीही तक्रार नोंदवायची असेल, तर त्यांनी नियंत्रण कक्षाचा टोल फ्री क्रमांक १८००२२२३६५ वर संपर्क साधावा किंवा जिल्हा विभागीय कार्यालयातील अधिकाऱ्यांना त्यांच्या संपर्क क्रमांकावर संपर्क साधून तक्रार नोंदवावी.

अजून संकट टळलेले नाही

कोरोनाचे संकट अजून टळलेले नसल्याने शासन पूर्ण काळजी घेत आहे. राज्यातील जनतेला मी आवाहन करू इच्छितो की, या कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावाच्या काळात जनतेने धैर्य न सोडता संयमाने वागावे, आवश्यक त्या कामासाठीच बाहेर पडावे, बाहेर निघताना मास्क घालावा. सोशल डिस्टंन्सिंग तसेच इतर नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. प्रत्येकाने 'माझे कुटुंब, माझी जबाबदारी' आहे हे समजून वागावे.

महाविकास आघाडी शासनाला एक वर्ष पूर्ण झाले आहे. सगळ्यांच्या सहकार्याने लोककल्याणाची कामे आमचे शासन करत राहणार आहे. यासाठी आवश्यक ती इच्छाशक्ती आणि जनतेचे आशीर्वाद आमच्या कायम पाठीशी आहेत. असा मला विश्वास आहे.

शब्दांकन : अर्चना शंभरकर,
विभागीय संपर्क अधिकारी

दृष्टिक्षेपात

कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासन विभागाने अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. अन्न व औषध प्रशासनाच्या, आयुक्त कार्यालयात २४ तास नियंत्रण कक्षाची व्यवस्था करण्यात आली. सॅनिटायझर व मास्कचे उत्पादन वाढवले. तसेच त्याचा काळा बाजार करणाऱ्यांना चाप दिला. इच्छुक अल्कोहोल उत्पादकांना सॅनिटायझर निर्मितीसाठी एक दिवसात परवाना मंजूर करण्यात आला. रक्तदान शिबिरांच्या माध्यमातून रक्ताचा तुटवडा दूर केला. जीवनावश्यक वस्तू व अन्न पदार्थांबाबत काळाबाजार होणार नाही, यासाठी सर्व उत्पादकांच्या व वितरकांच्या अडचणी सोडवण्यासाठी मुख्यालय व जिल्हास्तरावर नोडल अधिकारी नियुक्त करण्यात आले. कोविड-१९ या आजाराच्या उपचारासाठीच्या औषधांच्या किमती नियंत्रणात ठेवल्या. रुग्णांसाठी ऑक्सिजन कमी पडू नये म्हणून राज्यातील इच्छुक ऑक्सिजन उत्पादकांना तत्काळ परवाना मंजूर करण्यात आला. १९७ पदे नव्याने मंजूर करून मनुष्यबळ वाढवण्यात आले. गुटखामुक्त अभियान सुरू करण्यात आले. औषधे व सौंदर्य प्रसाधने, अन्नपदार्थ, मास्क इ. उत्पादक व विक्रेता आस्थापनांच्या जास्तीत जास्त तपासण्या करून या बाबींचा दर्जा व किंमत नियंत्रित ठेवण्याबाबत पडताळणी करण्याची मोहीम राबवण्यात आली.

कोरोनामुळे सामान्यांचा सार्वजनिक आरोग्य सेवेवरील विश्वास वाढण्यास मदत झाली आहे. तो अधिक दृढ करतानाच नागरिकांना दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा मिळण्यासाठी प्रयत्न केले. हिवाळ्याच्या काळात रुग्णसंख्या काही प्रमाणात वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही; तथापि यंत्रणा, लोक सजग आणि जागरूक असतील, तर ही वाढ सहजरीत्या हाताळू शकतो. कोरोनावर मात करण्यात शासनाच्या प्रयत्नाइतकेच लोकसहभागाचेही महत्त्व आहे.

कोरोनाशी यशस्वी लढा

राजेश टोपे
मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण

आरोग्य विभागाचा मंत्री झाल्यानंतर राज्यात आरोग्य क्षेत्रात आमूलाग्र बदल घडवून आणण्याच्या दिशेने पावले उचलत असतानाच जगाला भेडसावणारे कोरोनाचे संकट आपल्या राज्यातही येऊन धडकले आणि त्याला रोखण्यासाठी संपूर्ण आरोग्य यंत्रणाच जुंपली गेली. हा विभाग समजून घेताना अनेक बाबी समोर आल्या. त्यामागची कारणे मी जाणून घेतली. डॉक्टरांचे, कर्मचाऱ्यांचे प्रश्न समजून घेतानाच आरोग्याच्या पायाभूत सुविधा पूर्ण करण्यासाठी अधिकचा निधी आवश्यक असल्याचे जाणवले.

भरीव निधीची तरतूद

राज्यात अनेक ठिकाणी आरोग्य संस्थांची बांधकामे अर्धवट अवस्थेत आहेत. या साऱ्या बाबी समजून घेतल्यानंतर मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्याशी चर्चा केल्यानंतर राज्यात पहिल्यांदाचा आरोग्य विभागासाठी सुमारे ५५०० कोटी रुपयांचा निधीची तरतूद झाली आहे. अर्धवट बांधकामांच्या पूर्णत्वासाठी एशियन डेव्हलपमेंट बँकेकडून कर्ज घेण्याचा निर्णय झाला. या वर्षी ५० टक्के जुन्या रुग्णवाहिका बदलण्याचा निर्णय झाला. विशेष म्हणजे त्यातील ५०० नवीन रुग्णवाहिका आता उपलब्ध होणार आहेत.

कोविड रुग्ण निदान व्यवस्था

देशात कोरोनाचे रुग्ण आढळल्यानंतर राज्य शासन अधिक सतर्क झाले. मॉल, चित्रपटगृहे, शाळा, कार्यालये बंद करण्याबाबत टप्प्याटप्प्याने निर्णय घेतला. कोरोना विषाणू आजाराच्या रुग्ण निदानाची व्यवस्था सुरुवातीला केवळ एकाच ठिकाणी म्हणजे एन. आय. व्ही. पुणे येथे उपलब्ध होती. त्यानंतर कस्तुरबा रुग्णालय, मुंबई आणि इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथे ही सुविधा निर्माण करण्यात आली.

सद्य:स्थितीत, राज्यात ३५९ शासकीय आणि ११७ खासगी अशा ४७६ प्रयोगशाळांमध्ये कोविड रुग्ण निदान व्यवस्था उपलब्ध करण्यात आलेली आहे. याबरोबरच जूनमध्ये रॅपिड अँटिजेन टेस्ट राज्यस्तरावरून उपलब्ध करून देण्यात आल्या. यासाठी राज्यस्तरावरून जिल्ह्यांना निधी उपलब्ध करून देण्यात आला व जिल्हास्तरावरही याची खरेदी करण्यात आली.

साथरोग नियंत्रण कायदा

कोरोनाकाळात राज्य शासनाने सामान्य माणूस केंद्रबिंदू मानून निर्णय घेतले. एपिडेमिक ॲक्ट राज्यभर लागू केला. प्लेगच्या साथीचा फैलाव थांबण्यासाठी सरकारने त्या वेळी हा कायदा लागू केला होता.

१३ मार्च रोजी संपूर्ण राज्यात साथरोग नियंत्रण कायदा १८५७ लागू करण्यात आला या कायदेशीर तरतुदीमुळे कोरोना साथ नियंत्रणासाठी राज्य आणि जिल्हा पातळीवरील प्रशासकीय यंत्रणेस विशेष अधिकार मिळाल्याने निर्णय गतिमान पद्धतीने घेण्याच्या प्रक्रियेत सुलभता आली. सार्वजनिक ठिकाणी तंबाखू, सुपारी, पान, पानमसाला, गुटखा तसेच अन्य तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन, थुंकण्यास व धूम्रपानास प्रतिबंध करण्याचा निर्णय घेतला.

औरंगाबाद येथे ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत रुग्णवाहिकांचे लोकार्पण करताना आरोग्यमंत्री राजेश टोपे, पालकमंत्री सुभाष देसाई.

साधनसामग्रीची उपलब्धता

कोरोना रुग्णांच्या उपचारासाठी रुग्णालयांची त्रिस्तरीय वर्गवारी करण्यात आली. राज्यात ३,७८७ रुग्णालयामध्ये ३.६३ लाख एवढ्या खाटा आहेत. यातील ५९ हजार ५४४ खाटा या ऑक्सिजन सपोर्टेड खाटा आहेत. तसेच राज्यात ८,१५८ व्हेंटिलेटर्सची सुविधा निर्माण करण्यात आली आहे. साधनसामग्रीची उपलब्धता करतानाच कोरोना रुग्णांवर उपचार करणारे डॉक्टर्स, नर्स अन्य आरोग्य कर्मचाऱ्यांचे मनोबल उंचावण्यासाठी त्यांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न केला जात आहे.

मोफत व कॅशलेस विमा संरक्षण

रोग निदान आणि रोग उपचार यामध्ये सर्वसामान्य जनतेची आर्थिक परवड होऊ नये याकरिता महात्मा जोतिबा फुले जनआरोग्य योजनेच्या माध्यमातून राज्यातील १०० टक्के जनतेला मोफत आरोग्य उपचार देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. राज्यातील नागरिकांना मोफत व कॅशलेस विमा संरक्षण देणारे महाराष्ट्र हे देशात एकमेव राज्य ठरले आहे. कोरोनाच्या रुग्णांवर उपचार करताना मुंबईतील काही खासगी रुग्णालयांकडून मनमानी पद्धतीने दर आकारणी केली जात आहे. तिला चाप लावण्याचा धाडसी निर्णय राज्य शासनाने घेतला

उपचाराच्या दरावर नियंत्रण

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर मुंबईसह राज्यातील सर्व खासगी व धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणीकृत असलेल्या रुग्णालयांमधील एकूण खाटांच्या ८० टक्के खाटा कोरोना व अन्य रुग्णांच्या उपचारासाठी राखीव ठेवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य शासनाने घेतला. खासगी रुग्णालयांना राज्य शासनाने काढलेल्या आदेशाचे पालन करणे बंधनकारक करण्यात आले. यामुळे कोरोनाच्या रुग्णांना खाटा उपलब्ध होण्याबरोबरच उपचाराच्या दरावर देखील नियंत्रण राहण्यास मदत मिळाली आहे.

सामान्य रुग्णांना दिलासा

खासगी प्रयोगशाळांच्या तसेच सी.टी. स्कॅनच्या शुल्कावर निर्बंध घालण्यात आले आहेत, शासकीय रुग्णालयात रेमडिसिवीर हे इंजेक्शन मोफत उपलब्ध करून देण्यात आले आहे, तर खासगी रुग्णालयातही या इंजेक्शनची किंमत २३६० रुपयांपर्यंत कमी करण्यात आली आहे. कोरोना चाचण्यांसाठी आता सर्वात कमी दर महाराष्ट्रात असून खासगी प्रयोगशाळेतील कोरोना चाचण्यांसाठी ४५०० वरून ९८० रुपये इतका दर निश्चित करण्यात आला आहेत. शासनाने किमान चार वेळा चाचण्यांच्या दरात कपात करून सामान्य रुग्णांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे.

अतिदक्षता विभागात (आयसीयू) उपचार सुरू असलेल्या कोरोनाच्या रुग्णांसाठी विशेषज्ञांचे मार्गदर्शन आणि उपचारासाठी 'टेलीआयसीयु' सुविधेचा वापर केला आहे. भिवंडी, जळगाव, सोलापूर, औरंगाबाद, अकोला आणि जालना या ७ ठिकाणी प्रायोगिक तत्त्वावर ही सुविधा सुरू झाली आहे.

राज्यात कोरोनाच्या उपचारासाठी खासगी रुग्णालयांकडून आणि रुग्णवाहिकांकडून वाजवी शुल्क आकारण्याबाबत राज्य शासनाने वेळोवेळी निर्देश दिले आहेत. या सर्व निर्देशांची अंमलबजावणी आणि तपासणीसाठी राज्यात भरारी पथक नेमण्यात आले आहेत. कोरोना साथ आटोक्यात आणण्यासाठी महत्त्वाचा घटक असलेल्या मास्कची किंमत निश्चित करून योग्य त्या किमतीत नागरिकांना मास्क मिळावा यासाठी पुढाकार घेणारे राज्य म्हणून महाराष्ट्र देशात अग्रेसर ठरले आहे. राज्यात आता एन ९५-मास्क १९ ते ४९ रुपयांपर्यंत तर दुपदरी आणि तीनपदरी मास्क ३ ते ४ रुपयांना मिळत आहेत. यांसारख्या अन्य काही महत्त्वपूर्ण निर्णयांनी रुग्णांना दिलासा दिला आहे. कोरोनाच्या उपाययोजनांसोबतच विभागाने अन्य काही महत्त्वाचे निर्णयही घेतले आहेत. त्यामध्ये राज्यातील सर्व शासकीय व अनुदानित शाळांमधील ६ ते १८ वर्ष वयोगटातील मुलांमधील दृष्टिदोष निवारण्यासाठी त्यांना मोफत चष्मे देणे, प्राथमिक आरोग्य सुविधा बळकटीकरणावर भर देण्यासाठी आरोग्यवर्धिनी केंद्रांची संख्या वाढवणे, हृदयविकारामुळे होणारे मृत्यू रोखण्यासाठी राज्यात 'स्टेमी' प्रकल्प राबवणे, स्व.बाळासाहेब ठाकरे रस्ते अपघात विमा योजनेंतर्गत महाराष्ट्रातील रस्त्यावर झालेल्या अपघातामधील व्यक्तींना मोफत उपचाराचा लाभ देणे, आशा वर्कर व गटप्रवर्तकांना वाढीव मोबदला देणे, ग्रामीण रुग्णालयातदेखील टेलिरेडीओलॉजी सुविधा उपलब्ध करून देणे यांसारखे महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत.

शब्दांकन : अजय जाधव,
विभागीय संपर्क अधिकारी

माझे कुटुंब माझी जबाबदारी

राज्य शासन नागरिकांना मास्क वापरणे, वारंवार हात धुणे, शारीरिक अंतर पाळणे या सूचनांचा अवलंब करण्याचे आवाहन सातत्याने करत आहे. कोरोनावर उपचारापेक्षा प्रतिबंधात्मक उपायांनी मात केली जाऊ शकते. त्यामुळे नागरिकांनी अधिकाधिक खबरदारी घेण्यासाठी, त्यांचा सहभाग वाढवण्यासाठी राज्य शासनाने 'माझे कुटुंब माझी जबाबदारी' मोहीम यशस्वीरीत्या राबवली. त्या माध्यमातून नागरिकांच्या आरोग्य तपासणीसोबतच प्रतिबंधात्मक उपायांचा संदेशही त्यातून देण्यात आला.

माझे कुटुंब
माझी जबाबदारी

राज्यातील गावांच्या विकासाला गती देण्याच्या अनुषंगाने राज्य शासनामार्फत मागील वर्षभरात अनेक निर्णय घेण्यात आले. विशेषत: या वर्षातील बहुतांश काळ हा लॉकडाऊनमध्ये गेला. ग्रामीण भागातील कोरोना संसर्ग रोखण्यासाठी विविध उपाययोजना राबवण्याबरोबरच गावांमधील विकास योजनांचीही प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली.

समर्थ गावांच्या दिशेने

हसन मुश्रीफ
मंत्री, ग्रामविकास

राज्यात स्मार्ट ग्राम योजना सुरू होती. आर. आर. (आबा) पाटील यांचे ग्रामीण विकासातील योगदान लक्षात घेऊन या योजनेचे नाव आता 'आर. आर. (आबा) पाटील सुंदर गाव पुरस्कार योजना' असे करण्यात आले आहे. योजनेतील बक्षिसांच्या रकमेत वाढ करून तालुकास्तर गावास १० लाखांऐवजी २० लाख रुपये, तर जिल्हास्तरावरील विजेत्या गावास ४० लाखांऐवजी ५० लाख रुपयांचा पुरस्कार देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

सांडपाणी आणि घनकचरा

मोठ्या गावांमध्ये सांडपाणी, घनकचरा व्यवस्थापनासाठी शहरी दर्जाच्या सुविधा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या ग्रामपंचायतींना मलनिस्सारण प्रकल्प किंवा घनकचऱ्यावर प्रक्रिया करणे यांसारख्या मोठ्या प्रकल्पांची कामे करता येणार आहेत. मोठ्या गावांना जिल्हा वार्षिक योजनेतून २ कोटी रुपयांपर्यंत निधी मिळू शकणार आहे.

कल्याणकारी निर्णय

ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रात वास्तव्य करणाऱ्या सर्व आजी, माजी सैनिकांना मालमत्ता कर माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. ग्रामीण भागात जिल्हा भूमी अभिलेख कार्यालयाकडून सर्व गावात प्रॉपर्टी कार्ड उपलब्ध नाहीत. यासाठी स्वामित्व योजनेद्वारे कार्यवाही सुरू आहे. गावातील लोकांना कर्ज घेण्यासाठी गैरसोय होऊ नये म्हणून ग्रामपंचायत नमुना नंबर ८ वर कर्जाचा बोजा लावण्यास अनुमती देण्यात आली आहे.

मूलभूत सुविधांमध्ये सुधारणा

लोकप्रतिनिधींनी सुचवलेल्या गावांतर्गत मूलभूत सुविधा कामे यामध्ये नवीन कामांचा समावेश करण्यात आला. या योजनेंतर्गत सुमारे १ हजार १०० कोटी रुपयांच्या विकासकामांना मार्च २०२० मध्ये मंजुरी देण्यात आली. या योजनेत गावांमध्ये सौर ऊर्जा, विद्युत ऊर्जेवर आधारित पोलसहित विद्युत रोहित्र (डीपी) बसवणे या नवीन कामांचा समावेश करण्यात आला आहे.

रस्ते निर्मिती

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत (मनरेगा) ग्रामीण भागामध्ये १ लाख किलोमीटर पाणंद रस्ते व इतर खडीकरणाचे रस्ते निर्मिती करण्याचा संकल्प करण्यात आला आहे.

मनरेगामधून 'हरघर गोठे - घरघर गोठे' उपक्रम राबवण्यात येत आहे. यामधून गावांमध्ये रोजगार निर्मिती आणि शेतकऱ्यांसाठी मत्ता निर्मिती होणार आहे.

ग्रामोन्नती

ग्रामपंचायत सरपंच यांची थेट निवड करण्याऐवजी निवडून आलेल्या सदस्यांमधून निवड करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसाठी जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे. ग्रामपंचायतींच्या उपसरपंचांना प्रथमच मानधन वितरित करण्यात आले आहे. उपसरपंचांच्या खात्यावर पहिल्यांदाच १५.७२ कोटी रुपये जमा करण्यात आले आहेत. आदिवासी गावांच्या विकासासाठी पेसामधून १६० कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात आला आहे. आदिवासी गावांच्या विकासासाठी राज्यात या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येईल.

उमेद अभियान

राज्यात महिला बचतगटांसाठी उमेद अभियान प्रभावीपणे राबवण्यात येत आहे. बचतगटांची ३३ उत्पादने ॲमेझॉनवर, तर ५० उत्पादने जीईएम या ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मवर उपलब्ध करण्यात आली आहेत. स्वयंसाहाय्यता गटांकडून कोरोना

संग्रहित

काळात कापडी मास्क, पीपीई कीट्स तयार करण्यात आले. विक्रीतून गटातील महिलांना ११.०२ कोटी रुपयांचे उत्पन मिळाले. उमेदच्या ५० लाख स्वयंसाहाय्यता सदस्यांना कोरोनाविषयक जनजागृती करण्यासाठी ऑनलाइन प्रशिक्षण देण्यात आले. ग्रामीण व दुर्बल भागातील लोकांच्या दारात बँक पोहोचण्यासाठी अभियानांतर्गत ५५८ बीसी सखी व ५०३ डीजी पे सखी कार्यरत आहेत. या माध्यमातून कोरोनाच्या पार्श्वभूमीवर २२२ कोटी रुपये रकमेचे ४.९३ लाख आर्थिक व्यवहार करण्यात आले.

घरकुलांच्या निर्मितीला गती

नोव्हेंबर २०१९ ते ऑक्टोबर २०२० या काळात प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत १ लाख ४८ हजार ५३२ घरकुले, रमाई आवास योजनेंतर्गत २८ हजार ५१९ घरकुले, शबरी आवास योजनेंतर्गत १२ हजार १५३ घरकुले, पारधी आवास योजनेंतर्गत ७०८ घरकुले, आदिम आवास योजनेंतर्गत ९९४ घरकुले पूर्ण करण्यात आली. पंडित दीनदयाळ उपाध्याय जागा खरेदी अर्थसाहाय्य योजनेंतर्गत ३५० लाभार्थ्यांना जमीन खरेदीसाठी अर्थसाहाय्य करण्यात आले. शासकीय जागांवरील निवासी अतिक्रमणे नियमानुकूल करण्याच्या धोरणांतर्गत ७ हजार ५०० अतिक्रमणधारकांची अतिक्रमणे नियमानुकूल करण्यात आली. ग्रामीण भागातील घरकुलांच्या निर्मितीला गती देण्यासाठी ग्रामीण महाआवास अभियानाचा नुकताच प्रारंभ करण्यात आला. २० नोव्हेंबर २०२० ते २८ फेब्रुवारी २०२१ दरम्यान १०० दिवस हे अभियान राबवले जाणार असून विविध योजनांतर्गत ५ लाख ३ हजार ८८६ नवीन घरकुलांना मंजुरी देण्यात येणार आहे. यासाठी लाभार्थ्यांना प्रथम हप्ता रक्कम १५ हजार रुपयांप्रमाणे ७५० कोटी रुपये लगेच वितरित करण्यात येणार आहेत. उद्दिष्टापैकी अपूर्ण राहिलेली ८ लाख ८२ हजार १३५ घरकुले या काळात पूर्ण करून लाभार्थ्यांना निवारा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. याकरिता सुमारे ४ हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

अभ्यासगट नियुक्त

सूक्ष्म वित्त पुरवठा करणाऱ्या संस्थांच्या म्हणजेच फायनान्स कंपन्यांच्या कर्ज चक्रव्यूहामध्ये ग्रामीण भागातील महिला अडकत आहेत. त्यामधून महिलांना बाहेर काढणे, तसेच महिलांचे आर्थिक प्रश्न सोडवणे यास्तव उपाययोजना सुचवण्यासाठी अभ्यासगट नियुक्त करण्यात आला आहे.

ग्रामपंचायतींना निधी

१५व्या वित्त आयोगाचा निधी आता ग्रामपंचायतीबरोबरच जिल्हा परिषद व पंचायत समित्यांनासुद्धा मिळणार आहे. १४ व्या वित्त आयोगाचा निधी फक्त ग्रामपंचायतींना अदा होत होता. आता एकूण निधीपैकी १० टक्के निधी जिल्हा परिषदांना व १० टक्के निधी पंचायत समित्यांना वितरित करण्यात येत आहे. उर्वरित ८० टक्के निधी ग्रामपचांयतींना वितरित होईल. या वर्षी राज्यासाठी एकूण ५ हजार ८२७ कोटी रुपये उपलब्ध होणार असून, त्यापैकी २ हजार ९१३ कोटी रुपये निधी प्राप्त झाला आहे. एकूण निधीपैकी ५० टक्के निधी हा पाणीपुरवठा, स्वच्छता, गाव हागणदारीमुक्त ठेवणे, पावसाच्या पाण्याचे पुनर्भरण, पाण्याचे रिसायकलिंग करणे आदी बाबींवर खर्च करणे अनिवार्य असल्याने या क्षेत्रात भरीव काम होऊ शकते.

सर्वसामान्यांना दिलासा

मजूर सहकारी सदस्यांना आता ३० लाख रुपयांपर्यंत कामे मिळणार आहेत. जुनी निवृत्तिवेतन योजना लागू नसलेल्या जि.प. कर्मचाऱ्याचा सेवेत मृत्यू झाल्यास कुटुंबीयास १० लाख रुपये सानुग्रह अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

औषध वाटप

ग्रामीण पातळीवर कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात आल्या. ग्रामीण भागातील सुमारे पाच कोटी नागरिकांना रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी अर्सेनिक अल्बम-३० हे होमिओपॅथिक औषध व संशमनीवटी हे आयुर्वेदिक औषध खरेदी करून पुरवण्याबाबत सर्व जिल्हा परिषदांना परवानगी देण्यात आली. ग्रामपंचायतस्तरावर सर्व ग्रामपंचायत कर्मचारी, अंगणवाडी, मिनी अंगणवाडी कार्यकर्त्या, अंगणवाडी मदतनीस, आशा कार्यकर्त्या, अर्धवेळ स्त्री परिचर, आशा गट प्रवर्तक यांना नियमित वेतन, मानधनाव्यतिरिक्त १ हजार रुपये इतकी प्रोत्साहनपर रक्कम अदा करण्यात आली.

विमा संरक्षण

जिल्हा परिषदांतर्गत सर्व अधिकारी, कर्मचारी, ग्रामपंचायत कर्मचारी, संगणक परिचालक तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये कार्यरत कंत्राटी कर्मचारी तथा कामगार यांना ५० लाख रुपयांचे विमा संरक्षण देण्यात आले. मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींच्या निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या. या ग्रामपंचायतींचा कारभार सुरळीत चालण्याच्या अनुषंगाने त्यावर प्रशासक नियुक्त करण्यात आले.

शब्दांकन : इर्शाद बागवान,
विभागीय संपर्क अधिकारी

वर्षभरात शेतकरी, उद्योग तसेच घरगुती वीजग्राहकांना केंद्रस्थानी ठेऊन ऊर्जा विभागाने महत्त्वपूर्ण निर्णय घेत त्यांची अंमलबजावणी केली. वीजग्राहकांना माफक दरात वीज पुरवठा करणे, सेवेची गुणवत्ता आणि दर्जा उंचावणे, आधुनिक तंत्रज्ञान व प्रभावी व्यवस्थापनाने महानिर्मिती, महापारेषण व महावितरण या वीज कंपन्यांची कार्यक्षमता व उत्पादकता वाढवून आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने ऊर्जा विभागाला अत्याधुनिक करणे या सूत्रांनुसार आम्ही काम करत आहोत.

ऊर्जाविकासाचे प्रकाशपर्व...

डॉ. नितीन राऊत
मंत्री, ऊर्जा

राज्याच्या वीज सुधारणांना चालना देण्याच्या अनुषंगाने अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले जात आहेत. 'महावितरण', 'महापारेषण' व 'महानिर्मिती' या शासकीय वीज कंपन्यांचा आढावा घेऊन या क्षेत्रातील तज्ज्ञ, ग्राहक व कर्मचारी संघटना आदींशी सहकार्याने योजना आखल्या जात आहेत. राज्यात २ कोटी ६६ लाख एकूण वीजग्राहक संख्या आहे. त्यापैकी घरगुती ग्राहक १ कोटी ९७ लाख, वाणिज्यिक १९ लाख १० हजार, औद्योगिक ग्राहक सुमारे ४ लाख आणि कृषी ४२ लाख १८ हजार इतकी आहे.

या वर्षी कोरोनाच्या संकटामुळे मार्चपूर्वी जेव्हा वीजेची मागणी २१ हजार मेगावॅटच्या आसपास होती ती गेली काही महिने १६-१७ हजार मेगावॅटच्या दरम्यान घुटमळत होती. मात्र, आता नोव्हेंबरच्या अखेरीपासून ती पुन्हा २० हजार मेगावॅटच्या घरात पोहोचली असून, हे राज्यासाठी आश्वासक चित्र आहे. त्यासाठी आम्ही घेतलेले ग्राहकाभिमुख निर्णयही साहाय्यभूत ठरले.

वितरण प्रणालीचे बळकटीकरण

कृषिपंपांना मार्च २०१८ पर्यंतच्या प्रलंबित वीजजोडण्या देण्यासाठी उच्च दाब वितरण प्रणाली (एचव्हीडीएस) योजनेसाठी एशियन डेव्हलपमेंट बँकेकडून २ हजार २४८ कोटी रुपयांचे कर्ज उभारण्यास मंजुरी देण्यात आली आहे. ही रक्कम विदर्भ व मराठवाडा विभागातील 'एचव्हीडीएस'योजनेसाठी वापरण्यात येणार आहे. तसेच उर्वरित महाराष्ट्रात ही योजना राबवण्यासाठी महावितरणला २८०० कोटी रुपये कर्ज काढण्यास शासन हमी देण्यात आली आहे. या योजनेवर राज्यात एकूण ५ हजार ४८ कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत. 'एचव्हीडीएस'मुळे कृषी ग्राहकांना योग्य दाबाने वीज पुरवठा उपलब्ध होणार असल्याने कृषिपंप जळण्याचे प्रमाण कमी होईल.

नवीन कृषिपंप वीज धोरण

राज्यातील कृषी ग्राहकांना वीज जोडणी, थकीत वीजबील भरण्यासाठी आकर्षक सवलत आणि ग्रामीण भागातील वीज यंत्रणा, पायाभूत सुविधा आणि सेवेत सुधारणांसाठी मोलाचे ठरेल, असे नवीन कृषिपंप वीज जोडणी धोरण आम्ही नुकतेच मंजूर केले आहे. कृषी वीजदेयक थकबाकी वसुली योजनेंतर्गत कृषिपंपधारकांना वीज देयकांची थकबाकी भरण्यासाठी मूळ थकबाकी, व्याज व विलंब आकारामध्ये सवलत देण्यात येणार आहे. यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. सर्व कृषी ग्राहकांना पुढील ३ वर्षांत टप्प्याटप्प्याने कायमस्वरूपी दिवसा ८ तास वीज पुरवठा करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच या धोरणानुसार दरवर्षी एक लाख सौर कृषिपंप वितरित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. कृषी

टाटा वीजनिर्मिती केंद्राची पाहणी करताना ऊर्जामंत्री नितीन राऊत.

ग्राहकांकडून वसूल झालेली रक्कम ग्रामीण भागातील विजेच्या पायाभूत सुविधा तसेच सेवेचा दर्जा सुधारण्यासाठी वापरण्याचा महत्त्वाचा निर्णय या धोरणात घेतला आहे.

सौर ऊर्जा निर्मिती

राज्यातील सौर ऊर्जा निर्मिती क्षमतेचा महत्तम वापर करण्याचा आमचा प्रयत्न आहे. पडीक जमिनीवर व वीज कंपन्यांच्या रिकाम्या जागेवर सौर ऊर्जा प्रकल्प निर्माण करणे, शक्य तेथे जलाशयात तरंगते सौर ऊर्जा प्रकल्प करणे, सध्याच्या अस्तित्वात असलेल्या पवनऊर्जा प्रकल्पांच्या ठिकाणी रिकाम्या जागेत सौरऊर्जा निर्मिती असे संकरित (हायब्रीड) प्रकल्प विकसित करण्यास प्राधान्य दिले जाईल. राज्यातील एकही कुटुंब विजेपासून वंचित राहता कामा नये, हे आमचे लक्ष्य असून दुर्गम भागात जेथे वीजवाहिन्या पोहोचवणे कठीण असेल, अशा प्रत्येक ठिकाणी सौरऊर्जेद्वारे वीज पुरवठा करण्याचा मानस आहे.

'निसर्ग'शी समर्थ सामना

रायगड, ठाणे, पालघर, सिंधुदुर्ग, पुणे, रत्नागिरी, नाशिक व अहमदनगर या जिल्ह्यांना या वर्षी ३ जून रोजी निसर्ग चक्रीवादळाने जोरदार धडक दिल्याने शेतकऱ्यांसोबत वीज यंत्रणेचे अतोनात नुकसान झाले. सुमारे ५१.६५ लाख वीज ग्राहक बाधित झाले होते. या जमीनदोस्त झालेल्या वीज यंत्रणेची अल्पावधीतच विक्रमी वेळेत उभारणी व पायाभूत सुविधांची निर्मितीसाठी १९६ कोटी खर्च करण्यात आले. यात १६०७ नवीन वितरण रोहित्रे, ११,०७८ उच्चदाब वीज वाहिनीचे खांब व २२०९२ लघुदाब वीज वाहिनीचे खांब बदलण्यात आले. ही सर्व कामे 'कोरोना' परिस्थितीमध्ये जोखीम पत्करत पूर्ण करण्यात आली.

मुंबई महानगरप्रदेशसाठी नियोजन

१२ ऑक्टोबर २०२० रोजी मुंबई शहराचा वीजपुरवठा खंडित झाला होता. ऊर्जा विभाग आणि वितरण, वीजनिर्मिती तसेच पारेषण कंपन्यांच्या समन्वयातून तो विक्रमी वेळेत पूर्ववत करण्यात आला. या वीजपुरवठा खंडित घटनेमागील कारणे शोधून त्यावर उपाययोजना करण्याला सर्वाधिक प्राधान्य देण्यात येणार आहे. २०३० पर्यंतची मुंबई आणि एमएमआर क्षेत्राची विजेची मागणी ५ हजार मेगावॅटवर जाणे अपेक्षित आहे. हे लक्षात घेता निर्मितीमध्ये वाढ करणे तसेच बाहेरून अतिरिक्त वीज आणून या क्षेत्राला विजेच्या बाबतीत आत्मनिर्भर करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. उरण येथे आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून गॅसवर आधारित वीज निर्मिती प्रकल्प उभारण्याचे विचाराधीन आहे.

अखंडित वीज पुरवठा : कोरोना लॉकडाऊनच्या काळात तिन्ही कंपन्यांच्या यंत्रणांना सुरळीत वीज पुरवठा राहावा यासाठी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सातत्याने कर्मचाऱ्यांशी संवाद साधून मनोबल वाढवले. कोरोना काळात जिवावर उदार होऊन काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे मनोबल वाढवले.

ग्राहकांना सवलत : कोविड कालावधीत २ कोटी ६२ लाख वीज ग्राहकांपैकी वीज बिलाबाबत वाढ झाल्याची ७ लाख ७४ हजार ग्राहकांनी तक्रार केली होती. त्यापैकी ९९ टक्के ग्राहकांच्या तक्रारीचे निवारण करण्यात आले. वीजबील भरण्यासाठी विविध सवलती देण्यात आल्या.

अपारंपरिक ऊर्जा निर्मिती धोरण : अपारंपरिक ऊर्जा स्रोतांचा प्रभावी वापर करण्यासह पारंपरिक उर्जा स्रोतावरील अवलंबित्व कमी करण्याच्या उद्देशाने नवीन व नवीकरणीय (अपांरपरिक) ऊर्जा स्रोतापासून वीज निर्मितीच्या पारेषण संलग्न आणि पारेषण विरहित प्रकल्पांसाठी नवीन अपांरपरिक ऊर्जा निर्मिती धोरण लवकरच आम्ही आणत आहोत.

उद्योगांच्या वीज शुल्कात सूट : राज्यातील उद्योगांना चालना मिळण्यासाठी उद्योगांच्या वीज शुल्कात ९.३० टक्क्यांवरून ७.५० टक्के करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे आर्थिक संकटाचा मुकाबला करणाऱ्या उद्योगांना मोठा दिलासा मिळाला.

शासकीय वीज कंपन्यांना शासन हमी : मोठ्या प्रमाणात वीज देयकांच्या थकबाकीमुळे महावितरणच्या आणि पर्यायाने महापारेषण आणि महानिर्मिती या शासकीय कंपन्यांच्या आर्थिक गणितावर परिणाम होत असल्याने या कंपन्यांना आर्थिक तरलता राखण्यासाठी २० हजार कोटी रुपये कर्ज उभारणीसाठी शासनाची हमी देण्यात आली आहे.

शब्दांकन : सचिन गाढवे,
विभागीय संपर्क अधिकारी

दृष्टिक्षेपात

महापारेषण यंत्रणेचे आधुनिकीकरण तसेच महापारेषणच्या वाहिन्यांवर ऑप्टिकल फायबरचे जाळे उभारण्याच्या दृष्टीने नियोजन सुरू आहे. महापारेषणच्या उच्च दाब वाहिन्यांचे निरीक्षण व परीक्षण करण्यासाठी ड्रोन कॅमेराचा वापर सुरू करण्यात आला. महानिर्मितीद्वारे १८७ व ३९० मेगावॅट सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी जर्मनीच्या वित्तसंस्थेकडून कर्ज घेण्याचा निर्णय. कोराडी व चंद्रपूर आणि इतर औष्णिक विद्युत केंद्रांची प्रदुषणाची पातळी कमीत कमी करण्यासाठी टप्प्याटप्प्याने 'फ्ल्यू गॅस डिसल्फरायझेशन युनिट उभारण्याचा निर्णय. कोराडी औष्णिक वीज केंद्राच्या परिसरात ऊर्जा शैक्षणिक पार्कची निर्मिती करण्यात येणार. एकूणच राज्यातील ऊर्जा क्षेत्राला नवी ऊर्जा देण्याचे काम राज्य शासन करत असून, त्याला वीजग्राहकांनीही साथ द्यावी, असे आवाहन मी ऊर्जामंत्री या नात्याने करत आहे.

शालेय शिक्षण विभागाची मंत्री म्हणून कार्यभार स्वीकारल्यानंतर एक पालक आणि शिक्षक म्हणून विद्यार्थिहिताचे निर्णय घेतले जातील, याची खबरदारी घेतली. गुगल क्लासरूमसारख्या विविध माध्यमातून ऑनलाइन शिक्षण, विनापरीक्षा वर्गोन्नती, बालसप्ताह, राज्यातील सर्व शाळांमध्ये मराठी भाषेचे १० वी पर्यंत अध्यापन व अध्ययन सक्तीचे, अभ्यासक्रम सल्लागार समितीची स्थापना आदी महत्त्वपूर्ण निर्णय वर्षभरात घेऊन विद्यार्थिहिताला प्राधान्य दिले गेले.

दर्जेदार शिक्षणाची पायाभरणी

प्रा. वर्षा गायकवाड
मंत्री, शालेय शिक्षण

पालक म्हणून आपल्या पाल्याला उत्कृष्ट शिक्षण मिळावे ही प्रत्येक पालकांप्रमाणे माझीही अपेक्षा आहे. यासाठी शिक्षणाचा दर्जा उंचावता येईल का? याचा आढावा घेण्यास सुरुवात केली. केंद्र शासनाने नवे शैक्षणिक धोरण आणले आहे. त्याची अंमलबजावणी करताना राज्याची तयारी उत्तम असावी, यासाठी थिंक टँक तयार केले. मी स्वतः व्यवसायाने शिक्षण क्षेत्रातील असल्याने शिक्षकांच्या तसेच शाळांच्या अडचणी सोडवण्याचा प्रयत्न सुरू केला.

मार्चमध्ये खरं तर शाळांमध्ये मुलांच्या परीक्षा असतात, वर्षभर मुलांनी त्यासाठी तयारी केलेली असते, अशा नेमक्या वेळी कोरोनाचे संकट पुढे येऊन ठेपले. अशा प्रकारच्या आव्हानासाठी आपली तयारी नव्हती. मात्र या संकटाचे संधीत रूपांतर करून याचा धाडसाने सामना विभागाने केला, असे मला अभिमानाने सांगावे वाटते.

आव्हानांवर मात

आज राज्यासमोर अभूतपूर्व संकट असताना केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे शाळा देखील आपल्याला सुरू करावयाच्या आहेत. स्थानिक परिस्थितीचा विचार करून निर्णय घेतला जाईल. शाळांमध्ये स्वच्छता, निर्जंतुकीकरण, विद्यार्थ्यांची सुरक्षितता, शिक्षकांची सुरक्षितता याकडे प्राधान्याने लक्ष देण्याची गरज आहे. त्या दृष्टीने स्टँडर्ड ऑपरेटिंग प्रोसिजर (SOP)च्या माध्यमातून शाळांना, शिक्षकांना मदत केली जाईल.

बालदिवस सप्ताह

बालकांच्या सुप्त गुणांचा विकास करण्यासाठी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जन्मदिवसानिमित्ताने राज्यातील सर्व शाळांमधील इयत्ता पहिली ते १२ वीच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी ८ ते १४ नोव्हेंबर या कालावधीत 'बालदिवस सप्ताह' साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला, त्याबाबतचे परिपत्रक निर्गमित करण्यात आले आहे.

नवीन शैक्षणिक धोरण

नवीन शैक्षणिक धोरण नुकतेच जाहीर झाले आहे. यासंदर्भात राज्यामध्ये याची अंमलबजावणी कशी करायची या दृष्टीने शालेय शिक्षण विभागाचे काम सुरू आहे. राज्यात थिंक टँक गटाची यापूर्वीच स्थापना केलेली असून, त्यांच्याशी विचारविनिमय करून अंमलबजावणीची दिशी ठरवली जात आहे. या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण समितीच्या सदस्या असलेल्या डॉ. वसुधा कामत यांच्यासमवेत याबाबतचे चर्चासत्राचे आयोजित केले होते. तसेच एससीइआरटीमार्फत याबाबतच्या अनेक चर्चासत्रांचे आयोजन करून या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीचे कामकाज सुरू केले आहे. धोरणाच्या अंमलबजावणीत विविधांगी बदल करणे व स्थानिक पातळीवरील गरजांचा विचार करून, अभ्यासक्रमामध्ये व पाठ्यपुस्तकातील आवश्यक बदल या सर्व बाबींवर विचारमंथन सुरू असून, या धोरणाच्या अंमलबजावणीची दिशा ठरवली जात आहे.

मराठी भाषा सक्तीची

राज्य शासनाने मराठी सक्तीची

संग्रहित

करण्यासाठी कायदा केला आहे. त्यानुसार राज्यातील सर्व परीक्षामंडळाचे अभ्यासक्रम असलेल्या, सर्व माध्यमांच्या शासकीय व खासगी व्यवस्थापनांच्या सर्व शाळांमध्ये मराठी भाषेचे इयत्ता १० वीपर्यंत अध्यापन व अध्ययन सक्तीचे करण्यात आले.

१०-१२ वीचे ऑनलाइन वर्ग

दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी जिओ टीव्हीच्या माध्यमातून तज्ज्ञ शिक्षकांच्या तासिका प्रक्षेपित करत आहोत. याचबरोबर डी.डी.सह्याद्री वाहिनीवर देखील ज्ञानगंगा या शैक्षणिक कार्यक्रमाच्या माध्यमातून तज्ज्ञ शिक्षकांच्या तासिकांचे प्रक्षेपण केले जात आहे. तसेच राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या यु-ट्यूब चॅनेलच्या माध्यमातूनदेखील लाइव्ह प्रक्षेपण केले जात आहे. ज्याचा फायदा राज्यातील या विद्यार्थ्यांना होत आहे.

दीक्षा ॲप

दीक्षा ॲप केंद्र शासनाने विकसित केले आहे. त्याचा उपयोग करण्यात महाराष्ट्र प्रथम क्रमांकावर आहे. याचबरोबर लॉकडाऊन कालावधीमध्ये आम्ही सुरू केलेल्या अभ्यासमालेचे एकूण २२० दिवस अविरतपणे, या दीक्षा ॲपच्या माध्यमातून अभ्यास विद्यार्थ्यांसाठी पाठवत आहोत.

गुगल क्लासरूम

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर आपण विविध उपक्रम राबवत आहोत. त्यातील गुगल क्लासरूम हा एक महत्त्वाचा उपक्रम आहे. राज्यासाठी एवढा मोठा प्लॅटफॉर्म गुगलमार्फत मोफत स्वरूपामध्ये उपलब्ध करून देण्यात आला. त्यामुळे असा उपक्रम राबवणारे महाराष्ट्र हे देशातील नव्हे, तर कदाचित विश्वातील पहिले राज्य आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करणे सोपे जात आहे. या काळामध्ये देखील शिक्षक व विद्यार्थी परस्परसंवादी राहण्यास मदत झाली आहे. याचा लाभ राज्यातील सर्व शिक्षकांना करून देण्यात आला आहे.

विनापरीक्षा वर्गोन्नती

इयत्ता नववी व ११ वीच्या द्वितीय सत्राच्या परीक्षा न घेता प्रथम सत्र परीक्षेमधील तसेच चाचण्या, प्रात्याक्षिके व अंतर्गत मूल्यमापनातील प्राप्त गुणांचा विचार करून त्या आधारे विद्यार्थ्यांना वर्गोन्नती द्यावी, असा निर्णय घेण्यात आला.

अभ्यासक्रम सल्लागार समिती

माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळांतर्गत सर्वशाळांमधील मुलांना समान आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण मिळण्यासाठी तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार बालभारती/ राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्या अभ्यासक्रमात सुधारणा करण्यासाठी राज्य आंतरराष्ट्रीय अभ्यासक्रम सल्लागार समितीची स्थापना करण्यात आली आहे. त्याचबरोबर सुमारे ३०० शाळांना आदर्श शाळा म्हणून विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

केंद्र शासनातर्फे देण्यात येणारे परफॉर्मिंग ग्रेडिंग इन्डेक्स (पीजीआय) मध्ये महाराष्ट्राच्या कामगिरीच्या मानांकनात सुधारणा झाली असून, आता राज्याचा श्रेणी ४ मधून श्रेणी १ मध्ये समावेश झाला आहे.

शिक्षकांची कामगिरी उत्तम

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शाळा बंद असल्या तरी या काळातदेखील अनेक शिक्षक वेगवेगळ्या प्रकारे उपक्रम राबवत आहेत. आमचे अनेक शिक्षक पाड्यांवर, वाड्यावस्त्यांवर जाऊन गृहभेट देऊन, विद्यार्थ्यांना शिक्षण देत आहेत. आठवड्याला गृहभेट देणे, दैनंदिन फोनच्या माध्यमातून विद्यार्थी संवाद, लाउडस्पीकरच्या माध्यमातून विद्यार्थी शिक्षण असे अनेक उपक्रम राबवत आहेत. अशा सर्व शिक्षकांचे मी कौतुक नेहमीच करत आहे.

शब्दांकन : अर्चना शंभरकर,
विभागीय संपर्क अधिकारी

दृष्टिक्षेपात

● शालेय पोषण आहार प्री पॅकस्वरूपात वितरित. ● १० वी, १२ वीच्या निकालांचे काम वेळेत पूर्ण. ● अर्ज भरण्यापासून ते प्रवेश निश्चित करेपर्यंत सर्व कार्यवाही संपर्क विरहित व ऑनलाइन पद्धतीने. ● विद्यार्थ्यांना कागदपत्रे सादर करण्यासाठी ४ महिन्यांचा कालावधी देण्यात आला. ● टाळेबंदीच्या काळात अध्ययन - अध्यापन प्रक्रिया सुरू राहण्यासाठी 'लर्निंग फ्रॉम होम' ही संकल्पना राबवण्यात आली. ● राज्यातील सर्व शैक्षणिक संस्थांना फी वाढ न करण्याच्या सूचना. ● पाच हजारांपेक्षा जास्त शिक्षकांची 'पवित्र' प्रणालीमार्फत भरती. ● प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक अशा एकूण २१६५ शाळांना २० टक्के व या याआधीच २० टक्के अनुदान घेणाऱ्या २४१७ शाळांना अतिरिक्त २० टक्के अनुदान देण्याचा निर्णय. ● शाळेतील मुलांना पाणी पिण्याची आठवण करून देण्यासाठी 'वॉटर बेल' वाजवण्याचा निर्णय. लोकशाहीची मूल्ये शालेय जीवनातच रुजवण्यासाठी शाळेत 'संविधान दिन' साजरा करण्याचा निर्णय. ● शाळांमधून संविधान उद्देशिकेचे वाचन. ● सद्य:स्थितीमध्ये शाळा बंद असल्याने व विद्यार्थ्यांवर कसल्याही प्रकारचा ताण येऊ नये म्हणून सर्वसमावेशकपणे सर्व विषयांचा २५ टक्के अभ्यासक्रम कमी करण्यात आला आहे. ● विद्यार्थ्याला मातृभाषेतून कशा प्रकारे शिक्षण देता येईल, याचादेखील विचार केला जात आहे.

गृहनिर्माणाला उभारी देण्यासाठी आणि या क्षेत्रात आलेली मरगळ दूर करण्यासाठी गेल्या वर्षभरात अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. संपूर्ण जगाला सध्या जागतिक मंदीचा सामना करावा लागत आहे. गृहनिर्माण क्षेत्र त्याला अपवाद ठरले नाही. अर्थकारणाला जर गती, बळकटी द्यायची असेल तर बांधकाम उद्योगाला ताकद देण्याची गरज आहे. मुंबई आणि राज्याच्या इतर प्रमुख शहरांमध्ये विकासाला गती द्यायची असेल, तर गृहनिर्माण उद्योगाला सवलती व सुविधा देण्याची गरज आहे.

डॉ. जितेंद्र आव्हाड
मंत्री, गृहनिर्माण

स्वस्त व परवडणारी घरे

मुंबई शहरातील उपकरप्राप्त इमारतीतील लाखो रहिवाशांना दिलासा देण्यासाठी म्हाडा अधिनियमात सुधारणा, मुंबई महानगर क्षेत्रातील (मुंबई शहर वगळता) आठ महानगरपालिका आणि सात नगरपालिका/नगरपरिषद मिळून स्वतंत्र झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची स्थापना, चतुर्थ श्रेणी शासकीय कर्मचारी व पोलिसांसाठी म्हाडाच्या सोडतीत दहा टक्के घरे राखीव, राज्यातील प्रमुख शहरांमध्ये झोपडपट्टी पुनर्वसन योजना लागू करण्यासाठी अभ्यास गटाची स्थापना, वेश्म मालकी अधिनियमात सुधारणा व वेश्म/अपार्टमेंट मालकांना किंवा मालकांच्या संघटनेस अपिलाचा अधिकार अशा प्रकारचे निर्णय सर्वसामान्य नागरिकांच्या हिताचे व दूरगामी परिणाम करणारे ठरणार आहेत.

सर्वसामान्यांना परवडतील अशी घरे

शहरांमध्ये नागरिकांना राहण्यासाठी घरांची उपलब्धता ही मोठी समस्या आहे. ही बाब लक्षात घेऊन आम्ही गृहनिर्माणाचा व्यापक कार्यक्रम हाती घेतला आहे. म्हाडामार्फत सर्वसामान्यांना परवडतील अशी घरे आम्ही उपलब्ध करून देत आहोत. सामान्य माणसाचे घराचे स्वप्न पूर्ण करून त्याला हक्काचा निवारा देणे, स्वस्त व परवडणाऱ्या घरांची निर्मिती याबरोबरच शहरे झोपडपट्टीमुक्त करण्यासाठी गृहनिर्माण विभाग प्रयत्नशील आहे.

म्हाडा अधिनियमात सुधारणा

विकास नियंत्रण नियमावली ३३(७) अंतर्गत ज्या मालकांनी/विकासकांनी पुनर्विकास प्रकल्प अर्धवट अवस्थेत सोडले आहेत. तसेच ज्या उपकरप्राप्त इमारती अतिधोकादायक असूनसुद्धा मालक पुनर्विकासासाठी पुढे येत नाहीत, यासाठी म्हाडा अधिनियमात सुधारणा करण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला आहे.

मुंबई शहरातील जुन्या व मोडकळीस आलेल्या १४ हजार २०७ उपकर प्राप्त इमारतींचा पुनर्विकास जलद गतीने व्हावा, यासाठी म्हाडा अधिनियम कलम ७७, ७८ व ९१ मध्ये सुधारणा करण्याबाबतचा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला आहे. त्या संदर्भातील विधेयक विधानसभा व विधान परिषदेत मंजूर करण्यात आले. या प्रस्तावित सुधारणेंतर्गत विकास नियंत्रण नियमावली ३३ (७) मधील जे पुनर्विकास मालक/विकासकांनी अर्धवट अवस्थेत सोडले आहेत व भाडेकरू/रहिवाशांना पर्यायी जागेपोटी भाडे देणे बंद केले आहेत, अशा भाडेकरू/रहिवाशांना दिलासा देण्यासाठी, असे अर्धवट पुनर्विकास प्रकल्प म्हाडाने जमीन भूसंपादित करून प्रकल्प पूर्ण करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच ज्या उपकर प्राप्त इमारतींना महानगरपालिकेने कलम ३५४ अन्वये नोटीस पाठवून किंवा इतर कोणत्याही सक्षम प्राधिकरणाने इमारत धोकादायक घोषित केली आहे, अशा इमारतींच्या मालकास ०६ महिन्यांच्या आत ५१ टक्के भाडेकरू/रहिवाशांचे अपरिवर्तनीय संमतिपत्र उपलब्ध करून पुनर्विकासाचा प्रस्ताव मंडळास सादर करावयाचा आहे. मालकाने तसे न केल्यास, भाडेकरू/रहिवाशांच्या प्रस्तावित सहकारी गृहनिर्माण संस्थेस ६ महिन्यांच्या आत ५१ टक्के भाडेकरू/रहिवाशांचे अपरिवर्तनीय

संमतिपत्र उपलब्ध करून पुनर्विकासाचा प्रस्ताव मंडळास सादर करावयाचा आहे. जर या दोघांनीही प्रस्ताव सादर न केल्यास, म्हाडाने सदर इमारत व त्याखालील भूखंड भूसंपादित करून पुनर्विकास हाती घेण्याची तरतूद केली आहे. भाडेकरू/रहिवाशांच्या प्रस्तावित सहकारी गृहनिर्माण संस्थेने किंवा म्हाडाने पुनर्विकास योजना राबवल्यास, इमारतींच्या मालकास जमिनीच्या किमतीपोटी शीघ्र गणकाच्या २५ टक्के रक्कम किंवा विक्रीयुक्त बांधकाम क्षेत्रफळामधून १५ टक्के बांधकाम क्षेत्रफळ जे जास्तीचे असेल ते देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

विकास नियंत्रण नियमावली ३३(७) अंतर्गत करण्यात येणाऱ्या पुनर्विकास योजनांमध्ये असहकार्य करणाऱ्या रहिवाशांनी विकासकाने देऊ केलेली पर्यायी जागा किंवा भाडे स्वीकारण्यास तयारी दर्शवली नाही, तर अशा रहिवाशास मंडळाने नोटीस बजावून त्यांचे स्थलांतर सक्तीने मंडळाच्या संक्रमण शिबिरात करणे. संक्रमण शिबिराचे भाडे विकासकाने मंडळास देणे क्रमप्राप्त असेल.

इमारतींचा पुनर्विकास

मुंबई शहरातील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींचा पुनर्विकास जलद गतीने व्हावा, यासाठी गृहनिर्माण विभागाने पूर्वी निर्गमित केलेल्या शासन निर्णय ११ नोव्हेंबर २०१९ मधील जाचक अटीमुळे तसेच मालक / भाडेकरू / रहिवाशांवर विकासक निवडीचे लावण्यात आलेले निर्बंध या कारणास्तव गेली एक वर्ष पुनर्विकासासाठी प्राप्त झालेल्या व प्रलंबित असलेल्या प्रस्तावांना चालना देण्यासाठी हा शासन निर्णय रद्द करून नवीन मार्गदर्शक सूचना जारी करण्याचा निर्णय नुकत्याच झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

मार्गदर्शक सूचना

- विकासक नोंदणी व विकासक पात्रतेसंदर्भातील नवीन मार्गदर्शक सूचना/निकष गृहनिर्माण विभागाच्या स्तरावर नव्याने निश्चित करून निर्गमित करण्यात येतील.
- उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकास योजनेमधील मालक/विकासक यांनी भाडेकरू/रहिवाशी यांचे १ वर्षाचे भाडे आगाऊ जमा करण्यासाठी एस्क्रो खाते (Escrow Account) उघडणे बंधनकारक व पुढील उर्वरित कालावधीचे भाडेदेखील याचप्रमाणे प्रकल्प पूर्ण होईपर्यंत दरवर्षी आगाऊ जमा करणे मालक/विकासकास बंधनकारक राहील.
- म्हाडा अधिनियम, १९७६ मधील कलम-१०३ (ब) अन्वये भूसंपादित केलेल्या मालमत्तेच्या पुनर्विकासास चालना देण्यासाठी मार्गदर्शक सूचना.
- उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाचे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी ३ ते ५ वर्षांची कालमर्यादा निश्चित करण्यात आली.

महाराष्ट्र वेश्म/अपार्टमेंट मालकी अधिनियम, १९७० मधील तरतुदींची अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणी विचारात घेऊन, बहुसंख्य वेश्म मालकांच्या संमतीने विशेष बैठकीद्वारे प्रतिज्ञापन / वेश्म विलेखाच्या मजकुरात सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच, या अधिनियमाचा भंग झाल्यास वेश्म मालक/वेश्म मालकांच्या संघटनेस दाद मागण्यासाठी तक्रार निवारण मंच उपलब्ध नव्हते. नव्या सुधारणेमुळे कोणत्याही व्यथित वेश्म मालकास, वेश्म मालकांच्या संघटनेस, कोणत्याही वेश्म मालकाविरुद्ध किंवा मालमत्तेच्या एकमात्र मालक किंवा सर्व मालकांविरुद्ध निबंधक, सहकारी संस्था यांच्याकडे तक्रार दाखल करता येईल. या सुधारणा २०२० च्या पावसाळी अधिवेशनामध्ये मंजूर करण्यात आल्या आहेत.

म्हाडाच्या वसाहतींचा पुनर्विकास

म्हाडाच्या सोडतीमध्ये चतुर्थ श्रेणी शासकीय कर्मचारी आणि पोलिसांसाठी प्रत्येकी दहा टक्के घरे आरक्षित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. म्हाडा वसाहतीचे अभिन्यास मंजुरीकरिता गती देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे मुंबईमधील 'म्हाडा'च्या वसाहतींचा पुनर्विकास होण्यास गती प्राप्त होणार असून पुनर्विकासासाठी विकासक पुढे येतील. मुंबईतील कामाठीपुरा भागाचा पुनर्विकास करून येथे शहरातील सर्वात मोठे व्यापारी केंद्र बनवण्याचा मानस आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन योजना

झोपडपट्टी पुनर्वसनाबाबतही अनेक महत्त्वपूर्ण निर्णय आम्ही घेतले आहेत. सर्वसामान्य गरीब माणसाचे घराचे स्वप्न साकार करण्यासाठी ८ सप्टेंबर २०२०च्या अधिसूचनेद्वारे मुंबई महानगर क्षेत्रातील (मुंबई शहर वगळता) आठ महानगरपालिका व सात नगरपालिका क्षेत्रासाठी ठाणे येथे स्वतंत्र झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे.

आशयपत्र (Letter of Intimation) जारी करण्यापूर्वी वित्त विभागाकडून परिशिष्ट ३ सादर करण्याची अट आहे. त्यामुळे प्रस्ताव मंजूर करूनसुद्धा आशयपत्र (LOI) देता येत नव्हते. आता त्यामध्ये बदल करून परिशिष्ट ३ बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र (सीसी) पूर्वी घेतले जाणार आहे. सद्य:स्थितीत योजनेकरिता आशयपत्र (LOI) जारी केल्यानंतर IOA (Intimation of Approval) करीता अर्ज करावा लागत असल्याने बराच कालावधी लागत होता. आता आशयपत्र (LOI) व देकार पत्र (IOA) एकाच वेळी देण्यात येतील. आता अर्ज केल्यानंतर सात दिवसात ती परवानगी दिली जाईल.

अशा प्रकारे अनेक लोकाभिमुख निर्णय घेऊन राज्याला प्रगतिपथावर नेण्यासाठी व सामान्य माणसांच्या स्वप्नपूर्तीसाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

शब्दांकन : देवेंद्र पाटील,
विभागीय संपर्क अधिकारी

शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी शेतीपूरक उद्यम, पशुपालन आणि दुग्ध व्यवसायास प्रोत्साहन देण्यासाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत. याकरिता पशुसंवर्धन दुग्धव्यवसाय विकास विभागाद्वारे कुक्कुटपालन, संकरित गायीची पैदास, स्थानिक जातीच्या गोवंशामध्ये सुधारणा, शेळी-मेंढी विकास या कार्यक्रमावर भर दिला जात आहे. या माध्यमातून शेतकरी, आर्थिक दुर्बल घटकातील नागरिक तसेच सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होत आहे.

पशुधनात वृद्धी, खेळाडूंना संधी

सुनील केदार
मंत्री, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास, क्रीडा व युवक कल्याण

गुरेढोरे व शेळ्या, मेंढ्या, कोंबड्या यांसारख्या प्राण्यांच्या पालनातून एक मोठे उद्योगविश्व आकाराला आलेले असून त्यामुळे राज्याची अर्थव्यवस्था सुदृढ होण्यास मदत झाली आहे. वाढते शहरीकरण, बदलती जीवनशैली, रोजगार निर्मितीतील महिलांचा वाढता सहभाग, बदलत्या आवडीनिवडी या सर्व गोष्टींचा चांगला परिणाम पशुपालन व्यवसाय व त्याच्याशी निगडित व्यवसायांवर नक्कीच झाला आहे.

ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी

हेट्टीकुंडी जिल्हा वर्धा येथील जमिनीवर चराईचे अधिकार वन विभागाकडून पशूसंवर्धन विभागास मिळाले. येथील शेत जमिनीसह एमएलडीबीकडे ते हस्तांतर करण्यात आले. नागपूरहून दुबईला दोन कार्गोमधून जिवंत शेळ्यामेंढ्यांची निर्यात करण्यात आली. यामुळे येथील ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेला चालना मिळाली. महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठात कोविडच्या चाचणीसाठी प्रयोगशाळा स्थापना करण्यात आली.

दुग्धव्यवसाय, शेळीपालन आणि कुक्कुटपालन या शासन अनुदानित विविध योजनांमध्ये ऑनलाइन पद्धतीने लाभार्थ्यांकडून अर्ज मागवून आणि संगणकीय प्रणालीद्वारे निवड करून योजना राबवल्या जाणार आहेत, जेणेकरून या कामात वेळ, मनुष्यबळाची बचत होऊन पारदर्शकता राहील.

पशुस्वास्थ्य योजना

राज्यातील दुर्गम, डोंगरी, आदिवासीबहुल भागांमध्ये तसेच ज्या भागांमध्ये पशुधनाच्या तुलनेत पशुवैद्यकीय दवाखान्यांची संख्या कमी आहे. त्याप्रमाणे ज्या भागांमध्ये दळणवळणाच्या अपुऱ्या सुविधा आहेत, अशा तालुक्यांमधील पशुरुग्णांना पशुवैद्यकीय सेवा, पशुपालकांच्या शेतकऱ्यांच्या दारापर्यंत पोहोचवण्यासाठी, मुख्यमंत्री पशुस्वास्थ्य योजनेंतर्गत राज्यातील ३४९ ग्रामीण तालुक्यांमध्ये फिरते पशुचिकित्सा पथक स्थापन करण्यात येणार आहे. स्थापन करावयाच्या फिरत्या पशुचिकित्सा पथकांपैकी प्रथम टप्प्यात विविध तालुक्यांमध्ये नवीन ८१ फिरते पशुचिकित्सा पथके स्थापन करण्यास, तसेच या पथकांच्या कामांचा सर्वंकष अभ्यास करून फलनिष्पती विचारात घेऊन, उर्वरित तालुक्यांमध्ये फिरते पशुचिकित्सा पथके निर्माण करण्याचा निर्णय पुढील टप्प्यात घेण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे.

लस उत्पादन प्रयोगशाळा

प्रयोगशाळा उभारणीबाबतचे काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत तज्ज्ञ सल्लागारांच्या मार्गदर्शनाखाली 'टर्न की' पद्धतीने हाती घेण्यात आले असून सद्य:स्थितीत हे काम पूर्ण झाले आहे. कुक्कुट व विषाणू लस उत्पादन प्रयोगशाळा उभारणीसाठी राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत, या प्रकल्पातील कुक्कुट व विषाणू लस उत्पादन प्रयोगशाळा या भौतिकदृष्ट्या पूर्णत्वास आलेल्या असून, या प्रयोगशाळा लस उत्पादनासाठी सज्ज झालेल्या आहेत.

अफवा पसरवणाऱ्यांवर कारवाई

कोरोना महामारीत कुक्कुट उद्योगाशी निगडित अफवा सोशल मीडियाद्वारे चुकीच्या पद्धतीने पसरवल्या गेल्या होत्या. या चुकीच्या प्रचारामुळे कुक्कुटपालन व्यवसाय फेब्रुवारी ते एप्रिल २०२० दरम्यान अडचणीत आला होता. त्या अनुषंगाने पशुसंवर्धन विभागातून अफवा व चुकीची माहिती पसरवणाऱ्या संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. तसेच कुक्कुट मांस व कुक्कुट उत्पादने मानवी आहारात सुरक्षित व पोषक असण्याबाबत आकाशवाणी, दूरदर्शन व इतर प्रसारमाध्यमांतून लोकांचे प्रबोधन केले. परिणामी कुक्कुट मांस व अंडी यांस बाजारपेठेत आता चांगली

दूध उत्पादन वाढ प्रकल्प

राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत विदर्भ व मराठवाडा विभागात दूध उत्पादन वाढीचा विशेष प्रकल्प या कार्यक्रमाची अंमलबजावणी पशुसंवर्धन विभाग राष्ट्रीय दुग्धविकास मंडळ व मदर डेयरी फुड्स ॲण्ड व्हेजिटेबल लि. यांच्यामार्फत केली जात आहे. अकोला, अमरावती, बुलडाणा, वर्धा, नागपूर, चंद्रपूर, लातूर, नांदेड, जालना, यवतमाळ व उस्मानाबाद अशा ११ जिल्ह्यांतील एकूण ४२६३ गांवामध्ये दूध उत्पादन वाढीचा हा विशेष प्रकल्प राबवण्यात येत आहे.

मागणी व दर मिळत आहे.

पशुपालन व पशुपैदास प्रक्षेत्र

राज्यामध्ये कृषी विज्ञान केंद्राच्या धरतीवर पशुविज्ञान केंद्राची स्थापना करणे ही नवीन संकल्पना राबवून पशुपालक शेतकऱ्यांकरिता पशुपालन व पशुसंवर्धन केंद्रस्थानी ठेवून पूर्णपणे पशुधनावर आधारित प्रणाली पशुपालन व पशुपैदास प्रक्षेत्र, हेटीकुंडी जिल्हा वर्धा येथे स्थापित करण्यासाठी ४१.४० कोटींचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

दुधाचे रूपांतर दूधभुकटीत

संपूर्ण जगात कोविड-१९ या रोगाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात दिसून आल्याच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण देशात २३ मार्च, २०२० पासून लॉकडाऊन परिस्थितीत शासनाने प्रतिदिन १० लक्ष लीटर मर्यादेपर्यंत दूध स्वीकृत करून या दूधाचे रूपांतर दूधभुकटीत करण्याची योजना घोषित केली. या योजना ६ एप्रिल २०२० ते ३१ जुलै २०२० व त्यानंतर १ सप्टेंबर २०२० ते ३१ ऑक्टोबर २०२० या ६ महिन्यांकरिता राबवण्यात आली. या योजनेद्वारे प्राप्त होणारी दूधभुकटी आदिवासी विकास विभागाच्या भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार या योजनेंतर्गत ६ लाख ५१ हजार मुलांना, १ लाख २१ हजार गरोदर स्तनदा मातांना १ वर्षाकरिता उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

राज्याला २०७ कोटींचा महसूल

शासकीय दूध योजनेमार्फत औरंगाबाद, नागपूर व अमरावती विभागातून दूध उत्पादक शेतकऱ्यांचे दूध स्वीकृत करून अतिरिक्त होणारे एकूण १३७.९३ लक्ष लीटर दूधाचे भुकटीमध्ये रूपांतर करण्यात आले. उत्पादित दूधभुकटी व देशी कुकिंग बटर यांची ई-पोर्टलद्वारे विक्री करून एकूण २०७.१४ कोटी रुपये महसूल शासनास प्राप्त झाला. तसेच पायाभूत सुविधा या घटकाखाली दुग्धव्यवसाय विभागाच्या ४ नवीन प्रकल्पांना मंजुरी प्राप्त करून घेण्यात आली. या प्रकल्पांसाठी २६.८३ कोटी रुपये इतका निधी प्राप्त झाला आहे. या प्रकल्पांपैकी तीन प्रकल्प मराठवाड्यातील असून, या प्रकल्पांमुळे उस्मानाबाद व औरंगाबाद यासारख्या दुष्काळी जिल्ह्यांमध्ये १.३५ लक्ष लीटर दैनंदिन हाताळणी क्षमता उपलब्ध होणार आहे.

आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रीडा विद्यापीठ

संशोधन, प्रशिक्षण व कौशल्य विकास यामधील गुणवत्ता निर्माण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रीडा विद्यापीठ स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. विजय खोले यांच्या अध्यक्षतेखाली समितीचा अहवाल शासनास सादर करण्यात आला असून, कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

फीफा वर्ल्डकप स्पर्धा

जागतिक फुटबॉल संघटना, भारतीय फुटबॉल संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने व राज्य शासनाच्या सहकार्याने १७ वर्षांखालील मुली-फिफा वर्ल्डकप फुटबॉल स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. यातील अंतिम व उपांत्य फेरीचे सामने राज्यात होणार.

एक वर्ष महाराष्ट्र सेवेचे
महाविकास आघाडीचे

शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार

शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवन गौरव पुरस्कार, उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार, शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (खेळाडू), शिवछत्रपती राज्य क्रीडा दिव्यांग पुरस्कार, शिवछत्रपती राज्य क्रीडा साहसी क्रीडा पुरस्कार वितरण समारंभ तीन वर्षाच्या कालावधीनंतर सरकार स्थापनेबरोबर भव्य स्वरूपात संपन्न करण्यात आला.

खेलो इंडियात राज्य अव्वल

गुवाहाटी येथे झालेल्या तिसऱ्या खेलो इंडिया युथ गेम्स २०२० या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राने ७८ सुवर्ण, ७७ रौप्य व १०२ कांस्य अशी एकूण २५७ पदके मिळवून पदक तालिकेत प्रथम स्थान पटकावले. शासनाने पदक विजेत्या ३१९ खेळाडूंना सुवर्णपदक १ लक्ष, रौप्यपदक ७५ हजार रुपये व कांस्यपदक विजेत्यास ५० हजार रुपये याप्रमाणे ३.२५ कोटी रुपये रोख रकमेची बक्षिसे देऊन त्यांचा गौरव केला.

शिष्यवृत्ती व अर्थसाहाय्य

राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेत राज्याचे प्रतिनिधित्व केलेल्या व प्रावीण्यप्राप्त अशा २५२६ खेळाडूंना १.६७ कोटी रुपये शिष्यवृत्ती वितरित करण्यात आली आहे. तर मिशन ऑलिंपिक योजनेंतर्गत आंतरराष्ट्रीय स्पर्धेच्या तयारीसाठी ५२ खेळाडूंना २.५७ कोटी रुपये आर्थिक साहाय्य मंजूर करण्यात आले. यामुळे विद्यार्थ्यांनी शालेय जीवनापासून खेळात सहभागी व्हावे, यासाठी खेळाडूंना सर्वोत्तम सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

शब्दांकन : राजू धोत्रे,
विभागीय संपर्क अधिकारी

अतिवृष्टी, पुरामुळे बाधित शेतकरी, वंचित, बहुजन समाज, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग आदी समाज घटकांच्या अडचणी सोडवण्यासाठी विभागामार्फत सतत प्रयत्न सुरू आहेत. बहुजनांच्या कल्याणासाठी राज्य शासन सदैव तत्पर असून, 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' या तत्त्वानुसार काम करत आहे. गेल्या वर्षभरात कोविड-१९, चक्रीवादळ, गारपीट अतिवृष्टीमुळे बाधित नागरिकांकरिता सुमारे १३ हजार ३०० कोटी रुपये इतका निधी वितरित करण्यात आला.

आपत्तीत शासन पाठीशी

विजय वडेट्टीवार
मंत्री, इतर मागास बहुजन कल्याण, मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन, खार जमिनी विकास

जून ते ऑक्टोबर २०२० या कालावधीत राज्यात अतिवृष्टी व पुरामुळे शेतीपिकांचे व बहुवार्षिक पिकांचे किमान ३३ टक्के नुकसान झाले. अशा बाधित शेतकऱ्यांना शेतीपिकांच्या (जिरायत व आश्वासित सिंचनाखालील पिके) नुकसानीसाठी १० हजार रुपये प्रतिहेक्टर व बहुवार्षिक पिकांच्या नुकसानीसाठी २५ हजार प्रतिहेक्टर या दराने २ हेक्टरच्या मर्यादेत मदत देण्यात आली. नुकसानभरपाईच्या पहिल्या हप्त्यापोटी २ हजार २९७ कोटी ६ लाख रुपयांचा निधी दिवाळीपूर्वी वितरित करण्यात आला.

शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीर

राज्यात ऑक्टोबर २०१९ ते नोव्हेंबर २०१९ दरम्यान उत्तर पूर्व मान्सूनचे आगमन, अरबी समुद्रात सुपर सायक्लोन क्यार व महा अशा चक्रीवादळांमुळे निर्माण झालेला कमी दाबाचा पट्टा यामुळे अवेळी पाऊस झाला. या अवेळी पावसामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे राहिले. यासाठी ७ हजार ६४७ कोटी ९७ लाख रुपयांची रक्कम मदत म्हणून वितरित करण्यात आली. याशिवाय बाधित शेतकऱ्यांना जमीन महसुलात सूट, शेतपिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या पाल्यांना शाळा व महाविद्यालयीन परीक्षा शुल्कात माफी देण्याचा निर्णयही शासनाने घेतला.

राज्यात डिसेंबर २०१९ व जानेवारी २०२० या काळात गारपीट व अवेळी पावसामुळे जळगाव, अमरावती, यवतमाळ, वाशिम, वर्धा, नागपूर आणि भंडारा या सात जिल्ह्यातील ९८,०८१ हेक्टर क्षेत्रावरील शेतपिकांचे नुकसान झाले. यासाठी ९३ कोटी ५८ लाख रुपयांची मदत शेतकऱ्यांना देण्यात आली.

कोरोनाशी दोन हात

कोविड-१९ विषाणुचा प्रादुर्भाव नियंत्रित करण्यासाठी राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून विलगीकरण कक्ष स्थापन करणे, तात्पुरती निवास व्यवस्था करणे, अन्न, कपडे, वैद्यकीय देखभाल, अतिरिक्त चाचणी प्रयोगशाळा स्थापन करणे, अग्निशमन, पोलीस, स्थानिक स्वराज्य संस्था, आरोग्य सेवेतील कर्मचारी यांना वैयक्तिक संरक्षणासाठी साधने पुरवणे, व्हेंटिलेटर, हवा शुद्धीकरण यंत्र, थर्मल स्कॅनर्स, इ. विविध कामांसाठी आणि उपाययोजनांसाठी मदत व पुनर्वसन विभागामार्फत ६९७ कोटी ९२ लाख रुपयांचा निधी विभागीय आयुक्तांमार्फत वितरित करण्यात आला.

नैसर्गिक आपत्तीवर मात

राज्यात ३ जून २०२० रोजी आलेल्या निसर्ग चक्रीवादळामुळे कोकण किनारपट्टीतील रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात शेतपिके, फळपिके, घरे आणि सार्वजनिक मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. निसर्ग चक्रीवादळामुळे बाधित नागरिकांना एसडीआरएफच्या दरात आणि निकषात बदल करून विशेष वाढीव दराने मदत करण्याचा निर्णय शासनाने घेतला. निसर्ग चक्रीवादळग्रस्तांना मदतीसाठी शासनाकडून एकूण ७०७ कोटी ७५ लाख रुपयांच्या निधीचे वितरण करण्यात आले.

मध्य प्रदेशातील छिंदवाडा व शिवनी जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाल्यामुळे पेंच, कन्हान, बावनथडी, वैनगंगा या नद्यांना पूर आला. तसेच गोसीखुर्द धरणातून ३०,५९७ क्युसेक पाण्याचा विसर्ग करण्यात आला. त्यामुळे

बचावकार्याची पाहणी करताना आपत्ती व्यवस्थापन मंत्री विजय वडेट्टीवार

नदीकाठच्या जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांचे जनजीवन विस्कळीत होऊन शेतपिकांचे आणि मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या नागरिकांना राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या दरापेक्षा खास बाब म्हणून विशेष वाढीव दराने मदत करण्याचा निर्णय शासनाने घेतला आणि या सर्वांना मदत करण्यासाठी १८४ कोटी ५२ लाख रुपयांची रक्कम वितरित करण्यात आली.

याशिवाय विभागामार्फत खरीप हंगाम २०१८ मधील चारा छावणीसाठी या वर्षी ३८६ कोटी १२ लाख रूपये वितरित करण्यात आले. जुलै ते ऑक्टोबर २०१९ मधील अतिवृष्टीमधील घर पडझड/शेती पिकांचे नुकसान व इतर बाबींकरिता या वर्षी ८२१ कोटी २८ लाख रुपये वितरित करण्यात आले. पाणी टंचाईसाठी ३२६ कोटी ५६ लाख रुपये पाणी पुरवठा, विभागाला उपसा सिंचन योजनेची टंचाई कालावधीतील वीज देयकांसाठी १८ कोटी. पालघर जिल्ह्यातील भूकंपग्रस्तांसाठी (ताडपत्री व घर पडझड) या वर्षी १ कोटी ७७ लाख वितरित करण्यात आले.

कोरोना काळात दिलासा

टाळेबंदीच्या काळात राज्यातील उद्योग बंद झाल्याने या उद्योगातील कामगार, मजूर यांच्यासाठी भोजन, निवास, वैद्यकीय सुविधा इ.ची व्यवस्था निर्माण करण्यात आली. वेगवेगळ्या शिबिरांमध्ये सुमारे १८ लाख १५ हजार मजुरांची व्यवस्था करण्यात आली. परराज्यातील मजुरांना ८४२ श्रमिक रेल्वेद्वारे १२ लाख १० हजार २५५ मजूरांना त्यांच्या राज्यात पाठवण्यात आले. यासाठी मुख्यमंत्री साहाय्यता निधीतून सुमारे ९७ कोटी रुपये तसेच बसच्या खर्चासाठी सुमारे ११५ कोटी रुपयांचा निधी खर्च करण्यात आला.

प्रशिक्षण प्रबोधिनीची स्थापना

महात्मा जोतिराव फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेची (महाज्योती) नागपूर येथे स्थापना करण्यात आली. महाज्योती संस्थेसाठी २०२०-२१ या आर्थिक वर्षामध्ये ५० कोटी रुपये निधी अर्थसंकल्पित केला आहे. या संस्थेमार्फत इमाव, विजाभज आणि विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी विविध योजना राबवणे प्रस्तावित आहे. तसेच खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील युवक-युवती व इतर उमेदवारांसाठी विविध योजना राबवण्यासाठी महाराष्ट्र संशोधन उन्नत व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) संस्थेची नाशिक येथे स्थापना करण्यात आली आहे.

विद्यार्थिहिताला प्राधान्य

राज्यातील विजाभज, विमाप्र व इमाव या मागासवर्गीय व्यक्तींना शासकीय सेवेतील आणि शैक्षणिक प्रवेशासाठी आवश्यक असणाऱ्या नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र काढताना उत्पनाचा दाखला देण्याच्या कार्यपद्धतीमध्ये बदल केल्याने या मागास प्रवर्गातील व्यक्तीला सुलभपणे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र मिळते.

भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजातील ५५०० गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाच्या नामांकित शाळेमध्ये प्रवेश देण्याचा निर्णय घेण्यात आला. भटक्या जमाती 'क' प्रवर्गातील धनगर समाजासाठी घरे बांधण्याच्या योजनेला पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे नाव देण्यात आले आहे. राज्यात ओबीसी मुला-मुलींसाठी स्वतंत्र ७२ वसतिगृहे सुरू करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. प्रत्येक जिल्ह्यात प्रत्येकी (मुलांचे एक व मुलींचे एक) दोन वसतिगृहे बांधण्यात येणार आहेत.

२०१८-१९ या शैक्षणिक वर्षात राज्यातून व विभागीय परीक्षा मंडळातून इयत्ता १० वी व १२ वीच्या परीक्षेत सर्वप्रथम आलेल्या विमुक्त जाती भटक्या जमाती प्रवर्गाच्या ४० आणि इतर मागास प्रवर्गाच्या ४१ गुणवंत विद्यार्थी व विद्यार्थिनींना स्व. वसंतराव नाईक गुणवत्ता पुरस्कार प्रदान करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

जातपडताळणीसाठी दिलासा

कोरोनामुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीत सर्व घटकांतील विद्यार्थ्यांना जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करण्यास ६ महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली आहे. कोविड विषाणूच्या संसर्गामुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीत राज्यातील विजाभज, विमाप्र, इमाव या प्रवर्गातील विद्यार्थ्यांची २०१९-२० या शैक्षणिक वर्षातील किंवा तत्पूर्वीची शैक्षणिक संस्थांना देय असलेली शिष्यवृत्ती शासनाकडून अप्राप्त आहे या सबबीखाली कोणत्याही विद्यार्थ्याचे प्रवेश रद्द करण्यात येऊ नये, त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना आवश्यक असलेले सर्व दाखले, प्रमाणपत्र व आवश्यक दस्तवेज त्वरित उपलब्ध करून देण्यात यावे, असे आदेश राज्य शासनाकडून मॅट्रिकोत्तर शिक्षण देणाऱ्या सर्व शैक्षणिक संस्थांना देण्यात आले होते.

शब्दांकन : दत्तात्रय कोकरे,
विभागीय संपर्क अधिकारी

खार जमीन विकास

नारवेल बेनवले (ता .पेण जि.रायगड), काचली पीटकारी (ता. अलिबाग, जि. रायगड) आणि पालघर येथील खारभूमी योजनांची कामे सुरू झाली असून, ती दीड वर्षांत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. यामुळे २०५२ हेक्टर क्षेत्राचा पुनर्वापर होणार. पालघर जिल्ह्यातील कोल व बापाने (ता. वसई) योजनांची नूतनीकरणाची कामे सुरू. तसेच रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील माणकुले-सोनकोठा, हाशीवरे या तीन योजनांची कामे दोन वर्षांत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. यामुळे ९१८ हेक्टर क्षेत्राचा पुनर्वापर होणार आहे.

कोरोनाच्या प्रतिकूल परिस्थितीतसुद्धा उद्योग, गुंतवणूक, शेती, रोजगार निर्मिती, आरोग्य, युवक, महिला, वंचित घटक यांच्यासाठी विकास योजना राबवण्यासह सर्वच क्षेत्रात महाराष्ट्र आघाडीवर.

शेतकऱ्यांसाठी

- 'महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना' – ३०.७७ लाख खातेदारांना रु.१९,६४३ कोटीचा लाभ.
- 'विकेल ते पिकेल' –जिल्हा आणि पीकनिहाय व्हॅल्यू चेन.
- खरीप पीक कर्ज वाटप – या वेळी २७ टक्के जास्त.
- पीक विमा योजना – ८६ लाख शेतकऱ्यांना सुमारे रु.६ हजार कोटी विमा रकमेचे वाटप.
- शेतकऱ्यांकडून हमीभावाने गेल्या दहा वर्षातील विक्रमी कापसाची खरेदी.
- कृषिपंप वीजजोडणीसाठी नवीन धोरण.
- विक्रमी धान आणि भरड धान्य खरेदी ; पहिल्यांदाच रब्बी हंगामातही भरड धान्य खरेदी.

कोरोनाकाळात उपाय योजना

- 'माझे कुटुंब माझी जबाबदारी' व्यापक अभियान, जंबो उपचार सुविधांची निर्मिती, कोरोनाचाचण्यांचे दर ५ पट कमी.
- 'महात्मा फुले जनआरोग्य योजना' – आता सर्व नागरिकांना लाभ.
- रस्ते अपघातग्रस्तांवरील उपचारासाठी स्व.बाळासाहेब ठाकरे रस्ते अपघात विमा योजना जाहीर.
- गेल्या वर्षभरात चक्रीवादळ, गारपीट, अतिवृष्टी यासारख्या नैसर्गिक आपत्तिबाधित नागरिकांकरिता सुमारे रु.१३ हजार ३०० कोटी इतका निधी वितरित.
- शिवभोजन थाळीची किंमत आता फक्त रु.५. राज्यात ९०७ शिवभोजन केंद्रे कार्यरत, २.५० कोटी गरजूंनी घेतला लाभ.
- 'महाआवास' अभियान (ग्रामीण) – फेब्रुवारी २०२१ पर्यंत ८ लाख ८२ हजार घरकुले.
- मुद्रांक शुल्क दरात कपात केल्याने मालमत्ता खरेदी विक्री व्यवहारात ३९ टक्क्यांनी वाढ.

उद्योग, गुंतवणूक, रोजगार या क्षेत्रांसाठी

- महाराष्ट्रात उद्योग स्थापनेसाठी रु.६६ हजार ५९५ कोटींच्या गुंतवणुकीचे प्रस्ताव.
- मुंबई नागरी परिवहन प्रकल्प टप्पा ३ साठी रु.१०,९४७ कोटी पूर्णत्व किंमतीला मंजुरी.
- डी.सी.आर.बाबतच्या नव्या निर्णयामुळे संपूर्ण राज्यात क्लस्टर योजना, एस.आर.ए.आदी पुनर्विकास प्रकल्पांची अंमलबजावणी शक्य होणार.
- पर्यावरणाचे जतन आणि संवर्धनासाठी राज्यात 'माझी वसुंधरा अभियान'.
- आरे दूध वसाहतीत सुमारे ८०८ एकर जमीन राखीव वने म्हणून घोषित.
- पर्यटनाला चालना देण्यासाठी आदरातिथ्य क्षेत्राला उद्योगाचा दर्जा. आता ७० ऐवजी फक्त १० परवाने.
- स्थानिकांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी महाजॉब्स पोर्टल.
- मुंबईतील उपकरप्राप्त (सेस) इमारतींच्या दुरुस्ती व पुनर्रचनेसंदर्भात मोठ्या प्रमाणात सवलती.
- नवीन उद्योगांसाठी ४० हजार एकरची लँड बँक.
- कृषी पर्यटन धोरण जाहीर – शेतकऱ्यांना कृषिपूरक व्यवसाय उपलब्ध होऊन ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना.

महिला, वंचित घटक यांच्यासाठी

- इंदू मिल येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंतरराष्ट्रीय स्मारकातील डॉ. बाबासाहेब यांच्या पुतळ्याची उंची वाढविण्याचा निर्णय.
- जात प्रमाणपत्र पडताळणी आता ऑनलाईन : प्रक्रिया अधिक गतिमान होणार.
- आदिवासी बालकांना दूध भुकटी.

एक वर्ष महाराष्ट्र सेवेचे
महाविकास आघाडीचे

- आदिवासींच्या मदतीसाठी खावटी अनुदान योजना.
- आदिवासी कुटुंबांना रेशन/ जातपडताळणी प्रमाणपत्र तयार करण्यासाठी येणारा खर्च शासनाच्या बजेटमधून.
- यूपीएससीच्या मुख्य परीक्षेची व मुलाखतीची तयारी करणाऱ्या अनुसूचित जमातीतील उमेदवारांना रु. २६ हजार साहाय्य.
- मराठा युवकांसाठीची 'सारथी' अधिक बळकट.
- मराठा क्रांती मोर्चामधील आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याची कार्यवाही सुरू.
- इमाव, विजाभज आणि विमाप्र या प्रवर्गासाठी 'महाजोती' प्रशिक्षण संस्था.
- आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी विविध योजना राबवण्याकरिता 'अमृत' संस्थेची स्थापना.
- इमाव प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक जिल्ह्यात दोन वसतिगृहे.
- स्व. अण्णासाहेब पाटील महामंडळाच्या भागभांडवलात वाढ.
- ऊस तोडणी कामगार कल्याण मंडळाला चालना.
- कोरोनाकाळात माथाडी कामगारांना आणि बांधकाम कामगारांना प्रत्येकी रु. ५ हजार मदत.
- ४ हजार बचतगटांद्वारे अल्पसंख्याक महिलांचे होणार सक्षमीकरण.
- महिलांच्या अधिक सुरक्षिततेसाठी 'शक्ती' कायदा.
- राज्य राखीव पोलीस दलात महिलांच्या पहिल्या स्वतंत्र बटालियनला तत्त्वता मान्यता.
- ग्रामीण महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी 'नव तेजस्विनी' योजना

महाराष्ट्र थांबला नाही. थांबणार नाही.

श्री. बाळासाहेब थोरात
मंत्री, महसूल

श्री. अजित पवार
उपमुख्यमंत्री

श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे
मुख्यमंत्री

शासनाने गेल्या वर्षभरात अनेक महत्त्वपूर्ण लोकाभिमुख निर्णय घेतले आहेत. मार्च २०२० पासून ते अगदी आतापर्यंत आपण सर्वच कोविड-१९ परिस्थिती आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न करत आहोत. वैद्यकीय शिक्षण विभागाने राज्यातील कोविड-१९ परिस्थिती आटोक्यात ठेवण्यासाठी काही महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालये आणि रुग्णालयांमध्ये कोविड-१९ बाबत आवश्यक त्या सुविधा निर्माण करण्याला प्राधान्य देण्यात आले.

वैद्यकीय शिक्षणाला बळकटी

अमित देशमुख
मंत्री, वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्य

राज्यात २४ मार्च २०२० पासून लॉकडाऊन करण्यात आला होता. नंतर 'मिशन बिगीन अगेन' असे म्हणत आपण राज्याला हळूहळू अनलॉक करण्याची प्रक्रिया सुरू केली. मला जाणीव आहे की, या लॉक आणि अनलॉक काळामुळे मनोरंजन क्षेत्रात काम करणाऱ्या कलाकारांना याची मोठी झळ बसली. पण आता पुन्हा नव्या दमाने, नव्या जोमाने हे क्षेत्र प्रेक्षकांचे मनोरंजन करण्यासाठी सज्ज झाले आहे.

राज्यात कोविड-१९ चे रुग्ण कमी होत असले तरी धोका अजूनही टळलेला नाही. त्यामुळे येणाऱ्या काळात आपण सर्वांनीच दक्ष, सज्ज आणि तत्पर राहणे आवश्यक आहे.

सामान्य माणूस केंद्रबिंदू

कोविड-१९ पार्श्वभूमीवर राज्यात विविध उपाययोजना करण्यात येत आहेत.

रुग्णांसाठी त्वरित बेड उपलब्ध करून देणे, चाचण्यांचे दर निश्चित करणे, आवश्यक असलेल्या ऑक्सिजनची उपलब्धता, महात्मा फुले जनआरोग्य योजनेचा लाभ राज्यातील सर्व नागरिकांना अंगीकृत रुग्णालयांमार्फत उपलब्ध करून देणे आदी निर्णय सामान्य माणूस केंद्रबिंदू ठेवून घेण्यात आले आहेत.

उपाययोजनांना यश

कोविड-१९ विरुद्धच्या लढाईत मिळालेल्या यशामध्ये सर्वात मोठा वाटा हा डॉक्टर, नर्सेस, पॅरामेडिकल स्टाफ, सफाई कामगार, अंगणवाडी सेविका, आशाताई, पोलीस बांधव, स्वयंसेवी संस्थांचे कार्यकर्ते यांचा आहे. कोविड-१९ विरुद्ध सामना करण्यासाठी आपण प्रामाणिक प्रयत्न तर केलेच; त्यासोबतच पारदर्शक पद्धतीने उपाययोजना आखण्यात आल्या. त्यामुळे राज्यातील रुग्णसंख्या कमी होताना दिसत आहे. आता राज्यात 'माझे कुटुंब, माझी जबाबदारी' ही मोहीम व्यापक स्तरावर कार्यरत करण्यात आली आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाद्वारे स्थापित २० कोविड रुग्णालयात सुमारे ६००० हून अधिक खाटा कोविड-१९ रुग्णांसाठी उपलब्ध व यापैकी १६०० हून अधिक खाटा आयसीयूसाठी राखीव ठेवण्यात आल्या. यापैकी ९५ टक्क्यांहून अधिक खाटा ऑक्सिजनसह उपलब्ध करण्यात आल्या. सेंट जॉर्ज रुग्णालय, मुंबई येथे कोविड अतिदक्षता कक्षात १०० खाटांची व्यवस्था करण्यात आली.

कोविड-१९ चाचणीसाठी विक्रमी वेळेत खासगी व शासकीय १९६ प्रयोगशाळांची उभारणी करण्यात आली. सुमारे १ कोटींहून अधिक नागरिकांच्या कोविड चाचणी करण्यात आल्या. सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये कोविड-१९ चाचण्या करण्यासाठी साथरोग प्रयोगशाळा कार्यान्वित केल्या. कोविड-१९ साठी चाचणी किटचा पुरवठा १ सप्टेंबर २०२० पासून केंद्र शासनाकडून मिळणार नसल्याने राज्यातील प्रयोगशाळांना आरटीपीसीआर किट, आरएनए एक्स्ट्रॅक्शन किट व व्हीटीएम किटचे वितरण करण्यात आले.

निधीची उपलब्धता

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते

सांस्कृतिक कार्य

रत्नागिरी जिल्ह्यातील १७ गावांमध्ये विखुरलेल्या इतिहासपूर्वकालीन कातळ शिल्पांच्या जतन आणि संवर्धनाच्या कामाला तत्त्वत: मान्यता देण्यात आली. राज्य शासनाचा २०१८-२०१९ चा तमाशासम्राज्ञी विठाबाई नारायणगावकर जीवनगौरव पुरस्कार गुलाबबाई संगमनेरकर, राज्य शासनाचा संगीताचार्य अण्णासाहेब किर्लोस्कर पुरस्कार मधुवंती दांडेकर, नटवर्य प्रभाकर पणशीकर रंगभूमी जीवनगौरव पुरस्कार स्व. रत्नाकर मतकरी यांना जाहीर करण्यात आले.

राज्य शासनाचा गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार उषा मंगेशकर यांना जाहीर करण्यात आला. २०१९-२० चा ज्ञानोबा तुकाराम पुरस्कार ह.भ.प. बद्रीनाथ महाराज तनपुरे यांना जाहीर करण्यात आला. लॉकडाऊन काळात चित्रपटसृष्टीतील विविध कामांना मार्गदर्शक तत्त्वांसह शासनाची मान्यता; अटी-शर्तींसह चित्रीकरणासही मान्यता देण्यात आली.

रंगभूमी दिनी राज्यातील नाट्यगृहे/सिनेमागृहे ५० टक्के आसनक्षमतेसह सुरू करण्यास मान्यता देण्यात आली. मनोरंजन क्षेत्राबाबतचे धोरण ठरवण्यासाठी सांस्कृतिक कार्य विभागामार्फत तीन दिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. चर्चासत्राद्वारे समोर आलेल्या मार्गदर्शक सूचनेतून धोरण ठरवण्यात येणार आहे. महाराष्ट्र वैभव- राज्य संरक्षित स्मारक संगोपन योजनेंतर्गत जळगाव येथील 'अंमळनेर वेस' अंमळनेर नगरपरिषद यांना १० वर्षांच्या कालावधीसाठी संगोपनार्थ देण्यास मान्यता देण्यात आली. सध्या मुंबई आणि मुंबई उपनगरांमध्ये चित्रीकरणासाठी परवानगी देण्यात येणाऱ्या एक खिडकी योजनेचे लवकरच विस्तारीकरण करण्यात येणार आहे. पुणे, नाशिक, औरंगाबाद, सातारा, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांतही एक खिडकी योजना सुरू करण्यात येणार आहे.

प्लाझ्मा डोनेशन बँकेचे डिजिटल उद्घाटन करण्यात आले. राज्यातील २३ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांमध्ये 'प्रोजेक्ट प्लॅटिना' प्रकल्पासाठी आवश्यक असलेली यंत्रसामग्री, साधनसामग्रीसाठी मुख्यमंत्री साहाय्यता निधीतून १६.८५ कोटी रुपये इतका निधी उपलब्ध करण्यात आला. नंदुरबार येथे १०० एमबीबीएस क्षमतेचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय २०२० साली सुरू. अलिबाग येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व पुणे महानगरपालिकेने भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी १०० एमबीबीएस क्षमतेचे वैद्यकीय महाविद्यालय स्थापना करणेबाबत शासनाच्या मान्यतेने केंद्र शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला.

वैद्यकीय क्षेत्रातील निर्णय

राज्यातील १८ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, ३ दंत महाविद्यालय व ५ शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालयातील निवासी डॉक्टरांच्या सध्याच्या विद्यावेतनात १० हजार रुपयांची वाढ करण्यात आली. १ मे २०२० पासून अंमलबजावणीस सुरुवात करण्यात आली. आरोग्य विज्ञान पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता प्रादेशिक कोटा (७०:३०) आरक्षण पद्धत रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. प्रादेशिक आरक्षण रद्द झाल्याने सर्व भागातील विद्यार्थ्यांना आरोग्य विज्ञान पदवी अभ्यासक्रमासाठी शिक्षणाची समान संधी उपलब्ध होणार. बी.जे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय पुणे व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथे आयसीएमआर पुरस्कृत कोविड-१९ व्हॅक्सिनची क्लिनिकल ट्रायल करण्यास मान्यता देण्यात आली. हाफकिन संस्थेतील बीसीजी लसीची कोविड-१९ रुग्णावर क्लिनिकल ट्रायल ससून रुग्णालय, पुणे येथे सुरुवात करण्यात आली. धुळे येथील भाऊसाहेब हिरे शासकीय महाविद्यालयात पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यात आला. या अभ्यासक्रमाच्या ४६ जागांमध्ये वाढ करण्यात आली. लातूर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे 'विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय विज्ञान संस्था लातूर' असे नामकरण करण्यात आले.

शब्दांकन : वर्षा फडके-आंधळे,
विभागीय संपर्क अधिकारी

विद्यार्थी केंद्रबिंदू मानून उच्च व तंत्र शिक्षण विभागाने विद्यार्थ्यांच्या हितासाठी वर्षभरात अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. कोरोनाच्या संकट काळात विद्यार्थिहितासाठी अंतिम वर्षाच्या परीक्षा न घेण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला होता. मात्र, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार परीक्षेचे नियोजन करून अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांच्या ऑनलाइन, ऑफलाइन, मिश्र पद्धतीने सुरळीतपणे परीक्षा घेण्यात आल्या. या दरम्यान विद्यार्थ्यांच्या आरोग्याची संपूर्ण काळजीही घेतली गेली.

विद्यार्थिहित अग्रस्थानी

उदय सामंत
मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण

अध्यापकांच्या व्यावसायिक क्षमतेची वृद्धी सुधारण्यासाठी आणि प्रशिक्षणासाठी महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्थेची (महाराष्ट्र स्टेट फॅकल्टी डेव्हलपमेंट अॅकेडमी) स्थापना करण्यात आली. या संस्थेसाठी ६० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यात पारंपरिक प्रशिक्षण पद्धतीमध्ये सुधारणा करून शैक्षणिकदृष्ट्या प्रगत देशांमधील व इतर राज्यातील शैक्षणिक पद्धतीचा अभ्यास करून अद्ययावत तंत्रज्ञानाधिष्ठित व रोजगाराभिमुख कौशल्याधारित प्रशिक्षण अध्यापकांना देण्यात येणार आहे.

संतपीठासाठी निधी

संतपरंपरा आणि वारकरी सांप्रदायाचे संस्कार पुढील पिढ्यांना मिळण्याकरिता पैठण येथे संतपीठ सुरू करण्यात येत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठांतर्गत संतपीठ कार्यान्वित करण्यासाठी १ कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात आले आहेत. या संतपीठात पुढील शैक्षणिक वर्षापासून प्रवेश सुरू करण्यात येणार आहेत.

संगीत महाविद्यालय

नव्या पिढीचे गायक, संगीतकार निर्माण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचे देशातले पहिले संगीत महाविद्यालय सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

तसेच केंद्र शासनाच्या सेवांमध्ये मराठी विद्यार्थ्यांचे प्रमाण वाढवण्यासाठी रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग येथे भारतीय प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षण संस्था सुरू करण्यात येत आहेत.

सर जे.जे.कला महाविद्यालय, सर जे.जे.वास्तुविशारद महाविद्यालय व सर जे.जे.उपयोजित कला या तिन्ही महाविद्यालयांचे अभिमत विद्यापीठ करण्यात येत आहे.

आदिवासींना दर्जेदार शिक्षण

गोंडवाना विद्यापीठात डेटा सेंटर उभारणी करण्यात येत आहे. दुर्गम आणि आदिवासी भागामधील विद्यार्थ्यांना दर्जेदार उच्च शिक्षण सहज उपलब्ध व्हावे, यासाठी नवीन सॅटेलाईट केंद्राची निर्मिती करण्यात येत आहे. या शैक्षणिक वर्षापासून या केंद्र मंजुरीसाठी कार्यपद्धती व निकष जाहीर सुद्धा करण्यात आले आहेत.

मुंबई विद्यापीठ हेरिटेज सेंटर

देशातील सर्वात जुने विद्यापीठ असणाऱ्या मुंबई विद्यापीठाला १६३ वर्षांची उज्ज्वल परंपरा लाभली आहे. हावर्ड विद्यापीठ तसेच ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या धर्तीवर मुंबई विद्यापीठाच्या फोर्ट कॅम्पसचा वर्ल्ड क्लास हेरिटेज सेंटर बनवण्याचा आमचा मानस असून, मुंबई विद्यापीठ फोर्ट कॅम्पसचा वारसा संवर्धनासाठी २०० कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

व्यावसायिक अभ्यासक्रम प्रवेश

व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी अधिकाधिक विद्यार्थ्यांना प्रवेश मिळावेत, म्हणून या प्रवेश पात्रतेच्या गुणांमध्ये ५ टक्के सवलत देण्याचा मोठा निर्णय घेण्यात आला आहे. यात आता खुल्या प्रवर्गासाठी ५० टक्क्यांऐवजी ४५ टक्के, मागास प्रवर्ग, आर्थिक दुर्बल घटक व दिव्यांगांसाठी ४० टक्के गुणांची प्रवेश पात्रतेची अट आहे. तसेच आजी माजी सैनिकांच्या पाल्यांना


संग्रहित

व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता ५ टक्के आणि कमाल ५ जागांची अट रद्द करून एकूण प्रवेश क्षमतेच्या ५ टक्के जागा आरक्षित ठेवण्यात आल्या आहेत.

परीक्षेची संधी सर्वांना

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सर्व सुरक्षिततेचे नियम पाळून व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाने विद्यार्थ्यांची ऑनलाइन परीक्षा प्रक्रिया यशस्वी पार पाडली. यामध्ये अतिवृष्टी, पूरपरिस्थिती व कोविडमुळे बाधित विद्यार्थ्यांना पुन्हा परीक्षेची संधी दिली. तसेच अंतिम वर्षाव्यतिरिक्त इतर वर्षाच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या पूर्वीच्या सत्रातील कामगिरी आणि अंतर्गत मूल्यमापनाच्या आधारे प्रवेश देण्यात आला. शिक्षणाचा दर्जा उंचावणे, गुणवत्ता वाढवणे व बळकटीकरण करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मध्ये सुधारणा करण्यासाठी कार्यबल गटाची स्थापना करण्यात आली.

नामफलक मराठीत

कविवर्य वि.वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा २७ फेब्रुवारी, हा जन्मदिन सर्व महाविद्यालयांमध्ये मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा करण्यात आला. तसेच सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, सर्व स्वयं अर्थसाहाय्यित विद्यापीठे, सर्व शासकीय, अशासकीय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित तसेच मॉडेल डिग्री महाविद्यालये, परिसंस्था तसेच तंत्र शिक्षण संचालनालयाच्या व कला संचालनालयाच्या आधिपत्याखालील अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्रनिकेतने व तत्सम शैक्षणिक संस्थांमध्ये लावण्यात येणारे नामफलक मराठी भाषेत लावणे बंधनकारक करण्यात आले आहे.

महाविद्यालयांमध्ये राष्ट्रगीत : राष्ट्रीय भावना जोपासण्यासाठी महाविद्यालये आणि शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थ्यांचे दैनंदिन अध्ययन वर्ग सुरू होण्यापूर्वी आणि महाविद्यालयातील कोणत्याही कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीताने करावी, असे बंधनकारक करण्यात आले आहे.

नवे शैक्षणिक केंद्र : दोहा (कतार) येथे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सहकार्यातून शैक्षणिक केंद्र सुरू करण्यात येत आहे. या संदर्भात कतार शासनाशी सामंजस्य करार करण्यात आला आहे. या केंद्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण उपलब्ध होणार.

परीक्षा केंद्र घराजवळ : कोविडच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व विद्यापीठांमध्ये कोरोना तपासणीसाठी प्रयोगशाळा सुरू करण्यात आल्या. तंत्रशिक्षण, कृषी अभ्यासक्रमांच्या सामायिक प्रवेश परीक्षेसाठीचे केंद्र बदलण्याची मुभा प्रवेश नियमन प्राधिकरणाने दिली. त्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या घराजवळ परीक्षा केंद्र मिळण्यास मदत झाली.

नवे अध्यासन केंद्र : अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातून पुढच्या पिढीला प्रेरणा मिळावी, यासाठी त्यांची साहित्यसंपदा एका ठिकाणी उपलब्ध व्हावी म्हणून लोकशाहीर अण्णा भाऊ साठे अध्यासन केंद्र मुंबई विद्यापीठात सुरू करण्यात आले आहे. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या स्मृतिशताब्दीनिमित्त मुंबई विद्यापीठामध्ये त्यांच्या नावे अध्यासन केंद्र सुरू करण्यात आले आहे.

सीमाभागातील विद्यार्थ्यांसाठी

महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागातील मराठी विद्यार्थ्यांसाठी नवीन शासकीय मराठी महाविद्यालय सुरू करण्यात येणार आहे. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून किमान उपलब्ध मनुष्यबळाच्या आधारे मराठी भाषक विद्यार्थ्यांसाठी काही निवडक अभ्यासक्रम ऑनलाइन सुरू करण्यात येणार आहेत.

चरित्रसाधने प्रकाशन समित्या

छत्रपती शिवाजी महाराज व लोकमान्य टिळक यांचे समग्र साहित्य ग्रंथरूपाने सर्वसामान्यांसमोर आणण्यासाठी दोन स्वतंत्र चरित्रसाधने प्रकाशन समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. छत्रपती शिवाजी महाराज व लोकमान्य टिळक यांची चरित्रे लिहिणाऱ्या अभ्यासकांची समिती गठित करण्यात येणार आहे. त्यांचे समग्र वाङमय प्रसिद्ध करून, मराठी, हिंदी, इंग्रजी आदी भाषांमध्ये भाषांतर करून प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

इतर महत्त्वपूर्ण निर्णय

विद्यापीठातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांना सातवा वेतन आयोग लागू करावा, अशी अनेक दिवसांपासूनची मागणी होती. यामध्ये जी पदे न्यायप्रविष्ट आहेत, ती वगळून उर्वरित पदांना सातवा वेतन आयोग लागू करण्यात आला. तसेच उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अंतर्गत येणारी महाविद्यालये आणि विद्यापीठे यांच्या रिकाम्या जागेवरील अतिक्रमण हटवून ३० वर्षे पूर्ण झालेली महाविद्यालये आणि वसतिगृहे यांच्या इमारतींचे संरचनात्मक लेखा परीक्षण (स्ट्रक्चरल ऑडिट) करण्यात येत आहे.

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे नवीन पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी शिक्षकीय पदे निर्मिती मान्यता देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू मानून त्यांना रोजगाराभिमुख शिक्षण देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण यावरही अभ्यास करण्यासाठी कार्यबल गटाची स्थापना करण्यात आली आहे. या समितीचा अहवाल लवकरच प्राप्त होईल. त्यानंतर विद्यार्थ्यांना अनुकूल असे शैक्षणिक धोरण निश्चित करण्यात येईल. महाराष्ट्र शैक्षणिकदृष्ट्या सुदृढ व्हावा आणि विद्यार्थिहित जोपासले जावे, यासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत.

शब्दांकन : काशीबाई थोरात-धायगुडे,
विभागीय संपर्क अधिकारी

शेतकऱ्यांना चिंतामुक्त करण्याच्या उद्दिष्टपूर्तीसाठी कृषी विभागामार्फत शेतकरी केंद्रबिंदू ठेवून योजना राबवण्यात येत आहेत. शेती आणि शेतकऱ्यांचा शाश्वत विकास याला मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी नेहमीच प्राधान्य दिले आहे. हा त्यांचा जिव्हाळ्याचा विषय आहे. गेल्या वर्षभराच्या काळात शेती क्षेत्राला नव्या विस्ताराच्या दिशा देण्याचे काम सुरू केले आहे.

कृषी विस्तारातून प्रगती

दादाजी भुसे
मंत्री, कृषी

मुख्यमंत्री महोदयांची महत्त्वाकांक्षी असलेली 'विकेल ते पिकेल' ही योजना प्रत्यक्षात आणण्यासाठी कृषी विभाग कामाला लागला आहे. मधल्या काळात जवळपास सात ते आठ महिने कोरोना आणि लॉकडाऊनमुळे काहीसा परिणाम झाला; मात्र एकही दिवस बळीराजा न थांबता जगासाठी शेतात राबत होता आणि राबतोय त्याच्या कष्टाला मोल मिळावे, यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

विकेल ते पिकेल

ज्या पिकांना बाजारपेठ आहे अशी पिके घ्यावीत. ज्यामुळे शेतकऱ्यांना हमखास उत्पन मिळू शकेल. शेतकऱ्यांच्या जीवनातील अनिश्चितता संपून त्यांच्या जीवनात बदल झाला पाहिजे, यासाठी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या संकल्पनेतून 'विकेल ते पिकेल' ही अभिनव योजना साकार झाली. संघटित शेती आणि संघटित शेतकरी ही संकल्पना राबवून जे विकले जाईल तेच पिकवायचे, शेतकऱ्यांना संघटित करताना शेतमालाला बाजारपेठ उपलब्ध व्हावी, यासाठी त्याचे मार्केटिंग करण्यावर भर देण्याचे काम योजनेतून केले जात आहे. जिल्हा व पिकनिहाय १३४५ मूल्यसाखळी विकासाचे प्रकल्प, प्रचलित योजनांची सांगड (Convergence) घालून क्लस्टरनिहाय राबवण्याचे नियोजन या योजनेंतर्गत केले जात आहे.

२१०० कोटी किमतीच्या 'मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पा'च्या माध्यमातून विविध पिकांसाठी सर्वसमावेशक व स्पर्धात्मक मूल्यसाखळ्यांच्या विकासाद्वारे शेतकऱ्यांना थेट शेतमालाचे खरेदीदार, प्रक्रिया उद्योजक, निर्यातदार यांच्याशी जोडण्यात येत आहे.

एकाच अर्जाद्वारे लाभ

मातीत राबणाऱ्या शेतकऱ्याला माहिती तंत्रज्ञानाची जोड देऊन कृषी विभागाच्या विविध योजनांचा लाभ केवळ एकाच ऑनलाइन अर्जावर देणाऱ्या महाडीबीटी पोर्टलचा शुभारंभ मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाला. पात्र आणि गरजू शेतकऱ्यांना या योजनांचा लाभ एकाच अर्जाच्या माध्यमातून घेता यावा यासाठी महा-डीबीटी पोर्टल कार्यान्वित केले. आतापर्यंत सुमारे सात लाख शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे व १४ लाख बाबींसाठी एकूण ६ लाख अर्ज प्राप्त झाले आहेत.

कृषी संजीवनी सप्ताह

या वर्षी १ जुलैला कृषी दिनानिमित्त पिकाची उत्पादकता, गुणवत्ता व शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढ या त्रिसूत्रीवर आधारित कृषी संजीवनी सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. शेती क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्याच्या बांधावर पोहोचवण्यासाठी माझ्यासह कृषी अधिकारी, कर्मचारी, कृषी विद्यापीठातील शास्त्रज्ञ यांनी राज्यातील २३ हजार ५०६ गावांमध्ये जाऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन.

शेतकऱ्यांची रिसोर्स बँक

शेतीत नावीन्यपूर्ण उपक्रम राबवणाऱ्या ५००९ प्रगतिशील शेतकऱ्यांची रिसोर्स बँक तयार केली आहे. शासकीय योजनांमधील शेतकरी प्रशिक्षणासाठी या प्रगतिशील शेतकऱ्यांचा सहभाग नोंदवण्यात येत आहे.

शेतमजुरांना प्रशिक्षण

शेतमजुरांसाठी कौशल्याधारित कामांच्या प्रशिक्षणाचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

सध्याच्या पीक पद्धतीमध्ये औषध फवारणी, फळबागांची छाटणी, बीबीएफद्वारे पेरणी, कापूस वेचणी, सूक्ष्म सिंचनाची देखभाल दुरुस्ती, रोपवाटिकेतील कामे, नियंत्रित शेती, शेतमालाची स्वच्छता व प्रतवारी इ. सर्व कामे ही कौशल्यावर आधारित आहेत. याबाबत शेतमजुरांना कौशल्य आधारित प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

रानभाज्या महोत्सवादरम्यान रानभाज्यांची माहिती घेताना कृषीमंत्री दादाजी भुसे.

अभिनव उपक्रम

राज्यात ३२ हजार ६३८ शेती शाळांचे आयोजन करून सुमारे ८ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना पीक उत्पादन आधुनिक तंत्रज्ञान देण्यात आले. सुमारे ७० शेती शाळांचे आयोजन करून महिला शेतकऱ्यांसाठी देखील मार्गदर्शन करण्यात आले.

तालुकास्तरावर शेतकरी समन्वय समिती व कृषी विभागाच्या कार्यालयामध्ये शेतकरी सन्मान व मार्गदर्शन कक्ष स्थापन करण्याचा अभिनव उपक्रम आम्ही घेतला आहे. तेथे शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकून घेतानाच त्यावर उपाययोजना करण्यास संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश देण्यात आले आहेत. शेतकऱ्यांना कृषी उत्पादन वाढीसाठी प्रोत्साहन देण्यासोबतच त्यांचे प्रश्न समजून घेण्यासाठी 'एक दिवस शेतावर' उपक्रम राबवण्यात आला.

रानभाज्या महोत्सव

राज्यात प्रथमच रानभाज्या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. आदिवासी क्षेत्रातील रानभाज्यांना व्यावसायिक स्वरूप देण्याच्या दृष्टीने रानभाज्या महोत्सवात राज्यभरात सुमारे ९६ प्रकारच्या भाज्यांचे प्रकार नोंदले गेले. सुमारे १४ लाख रुपयांची उलाढाल या महोत्सवाच्या माध्यमातून झाली. त्याचबरोबर राज्यभरात ११९ ठिकाणी रानभाज्या विक्री सुविधा निर्माण केल्या.

रोपवाटिका योजना

महाराष्ट्र फलोत्पादनात अग्रेसर आहे. राज्यातून फळे, भाजीपाला मोठ्या प्रमाणावर निर्यात होत आहे. राज्यात भाजीपाला रोपांची मागणी वाढत असून भाजीपाला लागवडीस प्रोत्साहन देण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर रोपवाटिका योजनेच्या माध्यमातून प्रयत्न केले जात आहेत. प्रायोगिक तत्त्वावर या योजनेंतर्गत पहिल्या टप्प्यात ५०० लाभार्थ्यांची निवड केली जाणार आहे. त्यामध्ये प्रयोगशील शेतकरी, महिला बचतगट, शेतकरी उत्पादक कंपन्या, शेतकरी गट यांना प्राधान्य देण्यात येणार आहे. गावपातळीवर पहिल्यांदाच शेती संदर्भात ग्राम कृषी विकास समितीची स्थापना करण्यात आली आहे. प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये सरपंचांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र ग्राम कृषी विकास समिती स्थापन करण्यात आली आहे.

पीक विमा योजना

पिक विमा योजनेंतर्गत नुकसानग्रस्त ८६.१९ लाख शेतकऱ्यांना एकूण ६२१३ कोटी रुपये विमा रकमेचे वाटप करण्यात आले. त्यामध्ये प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत ८३.७६ लाख शेतकऱ्यांना पिकांच्या नुकसानीपोटी ५४९४ कोटी रुपये, फळ पीक विमा योजनेत २०१९-२० मध्ये २.४३ लाख शेतकऱ्यांना पिकांच्या नुकसानीपोटी ७१९.६८ कोटी रुपये रकमेचे वाटप करण्यात आले. विमा योजनेत पारदर्शकता येण्यासाठी पिक विमा पोर्टल व महा-भूलेख पोर्टलचे संलग्नीकरण करण्यात आले.

शेतकऱ्यांसाठी अपघात योजना

राज्यातील शेतकऱ्यांसाठी राबवण्यात येणाऱ्या स्व. गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेतील प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी विशेष मोहीम राबवण्यात आली. या योजनेंतर्गत सातबारावर नाव असलेला शेतकरी आणि त्याच्या कुटुंबातील एका सदस्याचा समावेश करण्यात आला आहे. योजनेच्या लाभ शेतकऱ्यांना मिळण्यासाठी विमा कंपनी, ब्रोकरेज कंपनी व कृषी विभाग यांनी समन्वयातून कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

एक वर्ष महाराष्ट्र सेवेचे
महाविकास आघाडीचे

कृषी निविष्ठा शेताच्या बांधापर्यंत

कृषी क्षेत्रासाठी खरीप हंगामाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. मात्र यंदा या हंगामाच्या नियोजनास सुरुवात करताना कोरोनाच्या प्रादुर्भावाचा काळ सुरू झाला. राज्यात लॉकडाऊन सुरू झाले. सामाजिक अंतर पाळणे आणि संसर्ग होऊ नये, यासाठी राज्यातील शेतकऱ्यांना खरीप हंगामासाठी बियाणे, खते, कीटकनाशके (कृषी निविष्ठा) त्यांच्या शेताच्या बांधापर्यंत पोहोचवली. शेतकऱ्यांना खते, बियाणे यांचा वेळेवर पुरवठा व्हावा, यासाठी मी सामान्य शेतकरी बनून औरंगाबाद येथील कृषी सेवा केंद्रावर धाड टाकून कारवाई केली. त्यामुळे विक्रेत्यांमध्ये योग्य तो संदेश पोहोचला.

लॉकडाऊन काळात शेतकऱ्यांनी पिकवलेल्या मालाला बाजारपेठ देतानाच नागरिकांनाही भाजीपाला, धान्य, फळे मिळावी, यासाठी कृषी विभागाने नियोजन करून मोठ्या शहरांमधील सोसायट्यांमध्ये थेट शेतमाल विक्रीची आणि ऑनलाइन विक्रीची व्यवस्था केली. विविध योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करून जगाच्या पोशिंद्याला बळ देण्याचे काम सुरू आहे.

शेतकरी ते थेट ग्राहक

शेतकऱ्यांनी पिकवलेली फळे, भाजीपाला थेट ग्राहकांना विकता यावा, यासाठी शेतकरी ते थेट ग्राहक भाजीपाला विक्री स्टॉलच्या उभारणीसाठी प्रोत्साहन दिले जात आहे. त्याला शेतकऱ्यांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. राज्यात नवीन शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन करण्याबरोबरच याअगोदर स्थापन झालेल्या शेतकरी उत्पादक कंपन्यांना तांत्रिक आधार देण्याचा प्रयत्न केला जात आहे. कृषी विभागामार्फत राबवल्या जाणाऱ्या योजनांचे शासन निर्णय, मार्गदर्शक सूचना शेवटच्या घटकापर्यंत व लाभार्थ्यापर्यंत पोहोचण्यासाठी देखील विशेष प्रयत्न केले जात आहेत.

शब्दांकन : अजय जाधव,
विभागीय संपर्क अधिकारी

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली गेल्या एक वर्षाच्या कालावधीत वन विभागाने अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. या निर्णयांची यशस्वीपणे व प्रभावीपणे अंमलबजावणी केली आहे. वने व वन्यजीवांच्या संरक्षणासाठी आणि संवर्धनासाठी वन विभाग कटिबद्ध आहे.

वनसंवर्धन : नवी पावले

संजय राठोड
मंत्री, वने, भूकंप पुनर्वसन

२०१९- २० या वर्षात पर्यायी वनीकरण निधी व्यवस्थापन प्राधिकरण (कॅम्पा) अंतर्गत कामे करण्यासाठी १८९ कोटी रुपयांच्या वार्षिक नियोजन आराखड्यास केंद्र शासनाने मंजुरी दिली होती. विधिमंडळ अधिवेशनात वित्त विभागाने वनविभागास १८९ कोटी रुपये पुरवणी मागण्यांद्वारे मंजूर केले होते. त्यापैकी १५१ कोटी रुपये निधी पर्यायी वनीकरण, अंतर्गत ग्रामीण भागातील वणवा प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करणे, गॅस वाटप करणे तसेच जलसंधारणाची कामे करणे यासाठी प्राधान्याने वापरण्यात आला आहे. २०२०-२१ या वर्षात कॅम्पा अंतर्गत कामे करण्यासाठी ५३४ कोटी रुपयांच्या वार्षिक नियोजन आराखड्यास केंद्र शासनाने मंजुरी दिली होती. यापैकी १०४ कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत.

राखीव वने

मुंबई शहरातील वाढत्या प्रदूषणास आळा घालण्यासाठी तसेच मुंबई उपनगरात उपलब्ध असलेला झाडोरा वनांचे क्षेत्र याचे अधिक सक्षमपणे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी आरे येथील दुग्धव्यवसाय व वन विभागाच्या ताब्यातील शासकीय क्षेत्र राखीव वने म्हणून घोषित करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. मौजे आरे गोरेगाव, व मरोल-मरोशी ता. बोरिवली, जि. मुंबई उपनगर येथील ३२७.१९७ हे आर (८०८ एकर) क्षेत्र भारतीय वन अधिनियम १९२७ च्या कलम ४ अन्वये 'राखीव वने' घोषित करण्याचा निर्णय १२ ऑक्टोबर २०२० रोजीच्या अधिसूचनेन्वये जाहीर करण्यात आला आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी वन विभागातील मौजे कोनाळ, बांबर्डे, घाटीवडे, केंद्रे ब्रु, केंद्रे खुर्द, पाट्ये, शिरंगे, ऐनवडे, हेवाळे व मेंढे ता. दोडामार्ग येथील २९.५३ चौ.कि.मी. क्षेत्रात वन्यप्राणी आणि वनस्पती यांचे विशेष महत्त्व आढळून आल्याने तसेच त्या वनातील वाघ, बिबट, हत्ती व इतर वन्यजीव प्रजातींचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने या क्षेत्राला तिलारी संवर्धन राखीव वन क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले आहे.

वृक्षारोपण करताना वनमंत्री संजय राठोड.

कांदळवन क्षेत्र राखीव

पर्यावरणाच्या दृष्टीने कांदळवनांचे महत्त्व लक्षात घेऊन शासकीय जमिनीवरील १०२०.३३ हेक्टर कांदळवन क्षेत्र भारतीय वन अधिनियम १९२७ च्या कलम २९ अन्वये अंतिमत: राखीव वन म्हणून घोषित करण्यात आले आहे.

सफेद चिप्पी राज्य कांदळवन वृक्ष

कांदळवन हे सागरी किनारपट्टीचे रक्षण तर करतातच; परंतु यात संपन्न जैवविविधता दडलेली आहे. पर्यावरण रक्षणातील कांदळवनांचे हेच महत्त्व लक्षात घेऊन सफेद चिप्पी या कांदळवन वृक्षाच्या प्रजातीला राज्य कांदळवन वृक्ष म्हणून दर्जा देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. राज्य कांदळवन वृक्ष घोषित करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिलेच राज्य ठरले आहे.

आंग्रिया बँक क्षेत्र समुद्रीय परिसंस्थेच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे आहे. या क्षेत्राला कायदेशीर संरक्षण उपलब्ध होण्यासाठी मेरिटाईम झोन ॲक्ट १९७६ च्या अंतर्गत संबोधित क्षेत्र घोषित करण्यासाठी राज्य वन्यजीव मंडळाने मान्यता दिली असून तशी शिफारस महाराष्ट्र शासनामार्फत पर्यावरण, वने आणि वातावरणीय बदल मंत्रालय, भारत सरकार यांच्याकडे केली आहे. हे क्षेत्र संबोधित क्षेत्र घोषित झाल्यास देशातील अशा प्रकारचे हे पहिलेच क्षेत्र असेल.

व्याघ्र संवर्धन

सह्याद्री व्याघ्र प्रकल्पामध्ये कुरण विकास, मेळघाट व्याघ्र प्रकल्पामध्ये स्पायडर संग्रहालय, ताडोबा व्याघ्र प्रकल्पामध्ये यु-ट्यूबवरील ऑनलाइन सफारीला व्यापक प्रसिद्धी तर पेंच व्याघ्र प्रकल्पामध्ये विद्यार्थी पर्यटनवाढीला प्राधान्य देण्यात येत आहे.

महत्त्वाचे निर्णय

● मानव व बिबट्या सहसंबंध अधिक समजून घेण्यासाठी वन विभाग व वाईल्ड लाईफ कंझर्व्हेशन सोसायटी इंडिया संयुक्तपणे अभ्यास करणार आहे. ● नगर वन उद्यान योजना व शाळा रोपवाटिका योजना राज्यात नावीन्यपूर्ण व विस्तारित स्वरूपात राबवण्यात येईल.नगर वन उद्यान योजनेसाठी राज्यातील ११ शहरांचे प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठवण्यात आले आहेत. ● माळढोक आणि तणमोर या दुर्मीळ पक्षांचे अधिवास विकासासाठी नानज (सोलापूर), वरोरा (चंद्रपूर) व अकोला वन विभागासाठी ६३ लाख रुपयांचा पहिला हप्ता वितरित करण्यात आला. ● बावधन (पुणे) येथे २२ एकर क्षेत्रावर वन्यप्राणी उपचार केंद्र स्थापित करण्यात येत आहे. या केंद्रासाठी ३ कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात आला. या उपचार केंद्रामुळे पुणे व परिसरातील वन्यजीव यांना तत्काळ उपचार सुविधा मिळेल. ● भीमाशंकर व राधानगरी अभयारण्य 'पर्यावरण संवेदनशील क्षेत्र' म्हणून घोषित करण्यात आले आहे. याबाबतची अंतिम अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे. ● राज्यातील आंतरराष्ट्रीय महत्त्व असलेले लोणार सरोवर आता राज्यातील दुसरे, तर देशातील ४१वे रामसर पाणथळ क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले आहे. ● पर्यावरण आणि पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे यांच्या पुढाकाराने वन विभागाचे ७ पर्यटन संकूल महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडे देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला.या माध्यमातून वन विभाग व पर्यटन विभाग यांच्या समन्वयातून पर्यटकांना सुंदर पॅकेजच्या स्वरूपात वन व निसर्ग पर्यटन करता येईल. ● कोविड या आजारावर लस विकसित करण्याचे प्रयत्न केले जात आहेत. चाचणीसाठी पुण्यातील राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्थेला माकडांची आवश्यकता होती. ते वन विभागाने उपलब्ध करून दिली.

संजय गांधी राष्ट्रीय उद्यान

मुंबईतील बोरिवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यान हे जैविक विविधतेच्या दृष्टीने अत्यंत समृद्ध आहे. या उद्यानाच्या विकासासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचा प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमण्यात येणार आहे.

हरित महाराष्ट्र अभियान

वृक्षांचे आपल्या जीवनात अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यांची लागवड वाढावी म्हणून हरित महाराष्ट्र अभियान व वन महोत्सवाचे १५ जून ते ३० सप्टेंबर या कालावधीत यशस्वी आयोजन करण्यात आले. या काळात राज्यात मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करण्यात आली.

अवनत वनक्षेत्राचे पुनर्वनीकरण

राज्यात वन विभाग, औद्योगिक संस्था व अशासकीय संस्था यांच्या त्रिपक्षीय करारनाम्याद्वारे अवनत वनक्षेत्राचे पुनर्वनीकरण करण्याची योजना राबवण्यात येत आहे. या अनुषंगाने या वर्षी तीन संस्थांसोबत करार करण्यात आले आहेत.

ट्रान्झिट ट्रीटमेंट सेंटर

नागपूर वनविभागाचे सेमिनरी हिल स्थित ट्रान्झिट ट्रीटमेंट सेंटरच्या धर्तीवर राज्यात अकरा वन वृत्तात किमान एक प्राणी बचाव पथक व तात्पुरते प्राणी उपचार केंद्र सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

जैविक वारसा क्षेत्र

जैविक विविधता अधिनियम २००२ व त्या अंतर्गत जैविक विविधता नियम २००८ चे कलम ३७ व नियम २२ नुसार गणेश खिंड गार्डन, पुणे येथील ३३.०१ हेक्टर क्षेत्र व लांडोरखोरी, जळगाव येथील ४८.०८ हेक्टर क्षेत्र जैविक वारसा क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले आहे.

वन व निसर्ग पर्यटन

गुगामल वन विभागात निसर्ग प्रेमी पर्यटकांसाठी सायकल बुकिंग केंद्र सुरू करण्यात आले आहे. अमझरी निसर्ग पर्यटन संकुल परिसरात होम स्टे प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला आहे.

एक वर्ष महाराष्ट्र सेवेचे महाविकास आघाडीचे

वाघांचे संवर्धन, स्थानांतरण

चंद्रपूर जिल्ह्यातील वाघांचे सुयोग्य अधिवासात संवर्धन व स्थानांतरणाबाबत विविध पर्याय तपासणे व उपाययोजना सुचवणे, यासाठी अभ्यास गटाची स्थापना करण्यात आली आहे.

पक्षी सप्ताह

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या निर्देशानुसार आता दरवर्षी ५ ते १२ नोव्हेंबर या कालावधीत पक्षी सप्ताह साजरा करण्यात येणार आहे. या सप्ताहामुळे पक्षी संरक्षण, संवर्धन, पक्षांच्या विविध जाती, पक्षांचे स्थलांतर व पक्षांचे महत्त्व याबाबत निश्चितच नागरिकांमध्ये जागृती होण्यास मदत होईल.

कांदळवन संवर्धन

कांदळवन प्रतिष्ठानमार्फत विविध संस्थांच्या संशोधन प्रकल्पास अनुदान मंजूर केले. यात डॉल्फिन व व्हेल अभ्यास (१६ लक्ष), सागरी कासवांचा अभ्यास (१० लक्ष), गोबीड मासे अभ्यास (१२ लक्ष) पाणमांजर व मगरींचा अभ्यास (६ लक्ष) निधी मंजूर केला आहे. सामाजिक उत्तरदायित्व निधीतून आम्ही कांदळवन लागवड वाढवत आहोत: १० हेक्टर लागवडचा करारनामा 'युनायटेड वे मुंबई' यांच्यासोबत केला आहे. कांदळवन संरक्षणासाठी ११७ सुरक्षा रक्षक आहेत. त्यात वाढ करून १८३ करण्याचा निर्णय घेण्यात आला. भांडुप येथील कांदळवन क्षेत्र पक्षी निरीक्षणासाठी विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

शब्दांकन : देवेंद्र पाटील,
विभागीय संपर्क अधिकारी

अन्न, वस्त्र व निवारा या मानवाच्या आवश्यक गरजा म्हणून गणल्या जात असल्या, तरी यापुढे याला शुद्ध पाणी व स्वच्छता या दोन घटकांची जोड देणे आवश्यक राहील. ही पंचसूत्री कोरोना काळात व त्यानंतरच्या जगात तारणहार ठरणार आहे. सध्या स्वच्छतेला अतिशय महत्त्व आले आहे. गेल्या वर्षभरात पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने अनेक महत्त्वाचे निर्णय घेऊन त्याची यशस्वीपणे अंमलबजावणी केली आहे.

गावांना शुद्ध पाणी

गुलाबराव पाटील
मंत्री, पाणीपुरवठा व स्वच्छता

केंद्र शासन पुरस्कृत 'जल जीवन मिशन' राज्यात राबवण्यास शासनाने मान्यता दिली आहे. यानुसार राज्यातील ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला २०२४ पर्यंत, वैयक्तिक नळ जोडणीद्वारे दरडोई ५५ लीटर प्रतिदिन गुणवत्तापूर्ण पाण्याचा पुरवठा करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. राज्यात जलजीवन मिशनची अंमलबजावणी करण्यासाठी १३ हजार ६६८ कोटी ५० लाख रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. योजनेत केंद्र आणि राज्य शासनाचा ५०:५० असा हिस्सा आहे. राज्यातील ग्रामीण भागातील प्रत्येक घराला नळ जोडणीद्वारे पाणीपुरवठा करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

अटल भूजल योजना

भूजल पातळी वाढवण्यासाठी केंद्र शासन पुरस्कृत अटल भूजल योजनेची (अटल जल) राज्यात अंमलबजावणी करण्यात येणार आहे. केंद्र शासन व जागतिक बँक यांच्या संयुक्त विद्यमाने भारतात महाराष्ट्रासह गुजरात, कर्नाटक, हरियाणा, मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश, राजस्थान या सात राज्यांमध्ये ही योजना राबवली जाईल. योजनेसाठी केंद्र शासनाकडून ६ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात येणार असून, यात महाराष्ट्रासाठी ९२५.७७ कोटी रुपयांच्या अनुदानाची तरतूद केलेली आहे. योजनेत राज्यातील अतिशोषित, शोषित आणि अंशत: शोषित पाणलोट क्षेत्रातील १३ जिल्ह्यांच्या ३८ तालुक्यांमधील १३३९ ग्रामपंचायती आणि १४४३ गावांची निवड करण्यात आली आहे.

घसरणाऱ्या भूजल पातळीला आळा घालून, भूजल पुनर्भरणाच्या उपाययोजनांद्वारे तसेच जल संधारण व कृषी विभागाकडील सूक्ष्म सिंचनाच्या उपाय योजनांद्वारे भूजल पातळीमध्ये सुधारणा करणे हा या योजनेचा मुख्य हेतू आहे.

महाराष्ट्राकरिता या योजनेंतर्गत केंद्र शासन व जागतिक बँक यांच्याकडून अधिकतम एकूण ९२५.७७ कोटी रुपये एवढे अनुदान पाच वर्षांमध्ये उपलब्ध होणार आहे. यामध्ये १८८.२६ कोटी रुपये हे संस्थात्मक बळकटीकरण व क्षमता बांधणी या घटकांसाठी आहेत. तर अधिकतम ७३७.५१ कोटी रुपये विविध विभागांमार्फत केल्या जाणाऱ्या उपाययोजनांच्या पूर्ततेअंती प्रोत्साहन अनुदान स्वरूपात मिळणार आहेत.

राज्यातील अतिशोषित, शोषित आणि अंशत: शोषित पाणलोटक्षेत्रांना प्राधान्य देऊन ७३ पाणलोट क्षेत्रातील १४४३ गावांमधून हा प्रकल्प राबवण्यात येणार आहे. तथापि, पाच वर्षांकरिता योजनेत समाविष्ट विभागांसाठी आवश्यकतेप्रमाणे एकूण ३६८.६३ कोटी रुपयांची तरतूद राज्य शासनामार्फत करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत मंजुरी देण्यात आलेल्या, प्रगतिपथावरील तसेच अपूर्ण पाणीपुरवठा योजनांची कामे पूर्ण करण्यासाठी योजनेस दोन वर्षे (२०२१-२२) मुदतवाढ देण्यात आली आहे. यासाठी ४३० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

शौचालय बांधकाम

वैयक्तिक शौचालय बांधकाम योजनेंतर्गत नोव्हेंबर २०१९ नंतर ३ लाख ३९ हजार ४७२ कुटुंबांना शौचालय उपलब्ध करून देण्यात आले आहे. त्यापैकी ३ लाख ३० हजार ६०४ कुटुंबांचे अनुदान वितरित झाले आहे. एकही कुटुंब शौचालय बांधकामातून सुटू नये, यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. राज्यात स्वच्छ भारत मिशन कार्यक्रमांतर्गत उरलेल्या कुटुंबांना वैयक्तिक शौचालय बांधून देण्याचा निर्णय घेतला आहे.

पाणीपुरवठा योजना मंजुरी

गेल्या वर्षभरात २०४६ ग्रामीण पाणीपुरवठा योजना रक्कम २०२३.७७ कोटी रुपयांस मंजुरी देण्यात आली आहे. ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील ९७ आदिवासी गावे व २७९ पाड्यांसाठी २७६.२२ कोटी रुपयांच्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेस मंजुरी देण्यात आली.

कोल्हापूर जिल्ह्यातील कसबा सांगाव ग्रामीण पाणीपुरवठा योजनेच्या १२ कोटी रुपयाच्या योजनांना मंजुरी देण्यात आली. अमरावती जिल्ह्यातील १५६ गावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजना बळकटीकरणासाठी (रक्कम ३.७७ कोटी रुपये) मंजूर करण्यात आले. सातारा जिल्ह्यातील उंडाळे १७ गावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजना पुनरुज्जीवनासाठी ६.१६ कोटी रुपये मंजूर करण्यात आले.

कोविड काळातील दिलासा

कोरोनाचा यशस्वी प्रतिकार करण्यासाठी पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या माध्यमातून कोरोनाच्या प्रतिकारासाठी भरीव निधीची तरतूद केलेली आहे. यापुढील काळातही ती केली जाईल. यामुळे आव्हान कठीण असले तरी कोरोना कालावधीत व पश्चात आपण सर्वांच्या प्रयत्नांनी येणाऱ्या प्रत्येक संकटावर मात करू, असा मला विश्वास वाटतो.

स्वच्छाग्रहींच्या नियुक्तीस मुदतवाढ

कोविड -१९ या रोगाचा प्रसार आणि त्याचा स्वच्छतेशी असणारा संबंध या बाबी लक्षात घेऊन पाणीपुरवठा विभागाने स्वच्छाग्रहींच्या नियुक्तीला एक वर्षाची (३१मार्च २०२१ पर्यंत) मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला व त्यांच्या कामाची कार्यपद्धती नव्याने निश्चित करण्यात आली आहे.

स्वच्छतेचा जागर

हे स्वच्छाग्रही ग्रामस्थांशी संवाद साधत असून त्यांना हाताची स्वच्छता राखणे, खोकताना आणि शिंकताना घ्यावयाची काळजी, कुठेही थुंकण्याच्या सवयी, मास्कचा वापर, निर्जंतुकीकरण, सामाजिक अंतर या विषयांची माहिती देत आहेत. स्वच्छतेबाबत चांगले काम करणाऱ्या स्वच्छाग्रही यांना प्रोत्साहनपर भत्ता देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

साधनसामग्री खरेदीसाठी दहा लाख

कोविड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्याच्या ग्रामीण भागातील स्वच्छता कर्मचाऱ्यांमार्फत ग्रामपंचायत स्तरावर स्वच्छतेची कामे सुरू आहेत. या स्वच्छाग्रहींच्या सुरक्षिततेसाठी हॅण्ड ग्लोव्हज, सॅनिटायझर तसेच मास्क खरेदीसाठी कोविड-१९चा प्रादुर्भाव असलेल्या राज्यातील २७ जिल्ह्यांना प्रत्येकी दहा लाख याप्रमाणे एकूण २ कोटी ७० लाख रुपयांचा निधी 'जागतिक बँक प्रोत्साहन अनुदान' अंतर्गत देण्यात आला.

प्रत्येक जिल्ह्यासाठी स्वतंत्र निधी

भारत सरकारच्या जलशक्ती मंत्रालयाने दिलेल्या सूचनेनुसार कोविड -१९ विषाणूचा प्रादुर्भाव झालेल्या राज्यातील ग्रामीण भागात विशेष काळजी घेण्यात येत असून मुबलक व स्वच्छ पाणीपुरवठ्यासाठी युद्ध पातळीवर उपाययोजना करण्यात आल्या आहेत. ग्रामपंचायतस्तरावर त्याची कार्यवाही सुरू आहे. त्यासाठी प्रत्येक जिल्ह्याला दहा लाख रुपयांचा अतिरिक्त निधी देण्यात आला आहे.

कोविड-१९ विषाणूंच्या प्रादुर्भावादरम्यान सर्वांना विशेषतः विलगीकरण केंद्रे, रुग्णालये, दलित वस्ती, झोपडपट्टी, वृद्धाश्रम इत्यादींना मुबलक व स्वच्छ पाणीपुरवठा कसा होईल, यादृष्टीने विशेष खबरदारी घेण्यात येत असून, त्या दृष्टीने तातडीच्या उपाययोजना करण्यात येत आहेत.

पाणी शुद्धीकरणासाठी आवश्यक रसायनांचा (ब्लिचिंग पावडर, सोडियम क्लोराइड, क्लोरिन टॅबलेट्स) वापर केल्यानंतरच पाणीपुरवठा करण्यात यावा; तसेच ठराविक कालावधीनंतर पाणी गुणवत्ता तपासणी करण्यात यावी, त्यासाठी आवश्यक प्रमाणात रसायने तसेच जैविक पाणी गुणवत्ता चाचणी संच यांचा मुबलक पुरवठा असेल, याची खात्री करावी. या प्रक्रियेत अडथळा येणार नाही, या दृष्टीने आवश्यकतेप्रमाणे रसायने तसेच पाणी गुणवत्ता चाचणी संचाची खरेदी करण्यात यावी, अशाही सूचना देण्यात आल्या. त्यासाठी प्रत्येक जिल्ह्याला दहा लाख रुपयांचा अतिरिक्त निधी देण्यात आला.

एक वर्ष महाराष्ट्र सेवेचे महाविकास आघाडीचे

कर्मचाऱ्यांना प्रोत्साहनपर भत्ता

राज्यातील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील पाणीपुरवठा केंद्रावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना प्रोत्साहनपर भत्ता व २५ लाख रुपयांचे विमा संरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील पाणीपुरवठा केंद्रावर कार्यालयात असणारे व अत्यावश्यक सेवेमध्ये समाविष्ट असणारे व गट-क आणि गट-ड मधील नियमित कर्मचारी, रूपांतरित आस्थापनेवरील कर्मचारी तसेच प्राधिकरणांतर्गत जे कर्मचारी अद्यापही कार्यरत आहेत, असे कंत्राटी कर्मचारी अशा सर्वांना ९० दिवसांच्या कालावधीकरिता प्रत्येकी १ हजार रुपये इतका प्रोत्साहनपर भत्ता देण्यात येणार असून, २५ लाख रुपयांचे विमा संरक्षणही देण्यात येणार आहे. राज्यातील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील पाणीपुरवठा केंद्रावरील सुमारे २ हजार ८०० कर्मचाऱ्यांना याचा प्रत्यक्ष लाभ होणार आहे.

स्वच्छतेचे पुरस्कार

सामुदायिक शौचालय अभियानांतर्गत राज्याला देशात दुसरा क्रमांक मिळाला. गंदगीमुक्त अभियानात श्रमदान प्रकारात राज्याला तिसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार मिळाला. सामुदायिक शौचालय अभियानांतर्गत जळगाव जिल्ह्याला देशातील तिसऱ्या क्रमांकाचा, तर भंडारा जिल्ह्यातील २ ग्रामपंचायतींना द्वितीय आणि तृतीय क्रमांक प्राप्त झाला. जागतिक शौचालय दिनानिमित्त झालेल्या केंद्रस्तरीय कार्यक्रमांमध्ये महाराष्ट्रातील कोल्हापूर आणि नाशिक या जिल्ह्यांना राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार प्रदान करण्यात आला.

शब्दांकन : देवेंद्र पाटील,
विभागीय संपर्क अधिकारी

आदिवासी जमातीने इतर समाजाबरोबर काय प्रगती केली पाहिजे, यावर विचारमंथन होणे आवश्यक आहे. इतर प्रवाहाबरोबर जात असताना या आदिम समाजातील चांगल्या प्रथा आहेत, त्या जिवंत ठेवल्या पाहिजे. त्यासाठी राज्य शासनाच्या आदिवासी विभागामार्फत प्रयत्न केले जात आहेत. गेल्या वर्षभरात घेतलेले निर्णय असोत किंवा पुढील काळात घेण्यात येणारे निर्णय, या प्रत्येकाचा उद्देश हा आदिवासी समाजाचा विकास हाच एकमेव आहे.

आदिवासींचा समग्र विकास

ॲड. के.सी. पाडवी
मंत्री, आदिवासी विकास

आदिवासी समाजात सिकलसेल व कुपोषण हे प्रश्न आहेत. हे सामाजिक प्रश्न कमी करण्यासाठी राज्य शासन प्रयत्न करत आहे. त्याचबरोबर समाजानेही पुढाकार घेण्याची आवश्यक आहे. सातपुडा, मेळघाटमधील धारणी अशा ठिकाणी मोठ्या प्रमाणात कुपोषण आहे. ते कमी करण्यासाठी भगर, मोहाची फुले हे पौष्टिक पदार्थ उपयुक्त आहेत. हे पदार्थ दिले तर कुपोषण थांबवता येईल. लग्न लवकर होणे, मुलांमधील अंतर कमी असणे असे सामाजिक प्रश्न आहेत. त्यासाठी कायदेशीर उपाय योजना राबवणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने पुढील काळात महत्त्वाचे निर्णय घेण्यात येणार आहेत.

न्यूक्लियस बजेट

कोविड संसर्गाचा फटका जगाबरोबर राज्यातील आदिवासी भागालाही बसला होता. लॉकडाऊन झाल्यामुळे आदिवासी मजूर राज्यातील विविध भागासह इतर राज्यातही अडकले होते. त्या आदिवासी मजुरांना त्यांच्या मूळ गावी आणण्यासाठी तातडीने निर्णय घेतला. त्यासाठी न्यूक्लियस बजेट मधून खर्च करण्याचे ठरवले. या काळात हजारो आदिवासी मजुरांना मूळ गावी आणण्यात आले. यासाठी प्रकल्पस्तरावर नियोजन करण्यात आले होते. या मजुरांची ने-आण करण्यासाठी आर्थिक मर्यादेची अट शिथिल करण्याचा निर्णय घेतला. तसेच हा खर्च न्यूक्लियस बजेटअंतर्गत करण्यास मान्यता दिली.

खावटी अनुदान योजना

कोरोनाच्या आपत्कालीन परिस्थितीमुळे आदिवासी समाजातील मजुरांचा, आदिवासी कुटुबांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला होता. त्यांच्यासाठी राज्यात पहिल्यांदाच खावटी अनुदान योजना राबवण्याचा निर्णय घेतला. या निर्णयामुळे रोजगारापासून वंचित राहिलेल्या आदिवासी, पारधी, कमकुवत घटकातील आदिम जमातीच्या कुटुंबांना प्रतिकुटुंब ४ हजार रुपये अनुदान देण्यात येणार आहे. त्यामध्ये २ हजार रुपये रोख लाभार्थ्यांच्या बँक खात्यात, तर उर्वरित दोन हजार रुपयांचा जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करण्यात येणार आहे. राज्यातील ११.५५ लाख आदिवासी लाभार्थ्यांना या योजनेचा फायदा होणार आहे.

घरपोच पोषण आहार

लॉकडाऊनमुळे सर्वच व्यवहार ठप्प पडले होते. अशा वेळेस आदिवासी, पारधी समाजातील स्तनदा माता, गरोदर स्त्रिया व ७ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजनेंतर्गत पोषण आहार देण्यातही खंड पडण्याची भीती होती.

शाळा, अंगणवाडी बंद असल्यामुळे शिजवलेले पौष्टिक आहार लाभार्थ्यांना देणे कठीण झाले होते. त्यावर उपाय म्हणून शिजवलेला गरम आहार घरपोच देण्यात आला. तसेच ज्या ठिकाणी घरपोच शिजवलेले आहार पोहोचवणे शक्य नव्हते, त्या ठिकाणी एक महिना पुरेल इतक्या अन्नघटकाच्या पाकिटांचे वाटप करण्यात आले. तसेच बालकांना अंडी, केळी घरपोच देण्यात आली. तसेच ज्या ठिकाणी दोन्ही शक्य नाही, अशा ठिकाणी लाभार्थ्यांना एक महिन्याच्या आहाराची रक्कम लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आली. या योजनेंतर्गत सुमारे १ लाख २७ हजार ४६५ गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना एक वेळचे चौरस आहार तसेच ६ लाख ९६ हजार १६२ बालकांना अंडी/केळ्यांचे वाटप करण्यात आले.

प्रमाणपत्र काढण्याचा खर्च

अनेक आदिवासी कुटुंबांकडे रेशन

संग्रहित

कार्ड नव्हते. अशा कुटुंबांना रेशनकार्ड काढून देण्यासाठी आदिवासी विकास विभागाने खर्च करण्याचा निर्णय घेतला. यंत्रणेला कामाला लावून हे काम सुरू आहे. त्याच प्रमाणे अनेक आदिवासी तरुणांना जात पडताळणी प्रमाणपत्र काढण्यासाठी पैसा उपलब्ध नसतो. त्यांची ही अडचण जाणून त्यांचे जात पडताळणी प्रमाणपत्र काढण्यासाठी येणारा खर्च विभागामार्फत करण्याचा निर्णय घेतला आहे.

अनलॉक लर्निंग

आदिवासी विभागाकडे सुमारे पाच लाख विद्यार्थी आहेत. कोविड काळात त्यांच्या शिक्षणात खंड पडू नये, यासाठी आम्ही विशेष प्रयत्न केले. यासाठी 'अनलॉक लर्निंग' हा उपक्रम सुरू करण्यात आला. शासकीय आश्रम शाळा, अनुदानित आश्रमशाळा, एकलव्य निवासी शाळा, खासगी नामांकित शाळांमध्ये शिकणाऱ्या मात्र लॉकडाऊनमुळे आदिवासी दुर्गम भागात राहणाऱ्या विद्यार्थ्यांपर्यंत ऑनलाइन शिक्षण पोहोचवण्यासाठी स्मार्ट फोन व इंटरनेटची सुविधा पोहोचवणे काही वेळेस शक्य नव्हते. त्यामुळे शिक्षणाच्या मूलभूत संकल्पना अमलात आणण्यासाठी नियोजन आराखडा तयार करण्यात आला. यासाठी ११ उपसमित्यांची स्थापना करण्यात आली. या उपक्रमासाठी इयत्तानिहाय कार्यपुस्तिका व कृतिपुस्तिका तयार करण्यात आली. या पुस्तिका व इतर आवश्यक शैक्षणिक साहित्याचे किट तयार करून ते वाड्यापाड्यांतील विद्यार्थ्यांच्या घरापर्यंत पोहोचवण्यात येत आहे. फक्त साहित्य पोहोचवून न थांबता विद्यार्थी या साहित्याचा वापर करून अभ्यास करतो की नाही, याचाही आढावा शिक्षकांमार्फत घेण्यात येत आहे. या उपक्रमाचा लाभ सुमारे ४ लाख ७६ हजार विद्यार्थ्यांना होत आहे. तसेच ज्या ठिकाणी ऑनलाइन शिक्षण पोहोचले नाही, तसेच शिक्षकही पोहोचू शकले नाहीत, तेथील विद्यार्थ्यांचा विचार करून एक वेगळा उपक्रम सुरू करण्यात आला.

आरोग्य तपासणी

आदिवासी भागात कोविड संसर्गाचा प्रादुर्भाव कमी होण्यासाठी मोठ्या प्रमाणात जागृती आली होती. त्याचबरोबर दुर्गम भागातील रुग्णवाहिकांचा उपयोग आदिवासी विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यासाठी केला जात होता. त्याचबरोबर दुर्गम भागातील आदिवासी बांधवांच्या आरोग्य तपासणी व इतर सुविधांसाठीही रुग्णवाहिकेचा वापर करण्यात आला. त्याचबरोबर दुर्गम भागातील जनतेचे आरोग्य सुधारण्यासाठी विशेष वैद्यकीय कक्ष निर्माण करणार आहोत.

उद्योगपूरक योजना

आदिवासी समाजात कॅश इकॉनॉमी कधीच नव्हती. त्यामुळे या जमातीला अशा आर्थिक व उद्योगविषयक सर्व गोष्टींचे प्रशिक्षण देण्याची गरज आहे. आदिवासी जमातीमध्ये उद्योग करणारा वर्ग तयार करण्याची आवश्यकता आहे. आदिवासी भागात असलेल्या मोहाची फुले, चारोळी, आमचूर आदींचा उद्योग सुरू केला, तर रोजगार मिळेल. यासाठी योजना करण्याचा विचार सुरू आहे. या जमातीला विकास प्रक्रियेत आणण्यासाठी व स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी उद्योगात पुढे आणणे आवश्यक ठरणार आहे.

आदिवासी जमातीला वनाच्या सान्निध्यामुळे शेळी पालनातून चांगल्या उत्पन्नाचे स्रोत निर्माण होऊ शकणार आहे. हे जाणून ठाणे व रायगड जिल्ह्यातील ईएजीएल संस्थेमार्फत शेळी पालन उपक्रम राबवण्यात येत आहे. यामध्ये आदिम जमातीतील १४३० कातकरी लाभार्थ्यांना शेळी पालनासाठी साहाय्य करण्यात येणार आहे. शबरी महामंडळाच्या माध्यमातून

गडचिरोली, गोंदिया भागात तांदूळ, मोहाची फुले, चारोळी आदी वस्तू साठवण्यासाठी गोदामे बांधण्याचा निर्णय घेतला आहे. पारंपरिक देशी बियाणांच्या साठवणुकीसाठी प्रोत्साहन देण्यात येत आहे.

वनधन विकास योजना

राज्यात सध्या ६४ वनधन केंद्रे सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे. मात्र आम्ही ५०० वनधन केंद्रे उभारण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या वनधन केंद्राच्या माध्यमातून आदिवासी भागातील आमचूर, मोह फुले, चारोळी आदी वस्तू खरेदी करण्यात येणार आहेत. वनधन विकास योजनेतून २० लाभार्थ्यांचा एक स्वयंसाहाय्यता गट अशा प्रकारे ३०० लाभार्थ्यांचा एक वनधन केंद्र स्थापन करण्यात येणार आहे. केंद्र शासनाने ही योजना २०१८ मध्ये जाहीर केली असली, तरी राज्यात जानेवारी २०२० पासून त्याची अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे.

आदिवासी भागातील जनतेला स्वतःचे पक्के घर असावे, यासाठी शबरी घरकूल योजना सुरू आहे. मात्र, या योजनेत आदिवासी समाजातील दिव्यांग लाभार्थ्यांना प्राधान्य मिळावे, यासाठी या योजनेत ५ टक्के आरक्षण दिव्यांग लाभार्थ्यांसाठी ठेवण्यात आले आहे. त्याचबरोबर आदिवासींचे वनहक्काचे दावे प्रलंबित आहेत. हे दावे लवकरात लवकर निकाली काढण्यासाठीच्या मोहिमेला वेग देण्यात येत आहे.

आदिवासी बांधवांचे पारंपरिक व्यवसाय व शेती यांना चालना दिली तर दुर्गम भागात राहणारा हा समाज प्रगती करेल. हे जाणूनच पुढील काळात तशा प्रकारे आदिवासी विभागामार्फत योजना सुरू करण्याचा विचार आहे.

शब्दांकन : नंदकुमार वाघमारे,
विभागीय संपर्क अधिकारी

अकुशल कामगारांना विविध योजनांच्या माध्यमातून रोजगार उपलब्ध करून देत कायमस्वरूपी मत्ता निर्मिती व ग्रामीण जनतेचे राहणीमान उंचावण्यावर वर्षभरात भर देण्यात आला. त्यासाठी रोजगाराचे अनेक पर्याय उपलब्ध करून देण्यात आले. त्याचबरोबर नियंत्रित वातावरणामध्ये कीड व रोगमुक्त भाजीपाला रोपांच्या निर्मितीसाठी पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर रोपवाटिका योजना राबवली जात आहे. या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना प्रत्यक्ष रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहेत.

प्रत्येक हाताला काम

संदिपानराव भुमरे
मंत्री, रोजगार हमी, फलोत्पादन

अकुशल रोजगाराची पूर्तता, दीर्घकालीन टिकणारी कामे व त्याद्वारे सामाजिक पायाभूत सोयी उपलब्ध करून देऊन ग्रामीण जनतेचे राहणीमान उंचावेल व कायमस्वरूपी मालमत्ता तयार होईल, अशा प्रकारे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत अंमलबजावणी करण्यासाठी सातत्याने प्रयत्न होत आहेत. भविष्यातही नवनवीन उपक्रम राबवण्याचा आमचा प्रयत्न आहे.

स्थानिक पातळीवर रोजगार

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये ग्रामीण भागात जो अकुशल मजूर कामाच्या शोधात आहे, अशा मजुरास स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध करून देण्यात येणार आहे. रोजगार उपलब्ध करून देताना त्यातून शाश्वत व उत्पादक स्वरूपाची मत्ता निर्माण करणेदेखील अपेक्षित आहे. या अनुषंगाने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी करताना नियोजन व लेबर बजेट तयार करण्यास अनन्यसाधारण महत्त्व दिले आहे.

गावपातळीवर ग्रामपंचायतमध्ये किती मजुरांना कामाची आवश्यकता आहे, किती दिवस कामाची आवश्यकता आहे व अशा मजुरांना मागणीनुसार रोजगार उपलब्ध करून देताना त्यातून कोणत्या मत्ता निर्माण करता येतील, या बाबींचे सूक्ष्म नियोजन करणे अनिवार्य आहे.

रोजगार निर्मितीचे पर्याय

रोजगार निर्मिती करताना कंपार्टमेंट बंडिंग, चेक डॅम, कंटूर बंडिंग, गॅबियन बंधारे, गली एग, भूमिगत बंधारे, शेततळे, वैयक्तिक लाभाच्या सिंचन विहिरी, सामूहिक विहिरी, रेशीम लागवड, फळबाग लागवड, नर्सरी, कंपोस्ट पीट, व्हर्मी कंपोस्ट, नाडेप, जनावरांचे गोठे, वृक्ष लागवड, सामूहिक वृक्षलागवड, वैयक्तिक वृक्षलागवड प्रामुख्याने महोगनी वृक्षलागवड, बारमाही रस्ते, पेव्हर ब्लॉक, काँक्रीट रोड, बाजार तळ, खेळाची मैदाने तयार करणे / दुरुस्ती करणे, धान्य गोदाम, अंगणवाडी, ग्रामपंचायत भवन, छोटे पाझर तलाव, स्मशानभूमी शेड, छोटे पुल, शौचालयाचे बांधकाम, शाळेसाठी कंपाऊंड वॉल, छतावरील पाण्याचे पुनर्भरण, इमारत दुरुस्ती कामे करण्यास प्राधान्य देण्यात येत आहे. या कामांचा समावेश वार्षिक कृती आराखड्यात तसेच लेबर बजेटमध्ये करता येऊ शकेल व कामे कार्यान्वित करताना पुढे तांत्रिक अडचणी निर्माण होणार नाही, यासाठी राज्यभरातील सर्व पातळीवरील अधिकारी कर्मचारी यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

मजुरांना काम

राज्यात कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे निर्माण झालेल्या असाधारण स्थितीत मजुरांना काम देण्यात आले. राज्यात ५५,११८ कामांच्या माध्यमातून ७,०४,७३२ मजुरांना रोजगार उपलब्ध करण्यात आला. लॉकडाऊनमुळे अनेक मजुरांचा रोजगार गेला. अनेक मजूर आपापल्या गावी गेले. शहराकडून ग्रामीण भागाकडे मजूर स्थलांतरित झाल्यानंतर त्यांच्यासमोर मोठा प्रश्न निर्माण झाला

लोकसंख्येनुसार सिंचन विहिरी

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये ग्रामपंचायतीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात नवीन सिंचन विहिरींची कामे सुरू करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी

योजनेंतर्गत घेण्यात येणाऱ्या सिंचन विहिरींची मर्यादा ५ वरून २० पर्यंत वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला. ग्रामपंचायत लोकसंख्या १५०० असेल, तर ५ नवीन सिंचन विहिरी, १५०० ते ३००० पर्यंत १०, ३००० ते ५००० पर्यंत १५ तर ५००० च्या पुढे २० नवीन सिंचन विहिरींची कामे मंजूर करण्यात येणार आहे.

होता. परंतु महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत त्यांना रोजगार उपलब्ध करून देण्यात आला. या योजनेमुळे त्यांना मोठा दिलासा मिळाला.

रोपवाटिका योजना

राज्य फलोत्पादनामध्ये अग्रेसर आहे. तसेच मोठ्या प्रमाणात भाजीपाला पिकाचे व्यावसायिक पद्धतीने लागवड करून उत्पादन घेतले जाते. त्याची निर्यातही मोठ्या प्रमाणात करण्यात येते. मागील दोन-तीन वर्षांपासून भाजीपाला पिकाचे निर्यातक्षम व विषमुक्त उत्पादन करण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढला आहे. भाजीपाला रोपांची नियंत्रित वातावरणामध्ये तयार झालेली कीड व रोगमुक्त भाजीपाला रोपांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढत आहे. त्यासाठी पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर रोपवाटिका योजना राबवली जात आहे. ही योजना शेतकऱ्यांसाठी लाभदायक ठरणार आहे. या योजनेंतर्गत पहिल्या टप्प्यात ५०० लाभधारकांची प्रायोगिक तत्त्वावर निवड करण्यात आली आहे.

लाभार्थी प्रामुख्याने कृषी पदवी किंवा पदविकाधारक असतील. याचबरोबर महिला बचतगटास प्राधान्य देण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे भाजीपाला उत्पादक

शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्या यांना देखील प्राधान्य देण्यात येणार आहे. ५०० लाभधारकांसाठी ५०० एकर भाजीपाला रोपवाटिका तयार करण्यात येणार आहे. योजनेचा कालावधी दोन वर्षांचा आहे. या योजनेमुळे भाजीपाला पिकाची दर्जेदार व कीडरोगमुक्त रोपांच्या निर्मिती उत्पादनात वाढ होणार आहे. तसेच स्थानिक शेतकऱ्यांना शेतीपूरक व्यवसायाची संधी उपलब्ध होणार आहे. पीक रचनेतदेखील बदल होणार आहे. शेतकऱ्यांना प्रत्यक्ष रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहे.

ऑनलाइन अर्ज : पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर रोपवाटिका योजनेच्या या अभियानाची सुरुवात करताना सर्वप्रथम ऑनलाइन अर्ज मागवण्यात येतील. प्रत्येक तालुक्याला लक्ष्यांक देण्यात येईल. लक्ष्यांकापेक्षा जास्त अर्ज आल्यास तालुकास्तरावर सोडत पद्धतीने यादी तयार केली जाईल. तालुका स्तरावरून पूर्वसंमती देण्यात येईल आणि कामाची सुरुवात करण्यात येईल. प्रथमत: ६० टक्के अनुदान देण्यात येईल व रोपांची विक्री सुरू झाल्यानंतर दुसरा हप्ता ४० टक्के शेतकऱ्याच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा केला जाईल.

फळबाग पुनर्लागवड कार्यक्रम

निसर्ग चक्रीवादळामुळे कोकण विभागात नुकसानग्रस्त फळबागांचे रोजगार हमी योजनेशी निगडित फळबाग योजनेंतर्गत पुनर्लागवड व पुनरुज्जीवन लागवड कार्यक्रम घेण्याचा निर्णय घेण्यात आला. राज्य रोजगार हमी योजनेशी निगडित फळबाग योजना पुढे चालू ठेवण्यास मान्यता देण्यात आली आहे. २०२०-२१ करिता ५० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे.

शब्दांकन : राजू धोत्रे,
विभागीय संपर्क अधिकारी

राज्याच्या विकासात सहकार क्षेत्राचे महत्त्वाचे योगदान आहे. सहकार संस्था, बाजार समित्या, थेट शेतकऱ्यांशी निगडित आहेत. त्यामुळे कृषी-औद्योगिक अर्थकारण ग्रामीण पत क्षेत्रात सहकार आणि पणन क्षेत्राला अधिक सक्षम करण्यासाठी शासनाने सामान्य माणूस, शेतकरी बांधव केंद्रस्थानी ठेऊन विकासावर लक्ष केंद्रित केले आहे.

बाळासाहेब पाटील
मंत्री, सहकार, पणन

मागील चार वर्षांपासून शेतकरी कर्जाच्या दुष्टचक्रात अडकलेला आहे. शेतकऱ्यांना प्रत्यक्ष कर्जमुक्त करणारी सहज, सोपी आणि पारदर्शक अशी 'महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना' महाविकास आघाडी सरकारने जाहीर केली आहे. या योजनेची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. कोरोनासारख्या महामारीच्या कालावधीत सुद्धा ग्राहकांना आणि शेतकरी बांधवांना अडचणी येऊ नयेत, म्हणून आवश्यक त्या उपाययोजना करून बाजार समित्यांचे व्यवहार सुरू ठेवले आणि ग्राहकांना सुद्धा भाजीपाला पुरवठा सुरू ठेवला.

कर्जमुक्ती योजना

१ एप्रिल २०१५ ते ३१ मार्च २०१९ पर्यंतच्या कालावधीत शेतकऱ्यांनी घेतलेल्या सर्व अल्पमुदत पीककर्ज, पुनर्गठित / फेर पुनर्गठित झालेले पीककर्ज, ज्यांची थकबाकी ३० सप्टेंबर २०१९ रोजी २ लाख रुपयांपर्यंत होती, ती कर्जमुक्तीची रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट जमा करण्यात आली. आतापर्यंत जवळपास ३०.७७ लाख शेतकऱ्यांच्या कर्जखात्यात १९,६४३ कोटी रुपये जमा करण्यात आले आहेत. जवळपास ९७ टक्के लाभार्थ्यांना जुलै, २०२० पर्यंत राज्यात लॉकडाऊन असताना देखील कर्जमुक्तीचा लाभ देण्यात आला आहे. त्यामुळे शेतकरी बांधवांना दिलासा मिळाला.

२०२०-२१ या वर्षातील खरीप हंगामासाठी राज्याचा ४५,७८५ कोटी रुपये एवढा लक्ष्यांक निश्चित करण्यात आला होता. १ एप्रिल २०२० ते ३० सप्टेंबर २०२० या कालावधीत पीक कर्ज वाटपाचे प्रमाण ७६.२६ टक्के असून, मागील वर्षाच्या तुलनेत २७ टक्के जास्त आहे. जुलै व ऑगस्ट २०१९ या कालावधीत झालेल्या अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान झाले होते. यात कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे, सोलापुर, अहमदनगर, औरंगाबाद, अमरावती व नागपूर या जिल्ह्यातील बाधित शेतकऱ्यांचे पीक कर्ज माफ करण्यात आले.

विक्रमी कापूस खरेदी

शेतकऱ्यांच्या हितासाठी या वर्षात शेतकऱ्यांना हमीभावापेक्षा कमी दराने कापूस विक्री करण्याची वेळ येऊ नये, यासाठी लॉकडाऊन असताना सुद्धा कापूस खरेदी संदर्भात तातडीने उपाययोजना करून गेल्या दहा वर्षांतील विक्रमी अशी कापूस खरेदी केली. पावसाळ्यामध्ये देखील मान्सून शेड उभारून बहुतांश कापूस हा खरीप २०२०-२१ च्या पेरणीपूर्वी खरेदी करून शेतकऱ्यांची देयकेदेखील वेळेत देण्यात आली.

अर्थचक्र पुन्हा सुरू

कोविड-१९ च्या रुग्ण संख्येत दररोज होणारी वाढ विचारात घेऊन सहकारी संस्थांच्या निवडणुका ३१ डिसेंबर २०२० पर्यंत पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण पूर्ण करण्यास आणि संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्याससुद्धा मुदतवाढ देण्यात आली. अशा परिस्थितीत संचालक मंडळाच्या नियंत्रणापलीकडील बाबीमुळे निवडणूक होऊ न शकल्यास अशा संस्थेच्या नवीन संचालक मंडळाची निवड होईपर्यंत सध्या कार्यरत असलेल्या संचालक मंडळास काही महत्त्वाचे निर्णय घेण्याचेसुद्धा अधिकार देण्यात आले आहेत. तसेच सहकार संस्था, बाजार समित्या, निर्यात क्षेत्रावर झालेला लॉकडाऊनचा परिणाम आणि त्यावर करावयाच्या उपाययोजना याचा अभ्यास करण्यासाठी समिती गठित करण्यात आली आहे. ही समिती अभ्यास करून आपला अहवाल शासनाला सादर करेल आणि शासनाच्या वतीने आवश्यक उपाययोजना करण्यात येतील. त्यामुळे अर्थव्यवस्थेचे अर्थचक्र पुन्हा सुरू होण्यास मदत होईल.

माफक दरात पुरवठा

लॉकडाऊन जाहीर झाल्यानंतर मुंबई, ठाणे, पुणे अशा मोठ्या शहरातील सहकारी गृहनिर्माण संस्थांमधील सभासदांना थेट फळे व भाजीपाला पुरवठा करण्यासाठी महाराष्ट्र विकास महामंडळाच्या स्तरावर संकेतस्थळाद्वारे जीवनावश्यक वस्तूंच्या

कर्जमुक्त शेतकरी

ऑनलाइन बुकिंगची व्यवस्था केली. या उपक्रमांतर्गत ७५ शेतकरी उत्पादक कंपन्या / सहकारी संस्थांमार्फत सुमारे ४१४ सहकारी गृहनिर्माण संस्थांमधील ११,८९९ सभासदांना १४६४ क्विंटल एवढा जीवनावश्यक वस्तूंचा माफक दरात पुरवठा केला.

इथेनॉल निर्मितीचे उद्दिष्ट

देशपातळीवर पेट्रोलमध्ये इथेनॉलचा वापर सद्य:स्थितीत ६ टक्क्याच्या आसपास असून २०२२ पर्यंत हे प्रमाण १० टक्के करण्याचे व २०३० पर्यंत २० टक्के वाढवण्याचे उद्दिष्ट आहे. राज्यातील इथेनॉल निर्मितीची वार्षिक क्षमता १६६ कोटी लीटर्स असली, तरी राज्यासाठी २०२०-२१ साठी इथेनॉल पुरवठा करण्याचे लक्ष्य १०८ कोटी लीटर्स निश्चित करण्यात आले आहे.

रुग्णालयांची उभारणी

सामाजिक दायित्वाच्या जाणिवेतून कारखान्यांनी किमान २५ खाटांचे हॉस्पिटल उभारण्याचे व त्यामध्ये कोरोनाच्या उपचाराशी संबंधित सुविधा देण्याची काही साखर कारखान्यांनी तयारी केली आहे. विघ्नहर सहकारी साखर कारखाना, सह्याद्री सहकारी साखर कारखाना, कृष्णा सहकारी साखर कारखाना आदी कारखान्यांनी कोविड सेंटरची उभारणी केली आहे.

अर्थसाहाय्य

आशियाई विकास बँक अर्थसाहाय्यित महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क- MAGNET या प्रकल्पास मान्यता देण्यात आली आहे. हा प्रकल्प एकूण १४२.९ दशलक्ष डॉलर्स (सुमारे १००० कोटी रुपये) इतक्या रकमेचा असून, त्यापैकी ७० टक्के निधी (१०० दशलक्ष डॉलर्स) आशियाई विकास बँकेकडून कर्ज स्वरूपात, ३० टक्के निधी (४२.९ दशलक्ष डॉलर्स) राज्य शासनाचा स्वत:चा निधी असणार आहे. यामुळे फळे व भाजीपाला उत्पादनास मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन मिळेल आणि राज्यात पुढील ५ वर्षांपर्यंत फळे व भाजीपाल्यांचे होणारे नुकसान लक्षात घेता या मॅग्नेट नेटवर्कमधून अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना प्रोत्साहन मिळेल. तसेच शेतकऱ्यांना शेतमाल बाजारपेठेत घेऊन जाताना काही अडचणी आल्या किंवा शेतमालास योग्य किंमत मिळत नसल्यास महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या गोदामांमध्ये मालाची साठवणूक करता यावी, यासाठी राज्य वखार महामंडळ आणि राज्य सहकारी बँक यांच्या संयुक्त विद्यमाने ऑनलाइन तारण कर्ज योजना सुरू करण्यात आली आहे. यामुळे शेतकऱ्यांचा बँकेत जाण्याचा वेळ आणि पैशाची बचत होण्यास मदत होते. या माध्यमातून शेतकऱ्यांना ऑनलाइन कर्जाची सुविधा फक्त एक ते दोन दिवसात पूर्ण केली जात आहे. तारण कर्जाची मर्यादा प्रतिशेतकरी ५ लाखांपर्यंत असून, तारण कर्जाचा व्याजदर ९ टक्के असून इतर बँकेच्या तुलनेत सर्वात कमी व्याजदर आहे.

सहकारी साखर कारखान्यांना मदत

या हंगामात सहकारी साखर कारखाने सुरू करण्यासाठी कारखान्यांना पुरेशा प्रमाणात कर्ज पुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेमार्फत आत्मनिर्भर योजना तयार करण्यात आली आहे. आतापर्यंत बँकेकडे १९ कारखान्यांचे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. तसेच ज्या सहकारी साखर कारखान्यांचे उक्त मुल्य व एनडीआर उणे आहे, अशा ३२ सहकारी साखर कारखान्यांना नाबार्डच्या धोरणानुसार महाराष्ट्र राज्य सहकारी बँक अथवा संबंधित जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक कर्ज पुरवठा करू शकणार नाहीत. अशा ३२ सहकारी साखर कारखान्यांच्या रुपये ५१६.२० कोटी अल्प मुदतकर्ज घेण्यास शासन हमी. सॉफ्ट लोन योजनेस पात्र १४७ कारखान्यांसाठी ४ वर्षांचे व्याजाचे अनुदान राज्य शासनामार्फत देण्यात येणार आहे. योजनेंतर्गत ५४ पात्र सहकारी साखर कारखान्यांना २०१७-१८ मधील सॉफ्ट लोन व्याज अनुदानाची उर्वरित रक्कम ३३.८३ कोटी रुपये वितरित करण्यात आली आहे.

आखाती, युरोपिय देशांमध्ये निर्यात

महाराष्ट्र राज्य पणन मंडळामार्फत जानेवारी ते जून २०२० अखेर सुविधा केंद्रावरून ९११२ मे टन शेतमाल आखाती देश व युरोपिय देशांमध्ये निर्यात करण्यात आलेला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने फळे, फुले, भाजीपाला, पशुखाद्य, कांदा आदींचा समावेश आहे. तसेच या केंद्रामध्ये एकूण ११७३ जणांना प्रत्यक्ष रोजगार मिळालेला आहे. लॉकडाऊन कालावधीत 'आंतरराज्यीय फळे व भाजीपाला वाहतूक नियंत्रण कक्ष' सुरू करण्यात आला आहे. महाराष्ट्रातून शेतमाल बाहेरील राज्यात पाठवण्यात यश आले. मोठ्या महानगरात भाजीपाला-धान्य-फळांचा तुटवडा निर्माण होऊ नये आणि शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून बाजार समिती आवारात स्वच्छता, सामाजिक अलगीकरणाचे सर्व नियम पाळले, बाजार आवारात येणाऱ्या व्यक्तीसाठी प्रवेश द्वाराजवळच, तसेच बाजार आवारात ठिकठिकाणी पुरेशा प्रमाणात हात धुण्यासाठी व्यवस्था, पाण्याचा नळ आणि निर्जंतुकीकरणासाठी सॅनिटायझरची व्यवस्था करून बाजार समित्यांचे कामकाज सुरू ठेवले. कोरोनाचा सामना करत शेतकरी हितासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.

शब्दांकन : काशीबाई थोरात-धायगुडे,
विभागीय संपर्क अधिकारी

राज्याच्या विकासात राज्य मार्ग परिवहन महामंडळ आणि एसटी महामंडळाचा मौलिक असा वाटा आहे. कोरोना महामारीच्या संकटामध्ये राज्याची लोकवाहिनी असलेल्या एसटीने स्थलांतरितापासून अत्यावश्यक सेवांतील कर्मचाऱ्यांपर्यंत विविध ठिकाणी दळणवळणाची सेवा देऊन शासनाच्या आरोग्य, पोलीस, महसूल आणि परिवहन या विभागांच्या खांद्याला खांदा लावून दमदार कामगिरी केली.

ॲड. अनिल परब
मंत्री, परिवहन, संसदीय कार्ये

दळणवळणाच्या सेवेची गरज बघता ही सेवा केवळ टिकवणे महत्त्वाचे नसून फायद्यात येणेदेखील तेवढेच महत्त्वाचे आहे. लॉकडाऊनमुळे सार्वजनिक वाहतुकीचे अर्थशास्त्र संपूर्णपणे विस्कळीत झाले होते. लॉकडाऊन कालावधीत एसटीच्या घटलेल्या दैनंदिन उत्पन्नामुळे संचित तोटा दुपट्टीने वाढला. कर्मचाऱ्यांचे पगार देणे अवघड झाले. संकटकाळात देखील अखंड प्रवाससेवा पुरवणाऱ्या एसटी महामंडळाला शासनाकडून एक हजार कोटीचे पॅकेज जाहीर केले आहे. त्यामुळे एसटीच्या कर्मचाऱ्यांचे थकीत असलेले वेतन दिवाळीपूर्वी देण्यात आले. पुढील सहा महिन्यांचे आर्थिक नियोजनही करण्यात आले. त्यामुळे एसटी महामंडळाला तात्पुरता दिलासा मिळाला. यापुढील काळात एसटीने शाश्वत उत्पन्न वाढीच्या दृष्टीने नवनवीन प्रकल्प हाती घेतले.

शुद्ध पेयजल

एसटीचा आर्थिक स्रोत सुरू राहावा, म्हणून एसटी प्रवाशांसाठी नाथजल योजना सुरू केली आहे. सर्व बसस्थानकांवर ६५० मिलीमीटर व एक लीटर बाटलीबंद स्वरूपामध्ये नाथजल एसटी महामंडळाचे अधिकृत पेयजल उपलब्ध करून देण्यात येत आहे. त्यामुळे सर्वसामान्य प्रवाशांना कमी दरामध्ये दर्जेदार शुद्ध पेयजल उपलब्ध होत आहे.

इंधन विक्री सुरू

महामंडळांच्या पेट्रोल पंपांवर आजपर्यंत केवळ एसटी बसेससाठी इंधन विक्री होत होती. परंतु आता इतर वाहनांसाठी देखील इंधन विक्री सुरू केली आहे. निवडक ३० पेट्रोल पंपांवर व्यावसायिक तत्त्वावर पेट्रोल-डिझेलची विक्री सुरू करण्यात आली आहे, तर ५ जागांवर सीएनजी आणि एलएनजी पंपांची उभारणी करण्यात येत आहे. याबाबतचा इंडियन ऑईल कॉर्पोरेशनशी सामंजस्य करार करण्यात आला आहे. त्यानंतर अनेक पेट्रोलियम कंपन्यांनी एसटी महामंडळाशी भागीदारी करण्यात स्वारस्य दाखवले आहे. तसेच एसटीच्या हजारो बसेसचे टायर रिमोल्डिंग करण्यासाठी स्वतःचे ९ टायर रिमोल्डिंग प्लांट आहेत. एसटीची गरज भागवून व्यावसायिक तत्त्वावर टायर रिमोल्डिंग करण्यास सुरुवात झाली आहे. विशेष म्हणजे बाजारभावापेक्षा महामंडळाचे टायर रिमोल्डिंगचे दर कमी आहेत.

बस बांधणी

पुणे, औरंगाबाद आणि नागपूर येथे एसटी महामंडळाचे बस बांधणी प्रकल्प मध्यवर्ती कार्यशाळा आहेत. या कार्यशाळांमध्ये एसटी बसेसची बांधणी केली जाते. याच कार्यकौशल्येचा वापर करून व्यावसायिक पद्धतीने खासगी व्यावसायिकांना त्यांच्या बसेस बांधून देण्यात येणार आहेत. बाहेरील बस बांधणीपेक्षा एसटीचे बस बांधणीचे दर स्पर्धात्मक स्वरूपाचे असल्यामुळे अनेक खासगी व्यावसायिक एसटीकडून बस बांधणी करण्यास इच्छुक आहेत. तसेच इंधन बचतीसाठी पहिल्या टप्प्यात एसटीच्या १२०० बसेस सीएनजी/एलएनजीमध्ये रूपांतरित करण्याचे महामंडळाने ठरवले आहे. याची चाचणी पूर्ण झाली आहे.

मालवाहतूक

सर्वसामान्य शेतकरी, छोटे उद्योजक, व्यावसायिक, कारखानदार यांच्या मालाची किफायतशीर दराने सुरक्षित व वक्तशीर वाहतूक करण्याच्या उद्देशाने एसटी महामंडळाने व्यावसायिक स्तरावर मालवाहतूक सुरू केली आहे. सध्या राज्यांतर्गत आंब्याची रोपे, काजूची बोन्डे,बी-बियाणे, खते अशा कृषिजन्य पदार्थापासून रंगाचे डबे, लोखंडी पाईप अशा अनेक विविध वस्तूची मालवाहतूक एसटीच्या मालवाहू वाहनातून सुरू आहे.

रेल्वेच्या उत्पन्नात सर्वाधिक वाटा मालवाहतुकीचा आहे. त्याचप्रमाणे एसटीने देखील व्यावसायिक स्तरावर माल वाहतुकीत उतरण्याचा क्रांतिकारी निर्णय घेतला आहे. प्रवासी वाहतुकीसाठी

सुरक्षित प्रवास...

कालबाह्य ठरलेल्या १०५० बसेस सध्या माल वाहतुकीसाठी चालवण्यात येत आहेत. हीच संख्या येत्या काळात २००० पर्यंत नेण्याचे उद्दिष्ट आहे. माल वाहतुकीतून एसटीला ऑक्टोबर अखेरपर्यंत २२ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे. एसटीचे माल वाहतुकीचे दर किफायतशीर असल्याकारणाने छोटे उद्योजक, कारखानदार, शेतकऱ्यांना याचा मोठा फायदा झाला आहे. रस्ते वाहतुकीप्रमाणेच रेल्वे वाहतुकीलादेखील महाराष्ट्र शासनाकडून मदत करण्यात येत आहे. विदर्भातील नागपूर-नागभीड नॅरोगेज रेल्वे मार्गाचे ब्रॉडगेजमध्ये रूपांतर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा प्रकल्प ११६.५ कि.मी.चा असून १४०० कोटी रुपये या प्रकल्पाचा प्रस्तावित खर्च आहे. राज्य सरकार त्यातील २८० कोटी रुपये टप्प्याटप्प्याने देणार असून, ४२० कोटी रुपयांची कर्जाची हमी देखील देणार आहे. प्रवासी वाढीच्या उद्दिष्टाने व प्रवाशांच्या सोयीसाठी प्रवासी माहिती प्रणाली सुरू करण्यात आली आहे. या प्रकल्पामुळे प्रवाशांना एसटी बसचे प्रत्यक्ष ठिकाण कळणार आहेत.

बसेसची खरेदी

लॉकडाऊनच्या अगदी पहिल्या दिवसापासून सेवा देणाऱ्या एसटी कर्मचाऱ्यांची काळजी घेणे महामंडळास क्रमप्राप्त होते. त्यासाठी महामंडळाच्या ७२ व्या वर्धापनदिनानिमित्त महामंडळातील चालक, वाहक तथा स्थानकावरील प्रवाशांच्या संपर्कात येणारे वाहतूक नियंत्रक, सहायक वाहतूक नियंत्रक, सुरक्षा रक्षक यांचा दुर्दैवाने मृत्यू झाल्यास ५० लाख रुपयांचे सानुग्रह अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच अत्यावश्यक सेवेसाठी मुंबई, ठाणे, पालघर या तीन विभागात कोविडयोद्धे म्हणून कार्य केलेल्या २००० एसटी कर्मचाऱ्यांना त्यांच्या वेतनाव्यतिरिक्त ३०० रुपये प्रतिमहा प्रोत्साहन भत्ता देण्यात आला आहे. राज्य शासनाकडून एसटी महामंडळास ७०० बसेस खरेदी करण्यासाठी ७० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

करमाफी

लॉकडाऊनमुळे उद्ध्वस्त झालेली सार्वजनिक वाहतूक सेवा पूर्वपदावर आणण्यासाठी एसटीबरोबरच खासगी व्यावसायिक वाहतुकीला नवसंजीवनी मिळणे गरजेचे आहे. लॉकडाऊन काळात सार्वजनिक वाहतूक पूर्णपणे बंद होती. त्यामुळे विविध वाहतूक संघटनांनी नुकसानभरपाई म्हणून शासनाने करमाफी द्यावी, अशी विनंती केली होती. यासाठी शासनाने आर्थिक वर्ष २०२०-२१ मधील पहिल्या ६ महिन्यांकरिता संपूर्ण कर माफी देण्याचा निर्णय घेतला आहे. ही कर माफी ७०० कोटींची असून, त्याचा फायदा राज्यातील ११ लाख व्यावसायिक वाहन धारकांना झाला आहे.

सुखरूप परतले

राजस्थान येथील कोटा शहरात शिक्षणासाठी गेलेल्या परंतु लॉकडाऊनमुळे अडकून पडलेल्या १४०० विद्यार्थ्यांना ७२ बसेसच्या माध्यमातून राज्यात सुखरूप आणण्यात आले. लॉकडाऊन काळापासूनच लोकल सेवा सर्वसामान्यांसाठी बंद आहेत. त्यामुळे अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांच्या वाहतुकीसाठी एसटीची सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. यामध्ये डॉक्टर, परिचारिका, पोलीस, सफाई कर्मचारी यांसारख्या अत्यावश्यक सेवेतील लोकांची वाहतूक करण्यात आली. आजदेखील एसटीच्या १००० बसेस बेस्टच्या मदतीला मुंबईत धावत आहेत. परंतु कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर एसटीच्या उत्पन्न वाढीसाठी करण्यात येणारी हंगामी दरवाढ या वेळी मात्र करण्यात आली नाही. ग्रामीण भागात संशयित कोरोना रुग्णांना जिल्हा रुग्णालयात घेऊन जाण्यासाठी एसटी बसेस उपलब्ध करून देण्यात आल्या. लॉकडाऊनमुळे हंगाम संपण्यापूर्वी पश्चिम महाराष्ट्रात अडकलेल्या १ हजार ऊसतोड मजुरांना ४८ बसेसच्या माध्यमातून त्यांच्या मूळ गावी पोहोचवले गेले.

स्थलांतरित मजुरांना मदत

लॉकडाऊन कालावधीत सुमारे ५ लाखांहून अधिक स्थलांतरित मजुरांना एसटी महामंडळाच्या बसेसद्वारे रेल्वेस्टेशनपर्यंत किंवा त्यांच्या राज्याच्या सीमेपर्यंत नेऊन पोहोचवण्यात आले. ९ मे ते ३१ मे २०२० या काळामध्ये ४४ हजार १०६ बसेसद्वारे सुमारे ५ लाख ३७ हजार ५९३ स्थलांतरित मजुरांना त्यांच्या राज्यात जाण्यासाठी महाराष्ट्राच्या सीमेपर्यंत/ रेल्वेस्टेशनपर्यंत मोफत बसची सोय उपलब्ध करून देण्यात आली. मध्य प्रदेश, तेलंगणा, गुजरात, छत्तीसगड, कर्नाटक यांसारख्या राज्यांच्या सीमेपर्यंत धावून एसटीने स्थलांतरित कामगारांना त्यांच्या घरी सुखरूप जाण्यास मदत केली आहे.

कोरोना महामारीच्या काळात ऑक्सिजन वायूचा पुरवठा सुलभ राहावा, याकरिता ऑक्सिजन वायूची वाहतूक करणाऱ्या वाहनांना रुग्णवाहिका समकक्ष वाहनाचा दर्जा दिला. राज्यातील सुरक्षित प्रवासी वाहतुकीची व्यवस्था आणि प्रवाशांना उत्तम सुविधा कशा उपलब्ध होतील, यासाठी शासन प्रयत्न करत आहे.

वेतनकपात

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्याची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता राज्यातील सर्व विधिमंडळ सदस्य, लोकप्रतिनिधींच्या वेतनात एप्रिल २०२० पासून एप्रिल २०२१ पर्यंत ३० टक्के कपात करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

शब्दांकन : काशीबाई थोरात –धायगुडे,
विभागीय संपर्क अधिकारी

राज्यावर आलेल्या कोणत्याही संकटात राज्य शासनाने खंबीरपणे सामोरे जात सामान्यातील सामान्य नागरिकाला दिलासा देण्याचे काम केले आहे. कोविड काळात कृषी, आरोग्य, वैद्यकीय शिक्षण याबरोबरच राज्यातील मच्छीमारांसाठी, तसेच इतर घटकांसाठी मत्स्यव्यवसाय, बंदरे विकास आणि वस्त्रोद्योग विभागामार्फत विविध निर्णय घेऊन तळागाळातील लाभार्थ्यांपर्यंत मदत पोहोचवण्यात येत आहे.

मत्स्यव्यवसायाला उभारी

अस्लम शेख
मंत्री, वस्त्रोद्योग, मत्स्यव्यवसाय, बंदरे विकास

मत्स्यव्यवसाय, बंदरे विकास आणि वस्त्रोद्योग या विभागांचा कार्यभार स्वीकारल्यानंतर या विभागाच्या माध्यमातून काय काय नवीन करता येईल याचा विचार सुरू केला. त्याच दरम्यान क्यार व महाचक्रीवादळामुळे किनारपट्टीवरील मच्छीमार बांधवांचे नुकसान झाले. या वादळाचा फार मोठा फटका रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील बांधवांना बसला. वादळग्रस्तांना तातडीने मदत करणे आवश्यक होते. त्यासाठी निर्णय घेऊन मदत पोहोचवण्यात आली. तातडीची रक्कम म्हणून रत्नागिरी तालुक्यातील मंडणगड व दापोली तालुक्यासाठी २५ कोटी रुपयांचा निधी दिला. तसेच क्यार व महा वादळामुळे पूर्ण क्षमतेने मासेमारी न करता आल्याने मच्छीमारांसाठी आर्थिक पॅकेजची मागणी केली होती. ती मंजूर होऊन मच्छीमारांसाठी ६५.१७ कोटी रुपयांचे विशेष आर्थिक साहाय्य शासनाने मंजूर केले आहे. त्यातील ३२.५८ कोटी रुपयांचे वाटपही करण्यात आले आहे.

मच्छीमारांना दिलासा

कोरोना संकटकाळात मच्छीमारांना दिलासा देणारे अनेक निर्णय मंत्री म्हणून घेतले. मच्छीमार नौकांच्या डिझेलवरील मूल्यवर्धित कराच्या प्रतिपूर्ती परताव्याच्या रक्कमेतून राष्ट्रीय विकास निगमच्या कर्जाची वसुली न करण्याची मागणी मी वित्त विभागाकडे केली होती. ती वित्त विभागाने मान्य केली. त्यामुळे मच्छीमार बांधवांना थोडा का होईना दिलासा मिळाला.

कोविड काळात व्यवसाय बंद असल्यामुळे मच्छीमारांचे व मत्स्य व्यावसायिकांचे नुकसान झाले. त्यामुळे तलाव ठेका रक्कम व मत्स्य बोटुकली संचयनाची आगाऊ रक्कम भरण्यास तसेच कोविड काळात मुदत संपलेल्या मासेमारी नौकांच्या परवान्यांच्या नूतनीकरणाला सहा महिन्यांची मुदतवाढ दिली.

त्याचप्रमाणे पिंजरा पद्धतीने मत्स्य संवर्धनासाठी देण्यात आलेल्या ठेक्याची रक्कम या कालावधीत आल्यास ती भरण्यास आणि निमखारे पाणी मत्स्यसंवर्धन/कोळंबी संवर्धन प्रकल्पाच्या परवान्याच्या नूतनीकरणासदेखील सहा महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली होती.

२०२०-२१ या आर्थिक वर्षासाठी केंद्र शासनाने प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेंतर्गत राज्यासाठी १६०.६९ कोटी रुपये इतक्या किमतीच्या मत्स्य आराखड्यास मान्यता प्रदान दिली आहे. तसेच केंद्र शासनाने २०२०-२१ ते २०२४-२५ या पाच वर्षांच्या कालावधीकरिता ३४५ कोटी रुपये इतक्या रकमेचे तात्पुरते वाटप केले आहे. याद्वारे ८९२ कोटी रुपये इतकी संभाव्य गुंतवणूक होणार आहे.

एलईडी लाईटच्या माध्यमातून सुरू असलेली बेकायदेशीर मासेमारी बंद करण्याबाबत मच्छीमारांमार्फत मागणी केली जात होती. एलईडी मासेमारीमुळे पारंपरिक मासेमारांवर संकट येते. त्याचबरोबर मत्स्य साठ्यांवरही त्याचा परिणाम होऊन सागरी पर्यावरणाला हानी पोहोचते. त्यामुळे मच्छीमार बांधवांची मागणी लक्षात घेऊन तसेच पारंपरिक मच्छीमारांचे हितसंबंध जपण्यासाठी व शाश्वत मासेमारी व्यवस्थापनाद्वारे भविष्यकालीन मत्स्यसाठ्यांच्या जतनासाठी एलईडी दिव्यांचा वापर करून मासेमारी करणाऱ्या अनधिकृत नौकांवर कारवाई सुरू केली. १३ सप्टेंबर २०२० अखेरपर्यंत एकूण १०४ अवैध मासेमारी करणाऱ्या नौकांवर सागरी कायद्यांतर्गत कठोर कारवाई करण्यात आली आहे.

तसेच अवैध मासेमारीला आळा बसावा, यासाठी किनारपट्टीवरील सर्व जेट्टी व बंदरांमध्ये सीसीटीव्ही बसवण्याचा निर्णय घेतला आहे.

संभाव्य नुकसान टळले

कोविड काळात मासेमारी व्यवसायाला दिलासा मिळावा, यासाठी अनलॉक करत असताना मासे, मत्स्यबीज व मत्स्यखाद्याचा समावेश अत्यावश्यक बाबींमध्ये करण्यासाठी

सागरी वाहतुकीला चालना

रस्ते वाहतुकीवरील ताण पाहता या पुढील काळात सागरी वाहतुकीला चालना देणे आवश्यक ठरणार आहे. त्यासाठी राज्याच्या बंदरे विकास विभागाच्या माध्यमातून वेगवेगळे उपक्रम तसेच पायाभूत सुविधांवर भर देण्याचे नियोजन केले आहे. राज्यात सागरी प्रवासी व माल वाहतुकीला खूप मोठी संधी आहे. प्रवासी वाहतूक वाढल्यास महसुलाबरोबरच वाहतूक कोंडी सुटण्यास मदत होणार आहे. त्यामुळे किनारपट्टी भागात नवीन जेट्टीचे बांधकाम, जुन्या जेट्टीचे नूतनीकरण आदी कामे हाती घेण्यात येत आहेत.

गेट वे ऑफ इंडिया येथून एलिफंटा, मांडवा, जेएनपीटी, हार्बर क्रुझिंग यासाठी जाणाऱ्या प्रवाशांची गर्दी कमी करण्याच्या दृष्टीने, गेट वे ऑफ इंडियाजवळ असलेल्या रेडीओ क्लबजवळ नवीन प्रवासी जेट्टी व त्यासंबंधित इतर सुविधा उभारण्यात येणार आहेत. त्यासाठी ९८.५७ कोटी रुपयांच्या खर्चाच्या कामास प्रशासकीय मान्यता दिली आहे. यामुळे दक्षिण मुंबई ते एलिफंटा, अलिबाग-मांडवा या मार्गाने प्रवासी वाहतूक वाढण्यास मदत होणार आहे. त्याचप्रमाणे रायगड जिल्ह्यातील काशिद येथे प्रवासी जेट्टी, टर्मिनल ब्रेकवॉटर व तत्संबंधित सुविधा निर्माण करण्यासाठी ११२ कोटी रुपये खर्चाच्या कामास प्रारंभ झाला आहे. या प्रवासी जेट्टीमुळे मुंबईहून बोटसेवा, रो-पॅक्स सेवा सुरू करता येणार असून, पर्यटक/प्रवाशांची चांगली सोय होईल.

मुंबईतील भाऊचा धक्का ते रायगड जिल्ह्यातील मांडवा या मार्गावर रो-रो पॅक्स ही सेवा सुरू झाली आहे. या सेवेमुळे प्रवाशांना आपल्या वाहनासह भाऊचा धक्का येथून ते थेट मांडवा जेट्टीपर्यंत बोटीतून प्रवास करता येणार आहे. यामुळे रस्ते मार्गाने जाण्यास लागणारा वेळ वाचणार असून हा प्रवास एक तासाचा झाला आहे. ही सेवा सुरू झाल्यामुळे रायगड जिल्ह्यातील पर्यटन व्यवसायालाही चालना मिळणार आहे. राज्याच्या किनारी भागात आनंदवाडी (ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग) व करंजा (ता. उरण, जि. रायगड) येथे मत्स्यबंदराचे बांधकाम सुरू असून, या आर्थिक वर्षात दोन्ही बंदरासाठी एकूण ६४.७२ कोटी रुपये निधी वितरित केला असून, दोन्ही मत्स्यबंदराचे काम प्रगतिपथावर सुरू आहे.

केंद्र शासनाला पत्राद्वारे विनंती केली होती. ती मान्य झाल्यामुळे मत्स्य व्यावसायिकांची शेकडो कोटींची मासळी कंपन्यांपर्यंत पोहोचू शकली व मच्छीमारांचे संभाव्य नुकसान टळले.

समुद्रकिनारा संरक्षण व व्यवस्थापन

सागरी प्रवासी वाहतुकीबरोबर सागरी किनाऱ्यांचे संरक्षण करणेही आवश्यक आहे. त्यासाठी पर्यावरणस्नेही उपाय योजना राबवण्यासाठीही बंदर विकास विभागामार्फत पुढाकार घेण्यात येत आहे. आशियाई बँक पुरस्कृत महाराष्ट्र शाश्वत पर्यावरणपूरक समुद्रकिनारा संरक्षण व व्यवस्थापन प्रकल्पासाठी ६४३.५ कोटी रुपयांच्या खर्चास राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे.

पायाभूत सुविधांचा विकास

जागतिक आर्थिक केंद्र तसेच स्वप्नाची नगरी म्हणून मुंबईची ओळख आहे. जागतिक ओळख टिकवून ठेवणे त्याचबरोबर येथील पायाभूत सुविधांचा विकास यावर जास्त भर देण्यात येत आहे. याचबरोबर कोविड काळात मुंबईमध्ये संसर्ग पसरू नये, यासाठीही विशेष लक्ष दिले.

त्रिसूत्रीचा वापर

कोविड संसर्ग सुरू झाल्यानंतर तातडीने जिल्हा विकास नियोजन निधीतून कोरोना उपाययोजनेसाठी निधी राखून ठेवण्याचे निर्देश दिले होते. त्याचबरोबर शासकीय तसेच खासगी डॉक्टर्स व वैद्यकीय कर्मचारी यांना संसर्गापासून बचावासाठी सुरक्षा संच उपलब्ध करून देण्याच्या व खासगी रुग्णालयांना मार्गदर्शक तत्त्वे आखून देण्याच्या सूचना बृहन्मुंबई महानगरपालिकेस केल्या होत्या. त्यानुसार महानगरपालिकेने खासगी रुग्णालयांसाठी मार्गदर्शक तत्त्वे आखून दिली आहेत. तसेच धारावीसारख्या दाटीवाटीच्या ठिकाणी कोरोनाचा संसर्ग पसरू नये, यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याच्या व घरोघरी तपासणी करण्याचे निर्देश दिले होते. तसेच जास्त संसर्ग असलेल्या ठिकाणीही ट्रेस, टेस्ट, चेस या त्रिसूत्रीचा वापर करण्यात आला. त्यामुळे मुंबई शहरातील कोविड संसर्ग आटोक्यात आला. मात्र, अद्यापही गाफील न राहता हा संसर्ग संपूर्णपणे जाईपर्यंत काळजी घेण्याचे निर्देश जिल्हाधिकारी व प्रशासकीय यंत्रणेस दिले आहेत.

राज्य शासनाने लोकांसाठी व लोकांच्या हितासाठी काम करण्याचे ध्येय ठेवले आहे. त्यामुळे कितीही संकट आले अथवा अडचणी आल्या तरी राज्यातील जनतेच्या विकासाला, प्रगतीला बाधा येणार नाही, याची काळजी घेत आहे. या पुढील काळातही लोकोपयोगी निर्णय घेऊन मच्छीमार, मत्स्यव्यावसायिकांना दिलासा देण्याचा आमचा प्रयत्न असेल.

शब्दांकन : नंदकुमार वाघमारे,
विभागीय संपर्क अधिकारी

महाराष्ट्राने सामाजिक, आर्थिक, राजकीय आदी क्षेत्रातील सुधारणांद्वारे देशाला दिशा देण्याचे काम केले आहे. या विभागाची मंत्री म्हणून पदभार घेतानाच 'महिला आणि बालकांचा विकास' हा विषय जिल्हास्तरावरच नव्हे, तर राज्यातील प्रत्येक विभागाच्या प्राधान्यक्रमावर आणणे हे उद्दिष्ट बाळगले आहे. 'सक्षम महिला, सुदृढ बालक आणि सुपोषित महाराष्ट्र' या संकल्पाच्या पूर्तीसाठी वर्षभरात अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.

ॲड. यशोमती ठाकूर
मंत्री, महिला व बालविकास

कोविड काळात अंगणवाड्या बंद ठेवाव्या लागल्यामुळे बालकांना घरपोच आहार पुरवठा करण्यात आला. कोविडमध्ये शहरांमधून, परराज्यातून गावी परतलेले नागरिक, मजूर यांच्या कुटुंबांनाही पोषण आहाराचा लाभ देण्याचा निर्णय घेत राज्याने कोणीही अन्नापासून वंचित राहणार नाही, याची काळजी घेतली. त्यामुळे कोविडपूर्व काळात असलेल्या ६५ लाखांच्या लाभार्थ्यांच्या संख्येत सुमारे १० लाखांची वाढ होत जवळपास ७५ लाख बालके आणि स्तनदा माता, गर्भवती महिलांना कच्चे धान्य, डाळी, तेल आदी स्वरूपात घरपोच पोषण आहार पुरवण्यात आला.

तरंग सुपोषित महाराष्ट्राचा

कोविड काळात पोषण व बालकांच्या सर्वांगीण विकासासंबंधी पालकांचे समुपदेशन सुरू राहण्यासाठी 'तरंग सुपोषित महाराष्ट्राचा' या डिजिटल प्लॅटफॉर्मची सुरुवात करण्यात आली. यामध्ये ८०८०८०९०६३ या क्रमांकावर थेट किंवा व्हॉट्सॲपद्वारे संपर्क साधून माहिती मिळवता येते. या प्लॅटफॉर्मद्वारे ३.५ लाखांपेक्षा जास्त पालकांचे समुपदेशन करण्यात आले.

कोविड योद्ध्या

कोविड कालावधीमध्ये आमच्या अंगणवाडी पर्यवेक्षिका, सेविका आणि मदतनीस यांनी लाभार्थ्यांच्या घरोघरी पोषण आहार पोहोचवण्यासाठी प्रचंड मेहनत घेतली. दुर्गम भागात पायपीट करत, कुठे होडीतून प्रवास करत स्वत:च्या जीवाची पर्वा न करता अखंड कार्यरत असलेल्या या आमच्या कोविड योद्ध्याच आहेत. कोविड सर्वेक्षण तसेच आता 'माझे कुटुंब, माझी जबाबदारी' या उपक्रमात महत्त्वपूर्ण योगदान अंगणवाडी सेविकांनी दिले आहे.

सेवानिवृत्त झालेल्या अंगणवाडी सेविका आणि मिनी अंगणवाडी सेविका व मदतनीसांना लागू असलेले अनुक्रमे १ लाख आणि ७५ हजार रुपये विम्याचे लाभ वेळेवर मिळत नसल्याच्या अनेक तक्रारी होत्या. त्याबाबत वेळोवेळी आढावा घेऊन यंत्रणेची संवेदनशीलता वाढवण्यावर भर दिला. त्यामुळे प्रलंबित असलेल्या २३७६ प्रकरणांपैकी १९०२ प्रकरणे निकाली काढून लाभ देण्यात आला.

बालकांचे संरक्षण

राज्यात शासकीय आणि मान्यताप्राप्त खासगी बालगृहात मिळून सुमारे ९ हजार ८०० विधिसंघर्षग्रस्त आणि काळजी व संरक्षणाची गरज असलेली बालके दाखल आहेत. या बालकांचा कोरोनापासून बचाव

सक्षम महिला, सुदृढ बालक

महिला धोरणाची अंमलबजावणी

राज्याचे १९९४ मधील पहिले, २००१ मधील दुसरे व २०१४ च्या महिला धोरणानुसार राज्यात लिंगसमानतेला केंद्रस्थानी ठेवत अनेक सुधारणावादी कायदे केले गेले. त्याच्या अंमलबजावणीमध्ये नावीन्यपूर्णता आणली जात आहे. महिलांचे आर्थिक, सामाजिक सक्षमीकरण करणे त्यांना दर्जा आणि संधीची समानता उपलब्ध करून देण्यासाठी नियम, कायद्यांमध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्याला आम्ही प्राधान्य देत आहोत.

पोषण आहाराचे वाटप करताना आशा सेविका.

करण्यासाठी केलेल्या उपाययोजनांमुळे कुठेही बालकांच्या जीविताला धोका पोहोचला नाही.

'फोस्टर केअर' योजना

बालगृहांमध्ये दाखल असलेल्या अनाथ बालकांची दत्तकप्रक्रिया करण्यासाठी खूप प्रयत्न येतात. मात्र प्रत्येकच प्रकरणात दत्तकप्रक्रिया होते असेही नाही. त्यामुळे अशा बालकांना कौटुंबीक वातावरणाचा जिव्हाळा मिळावा म्हणून 'फॉस्टर केअर' (प्रतिपालकत्व) योजना आम्ही

कोविडकाळात 'माविम' बचतगटांची कामगिरी

● ऑगस्टपर्यंत २५ लाखाहूंन अधिक मास्कची निर्मिती; ४.५ कोटी रुपयांची उलाढाल. ● पोलीस, अंगणवाडी सेविका, आशा कार्यकर्त्या अशा कोविड योद्ध्यांना मोफत मास्क वितरण. ● १२ जिल्ह्यात माविमच्या २९ सीएमआरसींकडून शिवभोजन थाळी केंद्रांचे संचालन; ऑक्टोबरअखेर ५.५ लाखाहून अधिक थाळीवाटप आणि जवळपास २.५ कोटी रुपयांची उलाढाल. ● गरजू कुटुंबांना जीवनावश्यक वस्तू, तयार जेवणाचा मोफत पुरवठा. ● टाळेबंदीमध्ये मुंबई, ठाणे, नवी मुंबई परिसरासह २७ जिल्ह्यांमध्ये सुमारे २ हजार ५०० मे.टन भाजीपाल्याचे माफक दराने वितरण. ● नंदूरबारप्रमाणेच 'धान्य बँक' हा उपक्रम राबवत कोविडकाळात गरजवंतांना मोफत धान्यपुरवठा.

आणली आहे. यामध्ये अनाथ बालकांचे प्रतिपालकत्व घेऊ इच्छिणाऱ्यांना मुलांच्या संगोपनासाठी दरमहा २ हजार रुपये देण्यात येतील. यासाठी कुटुंबांना पुढे येण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

बालगृहांची नोंदणी

राज्यातील बालगृहांच्या नोंदणीचा मोठा कार्यक्रम हातात घेऊन अपात्र संस्था बंद करण्यात आल्या. ३७ शासकीय तसेच नियमांचे पालन करत चांगले काम करत असलेल्या ४१३ अशासकीय संस्थांच्या नोंदणीला मान्यता दिली. त्यामुळे संस्थांच्या कामकाजात पारदर्शकता व संनियंत्रणात सुलभता शक्य होणार आहे.

बालविवाहांना प्रतिबंध

बालविवाहांची गंभीर समस्या कोरोना काळात अधिकच प्रकर्षाने जाणवली. एप्रिल ते ऑगस्टच्या कालावधीत माहिती मिळालेले सुमारे २०८ बालविवाह यंत्रणेने वेळीच हालचाल करून रोखले. परंतु, बालविवाह रोखण्यासाठी सामाजिक जागृतीबरोबरच कायदाही अधिक प्रभावी करण्याची गरज आहे. त्यासाठी बाल विवाह (प्रतिबंध) अधिनियम, २००६ च्या अंमलबजावणीसाठी राज्यात करण्यात आलेल्या बालविवाह प्रतिबंध नियम २००८ मध्ये सुधारणा करण्याचे आम्ही ठरवले असून, त्यासाठी तज्ज्ञांची मसुदा समिती गठित केली आहे.

महिलांच्या उन्नतीसाठी 'माविम'

आमचे एक महत्त्वपूर्ण घटक असलेले 'महिला आर्थिक विकास महामंडळ' अर्थात 'माविम' महिलांच्या उन्नतीसाठी उत्तम काम करत आहे. याअंतर्गत सुमारे १ लाख ३९ हजार महिला स्वयंसाहाय्यता बचतगट निर्माण करण्यात आले असून, १७ लाख महिला जोडल्या गेल्या आहेत. तसेच ३६१ लोकसंचलित साधन केंद्रे (सीएमआरसी) म्हणजेच बचतगटांचे फेडरेशन स्थापन झालेले असून त्या माध्यमातून ग्रामीण महिलांचे संघटन, त्यांची क्षमता बांधणी, उद्योजकता विकास यासाठी माविमकडून काम केले जाते. मानव विकास निर्देशांकानुसार आकांक्षित जिल्ह्यांमध्ये 'तेजश्री फायनान्शिअल सर्व्हिसेस'ची सुरुवात करण्यात आली आहे. त्याद्वारे अतिगरीब व कर्जबाजारी कुटुंबांना बँकिंग सेवेद्वारे नवीन कर्ज आणि रोजगारक्षम बनवून पुढील तीन वर्षांमध्ये त्यांना गरिबीतून बाहेर काढण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

राज्यातील ग्रामीण महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी नुकतीच मान्यता देण्यात आलेला 'नव तेजस्विनी- महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्प' क्रांतिकारी ठरणार आहे. सुमारे १० लाख कुटुंबांना दारिद्र्यरेषेतून कायमचे बाहेर काढण्याचा प्रयत्न या माध्यमातून होणार आहे. आंतरराष्ट्रीय कृषी विकास निधी (आयफॅड) साहाय्यित ५२३ कोटी रुपयांचा हा प्रकल्प असणार आहे.

माविम 'ई- बिझनेस प्लॅटफॉर्म'

बचतगटाच्या महिलांच्या 'ई - बिझनेस प्लॅटफॉर्म' ॲपद्वारे शेतमालाची रिअल टाईम माहिती संकलित करून बाजारपेठेची मागणी आणि बाजारभाव पाहून त्यानुसार शासकीय व खासगी संस्थांसोबत व्यापार करण्यास मदत होणार आहे. २.५ लाखांपेक्षा जास्त महिला शेतकऱ्यांची माहिती संकलित करण्यात आली असून त्यांना याचा लाभ मिळत आहे.

महिला व बालविकास भवन

महिला व बालकांशी संबंधित सर्व कार्यालये एकाच छताखाली यावीत आणि योजनांचे लाभ आणि सेवांची माहिती यासाठी एकाच ठिकाणी संपर्क साधता यावा; लोकांचा पैसा, वेळ आणि त्रास वाचावा या हेतूने प्रत्येक जिल्ह्यात 'महिला व बालविकास भवन' उभारण्याची घोषणा शासनाने केली. त्यानुसार प्राथमिकरीत्या या वर्षी १५ ऑगस्ट रोजी सर्व जिल्ह्यात जिल्हा परिषदेतील एकात्मिक बालविकास सेवा योजना कार्यालयात अशा प्रकारचे भवन सुरू करण्यात आले असून, पुढील काळात सर्व जिल्ह्यात स्वतंत्र इमारती उभारून सर्व कार्यालये एकाच ठिकाणी आणण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील.

राज्य शासन सर्वच घटकांप्रति संवेदनशील आणि बांधिलकी असलेले असून त्यातून नुकताच आम्ही उपेक्षित आणि कोविड काळात परिस्थिती अत्यंत हालाखीची झाली, अशा वेश्या व्यवसायातील महिलांना दरमहा प्रत्येकी ५ हजार रुपये आणि त्यापैकी ज्यांना शाळेत जाणारी मुले आहेत, त्यांच्यासाठी अतिरिक्त २ हजार ५०० रुपये देण्याचा निर्णय घेतला आहे.

एकूणच आम्ही महिला, बालके तसेच वंचित घटकांच्या विकासासाठी तसेच समस्या निर्मूलनासाठी शक्य ते सर्व प्रयत्न करत आहोत. पुढील काळातही आपण सर्वांना बरोबर घेऊन प्रगतीची पावले टाकत राहू, असा विश्वास मला आहे.

शब्दांकन : सचिन गाढवे,
विभागीय संपर्क अधिकारी

गेल्या वर्षभरात अनेक जलसंधारणाची कामे राज्य शासनाने हाती घेतली आहेत. मुख्यमंत्री जलसंचय योजना, राज्यात सुमारे ८ हजार जलसंधारण योजनांचे पुनरुज्जीवन, नियोजनपूर्वक जलसंधारण, नादुरुस्त प्रकल्पांची दुरुस्ती तसेच जमिनीच्या उपयोगितेनुसार माथ्यापासून पायथ्यापर्यंत पाणलोट क्षेत्र आधारित मृद् व जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य दिले जात आहे. राज्यातील जलसंचय वाढीवर व जमिनीची होणारी धूप थांबवण्यावर भर दिला जात आहे. त्या दृष्टीने राज्य शासनातर्फे विविध योजना व उपक्रम राबवले जाणार आहेत.

जलसंधारणातून जलसमृद्धी

शंकरराव गडाख
मंत्री, मृद् व जलसंधारण

लोक सहभागावर तसेच नैसर्गिक साधनसंपत्तीवर आधारित राज्यातील ग्रामीण भागातील सर्व कार्यामध्ये जल व मृद् संधारणाच्या प्रथा खोलवर रुजवून हरित ग्रामीण महाराष्ट्राची उभारणी करण्यास व गतीने कामे करण्यास राज्य शासन प्राधान्य देत आहे.

पूर्वीच्या योजनांतर्गत झालेल्या कामांचा अभ्यास करून योग्य कामांना गती देण्याचाही प्रयत्न करण्यात येत आहे.

मृद् व जलसंधारण कार्यक्रमामध्ये लोक सहभागास प्रोत्साहन देण्यासाठी नियोजनात्मक कार्यक्रम आखण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री जलसंवर्धन योजना

राज्यातील विविध योजनांमधून जलसंधारणाची कामे करण्यात आली आहेत. त्यांची देखभाल व दुरुस्ती अभावी आवश्यक तेवढा जलसंचय होत नसल्याने मुख्यमंत्री जलसंवर्धन ही नवीन महत्त्वपूर्ण योजना सुरू करण्यात आली आहे. यामुळे राज्यातील जलसाठ्यात मोठी वाढ होणार आहे. या योजनेसाठी आणि इतर जलसंधारणाच्या कामांकरिता निधी राखून ठेवण्यात आला आहेत.

नादुरुस्त प्रकल्पांची दुरुस्ती

जलसंधारण विभाग, जलसंपदा, पाणी पुरवठा, कृषी विभाग व सर्व जिल्हा परिषद यांच्याकडील १६ हजार नादुरुस्त प्रकल्पांची दुरुस्ती करण्यासाठी मृद् व जलसंधारण विभागाकडून विशेष मोहीम राबवण्यात येत आहे. या दुरुस्तीमुळे ८ लक्ष ३१ हजार टी.सी.एम. पाणीसाठा पुनर्स्थापित होणार

जलसंधारण योजनांचे पुनरुज्जीवन

राज्यात सुमारे ८ हजार जलसंधारण योजनांचे पुनरुज्जीवन केल्याने विकेंद्रित जलसाठे निर्माण होतील. भूजल पातळीत वाढ होईल, तसेच संरक्षित सिंचन क्षमता निर्माण होईल, त्यासाठी मुख्यमंत्री जलसंवर्धन योजना महत्त्वाची आहे. याकरिता १३४१ कोटींचा आराखडा प्रस्तावित आहे. राज्यात ० ते ६०० हेक्टर सिंचन क्षमता असणारे सुमारे ९७ हजार प्रकल्प बांधले आहेत. यामध्ये सिमेंट नाला बांध, माती नाला बांध, कोल्हापुरी पद्धतीचे बंधारे, गावतळे, पाझर तलाव, साठवण तलाव, लघुसिंचन योजना कामांचे; बांधकामानंतर किरकोळ दुरुस्तीअभावी अनेक प्रकल्पांची साठवण क्षमता व सिंचन क्षमता कमी झाली असल्याचे आढळून आल्याने ही योजना संजीवनी ठरणार आहे.

आहे. तसेच १ लक्ष ९० हजार सिंचन क्षमताही पुनर्स्थापित होणार आहे. यासाठी २०२०-२१ च्या अर्थसंकल्पात ३३७ कोटी रुपये तरतूद करण्यात आलेली आहे. ही सर्व कामे येत्या ३ वर्षांत पूर्ण करण्यात येणार आहेत.

जमिनीच्या उपयोगितेनुसार कामे

महाराष्ट्रातील ३०७ लक्ष हेक्टर भौगोलिक क्षेत्रापैकी ७५ टक्के क्षेत्र वाहितीखाली आहे. यातील बरेच क्षेत्र पावसावर आधारित कोरडवाहू क्षेत्रात मोडत असल्यामुळे राज्याचे बहुतांश कृषी व्यवस्थापन हे कोरडवाहू शेती व्यवसायावर अवलंबून आहे. राज्यात प्रवाही सिंचनाद्वारे मोठ्या प्रमाणातील क्षेत्र सिंचनाखाली आणण्यास वाव आहे. राज्यामध्ये पाणलोट क्षेत्र आधारित मृद् व जलसंधारणाची कामे माथ्यापासून पायथ्यापर्यंत जमिनीच्या उपयोगितेनुसार करण्यात येणार आहेत.

नियोजनपूर्वक जलसंधारण

येत्या काळात उपलब्ध होणाऱ्या पाण्याचे नियोजन काटेकोरपणे व कौशल्याने करण्यात येणार आहे. कमी पर्जन्यमान, पावसातील खंड व असमान वितरण अशा प्रसंगी संरक्षित सिंचनाच्या आधारे पिकांना वाचवावे लागते. शेततळ्याच्या उपाययोजनेमुळे संरक्षित पाणी देणे शक्य होणार आहे. पावसाळ्यात भरपूर पाणी आणि उन्हाळ्यात पिण्यासाठी हाल, अशी स्थिती काही भागांची होते. मृद् व जलसंधारणाच्या कामातून पिण्याच्या पाण्याची सोय त्यासोबतच वर्षभरात दोन ते तीन पिके शेतकरी घेऊ शकतील, याची खबरदारी घेतली जाणार आहे. त्याप्रमाणे नियोजनपूर्वक पावले उचलली जाणार आहेत.

जमिनीची धूप थांबवणार

पावसाच्या पाण्याच्या माऱ्याने, पाण्याच्या वेगवान प्रवाहाने तसेच वाऱ्याच्या झोताने जमिनीतील क्रियाशील सूक्ष्म कण, तसेच माती वाहून नेली जाते. या शेतजमिनीच्या धुपेमुळे होणारी मातीची घट थांबवणे अत्यंत गरजेचे आहे. यासाठी

एक वर्ष महाराष्ट्र सेवेचे महाविकास आघाडीचे

ढाळीचे बांध करून पावसाचे पाणी अडवले जाऊन जमिनीतील वाहून जाणारे मातीचे कण, अन्नांश, तसेच ओलावा जमिनीतच साठवण्याचे काम करण्यास भविष्यात प्राधान्य देण्यात येणार आहे.

पाणलोट क्षेत्रातील डोंगराच्या उताराहून खालील भागात वेगात वाहत येणारे पाणी समपातळी चरामध्ये अडवल्याने पाण्याचा वेग कमी होतो. तसेच पाण्याबरोबर वाहत आलेली माती चरामध्ये साठून राहिल्यामुळे झाडांची वाढ जोमाने होते. समपातळी चरामध्ये साठलेली माती ही दर तीन वर्षांनी काढून टाकून चर पुन्हा पूर्वीप्रमाणे होतील याप्रमाणे व्यवस्थापन ठेवण्यासाठी विविध उपाययोजना राबवण्यात येणार आहेत.

बंधारे उभारणार

जलसंधारणाच्या दृष्टीने नालाबांध महत्त्वाचा आहे. नाल्यातून वाहून येणारे पाणी पावसाळ्यानंतर येथे साठून राहते. हे पाणी जमिनीत मुरल्यामुळे बांधाच्या खालच्या भागातील विहिरींच्या पाण्याच्या

पातळीत वाढ होते. त्यामुळे पाणी साठवण क्षमता कायम राहील. ज्या ठिकाणी पाण्याचा साठा अधिक होऊ शकेल आणि वाहणाऱ्या पाण्याचे कमी रुंदीचे पात्र लक्षात घेऊन असे बंधारे लोकसहभागातून राबवण्याचा संकल्प आहे.

शब्दांकन : राजू धोत्रे,
विभागीय संपर्क अधिकारी

राज्यातील सर्वसामान्य जनतेच्या कल्याणासाठी गेल्या वर्षभरात सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागामार्फत अनेक महत्त्वपूर्ण निर्णय आम्ही घेतले आहेत आणि पुढेही घेणार आहोत. इंदू मिल येथे उभारण्यात येणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य स्मारक निर्मितीला वेग देण्यात आला असून, सर्वसामान्य घटकांसाठी प्रशिक्षण, वसतिगृहांची उभारणी आदी कामेही प्राधान्याने केली जात आहेत. लॉकडाऊन काळातही सर्वसामान्यांना दिलासा देणारे अनेक निर्णय घेतले आहेत.

धनंजय मुंडे
मंत्री, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य

सामाजिक न्याय केंद्रस्थानी

इंदू मिल येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक उभारणी व संनियंत्रणाची जबाबदारी सामाजिक न्याय विभागाकडे देण्यात आली आहे. येणाऱ्या काळात उभे राहणारे हे भव्य स्मारक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मृती आणि विचारातून आम्हाला पिढ्यान्पिढ्या प्रेरणा देत राहील.

३५ लाख लाभार्थ्यांना साहाय्य

राज्य पुरस्कृत संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती योजना, केंद्र पुरस्कृत इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तिवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तिवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्तिवेतन योजनेतील ३५ लाख लाभार्थ्यांना आतापर्यंत ३१९२ कोटी रुपये वितरण करण्यात आले आहेत.

कुटुंब लाभ योजना

केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय सामाजिक साहाय्य कार्यक्रमाखालील राष्ट्रीय कुटुंब लाभ योजनेंतर्गत दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाच्या यादीत नाव असलेल्या १८ ते ५९ वयोगटातील कर्ता स्त्री/पुरुष मरण पावल्यास त्याच्या कुटुंबीयांना एकरकमी २० हजार इतके अर्थसाहाय्य देण्यात येते. याबाबतचे अर्ज स्वीकारण्याची मुदत कर्ता स्त्री किंवा पुरुष मरण पावल्यानंतर एक वर्षाच्या आत अशी होती, ती आता वाढवून तीन वर्षे इतकी करण्यात आली आहे.

शिष्यवृत्ती नियमात बदल

अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या परदेश शिष्यवृत्ती योजनेच्या नियमात सुधारणा करण्यात आली. अनुसूचित जाती आणि नवबौद्ध घटकातील मुला-मुलींना परदेशात विशेष अध्ययन करण्यासाठी राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना राबवली जाते. या योजनेंतर्गत दरवर्षी अनुसूचित जाती आणि नवबौद्ध प्रवर्गातील ७५ विद्यार्थ्यांची निवड केली जाते. पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेताना त्याच अभ्यासक्रमाची पदवी आवश्यक असल्याने अनेक विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहत होते. आता या निर्णयात बदल करण्यात आला असून एखाद्या शाखेतील विद्यार्थ्यास परदेशातील विद्यापीठाने शासनाने अनुज्ञेय केलेल्या अन्य शाखेच्या पदुव्यत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश दिला असल्यास विद्यार्थ्याला या शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळणार आहे.

परदेश शिष्यवृत्तीसाठी संबंधित विद्यार्थी संलग्न विद्यापीठात शिक्षणासाठी पूर्णवेळ प्रवेशित असणे अनिवार्य आहे, कोविड-१९ महामारीच्या काळात अनेक विद्यार्थी भारतात किंवा परदेशात राहून ऑनलाइन पद्धतीने त्या त्या विद्यापीठात शिक्षण घेत आहेत. असे पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीच्या लाभापासून वंचित राहू नयेत, यासाठी विशेष बाब म्हणून कोविड प्रादुर्भाव संपुष्टात येईपर्यंत व संबंधित विद्यापीठ पूर्ववत सुरू होईपर्यंत या योजनेतील भारतात किंवा परदेशात राहून ऑनलाइन शिक्षण घेत असलेल्या पात्र विद्यार्थ्यांना अनुज्ञेय फी व

इंदू मिल येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक उभारणीच्या कामाचा आढावा घेताना सामाजिक न्याय मंत्री धनंजय मुंडे व खासदार शरद पवार.

शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी या वर्षी आतापर्यंत १२ कोटी रुपये निधी वितरित करण्यात आला आहे.

इतर महत्त्वाचे निर्णय

अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांची मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व फ्रीशिपच्या शिष्यवृत्तीसाठी ८३७.६९ कोटी रुपये मंजूर करून वितरित करण्यात आले. जात वैधता प्रमाणपत्र पडताळणीसाठी संपूर्ण ऑनलाइन पद्धतीने व दुप्पट वेगाने प्रक्रिया सुरू केली आहे.

तृतीयपंथीयांच्या कल्याणासाठी व त्यांच्या हक्कांच्या रक्षणासाठी स्थापन केलेल्या महामंडळावर सदस्यांची नियुक्ती करण्यात आली. तृतीयपंथीयांच्या समस्या / तक्रारी याचे निवारण करण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय तक्रार निवारण समितीची स्थापना करण्यात आली आहे.

हिंगोली जिल्ह्यातील शहीद जवान कवीचंद भालेराव यांच्या वीरमाता रुख्मिनबाई भालेराव यांना वय व दारिद्र्य रेषा या दोन्ही अटी शिथिल करून कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण योजनेंतर्गत जमीन देण्याचा निर्णय विशेष बाब म्हणून घेण्यात आला आहे.

मुंबईस्थित पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या सिद्धार्थ महाविद्यालयास विविध विकासकामांसाठी १२ कोटी ७९ लाख रुपये निधी देण्यात आला आहे.

ज्येष्ठ नागरिक व दिव्यांगांसाठी

कर्णबधिर प्रवर्गातील दिव्यांग व्यक्तींना कोविड-१९ची योग्य माहिती पोहोचवण्याच्या दृष्टीने सांकेतिक भाषेमध्ये व्हिडिओ निर्मिती केली. हालचाल करू न शकणाऱ्या दिव्यांग - ज्येष्ठ नागरिकांसाठी जिल्ह्याच्या दिव्यांग कल्याण निधीतून एक महिन्याचे रेशन, आवश्यक किराणा तसेच आरोग्यविषयक जीवनावश्यक वस्तू यांचे किट वाटप करण्यात आले. कोरोना विषाणू संसर्गाबाबत तत्काळ माहिती देण्यासाठी सर्व महानगरपालिका व जिल्हा समाज कल्याण कार्यालयांमध्ये दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक यांच्यासाठी स्वतंत्र मदत कक्ष स्थापन केले. मुंबई, पुणे, बुलडाणा यांसह काही जिल्ह्यांमध्ये कम्युनिटी किचनच्या माध्यमातून हजारो दिव्यांग व एकटे राहणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना मोफत जेवण देण्यात आले.

ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ

लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ नोंदणी, रचना, स्थापना, कार्यालय आदी बाबींना बैठकांच्या माध्यमातून वेग आला असून महामंडळ नोंदणीची प्रक्रिया लवकरच पूर्ण होईल, तसेच डिसेंबर अखेरपर्यंत महामंडळाचे कामकाज प्रत्यक्षात सुरू होईल. लॉकडाऊनच्या दुसऱ्या टप्प्यात १७ एप्रिल २०२० रोजी राज्याच्या विविध भागांत अडकलेल्या एक लाख ४१ हजार ऊसतोड मजुरांचे राज्यातील सर्वात मोठे यशस्वी स्थलांतर करण्यात आले.

स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन

पुणे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत महाराष्ट्रातील सर्व उमेदवारांसाठी एम.पी. एस.सी. परीक्षेसाठी ऑनलाइन कोचिंग सुरू करण्याचा निर्णय घेतला. याअंतर्गत बहुसंख्य विद्यार्थी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन घेत आहेत.

स्वाधार योजनेचा विस्तार

शासकीय वसतिगृहात प्रवेशास पात्र असूनही प्रवेश न मिळू शकलेल्या ११ वी व त्यापुढील उच्च शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जाती व नवबौद्ध विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या स्वाधार योजनेचा विस्तार तालुकास्तरापर्यंत करण्याचा व शहरापासून ५ कि.मी. हद्दीपर्यंत महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना लागू असलेल्या योजनेतील सवलती १० कि.मी.पर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव विविध मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती

पीएच.डी. व एम.फिलचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना दिली जाणारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (BANRF) कोरोनामुळे या वर्षी १०५ ऐवजी पात्र सर्व ४०८ विद्यार्थ्यांना देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या व यासम अनेक उपाययोजनांच्या माध्यमातून कोरोना काळात नागरिकांना दिलासा व आधार मिळवून देण्यासाठी विशेष प्रयत्न केले.

अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील मान्यवर व्यक्तींचे स्मारक बांधणे तसेच अनुसूचित जातीसाठी सांस्कृतिक व ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्व असलेल्या स्थळांचा विकास करणे व अनुसूचित जातीच्या सांस्कृतिक व नीतिमूल्यांवर आधारित विकास साधणाऱ्या प्रकल्पांसाठी, स्वयंसेवी संस्थांना अनुदान मंजूर करण्याविषयीच्या ५ नोव्हेंबर २०२० रोजीच्या शासन निर्णयामध्ये या योजनेचा जास्तीत जास्त लाभ हा अनुसूचित जातीतील व्यक्तींनाच होईल या अनुषंगाने सुधारणा करण्यात आली आहे.

राज्य सरकारवरील कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव आणि आर्थिक ताण असे दुहेरी संकट असताना एकीकडे आपल्या नागरिकांचे प्राण वाचवणे, नागरिकांना कोरोनापासून सुरक्षित ठेवणे हे क्रमप्राप्त आद्य कर्तव्य आहे. त्याचबरोबरीने राज्याचे अर्थचक्र सुरू ठेऊन, विविध योजना, विकासकामे हाती घेणे व ती पूर्णत्वास घेऊन जाणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. यासाठी सामाजिक न्याय विभागामार्फत आणखी नावीन्यपूर्ण उपक्रम हाती घेण्यात येणार आहेत.

शब्दांकन : दत्तात्रय कोकरे,
विभागीय संपर्क अधिकारी

राज्य शासनाच्या पर्यावरण आणि वातावरणीय बदल, पर्यटन आणि राजशिष्टाचार या तिन्ही विभागांनी मागील वर्षभरात खूप चांगली वाटचाल केली. या तिन्ही विभागांची सांगड घालून राज्याचे पर्यावरण संवर्धन करण्याबरोबरच पर्यटन वाढवण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. राज्याचा पर्यावरणपूरक विकास व्हावा, यासाठी ठामपणे पावले उचलली गेली.

आदित्य ठाकरे
मंत्री, पर्यावरण आणि वातावरणीय बदल, पर्यटन, राजशिष्टाचार

पर्यावरणाचे जतन आणि संवर्धन करणे, या कामी लोकांचा सहभाग वाढवणे या अनुषंगाने 'माझी वसुंधरा' अभियानाचा महात्मा गांधी जयंतीदिनी शुभारंभ करण्यात आला आहे. पहिल्या टप्प्यात राज्यातील ३९५ शहरे आणि ३३९ मोठ्या ग्रामपंचायतींमध्ये हे अभियान राबवण्यात येणार आहे. उत्कृष्ट काम करणारी ३ अमृत शहरे, ३ महापालिका, ३ नगरपंचायती आणि ३ ग्रामपंचायतींना ५ जून या जागतिक पर्यावरण दिनी पुरस्काराने सन्मानित करण्यात येईल. याशिवाय प्रत्येक जिल्ह्यात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शहरी आणि ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांनाही पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

क्रांतिकारी निर्णय

वातावरणीय बदल या विषयावर व्यापक कार्य करण्याच्या अनुषंगाने पर्यावरण विभागाचे नाव आता 'पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग' करण्यात आले आहे. निसर्गाशी संबंधित पृथ्वी, वायू, जल, अग्नी आणि आकाश या पंचतत्त्वांवर विभाग घेऊन पर्यावरणपूरक विकास राज्यात केला जाईल.

वृक्ष संगोपनाला चालना

वृक्ष संरक्षण व जतनासंदर्भात कायद्याचे नियमन नगरविकास विभागाऐवजी आता पर्यावरण व वातावरणीय बदल विभागामार्फत करण्यात येणार आहे. वातावरणीय बदलाच्या दृष्टीने कृतिआराखडा तयार करण्यात आला असून वृक्षलागवड, अस्तित्वातील वृक्षांचे जतन व संगोपन हे मुख्य उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. राज्य सिंगलयूज प्लास्टिकमुक्त करण्याचा निर्धार करण्यात आला आहे. याचीही प्रभावी अंमलबजावणी करून राज्य स्वच्छ, सुंदर करण्यात येईल.

समृद्ध वारसा आणि पर्यावरणाचे जतन

मुंबईतील माहुल भागामधील प्रदूषण नियंत्रणासाठी पहिल्या टप्प्यात या भागातील ३०० घरांचे पुनर्वसन करण्यात आले. माहुल भागातील प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी पाठपुरावा करण्यात येत आहे.

केंद्र शासनाकडे पाठपुरावा केल्याने ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाजवळील खाणीचा लिलाव रद्द करण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतला. यामुळे वन्यजीव कॉरिडॉरचे संरक्षण साध्य झाले आहे. त्याचबरोबर पर्यावरण प्रेमी कार्यकर्ते, स्वयंसेवी संस्था यांच्या सोबतीने पाठपुरावा केल्याने सांगली जिल्ह्यातील महामार्गाच्या कामात येणारा ४०० वर्षांपूर्वीचा वटवृक्ष वाचवण्याचा निर्णयही केंद्राने घेतला. यासाठी महामार्गाच्या कामात बदल करण्यात आला.

पर्यटनाला चालना

राज्यातील पर्यटनाला चालना देण्याच्या अनुषंगानेही वर्षभरात मोठे निर्णय घेण्यात आले. या दृष्टीने जगभरातील पर्यटकांना महाराष्ट्राकडे आकर्षित करण्यासाठी विविध धोरणात्मक निर्णय घेण्यात येत आहेत. हॉस्पिटॅलिटी म्हणजेच आदरातिथ्य क्षेत्रासाठी क्रांतिकारी निर्णय घेण्यात आले आहेत. राज्यात आदरातिथ्य उद्योग सुरू करण्यासाठी आता ७० परवानग्यांऐवजी फक्त १० परवानग्या तसेच ९ स्वयंप्रमाणपत्रे लागतील. शिवाय आदरातिथ्य क्षेत्राला उद्योगाचा दर्जा देण्यात आला आहे. यामुळे या क्षेत्रातील व्यावसायिकांना उद्योगांसाठीचे सर्व लाभ मिळणार आहेत.

पर्यटन धोरण

राज्याचे कृषी पर्यटन धोरण जाहीर करण्यात आले आहे. यामुळे शेतकऱ्यांना कृषिपूरक व्यवसाय उपलब्ध होऊन ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळणार आहे.

पर्यावरणपूरक विकास

कार्य करणार आहे. आरे येथील सुमारे ३२८.९ हेक्टर (सुमारे ८१२.७ एकर) जमीन राखीव वन म्हणून जाहीर करण्यात आली आहे. मागील वर्षातील हा एक क्रांतिकारी निर्णय ठरला आहे. या जमिनीवर प्रस्तावित असलेले मेट्रोचे कारशेड कांजुरमार्ग येथे हलवण्याचा निर्णय झाला. निसर्गाला ओरबाडून विकास नको. निसर्गाला सोबत

सांगली जिल्ह्यातील ४०० वर्षांपूर्वीचा वटवृक्ष

याबरोबरच कोकणच्या विकासाला चालना देणारे बीच शॅक धोरणही जाहीर करण्यात आले आहे. यामध्ये स्थानिकांना ८० टक्के रोजगार देण्याची अट घालण्यात आली आहे. पथदर्शी प्रकल्प म्हणून रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर, आरेवारे; सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुणकेश्वर, तारकर्ली; रायगड जिल्ह्यातील वर्सोली, दिवेआगार आणि पालघर जिल्ह्यातील केळवा व बोर्डी या आठ किनाऱ्यांवर बीच शॅक्स उभारण्यात येणार आहेत. राज्याचे कॅराव्हॅन पर्यटन धोरण तसेच साहसी पर्यटन धोरण निश्चित करण्यासाठी प्रक्रिया सुरू आहे.

मुंबईत पर्यटन आणि रोजगाराला चालना देण्यासाठी मिल्स कंपाउंड इत्यादी बिगरनिवासी क्षेत्रात मुंबई २४ X ७ ला संमती देण्यात आली आहे. एमटीडीसीमार्फत 'मोटोहोम कॅम्परव्हॅन'चा शुभारंभ करण्यात आला असून हे एक चालते-फिरते घरच आहे. एमटीडीसीच्या संकेतस्थळावरून याचे बुकिंग करता येईल. एमटीडीसी आणि मुंबई क्रिकेट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबईतील वानखेडे स्टेडिअमची सफर करण्यासाठी उपक्रम सुरू करण्यात येत आहे. मुंबई महापालिका मुख्यालय इमारतीच्या हेरिटेज वॉकसाठी महापालिका आणि एमटीडीसीमध्ये सामंजस्य करार करण्यात आला आहे. महापालिकेची इमारत ही फार सुंदर असून, लोकांना आता ही इमारत आतून पाहता येईल.

गंगापूर (जि. नाशिक) येथे एमटीडीसी ग्रेप पार्क रिसॉर्ट आणि बोट क्लब सुरू करण्यात आले आहे. खारघर (नवी मुंबई) येथे एमटीडीसी रेसीडेन्सी पर्यटक संकुल सुरू करण्यात आले आहे.

एमटीडीसी आता नवीन लोगोसह पर्यटकांच्या भेटीला येत आहे. नव्या लोगोमधून महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन घडते. या नवीन लोगोचे तसेच नाशिक येथील बोट क्लबचा लोगो, एमटीडीसीच्या फिडबॅक क्यूआर कोडचे अनावरण करण्यात आले. फिडबॅक क्यूआर कोडसारख्या तंत्रज्ञानाच्या वापरामुळे एमटीडीसीचे कामकाज अधिक डिजिटल होणार आहे.

पर्यावरणपूरक कामे

औष्णिक ऊर्जा प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या फ्लाय ॲशचा वापर हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गाच्या बांधकामात करण्यासंदर्भात चर्चा झाली आहे. याचबरोबर महामार्गांचा पर्यावरणपुरक विकास करण्यास चालना देण्यात येत आहे. महामार्गांवर सौर ऊर्जेचा वापर, रेन वॉटर हार्वेस्टिंग, दुतर्फा तसेच विभाजकांवर वृक्षारोपण करण्याच्या दृष्टीने पुढाकार घेण्यात आला आहे.

पर्यावरणपूरक अशा इलेक्ट्रिक वाहनांच्या वापरास चालना देण्यात येत आहे. इलेक्ट्रिक वाहन निर्मितीतील आद्य कंपनी टेस्लासमवेत राज्यात गुंतवणुकीसाठी नुकतीच चर्चा करण्यात आली आहे. इलेक्ट्रिक वाहनांच्या वापरासाठी विविध सवलती देण्यात येत आहेत. सद्य:स्थितीत कोरोनासंकटाच्या पार्श्वभूमीवर उद्योगांना महाराष्ट्रात उद्योग स्थापन करण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने संमतिपत्र प्रदान करण्यासाठीची कालमर्यादा कमी करण्याचा निर्णय घेतला आहे.

पायाभूत पर्यटन सुविधा

राज्यातील होम स्टे पर्यटनास चालना देण्याच्या अनुषंगाने एअर बीएनबीसोबत सामंजस्य करार करण्यात आला आहे. 'लंडन आय'च्या धर्तीवर मुंबईत 'मुंबई आय'ची निर्मिती, मुंबईत आंतरराष्ट्रीय दर्जाचे मल्टिलेव्हल ॲक्वेरिअम (मत्स्यालय), मुंबई विद्यापीठ परिसराचा हेरिटेज विकास, गेट वे ऑफ इंडियासह मुंबईतील विविध स्थळांचा पर्यटनदृष्ट्या विकास करण्याच्या दिशेने पावले उचलली जात आहेत. देश-विदेशातील पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी बृहन्मुंबई पर्यटन विकास प्रकल्प राबवण्यात येणार आहे.

पर्यटन केंद्र

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ला तालुक्यातील मौ. शिरोडा वेळागर येथे पंचतारांकित पर्यटन केंद्र उभारण्यासाठी ताज ग्रुपच्या मे. इंडियन हॉटेल्स कंपनीला ५४.४० हेक्टर जमीन ९० वर्षाच्या दीर्घ मुदतीच्या भाडेपट्ट्याने देण्यात आली. चंद्रपूर जिल्ह्यातील वन्यजीव पर्यटनास चालना देण्यासाठी थ्रिविंग हॉटेल्स प्रा.लि.सोबत सामंजस्य करार करण्यात आला आहे.

मोकळ्या जमिनींचा विकास

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या ताब्यातील शासकीय जमिनींचा आणि मालमत्तांचा पर्यटनदृष्ट्या विकास करण्यासाठी खासगीकरणाच्या धोरणास तत्त्वत: मान्यता देण्यात आली आहे.

पर्यटनस्थळांचा दर्जा

छत्रपती शिवाजी महाराजांचे सरसेनापती प्रतापराव गुजर यांचे जन्मगाव भोसरे (जि. सातारा), ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे जन्मगाव नायगाव (जि. सातारा), हत्ती बेट-देवर्जन (जि. लातूर), श्री क्षेत्र महाबळेश्वर (जुने महाबळेश्वर) (जि. सातारा), महाबळेश्वर नगरपालिका क्षेत्र (जि. सातारा), पाचगणी नगरपालिका क्षेत्र (जि. सातारा) या सहा पर्यटनस्थळांना 'ब' वर्ग पर्यटनस्थळाचा दर्जा देण्यात आला आहे.

प्रभावी कामगिरी

राजशिष्टाचार विभागाचा जगभरातील विविध देशांचे कौन्सुलेट जनरल इत्यादींशी नित्य संपर्क असतो. या अनुषंगाने या विभागाची पर्यटन विभागाशी सांगड घालून देशविदेशातील पर्यटक महाराष्ट्राकडे आकर्षित करणे, त्यांच्यापर्यंत महाराष्ट्राच्या वैभवाची माहिती पोहोचवणे या अनुषंगाने काम करण्यात येत आहे.

शब्दांकन : इर्शाद बागवान,
विभागीय संपर्क अधिकारी

जनकल्याणाच्या अनेक महत्त्वाच्या निर्णय प्रक्रियेत राज्यमंत्री या नात्याने सहभागी होता आले, याचा मला अभिमान आहे. डिजिटल ८-अ ची ऑनलाइन सुविधा, लिव्ह ॲण्ड लायसन्सबाबतचा निर्णय, बेघरांसाठी घरकुलांची उभारणी आदी निर्णयांच्या अंमलबजावणीतून सर्वसामान्यांचे जीवन अधिक सुखकर करण्याच्या दृष्टीने राज्य शासन प्रयत्न करत आहे. यापुढेही सर्वसामान्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे.

जनकल्याणासाठी बांधील

अब्दुल सत्तार
राज्यमंत्री, महसूल, ग्रामविकास, बंदरे, खार जमिनी विकास, विशेष साहाय्य

महसूल दिनाच्या पार्श्वभूमीवर महसूल विभागामार्फत डिजिटल ८-अ ची ऑनलाइन सुविधा नागरिकांसाठी उपलब्ध करून दिली. कंपनी एकत्रीकरण किंवा पुनर्रचनेसंबंधीच्या दस्तांसाठी आकारण्यात येणाऱ्या मुद्रांक शुल्कावर विहित केलेली कमाल मर्यादा २५ कोटींवरून ५० कोटींपर्यंत वाढवण्यास मंजुरी दिली.

जमिनीबाबत निर्णय

शासकीय जमिनींवरील सहकारी गृहनिर्माण संस्थांमधील सदनिका लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्त्वावर वापरण्याकरिता देताना आता जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्व परवानगीची आवश्यक नाही. तसेच त्यांना अवगत करण्याची गरज नाही. त्यामुळे शासनाने प्रदान केलेल्या शासकीय जमिनीवरील सहकारी गृहनिर्माण संस्थांमधील सदनिका लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्त्वावर वापरण्यास देण्यासंदर्भातील स्पष्ट निर्देश क्षेत्रीय महसूल अधिकारी आणि प्राधिकारी यांना दिले आहेत.

डिजिटल स्वाक्षरी

महसूल विभागाच्या महाभूमी प्रकल्पांतर्गत ई-फेरफार कार्यक्रम राबवला जातो. त्याअंतर्गत डिजिटल स्वाक्षरीत ७/१२ उपलब्ध करून देण्यात येत असून, आता डिजिटल स्वाक्षरीने खातेउतारा (गाव नमुना नं. ८-अ) देण्याची सुविधा ऑगस्ट २०२० पासून सुरू करण्यात आली आहे. राज्यात १.७५ लाख डिजिटल स्वाक्षरी खातेउतारे खातेदारांनी डाऊनलोड केले असून, त्यापोटी शासनाला १७.२५ कोटी रुपयांचा महसूल प्राप्त झाला आहे.

ग्रामविकासाला प्राधान्य

सरपंचाची निवड पूर्वीप्रमाणे ग्रामपंचायत सदस्यांमधून करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच स्मार्ट ग्राम योजनेचे 'आर. आर. आबा पाटील सुंदर गाव पुरस्कार योजना' असे नामकरण करण्यात आले. तसेच मोठ्या गावांमध्ये सांडपाणी, घनकचरा व्यवस्थापनासाठी शहरी दर्जाच्या सुविधा देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. ग्रामपंचायत निवडणुकीसाठी उमेदवारांना जातपडताळणी प्रमाणपत्र सादर करण्याच्या अटीमध्ये सूट देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. त्यामुळे अनेक उमदेवारांना या निर्णयामुळे दिलासा मिळाला आहे. मोठ्या गावांना जिल्हा वार्षिक योजनेतून २ कोटी रुपयांपर्यंत निधी देण्याचा निर्णय घेण्यात आला. ग्रामपंचायतींच्या उपसरपंचांना प्रथमच मानधन वितरित करण्यात आले.

कर्मचाऱ्यांना विमा कवच

जुनी निवृत्तिवेतन योजना लागू नसलेल्या जि.प. कर्मचाऱ्याचा सेवेत मृत्यू झाल्यास कुटुंबीयास १० लाख रुपये सानुग्रह अनुदान देण्याचा निर्णय घेतला. कोरोनामुक्तीसाठी काम करणारे ग्रामपंचायत कर्मचारी, संगणक परिचालक, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका, आशा गटप्रवर्तक, स्त्री परिचर यांना १ हजार रुपये प्रोत्साहनपर अनुदान वितरित करण्यात आले. कोरोनामुक्तीसाठी काम करणारे जि.प. अधिकारी, कर्मचारी, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका या सर्वांना ५० लाख रुपयांचे विमा संरक्षण देण्यात आले.

बेघरांना हक्काचे घर

ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून राज्यातील हजारो बेघरांना हक्काचे घर मिळाले आहे. ग्रामीण गृहनिर्माण (नोव्हेंबर २०१९ ते ऑक्टोबर २०२०) या काळात घरकुले निर्माण केली. त्यात प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण योजनेंतर्गत १ लाख ४८ हजार ५३२ घरकुले पूर्ण करण्यात आली. रमाई आवास योजनेंतर्गत २८ हजार ५१९ घरकुले पूर्ण करण्यात आली. शबरी आवास योजनेंतर्गत १२ हजार १५३ घरकुले पूर्ण करण्यात आली. पारधी आवास योजनेंतर्गत ७०८ घरकुले पूर्ण करण्यात आली. आदिम आवास योजनेंतर्गत ९९४ घरकुले उभारण्यात आली. तसेच पंडित दीनदयाळ उपाध्याय जागा खरेदी अर्थसाहाय्य योजनेंतर्गत ३५० लाभार्थ्यांना जमीन खरेदीसाठी अर्थसाहाय्य देण्यात आले. अतिक्रमण नियमानुकूल धोरणांतर्गत ७५०० अतिक्रमणधारकांची अतिक्रमणे नियमानुकूल करण्यात आली. ऑक्टोबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात मी कोकण दौरा केला होता. या परतीच्या पावसामुळे झालेल्या नुकसानीच्या संदर्भात पाहणी करून तत्काळ मदत देण्याचे आदेश दिले. तसेच या दौऱ्यादरम्यान बंदरांची पाहणी केली. बंदरांच्या विकासासाठी भरीव मदत केली जाणार आहे.

शब्दांकन : अर्चना शंभरकर,
विभागीय संपर्क अधिकारी

राज्यात महाविकास आघाडी सरकार अस्तित्वात आल्यानंतर गेल्या वर्षभराच्या काळात राज्याच्या गृह विभाग, गृहनिर्माण, परिवहन, माहिती तंत्रज्ञान या विभागांनी जनहिताचे अनेक महत्त्वाचे निर्णय घेऊन त्याची यशस्वीपणे अंमलबजावणी केली आहे.

माहिती तंत्रज्ञान यशस्वी

सतेज उर्फ बंटी डी. पाटील
राज्यमंत्री, गृह (शहरे), परिवहन, गृहनिर्माण, माहिती तंत्रज्ञान, संसदीय कार्ये, माजी सैनिक कल्याण

राज्यातील पोलीस दल सक्षम कसे बनेल, जनतेला सुरक्षितपणे व भयमुक्त कसे जगता येईल, या दृष्टीने गेल्या वर्षभरात अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. पोलीस शिपायांची सुमारे १२ हजार ५२८ पदे भरण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आंध्र प्रदेशमध्ये असलेल्या 'दिशा' कायद्याच्या धर्तीवर महाराष्ट्रात 'शक्ती' हा नवीन कायदा करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्या दृष्टीने सीआरपीसी, आयपीसी व पोक्सो या विद्यमान कायद्यांमध्ये सुद्धा आनुषंगिक बदल करून विद्यमान कायद्यातील शिक्षा अधिक कठोर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. चाईल्ड पॉर्नोग्राफीविरोधात 'ब्लॅकफेस' नावाने मोहीम उघडण्यात आली असून, गुन्हेगारांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले. राज्यातील सर्व पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही बसवण्यास मान्यता देण्यात आली आहे. पोलीस कर्मचारी आणि अधिकारी यांच्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात कोविड सेंटरची स्थापना करण्यात आली. कोविड संसर्गामुळे मृत्यू झाल्यास कर्तव्यावरील पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांच्या कुटुंबीयांना ५० लाखांचे सानुग्रह अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला.

गरिबांच्या घरांचे स्वप्न

गृहनिर्माणाला चालना देण्यासाठी आणि या क्षेत्रात आलेली मरगळ दूर करण्यासाठी गेल्या वर्षभरात आम्ही अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. मुंबई शहरातील उपकरप्राप्त इमारतीतील लाखो रहिवाशांना दिलासा देण्यासाठी म्हाडा अधिनियमात सुधारणा, गरिबांच्या घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी मुंबई महानगर क्षेत्रातील (मुंबई शहर वगळता) आठ महानगरपालिका आणि सात नगरपालिका/नगरपरिषद मिळून स्वतंत्र झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची स्थापना, चतुर्थ श्रेणी शासकीय कर्मचारी व पोलिसांसाठी म्हाडाच्या सोडतीमध्ये दहा टक्के घरे राखीव, राज्यातील प्रमुख शहरांमध्ये झोपडपट्टी पुनर्वसन योजना लागू करण्यासाठी प्रधान सचिव, गृहनिर्माण यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास गटाची स्थापना करण्यात आली आहे.

सुखकर आणि सुरक्षित प्रवास

सर्वसामान्य शेतकरी, छोटे उद्योजक कारखानदार यांच्या मालाची किफायतशीर दराने सुरक्षित व वक्तशीर वाहतूक करण्यासाठी एस.टी. महामंडळाने व्यावसायिक स्तरावर मालवाहतूक सुरू केली. महामंडळाच्या ६०८ बस स्थानकांवर प्रवाशांना माफक दरात दर्जेदार आणि शुद्ध पाणी उपलब्ध करून देण्यासाठी नाथजल योजना, प्रवासी माहिती प्रणाली, स्मार्ट कार्ड योजना अशा अनेक योजना सुरू करण्यात आल्या. कोरोना प्रादुर्भावाच्या काळात सार्वजनिक वाहतूक बंद असल्याने वाहतूक क्षेत्राला नुकसानभरपाई म्हणून सार्वजनिक व मालवाहतूक करणाऱ्या वार्षिक कर भरणाऱ्या वाहनांना एप्रिल ते सप्टेंबर २०२० अशा सहा महिन्यांसाठी वाहन करमाफी देण्यात आली. राज्यात अडकलेल्या पाच लाखांहून अधिक परराज्यातील स्थलांतरित कामगारांना/मजुरांना त्यांच्या राज्यात जाण्यासाठी महाराष्ट्राच्या सीमेपर्यंत, तसेच रेल्वे स्टेशनपर्यंत मोफत बसेसची सोय उपलब्ध करून देण्यात आली.

माहिती-तंत्रज्ञानाचा वाटा

महाआयटी महामंडळाकडून 'महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९'च्या अंमलबजावणीसाठी ऑनलाइन पोर्टल विकसित करण्यात आले आहे. या पोर्टलचा वापर करून बँकांमार्फत ३४ लाखांहून अधिक कर्ज खात्यांच्या रेकॉर्ड/नोंदी अपलोड करण्यात आल्या असून, ३१ लाखाहून अधिक कर्ज नोंदींवर प्रक्रिया पूर्ण झाली आहे. आतापर्यंत ३० लाखांहून अधिक शेतकऱ्यांकडून आधार प्रमाणीकरण पूर्ण करण्यात आले आहे. नोडल बँकेद्वारे ३० लाखाहून अधिक कर्ज खात्यात १९ हजार ४७४ कोटी रकमेचे वितरण करण्यात आले. सीएम डॅशबोर्ड प्रणाली, शहरी महानेट प्रकल्प, ग्रामीण महानेट प्रकल्प, महाआयटीकडून महाजॉब्स पोर्टल आणि मोबाइल ॲप विकसित, सायबर सुरक्षिततेच्या अनुषंगाने महाराष्ट्र सेक्युरिटी ऑपरेशन सेंटर आणि सी.ई.आर.टी. उभारणी, २३ व्या राष्ट्रीय ई - गर्व्हनन्स परिषदेचे ७ आणि ८ फेब्रुवारी २०२० रोजी मुंबईत यशस्वी आयोजन इत्यादी अनेक निर्णय व त्यांची अंमलबजावणी या काळात झाली. कोरोना प्रादुर्भावामुळे 'महा ई-ऑफीस' प्रणाली प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्यात आली. यामुळे शासकीय नस्त्या, पत्रे, व इतर दस्तऐवज यांच्या सुरक्षिततेत वाढ झाली. कामकाज गतिमान होण्यास मदत झाली. आतापर्यंत १२ मंत्रालयीन विभागांकडून ही प्रणाली वापरण्यास सुरुवात झाली आहे.

शब्दांकन : देवेंद्र पाटील,
विभागीय संपर्क अधिकारी

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेच्या हीरकमहोत्सवी वर्षानिमित्ताने राज्याचा विकास अधिक गतीने व्हावा व जनतेच्या कल्याणासाठी विविध कार्यक्रम व योजना राबवणे शक्य व्हावे, यासाठी राज्याच्या वार्षिक योजनेत भरघोस वाढ करण्यात आली. राज्याच्या वार्षिक योजनेंतर्गत पहिल्यांदाच १ लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक निधीची तरतूद करण्यात आली. राज्याच्या महसुलात वाढ, कौशल्य विकास व कृषी मालाच्या निर्यातीवरही विशेष भर देण्यात आला.

विकासासाठी अर्थचक्राला गती

शंभूराज देसाई
राज्यमंत्री, गृह (ग्रामीण), वित्त, नियोजन, राज्य उत्पादन शुल्क, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, पणन

जिल्हा वार्षिक योजनेच्या अंतर्गत कोविड-१९ च्या प्रादुर्भावावरील प्रतिबंधक उपाययोजनांकरिता आणि सार्वजनिक आरोग्य विभाग तसेच वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभागांच्या जिल्हास्तरीय आरोग्यविषयक सुविधांकरिता १६१७ कोटी रुपये निधी सर्व जिल्हा नियोजन समित्यांना विशेष बाब म्हणून उपलब्ध करून देण्यात आला.

आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीतून लोकप्रतिनिधींना लोकोपयोगी कामे करता यावीत म्हणून २०२०-२१ या आर्थिक वर्षापासून २ कोटी रुपयांच्या निधीत वाढ करून ती ३ कोटी रुपये करण्याचा निर्णय घेण्यात आला. याअंतर्गत आता दरवर्षी ११०० कोटी रुपये रकमेची लोकोपयोगी कामे करता येणार आहेत. त्याचबरोबर आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत कोविड-१९च्या प्रादूर्भावावरील प्रतिबंधात्मक उपाययोजनांतर्गत प्रति विधानसभा सदस्य व विधान परिषद सदस्य ५० लक्ष रुपये व 'माझं कुटुंब, माझी जबाबदारी' या मोहिमेतील आरोग्य पथकांना आवश्यक साहित्य देण्याकरिता प्रति विधानसभा सदस्य व विधान परिषद सदस्य यांच्यामार्फत मतदारसंघासाठी २० लक्ष रुपये निधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

जिल्हा नियोजन समिती कार्यालय कागदविरहीत होण्याकरिता संगणकीय प्रणाली सुरू करण्यात आली. राज्यातील महाबळेश्वर-पाचगणी येथे मोठ्या संख्येने पर्यटक येत असल्यामुळे महाबळेश्वर-पाचगणी परिसराचा नियोजनबद्ध विकास करण्यासाठी १०० कोटी रुपयांचा विकास आराखडा तयार करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

पोलीस यंत्रणा बळकट

पोलीस कर्मचारी, अधिकारी यांच्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात कोविड सेंटर स्थापन. तातडीने उपचार मिळावेत, याकरिता जिल्हानिहाय हेल्पलाइन सुरू. कोविड संसर्गामुळे मृत्यू झाल्यास कर्तव्यावरील पोलीस अधिकारी, कर्मचारी यांच्या कुटुंबास ६५ लाखांचे अनुदान. पोलीस शिपायांची सुमारे १२ हजार ५२८ पदे भरण्याचा निर्णय.

तक्रारीसाठी नियंत्रण कक्ष

अवैध मद्यनिर्मिती वाहतूक, विक्रीविरुद्ध नागरिकांना तक्रार करता यावी यासाठी नियंत्रण कक्ष स्थापन. गड किल्ल्यांचे पावित्र्य भंग करणाऱ्यांवर कारवाई व शिक्षेची तरतूद. राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून मद्यसेवन परवाने आता 'आपले सरकार' च्या https://aaplesarakar.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरून प्राप्त करण्याची सुविधा. साखर/साखरेचा पाक/ऊसाचा रस/बी-हेवी/सी-हेवी मळीपासून जलरहित मद्यार्काचे उत्पादन घेण्यास परवानगी देण्यासाठी सुधारीत धोरण निश्चित.

कौशल्य विकासावर भर

कोरोना काळात २४ ऑनलाइन रोजगार मेळावे संपन्न. 'महास्वयम्' वेबपोर्टलवर कोरोना संकटकाळात १ लाख ७२ हजार रोजगार इच्छुकांची नोंदणी. महाराष्ट्र स्टार्टअप सप्ताहात १६०० स्टार्टअप्सचा सहभाग. उत्कृष्ट २४ स्टार्टअप्सना १५ लाख रुपयांपर्यंतची विविध शासकीय कामे. जिल्ह्याजिल्ह्यांमध्ये आयोजित केलेले ऑनलाइन रोजगार मेळावे व इतर उपक्रमांमधून जानेवारी ते ऑक्टोबर २०२० दरम्यान राज्यात सुमारे दीड लाख बेरोजगारांना रोजगार. व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत प्रवेश प्रक्रिया सुलभ करण्याकरिता महाआयटीआय हे मोबाइल ॲप्लिकेशन विकसित. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत वर्षभरात लाभार्थ्यांना व गटांना ४३ कोटींहून अधिक रकमेचे अर्थसाहाय्य. इयत्ता दहावी व बारावी उत्तीर्ण न होऊ शकलेल्या विद्यार्थ्यांकरिता कौशल्य सेतू कार्यक्रम योजनेची अंमलबजावणी.

कृषी मालाची निर्यात

राज्यात ॲग्रीबिझिनेस नेटवर्क प्रकल्प राबवण्यास मान्यता देण्यात आली आहे. जानेवारी ते जून २०२० अखेर सुविधा केंद्रावरून ९९१२ मे. टन शेतमाल आखाती व युरोपीय देशांमध्ये निर्यात करण्यात आला. बाहेरील राज्यात पाठवण्यात येणाऱ्या भाजीपाला व फळे वाहतुकीस येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी कृषी पणन मंडळाच्या मार्केटयार्ड येथील मुख्यालयात २४ तास 'आंतरराज्यीय फळे व भाजीपाला वाहतूक नियंत्रण कक्ष' कार्यान्वित. राज्यात वर्षभरात दहा वर्षांच्या तुलनेत विक्रमी कापूस खरेदी करण्यात आली.

शब्दांकन : दत्तात्रय कोकरे,
विभागीय संपर्क अधिकारी

गेल्या वर्षभरातील कालावधीत कोरोनासारखे महाभयंकर संकट असतानाही विविध विभागांच्या माध्यमातून अनेक लोकोपयोगी निर्णय घेतले आहेत. या निर्णयांची अंमलबजावणी सुरू आहे. काही ठिकाणी थोड्याफार प्रमाणात अडचणी असू शकतील, पण त्याही लवकरच दूर होतील. आम्ही दिव्यांग, निराधार, माताभगिनी, वंचित घटक यांच्याकडे मानवतेच्या दृष्टीने, माणुसकीच्या भावनेने आपल्या घरातील ती एक व्यक्ती आहे, असे समजून लक्ष देण्याचा प्रयत्न केला आहे.

वंचितांना भक्कम आधार

ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू
राज्यमंत्री, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास, शालेय शिक्षण, महिला व बालविकास, इतर मागास बहुजन कल्याण, कामगार

वंचित घटकांसाठी असलेल्या शासनाच्या योजना शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी शासनाची आहे. त्यानुसार आमचे नियोजन व प्रयत्न सुरू आहेत. अनाथांना प्रमाणपत्र मिळावे, यासाठी देखील आम्ही विशेष सप्ताहाचे आयोजन केले. त्याद्वारे अनाथांना प्रमाणपत्र मिळवून दिले. शासनाच्या विविध योजनांमध्ये आता १ टक्का आरक्षण अनाथांना मिळणार आहे.

सिंचन क्षमता वाढली

जलसंपदा विभागांतर्गत वर्षभराच्या काळात सिंचन प्रकल्पांद्वारे १७२ दशलक्ष घनमीटर पाणीसाठा निर्माण झाला. १ लाख ४ हजार ५८६ हेक्टर सिंचनक्षमता निर्माण करून ७ बांधकामाधीन सिंचन प्रकल्प पूर्ण केले. पुराच्या पाण्याचे नियोजन, दुष्काळी भागातील शेतीसाठी, जनतेसाठी पाणी, राज्याच्या इतर भागातील प्रकल्पासाठी स्वतंत्र असा प्रकल्प अंमलबजावणी कक्षदेखील कार्यान्वित केला आहे.

शिक्षण : सर्वोत्तम कामगिरी

शिक्षण क्षेत्रातही महाराष्ट्र निश्चित अग्रेसर राहिला आहे. अजूनही कोविड-१९ प्रादुर्भावाचे संकट आहे. विविध उपक्रम राबवून त्याद्वारे, शाळा बंद असल्या तरी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये आणि त्यांना शिक्षण मिळावे, यासाठी ऑनलाइन शिक्षणाच्या माध्यमातून हे साध्य करण्यात येत आहे.

शाळा बंद पण शिक्षण आहे. या अभ्यासमालेच्या साहाय्याने दीक्षा ॲप आधारित विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययन करण्यासाठीचे उपक्रम आपण राबवत असून, आपल्या राज्याची ही कामगिरी देशातील सर्वोत्तम कामगिरी आहे. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्याची तजवीज करणारे शिक्षण त्यांना मिळेल, यासाठी शासन कटिबद्ध आहे.

नव तेजस्विनी प्रकल्प

महिला व बालविकास विभागामार्फत आम्ही अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. यात प्रामुख्याने नव तेजस्विनी-महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्प राबवण्याचा निर्णय आहे. राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत साहाय्यित ५२३ रुपये यासाठी खर्च अपेक्षित आहे. यामुळे ग्रामीण महिलांच्या उन्नत उपजीविकेकरिता मूलभूत बदलाचा हा कार्यक्रम दहा लाख कुटुंबापर्यंत पोहोचणार आहे. पोषण महिना राष्ट्रीय कार्यक्रमात आपल्या राज्याने सर्वाधिक उपक्रम राबवून देशात पहिला क्रमांक मिळवला आहे, ही निश्चितच अभिनंदनीय बाब आहे.

विजेच्या धक्याने मृत्यू ओढवलेल्या तीन भावंडांच्या कुटुंबीयांची आस्थेवाईकपणे विचारपूस करताना राज्यमंत्री बच्चू कडू.

लोकोपयोगी निर्णय

इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत इमाव, विजाभज आणि विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी महात्मा ज्योतिबा फुले संशोधन प्रशिक्षण संस्थेची म्हणजे महाज्योतीची नागपूर येथे स्थापना तसेच त्यासाठी ५० कोटी रुपयांचा निधीदेखील देण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे, विद्यार्थ्यांना विविध पुरस्कार, नामांकित शाळांमध्ये प्रवेश, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर घरबांधणी योजना असे लोकोपयोगी निर्णय घेण्यात आले आहेत.

कामगारांना दिलासा

कामगार विभागामार्फत बांधकाम कामगार, माथाडी कामगार, सुरक्षारक्षक, इतर कामगार यांच्यासाठीही मदतीचा हात पुढे करण्यात आला आहे. टाळेबंदीच्या काळात या वर्गाला मोठ्या प्रमाणात दिलासा देण्यात आला.

अगदी स्पष्ट सांगायचे झाल्यास कोरोनासारखे महासंकट असतानाही महाविकास आघाडी शासनाने गेले वर्षभर या संकटाशी मुकाबला करत लोकांना विश्वास दिला आहे की, शासन जनतेच्या पूर्णपणे पाठीशी आहे.

शब्दांकन : डॉ. राजू पाटोदकर,
विभागीय संपर्क अधिकारी

सर्वसामान्यांना केंद्रबिंदू मानून राज्य शासन काम करत आहे. कोरोनाच्या जागतिक संकटास आपण समर्थपणे सामोरे जात आहोत. टाळेबंदीच्या कालावधीत अनेक बंधने आली होती. टप्प्याटप्प्याने जीवन सुरळीत होण्यासाठी प्रयत्न केले. संकटकाळात शेतकरी, पशुपालक, मच्छीमार आदी घटकांनाही दिलासा दिला. लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाची सांगड घालत आणि पुरोगामी वारसा जपत राज्याला प्रगतिपथावर ठेवण्याचे काम शासनाकडून यापुढेही होईल.

सर्वसामान्यांना दिलासा

दत्तात्रय भरणे
राज्यमंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), मृद् व जलसंधारण, वने, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय, सामान्य प्रशासन

शासन आणि प्रशासनाकडून जेव्हा आपले प्रश्न सुटतात, याचा विश्वास जेव्हा सर्वसामांन्यांना येईल, तेव्हाच हे सरकार आपले असून आपल्यासाठी काम करत आहे, असे त्यांना वाटेल. हीच जाणीव ठेऊन आम्ही पहिल्या दिवसापासून काम करत असून कायम कार्यरत राहू. प्रशासनातील पारदर्शकता, निर्णय घेण्याची क्षमता आणि अंमलबजावणी यामध्ये आम्ही हेच दाखवून दिले आहे. विभागीय आयुक्तालयांच्या ठिकाणी 'मुख्यमंत्री सचिवालय कक्ष' सुरू करण्याचा निर्णय या दृष्टीने महत्त्वपूर्ण असून सर्वसामान्यांच्या समस्या अधिक गतीने प्रशासनाकडे पोहोचत आहेत आणि त्यावर गतीने तोडगाही निघत आहे.

दूध उत्पादकांना दिलासा

शेतकरी, दूध उत्पादक, मच्छीमार आदी जे आपल्या कृषी आणि कृषिसंलग्न व्यवस्थेचा पाया आहेत अशा घटकांच्या कल्याणासाठी राज्य शासनाने वर्षभरात महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. अतिरिक्त दूध उत्पादनामुळे शेतकऱ्यांना दर कमी मिळू लागताच आम्ही अतिरिक्त दुधाचे भुकटीत रूपांतर करण्याचा निर्णय घेतला. डॉ. ए. पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजनेतील ७ लाखांहून अधिक लाभार्थ्यांना वर्षभरासाठी मोफत दूध भुकटी उपलब्ध करून देण्यात आली.

योजनेचा लाभ थेट लाभार्थ्यांना

जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत स्वयंरोजगाराला चालना देण्यासाठी राबवण्यात येणाऱ्या दुग्धव्यवसाय, शेळीपालन आणि कुक्कुटपालनाच्या शासन अनुदानित योजनांमध्ये ऑनलाइन पद्धतीने लाभार्थ्यांकडून अर्ज मागवून, संगणकीय प्रणालीने निवड करण्यात येणार असल्याने खऱ्या आणि पात्र लाभार्थ्याला पारदर्शकपणे या योजनांचा लाभ मिळणार आहे.

मासेमारीसाठी सानुग्रह अनुदान

अरबी समुद्रात निर्माण झालेल्या 'क्यार' आणि 'महा' या दोन चक्रीवादळांमुळे मासेमारी न करता आल्यामुळे झालेल्या नुकसानीबद्दल मच्छीमार बांधवांना ६५ कोटी रुपये इतके विशेष सानुग्रह अनुदान देण्याचा निर्णय घेतला. चालू आर्थिक वर्षासाठी प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेंतर्गत राज्यात १६० कोटी रुपयांच्या आराखड्यास मान्यता दिली आहे. सागरी भागात जेट्टीसह मत्स्यबंदरांचे बांधकाम आणि मासळी उतरवण्याची ठिकाणे विकसित करण्यात येणार आहेत. पायाभूत सुविधांच्या विकासामुळे राज्याच्या सागरी मत्स्य उत्पादनात निश्चितच वाढ होईल.

सारथीसाठी भरीव निधी

छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्थेला (सारथी) भरीव निधी व मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी १३० कोटी रुपये निधीची तरतूद केली आहे. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या बेरोजगार तरुणांसाठीच्या व्यावसायिक कर्ज योजनेच्या भागभांडवलात ४०० कोटी रुपयांची वाढ केली आहे.

शासन सर्वसामान्यांच्या पाठीशी

महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नी दोन कॅबिनेट मंत्र्यांची सीमाभाग समन्वयक मंत्री म्हणून नेमणूक करत सीमावासीयांच्या पाठीशी राज्य शासन खंबीरपणे उभे असल्याचा विश्वास दिला आहे. वनक्षेत्रातील रस्त्यांच्या दुरुस्तीच्या कामांना मंजुरीचे अधिकार वनविभागाच्या प्रादेशिक तसेच विभागस्तरीय कार्यालयांना देण्याबाबत केंद्रीय पर्यावरण व वनमंत्रालयाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

वृक्षाच्छादन वाढवणार

राज्यातील वृक्षाच्छादित क्षेत्र वाढवण्यासाठी वनेतर जमिनीवरही वृक्षलागवड कार्यक्रमाला गती देण्याचे धोरण राबवले जाणार आहे. आदिवासींचे वन हक्क राखून ठेवण्यासह वनोत्पादनांमध्ये त्यांना सन्मानजनक वाटा देणे ही आमची प्राथमिकता आहे. राज्यात वनपर्यटनाला चालना देऊन पर्यटनातून महसूलवृद्धी आणि स्थानिक रोजगार निर्मितीला महत्त्व देण्याचे धोरण अवलंबले जाणार आहे.

शब्दांकन : सचिन गाढवे,
विभागीय संपर्क अधिकारी

राज्यातील शेतकरी, सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी, कृषी, सहकार क्षेत्राच्या विकासासाठी राज्य शासनाने काम करण्यास सुरुवात केली आहे. शेतकऱ्यांसाठी कृषी व सहकार विभागाच्या माध्यमातून अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी केली. कोविडमुळे करण्यात आलेल्या लॉकडाऊनमुळे असो की, अतिवृष्टीमुळे झालेले नुकसान असो, शासनाने तातडीने मदतीचा निर्णय घेतला.

शाश्वत विकासाला अग्रक्रम

डॉ. विश्वजीत कदम
राज्यमंत्री, सहकार, कृषी, सामाजिक न्याय, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, अल्पसंख्याक विकास व औकाफ, मराठी भाषा

शेतकऱ्यांना कर्जातून मुक्त करण्यासाठी महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना राबवण्यात आली. त्यातून अल्पमुदतीचे पीक कर्ज घेतलेल्यांचे तसेच पुनर्गठन व फेरपुनर्गठन केलेल्या जास्तीत जास्त शेतकऱ्यांना लाभ देण्याचा प्रयत्न शासनाने केला आहे.

लॉकडाऊन काळात नागरी सहकारी बँका तसेच पतसंस्थांची एकरकमी कर्ज परतफेड योजनेस मुदतवाढ, नागरी सहकारी बँकांमधील भागधारणाची कमाल मर्यादा वाढवणे असे निर्णयही घेण्यात आले. तसेच केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्य शासनानेही व्याज परतावा योजना सुरू केली. या योजनांसाठी वेगवेगळे अर्ज करावे लागू नये, तसेच त्यांचा लाभ थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात पोहोचावा, यासाठी महाडिबीटी पोर्टलद्वारे एकाच अर्जाद्वारे सर्व लाभ देण्याची प्रक्रिया राबवण्यात आली.

विविध योजना सुरू

शेती क्षेत्रासाठी वेगवेगळ्या योजनाही राज्य शासनाने सुरू केल्या. त्यामध्ये पिकेल तिथे विकेल अभियान, रानभाज्या महोत्सव, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर भाजीपाला रोपवाटिका योजना, शेती शाळांचे आयोजन, ग्राम कृषी विकास समिती स्थापन करणे अशा विविध योजना सुरू करण्याचा निर्णय या एक वर्षात घेतला. मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन स्मार्ट कृषी प्रकल्पातून शेती क्षेत्र शाश्वत व आर्थिकदृष्ट्या फायदेशीर होण्यावर भर देण्यात आला आहे.

राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेती क्षेत्राचे मोठे नुकसान झाले. शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तसेच पायाभूत सुविधांच्या पुनर्उभारणीसाठी सुमारे १० हजार कोटींचे पॅकेज जाहीर केले आहे.

उत्तम कामगिरी

कोविड काळात राज्य शासनाच्या कृषी विभागाच्या वतीने सुमारे ९ लाख ४२ हजार शेतकऱ्यांना खते व बी-बियाणे यांचे वाटप करण्यात आले. तसेच शेतकरी गटाच्या माध्यमातून शहरी भागातील ग्राहकांपर्यंत सुमारे १ लाख ३७ हजार मेट्रिक टन फळ व भाजीपाला थेट पुरवठा करण्यात आला. यामुळे कोविड काळात शेतकऱ्यांच्या मालाला बाजारपेठ तर मिळालीच त्याचबरोबर शहरी ग्राहकांनाही ताजा भाजीपाला व फळांचा पुरवठा झाला.

समस्या व तक्रारींचे निवारण

विद्यार्थ्यांची मागणी लक्षात घेऊन सामाजिक न्याय विभागाच्या वतीने देण्यात येणाऱ्या अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या परदेश शिष्यवृत्तीमध्ये बदल करून पदव्युत्तर पदवीसाठी त्याच विषयाची पदवीऐवजी इतर विषयांची पदवीही ग्राह्य धरण्याचा निर्णय घेतला.

समाजात आतापर्यंत दुर्लक्षित राहिलेल्या तृतीयपंथीयांच्या समस्या व तक्रारींच्या निवारणासाठी जिल्हास्तरीय तक्रार निवारण समिती स्थापण्याचा निर्णय घेतला.

अन्नधान्याचे वितरण

अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या वतीने लॉकडाऊन काळात प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना व राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली. शिवभोजन थाळी योजनेमुळे राज्यातील गरीब व गरजू नागरिकांना पाच रुपये दराने जेवण मिळत आहे. सध्या प्रतिदिवस सुमारे दीड लाख थाळ्यांचे वितरण होते.

शिक्षणाला चालना

अल्पसंख्याक विभागामार्फत अल्पसंख्याक समाजातील तरुणांसाठी शासकीय पॉलिटेक्निकमध्ये दुसऱ्या पाळीतील वर्ग सुरू करण्यात आले आहेत. तसेच या समाजातील मुलींच्या उच्च शिक्षणाला चालना देण्यासाठी २३ ठिकाणी वसतिगृहे सुरू करण्यात येत आहेत.

मराठी विषय अनिवार्य

मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच राज्याच्या सीमाभागात मराठी भाषेचा प्रचार व प्रसारासाठी उपक्रम राबवण्याचा आमचा प्रयत्न आहे. राज्यातील सर्व मंडळांच्या शाळांमध्ये मराठी हा विषय अनिवार्य करण्यात आला आहे. त्याचबरोबर प्रशासकीय कामकाजात मराठी भाषेचा वापर वाढवण्याचे प्रयत्नही सुरू आहेत.

शब्दांकन : नंदकुमार वाघमारे,
विभागीय संपर्क अधिकारी

किमान समान कार्यक्रमांतर्गत अगदी वर्षभरातच सरकारी कामकाज अधिक लोकाभिमुख आणि पारदर्शी पद्धतीने करण्याच्या प्रयत्नांना यश आले आहे. मुख्यमंत्री यांचे मार्गदर्शन आणि मंत्रिमंडळ सहकाऱ्यांच्या समन्वयातून पूर्वीपेक्षा अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम राबवून अत्यंत कमी कालावधीत सर्वच विभागांचे सक्षमीकरण करता आले.

आश्वासक वाटचाल

डॉ. राजेंद्र पाटील-यड्रावकर
राज्यमंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, वैद्यकीय शिक्षण, अन्न व औषध प्रशासन, वस्त्रोद्योग, सांस्कृतिक कार्य

राज्यातील रुग्णालये अद्ययावत व सुसज्ज करण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा गतिमान करण्यावर भर देण्यात येत आहे. महात्मा फुले जन आरोग्य योजनेतील कार्यवाहीस लागणारा विलंब दूर करून जनआरोग्य योजनेस गती व बेळगाव येथील केएलई रुग्णालयासह नवीन रुग्णालयांचा समावेश केला. यामुळे कर्नाटक सीमेवरील नागरिकांना यांचा फायदा मिळत आहे.

कोरोना काळात दिलासा

राज्यातील कोरोना परिस्थितीचा दूरदृश्यप्रणालीद्वारे दररोज संपर्क आणि वैद्यकीय मदतीसाठी समन्वय केला जात आहे. आयुष्यमान भारत आरोग्यवर्धिनी कार्यक्रमांतर्गत डिसेंबर २०२२ पर्यंत १३ हजार आरोग्यवर्धिनी केंद्रे स्थापित करण्याचे उद्दिष्टासह सीएचओ प्रशिक्षण केंद्रासाठी मान्यता देण्यात आली आहे. कोरोना कालावधीत आर.टी.पी.सी.आर. आणि एच.आर.सी.टी.चे चाचणी दर निश्चित करण्यात आले. शासनाचा एकही रुपया न खर्च करता लोकसहभागातून १० व्हेंटिलेटर्स आणि १०० ऑक्सिजन खाटांच्या मोफत अद्ययावत कोविड सेंटरची जयसिंगपूर येथे निर्मिती करण्यात आली.

कोरोना काळात सामान्य नागरिकांना वैद्यकीय सेवा न देणाऱ्या खासगी डॉक्टरांवर कारवाई करावी, अन्यथा त्यांची सनद रद्द करण्यासंदर्भात सूचनाही केली.

विद्यार्थ्यांना दिलासा

वैद्यकीय महाविद्यालयातील शुल्क आकारणीचा निधी (पी.एल.ए.) रुग्णांच्या उपचारासाठी उपलब्ध, त्यासाठी उपमुख्यमंत्री यांच्याशी समन्वय साधून वित्त व नियोजन विभागाकडून परवानगी. वैद्यकीय शिक्षण प्रवेशाचा ७०:३० प्रादेशिक कोटा रद्द करून हजारो विद्यार्थ्यांना थेट फायदा देण्याचा निर्णय घेण्यात आला. शासकीय वैद्यकीय आणि दंत महाविद्यालयातील पदव्युत्तर निवासी डॉक्टरांसह आयुर्वेद महाविद्यालयातील निवासी डॉक्टरांच्या विद्यावेतनात प्रतिमाह रुपये १० हजार एवढी वाढ केली. कोरोना महामारीच्या काळात सामाईक प्रवेश परीक्षेच्या अर्जास मुदतवाढ देऊन विद्यार्थ्यांना दिलासा दिला. परदेशातील वैद्यकीय पदवी तथा पदव्युत्तर पदवी अहर्ताप्राप्त पात्र डॉक्टरांच्या वैद्यकीय सेवा उपलब्ध होण्याबाबत पात्रता परीक्षा त्वरित घेण्यासंबंधी निर्णय घेतला.

भेसळ रोखण्यात यश

कोरोना काळात औषधांचा काळाबाजार, साठेबाजी रोखण्याची खबरदारी आणि रुग्णांना औषधोपचार पुरवठा होण्यासाठी उपाययोजना, नियोजन करण्यात आले. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर मिठाईसह विविध अन्नपदार्थातील भेसळ रोखण्याचे आणि खाद्यतेलाच्या डब्यांचा पुनर्वापर करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचे निर्देश यंत्रणेला दिले.

रेशीम उत्पादनाला चालना

राज्यातील रेशीम बीज कोष उत्पादक शेतकऱ्यांनी विक्री केलेल्या कोषाची रक्कम अदा करण्यासाठी व नवीन अंडीपुंज निर्मितीसाठी महाराष्ट्र सरकारकडून तब्बल ६२.७४ लाख रुपयांचा निधी वितरित केला. कोल्हापूरमधील जयसिंगपूर कृषी उत्पन्न बाजार समितीत राज्यातील तिसऱ्या व नवीन रेशीम कोष खरेदी आणि विक्री केंद्रास मान्यता दिल्याने कोल्हापूर, सांगली, सिंधुदुर्ग जिल्ह्यांतील शेतकऱ्यांनी मध्यवर्ती ठिकाणी रेशीम कोष बाजारपेठ उपलब्ध.

चित्रीकरणाला सुरुवात

कोल्हापूर चित्रनगरी येथे चित्रीकरणाला उर्जितावस्था देण्यासाठी प्रयत्न, महामंडळाकडील अखर्चित निधी खर्च करण्यासाठी वित्त व नियोजन विभागाकडून मान्यता. विकास कामांना गती, दख्खनचा राजा मालिकेच्या चित्रीकरणाला प्रारंभ, तसेच सोनी टीव्ही, स्टार टीव्ही आदि वाहिन्यांशी चित्रीकरण करार अंतिम टप्प्यात. महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या सर्वांगीण विकासासाठी चित्रपट व मनोरंजन माध्यम धोरण, उत्पन वाढीच्या दृष्टीने जागेचा विकास आणि मुंबईत चित्रीकरण परवान्याबाबत एक खिडकी योजनेसह अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले.

सांस्कृतिक कार्य विभाग अद्ययावत करण्याच्या दृष्टीने अभिलेखांचे मायक्रोफिल्मिंग स्कॅनिंग, अभिलेख व्यवस्थापन कार्यशाळेचे आयोजन, मोडिलिपी प्रशिक्षण वर्ग आयोजन, राज्य स्थापनेचा हीरकमहोत्सव नियोजन, महाराष्ट्र वैभव राज्य संरक्षित स्मारक संगोपन योजनेसह पर्यटन आणि सांस्कृतिक कार्य विभागाचे संकेतस्थळ अधिक लोकाभिमुख करण्याचे निर्णय घेतले.

शब्दांकन : कृष्णदर्शन जाधव

पाणीपुरवठा व स्वच्छता विभागांतर्गत भविष्यातील पिण्याच्या पाण्याची गरज भागवण्याच्या दृष्टीने महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची कामे पूर्ण करण्यात येत आहेत. राज्यातील ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला वैयक्तिक नळ जोडणीद्वारे गुणवत्तापूर्ण पाण्याचा पुरवठा करण्याचे उद्दिष्ट आहे. वातावरणीय बदलाच्या दृष्टीने पर्यावरण विभागातर्फे कृतिआराखडा विविध विभागांमार्फत राबवण्यात येत आहे.

प्लास्टिकमुक्तीचा निर्धार

संजय बनसोडे
राज्यमंत्री, पर्यावरण व वातावरणीय बदल,
पाणीपुरवठा व स्वच्छता, सार्वजनिक बांधकाम
(सार्वजनिक उपक्रम), रोजगार हमी,
भूकंप पुनर्वसन, संसदीय कार्ये

जलजीवन अभियान मिशन मोड वर राबवण्याच्या दृष्टिकोनातून राज्यातील सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात येत आहेत. जलजीवन अभियानांतर्गत करण्यात येणारी कामे नियोजित वेळेत पूर्ण व्हावीत, यालाच प्राधान्य असणार आहे.

कामे पूर्ण करण्याचे उद्दिष्ट

पाणीपुरवठा व स्वच्छता विभागांतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाद्वारे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण भविष्यातील पिण्याच्या पाण्याची गरज भागवण्याच्या दृष्टीने जे.एन.पी.टी, सिडको आणि पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने ४९३ कोटी रुपये किमतीच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे काम ३० महिन्यांत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. याशिवाय येत्या ४ वर्षात राज्यातील ग्रामीण भागातील कुटुंबांना एकूण ८८.४८ लाख नळ जोडणी देण्याचे काम मिशन मोडवर पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे आणि मला सांगण्यास आनंद वाटतो की, आतापर्यंत ४० टक्क्यांहून अधिक उद्दिष्ट पूर्ण करण्यात आले आहे. या वर्षी कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे ग्रामसभा व्हर्च्युअल पद्धतीने घेण्यात आली. महात्मा गांधी रोजगार हमी योजना ही मागेल त्याला काम या मागणीवर आधारित आहे. सध्या सुमारे ४ लाख ५० हजार कामे शेल्फवर असून त्यांची मजूर क्षमता ९९४.५४ कोटी मनुष्यदिवस इतकी आहे.

प्लास्टिकमुक्त महाराष्ट्र

निसर्गाशी संबंधित पृथ्वी, वायू, जल, अग्नी आणि आकाश या पंचतत्त्वांवर पर्यावरण आणि वातावरणीय बदल विभागाचे कार्य राहणार आहे. संपूर्ण महाराष्ट्र राज्य सिंगल युज प्लास्टिकमुक्त करण्याचा निर्धार केला आहे. वातावरणीय बदलाच्या दृष्टीने पर्यावरण विभागातर्फे कृतिआराखडा विविध विभागांमार्फत राबवण्यात येत असून यामध्ये वृक्षलागवड, अस्तित्वातील वृक्षांचे जतन व संगोपन हे मुख्य उद्दिष्ट आहे.

वैयक्तिक नळजोडणी

केंद्र शासन पुरस्कृत जल जीवन मिशन राज्यात राबवण्यास शासनाची मान्यता. राज्यातील ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला वैयक्तिक नळजोडणीद्वारे दरडोई ५५ लीटर प्रतिदिन गुणवत्तापूर्ण पाण्याचा पुरवठा करण्याचे उद्दिष्ट आहे. कोविड-१९चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी २७ जिल्ह्यांतील स्वच्छताग्रहींसाठी हातमोजे, सॅनिटायझर तसेच मास्क खरेदीसाठी प्रत्येकी दहा लाख रुपयांचे अर्थसाहाय्य देण्यात आले. राज्यात कार्यरत स्वच्छताग्रहींना ३१ मार्च २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

दुरुस्ती व पुनर्निर्माण

राज्य महामार्गावर शौचालय, रेस्ट रूम, आदी सुविधा देण्याचा निर्णय घेण्यात आला. महाराष्ट्र समृद्धी महामार्गाचे 'हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग' असे नामकरण करण्याचा निर्णय घेतला. पुलांची देखभाल, दुरुस्ती व पुनर्निर्माणासाठी नियमावली विकसित करण्यात आली.

शब्दांकन : वर्षा फडके– आंधळे,
विभागीय संपर्क अधिकारी

गेल्या वर्षभरात सर्वसामान्य जनतेच्या समस्या सोडवणे, आदिवासी भागातील जनतेला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे, वाढत्या नागरीकरणामुळे निर्माण होणाऱ्या सोयीसुविधांचा अभाव लक्षात घेता यावर प्रभावी उपाययोजना करणे, माफक दरात वीज देणे आदींवर भर देण्यात आला आणि दिला जात आहे. आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसनाच्या कामातही राज्य शासनाने सर्वसामान्य नागरिकांच्या हिताचे निर्णय घेत धडाडीने काम करत संकटांचा यशस्वी सामना केला आहे.

सामान्यांच्या हिताची जपणूक

प्राजक्त तनपुरे
राज्यमंत्री, नगर विकास, ऊर्जा, आदिवासी विकास, उच्च व तंत्रशिक्षण, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन

ऊर्जा विभागांतर्गत येणाऱ्या तीन कंपन्यांच्या समन्वयाने राज्यातील शेवटच्या घटकापर्यंत माफक दरात नियमित वीज उपलब्ध करण्याकरिता शासन प्रयत्नशील आहे. आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन या विभागांच्या माध्यमातून राज्यातील जनतेला आपत्तिप्रसंगी दिलासा देण्याचे काम राज्य शासन सातत्याने करत आहे. आजपर्यंत विविध योजना शासनाच्या वतीने राबवण्यात येत आहेत. राबवण्यात येणाऱ्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

आदिवासी विकास

लॉकडाऊनमध्ये आदिवासी कामगार विविध शहरात अडकले होते, त्यांना सुखरूप मूळ गावी पोहोचवण्यासाठी सरकारने न्युक्लिअर बजेटमधून खर्च करण्याचा निर्णय घेतला आणि ६० ते ७० हजार कामगारांना आपल्या मूळ गावी पोहोचवले. बेरोजगार आदिवासी कुटुंबांला ४ हजार रुपये खावटी अनुदान देण्याचा निर्णय घेतला. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजनेंतर्गत १ लाख २७ हजारहून अधिक गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना एक वेळचा पूरक आहार आणि सुमारे ७ लाख बालकांना अंडी, केळी देण्यात आली. शबरी घरकूल योजनेत दिव्यांग लाभार्थ्यांना ५ टक्के आरक्षण ठेवण्यात आले.

आपत्तिग्रस्तांना दिलासा

'क्यार' आणि 'महा' अवकळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना ७,८४,४४७ लक्ष निधी पाच टप्प्यात वितरित करण्यात आला. डिसेंबर २०१९ व जानेवारी २०२० या कालावधीत गारपीट व अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना ९ हजार ३५८ लाख निधीचे वितरण करण्यात आले. कोरोनाचा संसर्ग रोखण्यास विविध उपाययोजना राबवण्यात आल्या, त्यासाठी ६९,८९२ लाख रुपयांचा निधी खर्च करण्यात आला. निसर्ग चक्रीवाळाच्या नुकसानग्रस्तांना तत्काळ १२५ लाख रुपयांची मदत देण्यात आली. तसेच अन्नधान्य व केरोसीन मोफत देण्यात आले. आतापर्यंत ७०८८५ लाखांची मदत करण्यात आली आहे. अतिवृष्टी आणि पुरामुळे नुकसान झालेल्या विदर्भातील नागरिकांना १७९.२९ कोटी रुपयांची मदत देण्यात आली.

कार्यक्रमांची सुरुवात राष्ट्रगीताने

प्राध्यापक व प्राचार्य यांच्या प्रशिक्षणासाठी पुणे येथे अध्यापन विकास संस्था स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली. १९९६ पासून पीएचडीधारक अधिव्याख्यात्यांना दोन वेतनश्रेणी वाढ देण्यात आली. राज्यातील सर्व शैक्षणिक संस्थांचे मराठीतून नामफलक लावणे बंधनकारक केले. महाविद्यालयातील सर्व कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीत गायनाने करण्याचे निर्देश दिले.

महानगरांचा विकास

इंदू मिल येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याची उंची वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला. नागरी भागात निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर १०० टक्के प्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला. नगराध्यक्षांची निवड नगरसेवकांमधून करण्यात येणार आहे. मुद्रांक शुल्क शून्य टक्के करण्यात आला. खारघर येथील सेंटर फॉर एक्सलन्स टप्पा १ आणि २ विकासासाठी सिडकोने ३४५ कोटी आकस्मित खर्चाला मान्यता दिली. नागपूर मेट्रोला जोडणाऱ्या पॅसेंजर गाड्यांऐवजी वातानुकूलित ब्रॉडगेज मेट्रो सुरू करण्यासाठी महामेट्रोने ३३३ कोटी रुपयांच्या प्रस्तावाला सरकारने तत्वत: मंजुरी दिली आहे.

ऊर्जा

दरवर्षी नवीन वीजजोडणीसाठी साधारणत: १ लाख शेतकरी अर्ज करतात मात्र, जुन्या धोरणामुळे वीजजोडणी देता येत नव्हती, मात्र नवीन ऊर्जा धोरणामुळे या शेतकऱ्यांना वीज देणे शक्य होणार आहे. तसेच मुख्यमंत्री सौर कृषिपंप योजनेंतर्गत दरवर्षी एक लाख सौर कृषिपंप देण्यात येणार आहेत. कृषी ग्राहकांना दिवसा ८ तास वीज पुरवठा करण्याकरिता वितरण उपकेंद्र स्तरावर विकेंद्रित सौरऊर्जा प्रकल्प उभारून वीज निर्मिती करून वीज पुरवठा करण्याची दीर्घकालीन योजना राबवण्यात येणार आहे.

शब्दांकन : राजू धोत्रे,
विभागीय संपर्क अधिकारी

अनलॉकनंतर जनजीवन पूर्ववत होत आहे. अजून कोरोनाचे संकट संपले नाही. आपण सर्वांनी काळजी घेणे खूप गरजेचे आहे. गत एक वर्षात उद्योग, खनिकर्म, पर्यटन, फलोत्पादन, क्रीडा व युवक कल्याण या विभागांनी महत्त्वपूर्ण कामगिरी केली आहे. विशेषत: उद्योग आणि पर्यटन विभागातील सामंजस्य करार व विविध निर्णयांमुळे अर्थगतीस चालना मिळाली आहे.

उद्योग, पर्यटनाला चालना

कुमारी आदिती तटकरे
राज्यमंत्री, उद्योग, खनिकर्म, पर्यटन, फलोत्पादन, क्रीडा व युवक कल्याण, राजशिष्टाचार, माहिती व जनसंपर्क

गोवा राज्यातील किंवा जगभरातील किनारे शॅकमुळे प्रसिद्ध आहेत. कोकण पर्यटनाला चालना देण्यासाठी बीच शॅक धोरण राबवून समुद्रकिनाऱ्यांचा क्षमतेनुसार विकास करण्यात येत आहे. कोकणातील सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड आणि पालघर यांचा समावेश आहे. आठ किनाऱ्यांवर शॅक सुरू करण्यात येत आहेत. प्रत्येकी दहा शॅक उभारून हा पायलट प्रोजेक्ट करण्यात येत आहे. यात ८० टक्के रोजगार निर्मितीला प्राधान्य देण्यात येत आहे.

पर्यटन स्थळांचा विकास

शिर्डी, पंढरपूर, अष्टविनायक प्रमाणेच राज्यातील धार्मिक स्थळांचा विकास, पायाभूत सोयी-सुविधा आणि आध्यात्मिक पर्यटनविषयक जनजागृती करण्यात येत आहे. रायगड जिल्हा हा भौगोलिक, नैसर्गिक व औद्योगिकदृष्ट्या खूप संपन्न आहे. पर्यटकांना जिल्ह्यात आल्यावर चार ते पाच दिवस राहता, फिरता यावे यादृष्टीने 'टूरिस्ट हब' या जिल्ह्यात व्हावा, यासाठी पर्यटन विभाग व स्थानिक प्रशासन मिळून प्रयत्न करीत आहोत. खारघर येथे एम.टी.डी.सी. रेसिडेन्सी सुरू करण्यात आले आहे. समुद्र किनारी आलेला पर्यटक आजूबाजूला असलेल्या अनेक स्थळांना भेट देतील व वास्तव्य करतील, या दिशेने विकास करून 'रायगड जिल्हा पर्यटन पॅकेज' म्हणून येणाऱ्या काही काळात पर्यटकांना देण्याचा आमचा प्रयास आहे. कुडा लेण्या विकास, एलिफंटा लेण्यांचा विकास, मुरूड-जंजिरा आदी पर्यटनस्थळांचा विकास करण्यासाठी एएसआय (ASI) कडून परवानगी घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

रोजगार हमी योजना

निसर्ग चक्रीवादळाने आंबा, काजू, नारळ, सुपारी आदींचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, त्यांना भरपाईबरोबरच त्यांना पुर्वपदावर येण्यासाठी बागायतदारांच्या मागणीनुसार १९९२ साली तत्कालीन मुख्यमंत्री काळातील जुनी रोजगार हमी योजना पुन्हा शासनाने सुरू केली आहे. फलोत्पादन योजनेला गती देण्यासाठी 'विकेल ते पिकेल' ही महत्त्वाकांक्षी योजना शेतकऱ्यांसाठी सुरू करण्यात आली आहे. या माध्यमातून शेतकऱ्यांना हमखास भाव मिळणे शक्य होणार आहे.

क्रीडा क्षेत्र

राज्यातील खेळाडूंना त्यांच्या गावात किंवा शहरात सराव करता यावा, योग्य आहार मिळावा, त्यांचा खेळ अधिक उत्तम व्हावा, यासाठी तालुकास्तरावरील क्रीडा संकुल विकसित करण्यात येत आहेत. ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये निवडलेल्या पाच खेळाडूंना प्रत्येकी त्यांच्या खेळासाठी, सराव करण्यासाठी व प्रशिक्षणासाठी प्रथम हप्ता २० लाख रुपये वितरित करण्यात येत आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर पदके मिळालेल्या खेळाडूंना ५ टक्के राखीव पदामधून शासकीय नोकरी देण्याच्या धोरणात बदल करण्याचा प्रयत्न आहे. तसेच पुण्यात आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ स्थापन करण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरू आहे. पुणे येथे ऑलिम्पिक भवन उभारण्यात प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

उज्ज्वल भविष्यासाठी गुंतवणूक

कोरोना काळात महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे, जिथे १६ हजार कोटींची विदेशी गुंतवणूक झालेली आहे. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. त्याव्यतिरिक्त उद्योगाची क्षमता असलेल्या पुणे, कोकण, नाशिक मराठवाड्यातील काही ठिकाणी अधिक विकास होण्यासाठी 'वन पॉईंट विंडो'सारखे धोरण राज्य शासन राबवत आहे. १६ आंतरराष्ट्रीय कंपन्यांबरोबर सामंजस्य करार करण्यात आला आहे. रोजगारासाठी 'ऑनलाइन जॉब पोर्टल' सुरू केले आहे. 'ईज ऑफ डुईंग बिझनेस' अंतर्गत उद्योग सुरू करण्यासाठी लागणाऱ्या कागदपत्रांची संख्या कमी केली आहे.

महिलांच्या न्यायासाठी

महिला व बालक अंतर्भूत असलेली बलात्कार व पॉक्सो (POCSO) कायद्यांतर्गतची प्रलंबित प्रकरणे चालवून त्वरित निकाली काढण्यासाठी राज्यात १३८ विशेष जलदगती न्यायालये स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर रोपवाटिका योजनेंतर्गत महिला बचतगटांना व महिला कृषी पदवीधारकांना दोन ते अडीच लाखांपर्यंतच्या अनुदानातून ग्रामीण भागातील महिलांना प्रोत्साहन व आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. राज्यातील उद्योग, पर्यटन, क्रीडा क्षेत्राताला चालना देण्याबरोबरच राज्यातील अलिबागचा पांढरा कांदा, रोठा सुपारी, काजू या पिकांना जीआय (GI) मानांकन मिळवून देण्याचा प्रयत्न आहे.

शब्दांकन : काशीबाई थोरात-धायगुडे,
विभागीय संपर्क अधिकारी

भारतीय प्रेसच्या स्वातंत्र्यासंबंधी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आणि अनुभव अभ्यासणे महत्त्वाचे आहे. बाबासाहेबांनी संविधान मसुदा समितीचे अध्यक्ष या नात्याने प्रेसच्या स्वातंत्र्यावर विस्तृत चर्चा केल्यावर संविधानाच्या अनुच्छेद १९ मध्ये अन्य पाच स्वातंत्र्याशिवाय भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्याला प्रेसच्या स्वातंत्र्याच्या रूपाने प्रयुक्त केले आहे. सामाजिक स्वातंत्र्यासाठी ते आग्रही होते, मात्र त्यांचे हे विचार त्या वेळच्या वृत्तपत्रांकडून दुर्लक्षित करण्यात आले हेही तितकेच खरे.

प्रेस स्वातंत्र्य : डॉ. आंबेडकरांचा दृष्टिकोन

भि.म. कौसल

स्वातंत्र्य मानवी जीवनातील श्रेष्ठ आदर्श आहे. ज्याप्रमाणे लोकांना आपल्या मर्जीचे सरकार निवडण्याचे स्वातंत्र्य आहे त्याप्रमाणे सरकारच्या उणिवा दाखवण्यासाठी विरोधी पक्षाबरोबरच प्रेसचीही जबाबदारी आहे. भारतात प्रेस कधी उत्तरदायित्वपूर्ण, तर कधी उत्तरदायित्वहीन राहिले आहे. भारतीय प्रेसबाबत डॉ. आंबेडकरांचा आक्षेप होता की, ते वंचितांचा आवाज आणि हितांना प्रतिनिधित्व देण्यात अयशस्वी ठरले आहे. म्हणून प्रेसच्या माध्यमातून लोकशिक्षणाद्वारे स्वातंत्र्याचा व्यापक अर्थ प्रसारित करणे आवश्यक आहे जेणे करून प्रेसचे स्वातंत्र्य खऱ्या अर्थाने सार्थक सिद्ध होईल. बाबासाहेबांनी सर्वसामान्य जनतेच्या समस्यांना मूकनायकमधून वाचा फोडण्याचा प्रयत्न केला.

सामाजिक सुधारणेसाठी आग्रही

भारतात १९४७ पूर्वी इंग्रजी सत्तेविरुद्ध विविध राजकीय पक्षांनी आंदोलने केली. त्या वेळी एक मत प्रवाह होता की, प्रथम राजकीय स्वातंत्र्य प्राप्त करावे आणि भारत स्वतंत्र झाल्यानंतर सामाजिक सुधारणांकडे लक्ष द्यावे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक सुधारणा हा शब्द चुकीचा आहे असे मानत. त्यांच्या मते भारताला सामाजिक सुधारणांची नाही, सामाजिक स्वातंत्र्याची गरज आहे. बालविवाह, विधवा विवाह, हुंडा इत्यादी सामाजिक सुधारणांचे प्रश्न राजकीय नसतात.

सामाजिक स्वातंत्र्याचे प्रश्न अभिन्नरीत्या राजकीय स्वातंत्र्याशी निगडित आहेत. वंचित जातींचे सामाजिक स्वातंत्र्य नाकारणे वस्तूतः राजकीय स्वातंत्र्य नाकारण्यासारखे आहे. म्हणून राजकीय स्वातंत्र्य प्रथम की, सामाजिक सुधारणा प्रथम हे द्विभाजन चुकीचे आहे.

भारताला १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाले. संविधानाच्या मसुदा समितीचे अध्यक्ष या नात्याने संविधान निर्मितीचे कार्य डॉ. आंबेडकरांवर सोपवण्यात आले. संविधानानुसार भारताच्या इतिहासात प्रथमच देशातील सर्व जनतेला समता, स्वातंत्र्य, न्याय व बंधुत्व हे मूल्य आणि अधिकार बहाल करण्यात आले.

डॉ. आंबेडकर यांच्या मतानुसार राजनैतिक स्वातंत्र्य हे सामुहिक स्वातंत्र्य आहे, जे वैयक्तिक स्वातंत्र्याशिवाय अपूर्णच नाही, तर निरर्थकदेखील आहे. व्यक्तिगत स्वातंत्र्य केवळ मत देण्यापुरते मर्यादित नसते, तर व्यक्तीचा सर्वांगीण विकास करण्याची ती एक संधी असते. सर्वांगीण विकासासाठी मानवतावादी, उदार, सहिष्णू आणि विचारशील शिक्षण फार महत्त्वपूर्ण आहे.

डॉ. आंबेडकर यांच्यानुसार भारताने लोकशाहीचे अनुकरण केले आहे. हायेक (Hayek) यांनी त्यांचे पुस्तक 'The constitution of Liberty' जे १९६० मध्ये प्रकाशित झाले, डॉ. आंबेडकरांप्रमाणे त्या पुस्तकात म्हटले आहे की, राजकीय स्वातंत्र्य लोकशाहीकरिता अनिवार्य आहे मात्र, पुरेसे नाही.

प्रेसच्या स्वातंत्र्याबाबत

डॉ. आंबेडकर यांनी म्हटले आहे की 'अमेरिकन जनतेने त्यांचे संविधान विकसित केले कारण त्यांच्यापुढे कोणत्याही भूतकाळातील संविधानाचा आदर्श नव्हता. अमेरिकन लोक स्वतंत्र होते आणि स्वातंत्र्याची महती त्यांना माहिती होती, म्हणून त्यांनी त्यांच्या संविधानाचा आदर केला आणि पालन केले. परंतु भारतीय जनता न कधी स्वतंत्र होती न तिला स्वातंत्र्याचा अर्थ माहिती होता. भारतीयांसमोर केवळ एकांगी राजकीय स्वातंत्र्याची भावना मांडण्यात आली, कदाचित त्यामुळे त्यांच्यात संविधानाप्रति आदरभाव किंवा मैत्रीभाव वाढीस लागला नसावा.'

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रेसच्या स्वातंत्र्याबाबत दोन दृष्टिकोन होते. एक बहुमतावर आधारित लोकशाही आणि दुसरा लोकशाहीमध्ये अल्पमताचे स्थान. लोकशाहीबाबत जे.एस.मिलच्या मताशी सहमती दर्शवत डॉ. आंबेडकर म्हणतात, लोकांच्या मर्जीने

निवडलेले बहुमताचे सरकार असले तरी बहुमताच्या जोरावर निरंकुश पद्धतीने कामकाज करू शकत नाही. बहुमत प्राप्त सरकारला ज्याप्रमाणे कायदे बनवून राज्य कारभार करण्याचा अधिकार असतो, त्याचप्रमाणे अल्पमतातील विरोधी पक्षाला असंवैधानिक कायदे करण्यापासून सरकारला परावृत्त करण्याचा त्याचप्रमाणे संवैधानिक पद्धतीने तयार करण्यात आलेल्या कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्यास टाळाटाळ करत असल्यास सरकारवर टीका करण्याचा अधिकार असतो.

जी समस्या लोकशाहीच्या संचालनाची आहे तीच समस्या प्रेसच्या स्वातंत्र्याचीसुद्धा आहे. लोकशाहीत प्रेसचे सर्वप्रथम कर्तव्य आहे की, चुकीच्या धोरणाबद्दल किंवा सामान्य जनतेच्या हिताकडे दुर्लक्ष केल्यास त्याने निर्भीडपणे सरकारवर टीका करावी. एवढेच नव्हे, तर देशातील अल्पसंख्याक आणि वंचित जनतेशी संबंधित बातम्या आणि त्यांच्या मतांना प्रेसमध्ये न्यायसंमत स्थान द्यावे.

बाबासाहेबांचा अनुभव

भारतीय लोकशाहीतील बहुमत हे राजकीय बहुमत नसून सांप्रदायिक बहुमत आहे. ही बाब भारतीय प्रेसलादेखील लागू होते. भारतातील प्रेस अल्पसंख्याक व वंचितांच्या बातम्यांना महत्त्व देत नाही. लोकलाजेस्तव त्यांच्या बातम्या दिल्या, तरी या समाजाचे मत किंवा दृष्टिकोन नजरेसमोर ठेवून देत नाही. अशा रितीने या समाजाला पूर्वग्रहदूषित प्रेसच्या निरंकुशतेचा सामना करावा लागतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विविध वक्तव्यांतून भारतीय प्रेस वंचितांच्याप्रति पूर्वग्रहदूषित असल्याची बाब सिद्ध होते. नागपूरच्या दीक्षाभूमीवरील ऐतिहासिक धम्मचक्र प्रवर्तन समारंभानंतर दुसऱ्या दिवशी म्हणजे १५ ऑक्टोबर १९५६ रोजी वृत्तपत्र प्रतिनिधींना संबोधित करताना ते म्हणाले. हे प्रेसवाले मागील ४० वर्षांपासून माझ्या मागे हात धुऊन लागले आहेत. माझ्याबाबत यांची भाषा पूर्वग्रहदूषित आणि अपरिपक्व असते. कमीतकमी आतातरी यांनी सत्यवादी आणि प्रामाणिक व्हावे.

भारतीय प्रेसच्या स्वातंत्र्याबाबत डॉ. आंबेडकरांनी ६० वर्षांपूर्वी जी मते व्यक्त केली, आजही त्यात उल्लेखनीय बदल करण्यासाठी वाव आहे. वर्णव्यवस्थेवर प्रेस फारसी टीका करताना दिसत नाही. असे मानले जाते की, प्रामाणिक, सत्य आणि सभ्य लोकशाही व्यवस्थेत प्रेसची भूमिका अल्पसंख्याक व वंचित आणि कमजोर लोकांचा स्वतंत्र दृष्टिकोन आणि अस्मितांच्या प्रश्नांना निष्पक्ष स्थान देणारी असली पाहिजे. परंतु स्वातंत्र्यापूर्वी असे होऊ शकले नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९३१-३२ च्या गोलमेज परिषदेत अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदार संघ मंजूर करून घेतले होते. तेव्हा त्या वेळच्या प्रेसने त्यांना कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ, ब्रिटिश सरकारचा हस्तक म्हणून हिणवले. एवढेच नव्हे, तर डॉ. आंबेडकर स्वातंत्र्य चळवळविरोधी असल्याचा डांगोरा पिटला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना या आरोपांमुळे खूप मनस्ताप सहन करावा लागला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते प्रेस बुद्धिजीवी वर्ग चालवत असल्याने त्यात बुद्धिजीवी वर्गाचे प्रतिबिंब उमटते. आपल्याला हे पटो की न पटो, समाजात वास्तविक परिवर्तन कुणी महान नेता घडवतो की नाही. परंतु आपणास हे मानलेच पाहिजे की, बुद्धिजीवी वर्गच समाजात परिवर्तन घडवतो. कारण सामान्य जनता आपल्या दैनंदिन गरजा पूर्ण करण्याच्या कामात एवढी मग्न असते की, तिला सामाजिक परिवर्तनासारखे प्रश्न समजणे अवघड असते आणि त्यामुळे सर्वसामान्य जनता बुद्धिजीवी वर्गाचे अनुकरण करते. बुद्धी एक साधन आहे आणि बुद्धिजीवी त्या साधनाचा उपयोग कोणत्या साध्यासाठी करतो हे महत्त्वाचे आहे.

स्वातंत्र्यपूर्व भारतीय प्रेसवर डॉ. आंबेडकरांचा आरोप होता की, काँग्रेस व गांधीजी सामाजिक व राजकीय प्रश्नांवर जे बोलतात, लिहितात, त्याचे ते प्रत्युत्तर देत नाही किंवा एकच अप्रासंगिक री ओढतात की, डॉ. आंबेडकरांना सामाजिक सुधारणा प्रथम आणि राजकीय स्वातंत्र्य नंतर हवे. परंतु डॉ. आंबेडकरांनी स्वातंत्र्य चळवळीच्या काळातील हृदयविदारक वास्तविकतेकडे अनेकदा लक्ष वेधले की, या वास्तविकतेपासून आंदोलनाच्या काळातच मुक्ती मिळाली नाही, तर स्वतंत्र भारत धार्मिक फासिस्ट राज्यात परिवर्तित होईल. ज्यात अस्पृश्य आणि वंचितांच्या हक्कांना तिलांजली दिली जाईल आणि ते राज्याच्या दमनकारी धोरणांपुढे पूर्णपणे असाहाय्य होतील. त्यांचे ब्रेनवॉश केले जाईल आणि ते मालकाविना गुलाम बनतील. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाल्यास अस्पृश्यांच्या बरोबरच देशाची विशाल लोकसंख्या (विशेषतः इतर मागासवर्गीय) जी एकूण लोकसंख्येच्या ८५ टक्के आहे कधीही सत्ताधारी पक्ष होऊ शकणारा नाही. परंतु त्या वेळच्या प्रेसने त्यांच्या या आकलनाकडे पूर्णतः दुर्लक्ष केले.

डॉ. आंबेडकरांचा प्रेसच्या स्वातंत्र्यासंबंधी विचार लोकशाहीची व्यापकता आणि लोकशाहीचा दुरुपयोगविषयक विचारांशी निगडित आहे. ज्याप्रमाणे लोकशाही बहुमताच्या निरंकुशतेत परिवर्तित होऊ शकते, त्याचप्रमाणे प्रेस स्वातंत्र्याचा दुरुपयोग करत सांप्रदायिक (Communal) बहुमत कायम राखण्याचा प्रचार करू शकते. ते जनतेला राजकीय बहुमताच्या विचारांबाबत जागरूक करण्याची जबाबदारी प्रभावीपणे पार पाडत नाही, असे बाबासाहेबांचे म्हणणे होते.

(लेखक सेवानिवृत्त माहिती संचालक आहेत.)

राज्य शासन राज्याचा विकास करताना अनेक उपाययोजना करत असते. या उपाययोजना करताना सर्वसमावेशक विकास हा दृष्टिकोन समोर ठेवला जातो. विकासाभिमुख वाटचाल करताना राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात येतात. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीतील निर्णयांचा हा थोडक्यात आढावा.

मंत्रिमंडळात ठरले !

ग्रामीण कुक्कुटपालनाला प्रोत्साहन

कोविड परिस्थितीमुळे फटका बसलेल्या ग्रामीण भागातील शेतीपूरक उद्योगांना पुनरुज्जीवित करण्यासाठी राष्ट्रीय सहकार विकास निगमच्या सहकारी कुक्कुटपालन संस्थांकडून थकबाकीबाबत वन टाइम सेटलमेंट (एकमुस्त करार) करून त्यांना दिलासा देण्याचा निर्णय घेण्यात आला.

शिधावाटप वाहतूक

शिधावाटप यंत्रणेतील अन्नधान्याची वाहतूक अधिक सक्षम करण्यासाठी जिल्हानिहाय स्वतंत्र वाहतूक कंत्राट निविदा प्रक्रिया राबवण्याचा निर्णय घेण्यात आला. याशिवाय जिल्ह्यातील सर्व महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषदा व तालुका मुख्यालयाची ठिकाणे येथे करावयाच्या थेट वाहतुकीसह उर्वरित ग्रामीण क्षेत्रात पहिल्या टप्प्याच्या व दुसऱ्या टप्प्याच्या वाहतुकीसाठी जिल्हानिहाय स्वतंत्र वाहतूक कंत्राट निविदा प्रक्रिया तसेच मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रात स्वतंत्र वाहतूक कंत्राट निविदा प्रक्रिया राबवण्यात येईल. या सर्व निविदांना अंतिम मान्यता देण्यासाठी राज्यस्तरावर समिती स्थापन करण्यासही मान्यता देण्यात आली.

गुणसंवर्धित तांदूळ

राज्यातील ॲनिमियाचे प्रमाण कमी करण्यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत पोषणतत्त्व गुणसंवर्धित तांदूळ (Fortified Rice) वितरित करण्याची योजना संपूर्ण गडचिरोली जिल्ह्यात प्रायोगिक तत्त्वावर राबवण्यास मंजुरी देण्यात आली.

प्राचीन मंदिराचे जतन व संवर्धन

राज्यातील प्राचीन मंदिरांचे जतन व संवर्धन करण्याच्या निर्णयास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली आहे. याबाबतीत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी नुकत्याच झालेल्या विधिमंडळ अधिवेशनात घोषणा केली होती. हा प्रकल्प महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत राबवण्यात येईल. त्यासाठी २०२१-२२ च्या अर्थसंकल्पात १०१ कोटींची तरतूद करण्यात येईल. या प्रकल्पाचे स्वरूप काय असावे, प्राधान्याने कोणती कामे हातात घ्यावी, या कामांचा तपशील कसा असावा, हे ठरवण्यासाठी प्रथमतः शासनस्तरावर समिती नेमण्यास मान्यता देण्यात आली.

महिला शिक्षण दिन

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचा ३ जानेवारी हा जन्मदिवस राज्यातील सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले महिला शिक्षण दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. स्त्री शिक्षणातील क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे योगदान आणि त्यांचे कार्य समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचवणे गरजेचे असल्यामुळे हा निर्णय घेण्यात आला. या दिवशी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित भाषणे, निबंध, वक्तृत्व, परिसंवाद व एकांकिकांचे आयोजन शाळांमध्ये करण्यात येईल.

दुर्बल घटकाचे प्रमाणपत्र

एसईबीसी उमेदवारांना आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाचे (ईडब्ल्यूएस) आरक्षणाचा लाभ शैक्षणिक प्रवेश व सेवाभरती यासाठी होण्याकरिता ईडब्ल्यूएसचे प्रमाणपत्र देण्याचा निर्णय घेण्यात आला.

सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील उमेदवारांना खुल्या प्रवर्गात किंवा ईडब्ल्यूएस आरक्षणातून लाभ घेणे ऐच्छिक असेल, उमेदवाराने शैक्षणिक प्रवेशातील किंवा शासन सेवेत भरतीकरिता ईडब्ल्यूएस आरक्षणाचा लाभ घेतल्यास सदर उमेदवार एसईबीसी आरक्षणाच्या लाभास पात्र ठरणार नाही. ईडब्ल्यएस प्रमाणपत्र देताना एसईबीसी उमेदवारांना मागील आर्थिक वर्षाच्या उत्पन्न व मत्ता याआधारे राज्य शासनाने विहित केलेले निकष लावण्यात येतील.

शक्ती विधेयक

महिला व बालकांवर होणाऱ्या अत्याचारांच्या तक्रारींवर प्रभावीपणे कार्यवाही करता यावी, याकरिता प्रस्तावित कायद्यांची चौकट अधिक बळकट करण्यासाठी महाराष्ट्र शक्ती क्रिमिनल लॉ (महाराष्ट्र अमेंडमेंट) ॲक्ट २०२० आणि स्पेशल कोर्ट ॲड मशिनरी फॉर इंप्लिमेंटेशन ऑफ महाराष्ट्र शक्ती क्रिमिनल लॉ २०२० या दोन प्रस्तावित कायद्यांना विधिमंडळासमोर सादर करण्यास मान्यता देण्यात आली.

एकसमान मुद्रांक शुल्क

मालमत्तांवर कर्ज घेण्यासाठी नोंदणी करावयाच्या करारांसाठी मुद्रांक शुल्क कमी करण्याचा तसेच त्यामध्ये एकसमानता आणण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे यापुढे सामान्य नागरिक, झोपडपट्टीधारक, शेतकरी तसेच अन्य असंघटीत घटक ज्यांच्याकडे नोंदणीकृत दस्त नाही परंतू, सातबारा किंवा मिळकत प्रमाणपत्राचा

पुरावा आहे. अशा घटकाला त्यांच्याकडे असलेल्या मालमत्तेच्या टायटल तथा पुराव्याच्या आधारावर कर्ज घेण्यासाठी नोंदणी करावयाच्या करारनाम्यावर कमी मुद्रांक शुल्क द्यावे लागणार आहे.

शरद पवार ग्रामसमृद्धी योजना

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या संयोजनातून शरद पवार ग्रामसमृद्धी योजना राबवण्याचा निर्णय घेण्यात आला. कामांतून सामूहिक आणि वैयक्तिक पायाभूत सुविधा उपलब्ध करून २०२२ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करून प्रत्येक ग्रामपंचायत व त्या ग्रामपंचायतीतील घटक गावे समृद्ध होतील हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून योजना राबवण्यात येईल.

ॲग्रिकल्चर ॲण्ड टेक्निकल युनिव्हर्सिटी

कोल्हापूर जिल्ह्यातील तळसंदे येथे डी. वाय.पाटील ॲग्रिकल्चर ॲण्ड टेक्निकल युनिव्हर्सिटी या स्वयंअर्थसाहाय्यित विद्यापीठ स्थापनेस मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. विद्यापीठ स्थापनेचा प्रस्ताव विधान मंडळात मांडण्यात येईल. डी.वाय.पाटील एज्युकेशन सोसायटी, पुणे यांना या विद्यापीठाचे प्रायोजक मंडळ म्हणून मान्यता देण्यात आली आहे.

आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ

आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ महाराष्ट्र २०२० च्या प्रारूप विधेयकास मान्यता देण्यात आली. २०२०-२१ च्या अर्थसंकल्पात उपमुख्यमंत्र्यांनी या विद्यापीठाच्या स्थापनेची घोषणा केली होती. हे विधेयक विधिमंडळाच्या अधिवेशनात सादर करण्यात येईल.

एसटी महामंडळास अर्थसाहाय्य

एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करण्यासाठी एक हजार कोटी रुपयांचे अर्थसाहाय्य मंजूर करण्याचा निर्णय घेण्यात आला. यापूर्वी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांचे ऑक्टोबर २०२० अखेरचे वेतन देण्यासाठी गेल्या महिन्यात १२० कोटी इतका निधी आकस्मिकता निधीमधून अग्रिम म्हणून मंजूर करण्यात आला होता. या अग्रिमाची रक्कम वजा करून उर्वरित ८८० कोटी रुपये ६ मासिक हप्त्यात एसटी महामंडळास अदा करण्यात येईल. ही रक्कम हिवाळी अधिवेशनामध्ये पूरक मागणी म्हणून मंजूर करण्यात येईल. (नोव्हेंबर २०२० ते मार्च २०२१ या महिन्यांच्या वेतनासाठी प्रतिमहिना १५० कोटी या प्रमाणे व एप्रिल २०२१ च्या वेतनासाठी १३० कोटी रुपये)

वस्त्यांची नावे बदलणार

राज्यातील शहरे व ग्रामीण भागातील वस्त्यांची जातिवाचक नावे बदलून नवीन नावे देण्याचा निर्णय घेण्यात आला. काही वस्त्यांची नावे महारवाडा, बौद्धवाडा, मांगवाडा, ढोरवस्ती, ब्राह्मणवाडा, माळी गल्ली, अशा स्वरूपाची नावे आहेत. ही बाब महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्याला भूषणावह नसल्याने सामाजिक सलोखा आणि सौहार्द निर्माण होऊन राष्ट्रीय एकात्मता वाढण्याच्या दृष्टीने ही नावे बदलण्याचा निर्णय घेण्यात आला. या वस्त्यांना आता समता नगर, भीम नगर, ज्योती नगर, शाहू नगर, क्रांती नगर तसेच इतर तत्सम नावे देण्यात येतील.

अतिविशेषोपचार रुग्णालये

राज्यामध्ये प्रधानमंत्री स्वास्थ्य सुरक्षा योजनेत अकोला, यवतमाळ, लातूर व औरंगाबाद येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात अतिविशेषोपचार रुग्णालय सुरू करण्यास मान्यता देण्यात आली. यासाठी प्रथम टप्प्याकरिता ८८८ पदांची निर्मितीदेखील करण्यात येईल. या प्रत्येक महाविद्यालयासाठी केंद्र शासन १२० कोटी रुपये, तर राज्य शासन ३० कोटी रुपये अर्थसाहाय्य करणार आहे. सध्या औरंगाबाद येथील बांधकाम ९५ टक्के पूर्ण झाले असून, यवतमाळ येथील बांधकामही जवळपास पूर्ण झाले आहे.

वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय

सिंधुदुर्ग येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि जिल्हा सामान्य रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करून ५०० रुग्ण खाटांचे रुग्णालय संलग्न करण्यास मान्यता देण्यात आली. नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय २०२१-२२ मध्ये सुरू करण्याच्या अनुषंगाने प्रस्ताव ३० नोव्हेंबर २०२० पूर्वी केंद्र शासनास/राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगास सादर करण्यात येणार आहे.

कृषिपंप वीजजोडणीचे नवीन धोरण

नवीन कृषिपंप वीजजोडणीचे धोरण जाहीर करण्यात आले. त्यामध्ये लघुदाब वाहिनी, उच्चदाब वाहिनी, सर्व्हिस कनेक्शन व सौर कृषिपंप यांद्वारे वीजजोडणी देण्याचे पर्याय उपलब्ध

राजकीय व सामाजिक खटले मागे

राज्यातील ३१ डिसेंबर २०१९ पर्यंत दाखल झालेले राजकीय व सामाजिक खटले मागे घेण्याचा निर्णय घेण्यात आला. यापूर्वी १४ मार्च २०१६च्या शासन निर्णयान्वये १ नोव्हेंबर २०१४ पूर्वीचे खटले मागे घेण्याचा निर्णय घेण्यात आला होता. तथापि १ नोव्हेंबर २०१४ नंतर देखील राज्यात विविध राजकीय, सामाजिक व इतर जनआंदोलनाची संख्या सतत वाढते आहे. हे खटले मागे घेण्याबाबत लोकप्रतिनिधी व विविध संघटनांकडून सातत्याने विनंती होत आहे. त्यामुळे ही सुधारणा करण्यात आली. यापूर्वी खटले मागे घेण्याकरिता वित्त व नियोजन मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती गठित करण्यात आली होती. हे खटले काढून घेण्यास आता गृह विभागाचे प्रमुख म्हणून गृहमंत्री हे सक्षम प्राधिकारी असल्याने ही मंत्रिमंडळ उपसमिती आता बरखास्त करण्यात आली आहे.

करून देण्यात आले असून, राज्यभर सुमारे एक लाख कृषिपंप वीजजोडण्या दरवर्षी देण्यात येणार आहेत.

कापूस खरेदी केंद्रे सुरू

राज्यातील कापूस खरेदी केंद्रे सुरू करून त्यांच्यामार्फत कापूस खरेदीस सुरुवात होत आहे. यासंदर्भात पणन विभागाचे प्रधान सचिव यांनी दिलेल्या माहितीनुसार महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक महासंघाद्वारे पहिल्या टप्प्यामध्ये शुक्रवार २७ नोव्हेंबर २०२० पासून एकूण १६ कापूस उत्पादक जिल्ह्यांतील २१ केंद्रामध्ये, तसेच ३३ जिनिंग मिलमध्ये कापूस खरेदी केंद्रे सुरू करण्यात येत आहेत. दुसऱ्या टप्प्यामध्ये निविदेस प्रतिसाद न मिळालेल्या बीड, परभणी आणि जळगाव अशा ३ जिल्ह्यांत ९ कापूस खरेदी केंद्रे डिसेंबर २०२० च्या पहिल्या आठवड्यामध्ये सुरू होणार आहेत. यंदा कापूस पेरा ४२.८६ लक्ष हेक्टरमध्ये झालेला असून, एकूण ४५० लक्ष क्विंटलपर्यंत कापूस उत्पादन होण्याची शक्यता आहे. याबाबत केंद्रीय कापूस खरेदी निगम (सीसीआय) आणि महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक महासंघ यांच्यातर्फे खरेदीचे तंतोतंत नियोजन करण्यात आले आहे.

जड वाहनांवरील पथकरात वाढ

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या खासगीकरण प्रकल्पांवर केवळ जड वाहनांसाठी पथकर दरामध्ये काही प्रमाणात वाढ करण्याचा तसेच कार, जीप, एसटी, स्कूल बसेस व हलकी वाहने यांची सूट कायम ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला.

टीम लोकराज्य

शिक्षक रणजितसिंह डिसले यांचा सन्मान

युनेस्को व लंडनस्थित वार्की फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दिला जाणारा ७ कोटी रुपयांचा 'ग्लोबल टीचर' पुरस्कार सोलापूरच्या परितेवाडी जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक रणजितसिंह डिसले यांना जाहीर झाला. या उत्कृष्ट कामगिरीसाठी श्री. डिसले यांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

जागतिक स्तरावरील शिक्षण क्षेत्रातील सर्वोच्च पुरस्कार रणजितसिंह डिसले यांना मिळाल्याबद्दल अभिमान असल्याचे गौरवोद्गार मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी काढले. श्री. डिसले यांच्यासारखे नावीन्यपूर्ण उपक्रम राबवून शिक्षण क्षेत्रात वेगवेगळे प्रयोग राबवणाऱ्या राज्यातील शिक्षकांना सोबत घेऊन शेवटच्या विद्यार्थ्यांपर्यंत अव्वल दर्जाचे शिक्षण पोहोचवण्यासाठी आराखडा तयार करण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले. या वेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, शालेय शिक्षण मंत्री वर्षा गायकवाड, नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, परिवहन मंत्री ॲड. अनिल परब, पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे उपस्थित होते.

सोलापूरसारख्या दुष्काळी समजल्या जाणाऱ्या भागातील जिल्हा परिषदेतील शिक्षकाने हा पुरस्कार मिळवला ही खरेच अभिनंदनीय बाब असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, तर जिल्हा परिषदेच्या शाळांमधून जागतिक दर्जाचे शिक्षण दिले जात असून, आता इंग्रजी शाळांबरोबर स्पर्धा करणाऱ्या शाळा म्हणून जिल्हा परिषदेच्या शाळा ओळखल्या जात आहेत. यात रणजितसिंह डिसले यांच्यासारख्या शिक्षकांचा मोलाचा वाटा असल्याचे महसूल मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले. शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीमुळे महाराष्ट्राचे नाव जगभर पोहोचवणाऱ्या रणजितसिंह डिसले सरांच्या कार्याचा अभिमान वाटत असल्याचे गौरवोद्गार शालेय शिक्षण मंत्री प्रा. वर्षा गायकवाड यांनी काढले.

उत्कृष्ट कार्याची दखल

लंडनमधील नॅचरल हिस्ट्री म्युझियममध्ये झालेल्या समारंभात सुप्रसिद्ध अभिनेते स्टिफन फ्राय यांनी या पुरस्काराची अधिकृत घोषणा केली. असा पुरस्कार मिळणारे ते पहिलेच भारतीय शिक्षक ठरले आहेत. जगभरातील १४० देशांतील १२ हजारांहून शिक्षकांच्या नामांकनातून अंतिम विजेता म्हणून डिसले सरांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. क्यूआरकोडेड पुस्तकांच्या माध्यमातून महाराष्ट्रच नव्हे, तर देशातील शिक्षण क्षेत्रात अभिनव क्रांती केलेल्या कामाची दखल घेत त्यांना हा पुरस्कार जाहीर झाला आहे. जिल्हा परिषदेच्या शिक्षकाचा ग्लोबल चेहरा म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात आहे. त्यांनी तयार केलेली क्यूआरकोडेड पुस्तके राज्यातील एक कोटींहून अधिक मुले वापरत आहेत.

महाराष्ट्र शासन

माझे कुटुंब
माझी जबाबदारी

महाराष्ट्रासाठी
MAH कसम!

मास्क घाला
हात धुवा
अंतर ठेवा

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th Every Month
Date of Publication : 10th of Every Month

कोविड-१९ हा संसर्गजन्य रोग आहे आणि तो कोणालाही होऊ शकतो.

आपल्या सुरक्षिततेसाठी आवश्यक आहे

घरीच राहा | एकमेकांमध्ये योग्य अंतर ठेवा | हात वारंवार साबणाने स्वच्छ धुवा | श्वसनासंबंधी स्वच्छता राखा

आपण सर्वजण मिळून कोविड-१९ विरुध्द लढू या

अधिक माहितीसाठी संपर्क साधा

• राष्ट्रीय कॉल सेंटर क्र. +९१-११-२३९७८०४६ • राष्ट्रीय नियंत्रण कक्ष क्र. ०२०-२६१२७३९४ • टोल फ्री हेल्पलाइन क्र.१०४ .बीएमसी हेल्पलाइन क्र. १९१६

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र शासन

NHM

unicef for every child

/MahaArogyaIECBureau @MahaHealthIEC /mahahealthiec /MahaHealthIEC राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, पुणे

Visit: www.mahanews.gov.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

प्रति/TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

If undelivered, please return to:

प्रेषक / From

अनिल आलूरकर
उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई – ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक अनिल आलूरकर, उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी मे. मुद्रण प्रिंट एन पॅक प्रा.लि., ए-१८०/४, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७०३ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.

मुख्य संपादक: डॉ. दिलीप पांढरपट्टे